


# संत तुकारामांचा जीवनविचार

निर्मलकुमार फडकुले



# संत तुकारामांचा जीवनविचार

निर्मलकुमार फडकुले

संत तुकारामांचा जीवनविचार
निर्मलकुमार फडकुले

Sant Tukaramancha Jeevanvichar
By Nirmalkumar Phadkule

प्रकाशक :
बाबूराव मैंदर्गीकर
सुविद्या प्रकाशन
३७४, उत्तर कसबा, सोलापूर - ४१३ ००७
फोन - ७२४४१५

प्रथम प्रकाशन :
१४ जानेवारी १९९९

©
निर्मलकुमार फडकुले
'विवेक'
विद्यानगर, उत्तर सदर बजार,
सोलापूर - ४१३ ००३

मुखपृष्ठ :
शिरीष घाटे

मुद्रक :
गणेश फोटो टाईप सेटर्स
३७४, उत्तर कसबा, सोलापूर - ४१३ ००७
फोन - ७२४४१५

मूल्य :
रुपये ८०/- फक्त

'संत तुकारामांचा जीवनविचार' हे प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित पुस्तक १९९९ साली 'सुविद्या प्रकाशन' यांनी प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकाचे चिरंजीव व वारस श्री अजित फडकुले यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्याचे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री अजित फडकुले :-9422463642

ajitphadkule@hotmail.com

यांचे आभारी आहोत.

## ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# संत तुकारामांचा जीवनविचार

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाचे चिरंजीव व वारस श्री. अजित फडकुले यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : २८ जुलै २०२०

(स्व. श्री. निर्मलकुमार फडकुले स्मृतीदिन)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.

## **पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?**

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा.

**वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे**.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

प्रबोधनाचे भाष्यकार

**प्रा.गं.बा. सरदार**

यांच्या प्रेरक स्मृतीस अर्पण.

यांनी मला संतवाङ्मयाकडे पाहाण्याची दृष्टी दिली.

## थोडेसे मनातले .....

तुकयाची अभगंवाणी हे महाराष्ट्राचं अमूल्य असं वैचारिक धन आहे. सामान्यापासून विद्वानापर्यंत तुकारामांचे अभंग सर्वांनाच आकृष्ट करु न घेतात. लोकमानसात इतका दृढपणे रुजलेला दुसरा संतकवी नाही असं म्हटल्यास त्यात अतिशयोक्ती नाही. तुकारामांच्या प्रत्येक अभंगात त्यांचा जीवनविषयक विचार प्रकट झाला आहे. प्रत्येक अभंगात त्यांचं व्यक्तित्व स्पष्टपणानं उमटलं आहे. 'तुका म्हणे होय मनासी संवाद। आपुलाचि वाद आपुल्यासी।' स्वसंवाद करणारे तुकोबा समाजाशीही सतत बोलत होते. लोकजीवन त्यांनी न्याहाळलं. भलेबुरे अनुभव घेतले. आपल्या अनुभवांची कहाणी त्यांनी अभंगांतून सांगितली आहे. ही कहाणी सांगतानाच हा तुकोबा नावाचा मेघ जनतेच्या मनोभूमीवर आपल्या विचाररूपी अमृतधारांची बरसात करीत राहिला. तुकोबा केवळ संत आणि केवळ कवी नव्हते. ते जीवनाचा सूक्ष्म दृष्टीनं शोध घेणारे तत्त्वचिंतक होते. म्हणूनच त्यांनी आपल्या कवितांतून जीवनविचार उत्कटतेनं मांडला आहे. या समाजनिष्ठ संतकवीचं त्याच्या अभंगांतून जे दर्शन होतं. ते जितकं प्रसन्न तितकंच उद्‌बोधक आणि प्रेरक असतं.

या पुस्तकात मी तुकोबांचे सुमारे ७५ अभंग निवडून त्यावर माझ्या दृष्टिकोनातून भाष्य केलं आहे. संत काव्याकडे पाहाण्याची माझी दृष्टी पारंपरिक स्वरूपाची नाही. मला भाविकही कुणी म्हणणार नाही. तुकोबांच्या जीवनविचाराचा मी प्रत्येक अभंगातून शोध घेण्याचा प्रयत्न केला. अभंगाचा अन्वय आणि अर्थ सांगणारं भाविकांच्या पठडीतलं हे पुस्तक नव्हे. आधारासाठी अभंग घेऊन त्यातील जीवनविचार विवरून सांगताना माझ्याही कल्पना आणि विचार या भाष्यांत मिसळलेले आहेत. त्यामुळं विवेचनात त्रुटी आढळल्यास ती जबाबदारी माझी आहे हे वाचकांनी कृपया लक्षात घ्यावं.

तुकोबांचे काही अभंग निवडून त्यावर मी सोलापूर आकाशवाणीच्या श्रोत्यांशी प्रत्येक सप्ताहात बोलावं ही कल्पना आकाशवाणीचे एक साहित्य प्रेमी अधिकारी श्री. सुभाष तपासे यांनी माझ्यासमोर मांडली प्रत्येक आठवड्यात एका अभंगावर भाष्य करायचं अशी त्यांची योजना होती. डॉ.सौ. माधवी रायते यांनी

अभंगगायन करायचं आणि मी अभंगाच्या अनुषंगानं भाष्य करायचं हा क्रम जवळजवळ वर्षभर चालला आहे. अनेक श्रोत्यांनी उत्स्फूर्तपणे हे भाष्य आवडल्याचं मला आणि आकाशवाणीला कळवलं. अखेर हे श्रेय तुकोबाचंच आहे., त्यांच्या गाथेचा मी वर्षानुवर्षे अभ्यास केला तो एक काव्यरसिक या नात्याने. 'तुकयाची अभंगवाणी' हा अक्षय असा 'आनंदाचा डोह ' आहे. या डोहात स्नान करण्याची संधी श्री. तपासे यांनी मला दिली याबद्दल मी त्यांचा आणि आकाशवाणीचा आभारी आहे. पण आकाशवाणीवरून केलेल्या भाषणांत मी अधिक भर टाकली आहे. अभंगांवरील विचार त्रोटक वाटू नये यासाठी प्रत्येक भाष्यात थोडीफार भर टाकावी लागली.

'सुविद्या' प्रकाशनाचे संचालक श्री. बाबूराव मैंदर्गीकर यांनी मित्रभावानं पुस्तक प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली. ते संतसाहित्याचे भक्त आहेत. श्री. शिरीष घाटे यांनी आपल्या कलादृष्टीनं आकर्षक मुखपृष्ठ रेखाटलं. या दोन्ही मित्रांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

ज्या संत तुकारामांनी मला लेखनाची प्रेरणा दिली त्यांच्या संतत्वाला आणि कवित्वाला माझं नम्र अभिवादन.

निर्मलकुमार फडकुले

सोलापूर
१६ नोव्हेंबर १९९८

# अ नु क्र म णि का


१ कन्या सासुऱ्यासी जाये / १
२ सुख पाहता जवापाडे / ३
३ नको नको मना गुंतू मायाजाळी / ५
४ जेथे जातो तेथे तू माझा सांगाती / ७
५ तीर्थी धोंडा पाणी / ९
६ देही असोनिया देव / ११
७ रात्री दिवस आम्हां युद्धाचा प्रसंग / १३
८ वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे / १५
९ आम्ही वैकुंठवासी / १७
१० आम्हां घरी धन शब्दाचीच रत्ने / १९
११ न लगे चंदना सांगावा परिमळ / २१
१२. आनंदाचे डोही आनंद तरंग / २३
१३ जे का रंजले गांजले / २५
१४ चंदनाचे हात पाय ही चंदन / २७
१५ शुद्ध बीजापोटी / २९
१६ दुधाचे घागरी मद्याचा हा बुंद / ३१
१७ काय बा करिसी सोवळे ओवळे / ३३
१८ विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म / ३५
१९ नाही निर्मळ जीवन / ३७
२० ऐसे संत झाले कळी / ३९
२१ दया तिचे नाव भूतांचे पालन / ४१
२२ कस्तुरीचे रूप अति हीनवर / ४३
२३ पतिव्रतेची कीर्ती वाखाणिता / ४५
२४ जोडोनियां धन उत्तम वेव्हारें / ४७
२५ बोलिलो ते काही तुमचिया हिता / ४९
२६ वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा / ५१
२७ आसावले मन जीवनाचे ओढी / ५३
२८ डोळियांचे दैव आजि उभे ठेले. / ५५
२९ चला आळंदीला जाऊ / ५७
३० अगुरणिया थोकडा / ५९
३१ मुंगी आणि राव / ६१
३२ आता तरी पुढे हाचि उपदेश / ६३
३३ वाळो जन मज म्हणोत शिंदळी / ६५
३४ आलिया भोगासी असावे सादर / ६७
३५ आम्हां भय धाक कोणाचा रे पाहे / ६९
३६ धन मेळवुनि कोटी / ७१
३७ माझिया जातीचे मज भेटो कोणी / ७३
३८ आपुलिया बळे नाही मी बोलत / ७५
३९ हिरा ठेविता ऐरणी / ७७
४० ज्यासी आवडी हरिनामाची / ७९
४१ तांबियाचे नाणे न चले खऱ्या मोले / ८१
४२ ब्राह्मण तो याती अंत्यज असता / ८३
४३ कमोदिनी कायजाणेतो परिमळ / ८५
४४ अंतरीची ज्योती प्रकाशली दीप्ति / ८७
४५ आलिया संसारा उठा वेग करा / ८९
४६ दसरा दिवाळी तोचि आम्हां सण / ९१
४७ थोर ती गळाली पाहिजे अहंता / ९३
४८ ओले मूळ भेदी खडकाचे अंग / ९५
४९ मृगाचिये अंगी कस्तुरीचा वास / ९७
५० नाही संतपण मिळत हे हाटी / ९९

५१ ओस जाल्या दिशा मज भिंगुळवाणे / १०१
५२ आधिल्या भ्रतारे काम नव्हे पुरा / १०३
५३ सर्व सुखे आजी येथेंचि वोळली / १०५
५४ पाया जाला नारू / १०७
५५ शूद्रवंशी जन्मलो / ११०
५६ तोवरि तोवरि शोभतील गारा / ११२
५७ क्षमा शस्त्र जया नराचिया हाती / ११५
५८ ज्ञानियांचा गुरू राजा महाराव / ११८
५९ निंबाचिया झाडा साकरेचे आळे / १२१
६० अज्ञानाची भक्ति इच्छिती संपत्ती / १२३
६१ अधिकार तैसा करू उपदेश / १२५
६२ शांतीपरते नाही सुख / १२७
६३ बैसोनी निवांत शुद्ध करी चित्त / १३०
६४ पापाची वासना नको दावू डोळां / १३२
६५ नव्हे जाखाइ जोखाई / १३४
६६ तारूण्याच्या मदे न मनी कोणासी / १३६
६७ जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचे / १३९
६८ तीळ जाळिले तांदूळ / १४१
६९ सेवितो हा रस वाटितो आणिकां / १४३
७० गंधर्वनगरी क्षण एक न राहावे / १४५
७१ गुळ सांडुनी गोडी घ्यावी / १४७
७२ हेचि दान देगा देवा / १४९
७३ जन्म मरणांचि विसरलो चिंता / १५१
७४ याजसाठी केला होता अट्टाहास / १५३
७५ आम्ही जातो आपुल्या गावा / १५६

**कन्या सासुऱ्यासी जाये । मागे परतोनी पाहे ॥**
**तैसे झाले माझ्या जिवा । केव्हा भेटसी केशवा ॥**
**चुकलिया माये । बाळ हुरूहुरू पाहे ॥**
**जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥**

ज्ञानेश्वरांची ओवी आणि तुकारामांची अभंगवाणी लोकमानसात वर्षानुवर्षे - नव्हे शतकानुशतके इतकी खोलवर रुजली आहे की तिची चिकित्सा करणं सुद्धा कठीण व्हावं. तुकोबांच्या कोणत्याही अभंगात ते स्वत: आहेत. त्यांच्या आशाआकांक्षा, त्यांच्या भावना आणि त्यांचं सुखदु:ख या अभंगांतून व्यक्त होतं. तुकोबांची अभंगवाणी ही त्यांची आत्मकहाणी आहे. एक सर्वसाधारण माणूस आपल्या उत्कट भावबळावर अध्यात्माच्या उच्चतम पातळीवर कसा जातो याचं दर्शन त्यांच्या अभंगांतून घडतं. 'कन्या सासुऱ्यासि जाये' हा त्यांचा एक आर्त अभंग आहे. तुकोबांची भक्ती त्यांच्या साऱ्या जीवनाला व्यापून उरलेली होती. परमेश्वरी साक्षात्कारासाठी ते रात्रंदिवस तळमळत राहिले आहेत. एका आर्त विव्हल मनाचं खोल दु:ख या अभंगातून प्रकट होतं. आता तुकोबा अशा अवस्थेला आलेले आहेत की विठ्ठलानं दर्शन दिल्याशिवाय त्यांना कधीच समाधान वाटणार नाही. भक्ताची एकमेव इच्छा ही असते की आपल्याला तो परमात्मा भेटावा. कलावंतांच्या बोटांचा स्पर्श व्हावा म्हणून ज्याप्रमाणं वीणेच्या तारा अंतर्बाह्य उत्सुक झालेल्या असतात, त्याप्रमाणं तुकोबांच्या रक्ताचा प्रत्येक थेंब ईश्वरदर्शनासाठी व्याकुळ झाला आहे. ते विठ्ठलाची प्रार्थना करतात.

'हे विठ्ठला केव्हा भेटणार आहेस ? सासरी निघालेली कन्या पुन्हा पुन्हा आपल्या माहेराकडं व्याकुळ दृष्टीनं पाहाते. तीच व्याकुळता मला वाटत आहे. तुझ्याच चिंतनानं माझं मन आणि जीवन भारून गेलं आहे. तुला डोळांभर पाहावं. तुला क्षेमालिंगन द्यावं यासाठी मी उत्कंठित झालो आहे. चुकलेले मूल आपल्या आईला शोधण्यासाठी सैरभैर होते. आई भेटत नाही असं पाहून ते निराश होऊन रडू लागते. आईशिवाय त्याला काहीच सुचत नाही. कारण आपली माय हाच आपल्या जीवनाचा एकमेव आधार आहे हे त्याला समजलेले असते. त्यामुळं भांबावलेलं, धीर सुटलेलं ते मूल सगळीकडं हुरूहुरू पाहू लागतं. तशी माझी अवस्था झाली आहे. पाण्यावाचून तडफडणाऱ्या माशाप्रमाणंच

मी अत्यंत अस्वस्थ झालो आहे. माझी तळमळ विठ्ठला, तुला दिसत नाही का ?'

तुकोबांच्या या अभंगात त्यांच्या भक्तिमय अंतरंगाचं , त्यांच्या वेदनेचं जे तीव्र दर्शन घडतं ते या अभंगाचं खरं सामर्थ्य आहे. तुकोबांचे शब्द साधे आहेत पण त्यामुळेच हे साधे शब्द सरळ जाऊन वाचकांच्या हृदयाला भिडतात. त्यांच्या मनाला दंश करतात. हृदयाला भिडणारे परिणामकारक शब्द म्हणजे साहित्य. काव्य म्हणजे शब्दांचा खेळ नव्हे. काव्यात कवीच्या भावना झंकारून उठल्या आहेत आणि त्या आपली सुखदु:खं सहजपणानं सांगत आहेत असं वाटलं पाहिजे. संत तुकोबा हे एकाच वेळी स्वत:शी, विठ्ठलाशी आणि वाचकांशी मोकळेपणाने बोलतात. सासरी जाणारी कन्या, चुकलेलं मूल आणि पाण्याविना तडफडणारी मासोळी या तीन अर्थपूर्ण प्रतिमा आपल्या अभंगात त्यांनी सहज गुंफल्या. त्यामुळं तुकोबांचं मानसिक दु:ख परिणामकारक रीतीनं साकार होऊ शकलं. यापुढे जाऊन मी म्हणतो की हे दु:ख एकट्या तुकोबांचं राहात नाही. ते तुमचं, माझं आणि सर्वांचं होऊन जातं. आपल्या मनाची तार तुकारामांच्या मनाशी जुळते. भक्तीचा हा अभंग काव्यदृष्ट्या नितांत सुंदर आहे. साध्या, सुलभ शब्दांतून आपली दु:ख भावना समूर्त करू शकणारा हा अभंग तुकोबांच्या मन:स्थितीवर स्वच्छ प्रकाश टाकणारा आहे.

ज्या विठ्ठलाचा ध्यास या भक्तानं घेतला आहे, त्याची उराउरी भेट व्हावी, त्याची प्रत्यक्ष मूर्ती आपल्या नेत्रांत साठवावी, साऱ्या गात्रांनी त्याला टिपून घ्यावं या परतं भक्ताला काही नको असतं.

*मोक्ष तुमचा देवा। तुम्ही दुर्लभ तो ठेवा। मज भक्तीची आवडी।*
*तुका म्हणे भेटी। पुरे एकचि शेवटी॥*

ते सावळं परब्रह्म भेटलं की जीवन कृतार्थ झालं दुसरी कसलीच इच्छा नाही. तुकोबांची भावस्पंदनं समूर्त करणारा हा अभंग काव्यदृष्ट्याही रमणीय आहे. 'कन्या सासुऱ्यासी जाये' आपल्या डोळ्यांत अश्रू उभे करू शकते. Our sweetest songs are those that tell us the saddest thought. हे वचन सार्थ वाटतं. अश्रूंनी भिजलेला हा अभंग मराठी काव्यात 'अभंग' आहे यात काय संशय ?

❑❑❑

**सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वताएवढे ।।**
**धरी धरी आठवण । मानी संतांचे वचन ।।**
**नेले रात्रीने ते अर्धे । बाळपण ते जराव्याधें ।।**
**तुका म्हणे पुढा । घाणा जुंती जसी मूढा ।।**

संत म्हणजे केवळ देवाचे भजन करणारा एक भक्त असतो अशी कल्पना करणं चुकीचं आहे. संतांच्या ह्रदयात ईश्वरभक्ती असतेच. पण जीवनाची चिकित्सा करण्याची त्यांची प्रवृत्ती असते. हे जग काय आहे, या जीवनाचा नेमका अर्थ काय असू शकेल इत्यादी गूढ प्रश्नांची ते आपल्या अनुभवाच्या संदर्भात साधक बाधक चर्चा करतात. तुकारामांनी जीवनविषयक प्रश्नांची खोल चर्चा आपल्या अभंगांतून केली आहे. ते जीवनाचे आणि समाजाचे अभ्यासक होते. या तत्त्वचिंतक संतानं आपल्या अनुभवांचं सार स्पष्टपणानं मांडलं आहे. तुकोबांच्या डोळ्यांदेखत त्यांची पहिली पत्नी आणि मूल दुष्काळात मरण पावले. वडील भाऊ परागंदा झाला. आईवडिलांचा वियोग झाला होता. एकेकाळी चांगली चालणारी दुकानदारी दुष्काळामुळं उध्वस्त झाली होती. गावातली माणसं उपासमारीनं गांजून गेली होती. त्यांच्या जगण्यालाही अर्थ नव्हता आणि मरण्यालाही अर्थ नव्हता. तुकाराम उघड्या डोळ्यांनी मानवी दुःखदैन्याचं हे विचित्र स्वरूप पाहात होते. त्यांना स्वतःलाही आयुष्याबरोबर सतत झगडावं लागलं. त्यात त्यांना अनेक जखमा झाल्या. माणसाच्या आयुष्यातली ही प्रचंड उलथापालथ पाहिल्यानंतर त्यांनी आपल्या अभंगांतून एक निष्कर्ष काढला. या जगात सुख जवाइतकं थोडं आहे. दुःख मात्र पर्वतासारखं प्रचंड आहे. यासाठी संतांचं वचन मान्य करून ते नेहमी लक्षात ठेवलं पाहिजे असं ते म्हणतात. तुकोबा काही निराशावादी नव्हते. पण जवाइतकं सुख असतं आणि पर्वतप्राय दुःख असतं. हा त्यांचा विचार सर्वमान्य होण्यासारखा आहे. विज्ञानशास्त्रातल्या शोधांनी अनेक सुखांची साधनं निर्माण केली. रेडिओ आला, टी.व्ही. आला, विमानं आली, घरं देखील एअरकंडिशण्ड झाली. तऱ्हेतऱ्हेची वस्त्रप्रावरणं तयार होऊ लागली. पायातल्या पादत्राणापासून शिरस्त्राणापर्यंत क्रांती झाली. पण म्हणून आम्ही सुखी आहोत. आता दुःखं उरलं नाही असं मात्र कुणीच म्हणत नाही. उलट दुःखं गणितश्रेणीत वाढली. नवनवीन रोग निर्माण झाले. प्रचंड

मानसिक तणावाखाली माणूस राहू लागला. सुखसाधनं गोळा करूनही सुख, आनंद, उत्साह मनुष्य हरवून बसला. रात्रीच्या झोपेलादेखील तो महाग झाला. तिजोरीत पैसा आहे. उंची दागदागिने आहेत पण मनाला मात्र विवंचनांच्या शेकडो इंगळ्या डसत आहेत. लोभ आणि क्षोभ, क्रोध आणि मोह या विकारांच्या कात्रीत सापडलेल्या जगाला सुख कुठून मिळणार ? तुकोबांच्या या निष्कर्षात विदारक सत्य आहे. त्यात अतिशयोक्ती मुळीच नाही.

आपल्या या अभंगात ते म्हणतात, शंभर वर्षांच्या आयुष्यातला अर्धा भाग म्हणजे साऱ्या रात्री झोपेत जातात. बाळपणात काही वर्षं जातात. तारुण्याच्या मस्तीत थोडी जातात आणि उरलेली काही रोगात व म्हातारपणात संपून जातात. जन्ममृत्युरूपी घाण्याला माणूस पुन्हा पुन्हा जुंपला जातो. आयुष्याचा हा हिशेब अगदी रोखठोकपणे तुकोबांनी मांडला आहे. या प्रकारच्या नीरस आणि निराश जीवनात आपल्या पदरात कितीसं सुख पडणार आहे ? जवाइतकं सुख मिळविण्यासाठी दु:खाचे पहाड चढून जाण्यात कोणता शहाणपणा आहे याचा विचार माणसानं गंभीरपणानं केला पाहिजे. संत हा विचार स्थिर बुद्धीनं करतात. ते आशावादी नाहीत. निराशावादी नाहीत किंवा पलायनवादीही नाहीत. ते सर्वार्थानं सत्यवादी आहेत. या सत्य शोधनातून त्यांना जे सापडलं ते समाजकल्याणासाठी त्यांनी सडेतोडपणानं सांगून टाकलं. कधीकधी तर जवाइतकंही सुख लाभत नाही. फुलाची पाकळीही पदरात पडत नाही. काटे मात्र नको तितके मिळतात हे ध्यानात ठेवून संतांनी सांगितलेल्या वाटेनं मनुष्यानं चालत राहाण्यातच त्याचं खरं कल्याण सामावलं आहे. तुकोबा विफलतेचा सूर आळवतात असा गैरसमज या अभंगामुळं होण्याचा संभव आहे. पण ते वैफल्याचं समर्थन करीत नाहीत. आयुष्याचं कठोर दर्शन त्यांना घडवायचं आहे. दु:खावर मात करण्यासाठी मनुष्यानं आपली कर्तव्यं पार पाडावीत आणि *'मन करारे प्रसन्न । सकळ सिद्धीचे कारण ॥'* असा आशाप्रेरक संदेश ते आपल्या काव्यातून देतात. *'आलिया भोगासी असावे सादर'* असं म्हणणारा हा संतकवी जीवनाचा चिंतक असून त्याचं सम्यक स्वरूप स्पष्ट करीत आहे. सुख राईएवढं, दु:ख मात्र पर्वताएवढं या विधानाशी आपण सहमत आहोत. ही साऱ्यांचीच अनुभवकथा आहे.

□□□

**नको नको मना गुंतू मायाजाळीं । काळ आला जवळी ग्रासावया ॥**
**काळाची हे उडी पडेल बा जेव्हा । सोडवीना तेव्हा मायबाप ॥**
**सोडवीना राजा देशीचा चौधरी । आणिक सोहरी भली भली ॥**
**तुका म्हणे तुला सोडवीना कोणी । एका चक्रपाणी वाचूनियां ॥**

माणूस मायामोहाच्या जाळ्यामध्ये कळत न कळत गुरफटून जातो. मायेचं हे जाळं फसवं असलं तरी अत्यंत आकर्षक असतं. त्यामुळंच माणसाचं मन तिकडं ओढ घेत असतं. काही वेळा अज्ञानानं मनुष्य त्यात पुरता गुंतून पडतो. पण काही प्रसंगी समजत असूनही तो स्वत: होऊन मायाजाळात अडकून बसतो. अल्पकाळ त्याला त्यात आनंद वाटतो पण नंतर मात्र पश्चात्ताप करण्याशिवाय हातात काहीच उरत नाही. सर्वच साधुसंतांनी क्रोध, मान, माया, लोभ आणि मोह यांच्यापासून विवेकानं आपण अलिप्त राहिलं पाहिजे असं पुन्हा पुन्हा सांगितलं आहे. पण मोहाचे पाश चिवट असतात. मायेचं जाळं अतूट असतं, याचा अनुभव श्रेष्ठ व्यक्तींना देखील आलेला आहे. तिथं सामान्य मनुष्य अगदी सहजपणानं या जाळ्यात फसला तर त्यात कसलं आश्चर्य ? सोन्याचं हरीण असू शकत नाही हे रामचंद्रासारख्या प्रज्ञावंताला कळलेलं नव्हतं काय ? ही माया आहे. हा केवळ आभास आहे. ही वंचना आहे. हे त्या महापुरुषाला कळत होतं. पण सीतेचा हट्ट आणि नाही म्हटलं तरी कांचनमृगाचा मोह यांचा प्रतिकार रामाला करता आला नाही. तो धनुष्यबाण घेऊन त्या हरिणाच्या पाठीमागे धावत गेला. द्यूत खेळण्याचा मोह युधिष्ठिराला आवरला नाही. आपली फसवणूक केली जात आहे हे त्याला कळत होतं पण मनात ईर्ष्या होती. मायेचं जाळं असंच साऱ्यांना खेचून घेतं. नंतर मात्र काहीही उपाय चालत नाही म्हणून तुकोबांसारखा सत्पुरुष *'नको नको मना गुंतू मायाजाळी'* असं आपल्याही मनाला आणि साऱ्या माणसांना कळवळून सांगत आहे. काळाची उडी केव्हा पडेल हे सांगता येत नाही. त्यावेळी आपल्याला आईबाप वाचवू शकत नाहीत. सत्ताधारी राजाही अशावेळी दुबळा ठरतो. आप्त, नातलग, मित्र कोणीही आपल्याला काळाच्या पंजातून सोडवू शकत नाहीत. सोडवण्याची शक्ती एकट्या परमेश्वरापाशी आहे.

संत तुकोबांच्या या वचनात संपूर्णपणानं सत्य भरलेलं आहे. मोह मायेच्या पाशात

फसलेल्या माणसाला थोडावेळ सुखाचा आभास होऊ शकेल कारण त्याची इंद्रियं त्याला आभासात्मक सुखात गुंतवून ठेवतात. त्याचा परिणाम असा होतो की जीवनातल्या श्रेष्ठ मूल्यांचा त्याला संपूर्णपणानं विसर पडतो. तो स्वत:ची मोहजालातून सुटका करून घेण्यासाठी कसलाच प्रयत्न करीत नाही. चिखलात रुतलेला प्राणी अधिकाधिक खोल बुडत जातो. तशीच त्याची अवस्था होते. याच स्थितीत कोणत्याही क्षणी मरणाचा हल्ला होतो. या मरणाच्या वेगवान लाटेबरोबर वाहात चाललेल्या माणसाला कोणतीही शक्ती वाचवू शकत नाही. हे लक्षात घेऊन मुळातच मोहमायेचे पाश आपल्या भोवती बांधले जाऊ नयेत यासाठी मनुष्यानं सदैव सावध असावं, जागृत असावं.

*तुका म्हणे मना पाहिजे अंकुश ।*
*नित्य नवा दीस जागृतीचा ॥*

जो मनावर अंकुश ठेवतो, जो आपल्या वासना विकारांना विवेकाच्या ताब्यात ठेवतो, जो मोह आणि माया यांचा प्रतिकार करीत राहतो त्याला प्रत्येक दिवस नवीन जागृतीचा, प्रगतीचा, मानसिक शांतीचा आणि आनंदाचा दिसू शकतो. यासाठी संयमाचा संदेश तुकारामांनी आपल्याला दिलेला आहे. मायाजाळात गुंतलेल्या कैक व्यक्तींची कशी ससेहोलपट होत आहे हे दररोज वृत्तपत्रांतून वाचायला मिळतं. म्हणूनच तुकोबांच्या शब्दांत आपले सूर मिसळून आपणही म्हणू- नको नको मना गुंतू मायाजाळी ।
मायेचे असंख्य प्रकार आहेत. मोहाची अनंत रूपे आहेत. आपले जीवन मयसभेसारखे फसवे असते. जपून पाय टाकला पाहिजे. माया म्हणजे वंचना. वंचनेच्या पाशात अडकू नये म्हणून सतत आपल्या मनाचा शोध घेतला पाहिजे. कारण मनासारखं चंचल आणि अनेकरंगी दुसरं काय आहे ? पण मन माणसाला नको तिथं नको त्या वाटेनं खेचून नेतं. सर्वनाशाकडं माणूस ओढला जातो. *'मना सज्जना भक्ति पंथेचि जावे'* हे समर्थ वचन सार्थ आहे. मानसिक सौंदर्य हेच खरं सौंदर्य असतं. मनाला मलिन करणाऱ्या अनेक विचारांपासून अलिप्त राहावं हा तुकोबांचा संदेश मानलां पाहिजे.

❑❑❑

**जेथे जातो तेथे तू माझा सांगाती । चालविसी हाती धरूनिया ॥**
**चालो वाटे आम्ही तुझाचि आधार । चालविसी भार सवें माझा ॥**
**बोलो जाता बरळ करिसी ते नीट । नेली लाज धीट केलो देवा ॥**
**अवघे जन मज झाले लोकपाळ । सोइरे सकळ प्राणसखे ॥**
**तुका म्हणे आता खेळतो कौतुके । झाले तुज सुख अंतर्बाहीं ॥**

आपल्याला या जीवनात सर्वस्वी आधार जर कोणाचा असेल तर तो केवळ परमेश्वराचा आहे. आपल्या भक्ताची चिंता तोच वाहातो. जिथं जावं तिथं तोच संगतीला असतो. जे जे आपण करतो ते सारं कार्य पार पाडण्यासाठी तो साहाय्यभूत होतो. संत तुकोबांचा देवाच्या ठायी असा अभंग विश्वास आहे. आपल्या साऱ्या जीविताचं नियमन देवच करीत असतो ही तुकोबांची भूमिका आहे नव्हे तो त्यांचा अनुभव आहे. आपल्या प्रत्येक श्वास निःश्वासाच्या मागे ईश्वर आहे. ईश्वर केवळ आपल्या बाह्य जीवनाचं नव्हे तर आपल्या आंतरिक जीविताचं, आपल्या शक्तीचं, बुध्दीचं, सुखदुःखाचं नियमन आणि नियंत्रण करीत आहे. ही भक्ताची भावना असते. भक्तीचं हे उदात्त आणि उत्कट रूप आहे. आपण जावं तिकडं आपल्या साथीला परमेश्वर आहे ही जाणीव असल्यावर माणसाच्या हातून अनैतिक किंवा अभद्र असं काही घडणंच शक्य नाही. भक्त जणू देवाच्या दृष्टीने पाहातो. प्रत्येक पाऊल टाकताना देव भक्ताचा हात धरून त्याला वात्सल्यानं चालवतो. भक्ताचा सारा भार त्या परमदयाळू परमात्म्यानंच स्वीकारलेला असतो. ही भक्ताची अनुभूती खरोखर त्याच्यात विलक्षण आत्मविश्वास निर्माण करू शकते. तुकोबांनी माझा सर्व भार तू घेतलास असं त्या ईश्वराला म्हटलं याचा अर्थ ईश्वरी शक्ती आपल्या पाठीशी उभी आहे, आता आपण निःशंक, निर्भय होऊन वाट चालत राहिलं पाहिजे. दैवी शक्तीनंच जिथं मदतीसाठी आपला हात धरला आहे तिथं वाट चुकणंच शक्य नाही. परमार्थाच्या मार्गानं जात असताना इतका समर्थ आधार मिळणं ही भक्ताच्या दृष्टीनं महान भाग्याची घटना आहे. तुकोबा म्हणतात, 'हे परमेश्वरा, हे जीवाच्या जीवना, हे त्रैलोक्याच्या संचालका, तूच आमच्याबरोबर राहून आमचा योगक्षेम चालवतोस. माझ्या तोंडून काही चुकीचे शब्द निघाले, मी काही बरळत राहिलो तर तूच त्या शब्दांना नीटनेटकेपणा देतोस. माझं कवित्व ही तुझीच कृपा आहे. सारं जग मला प्राणसख्याप्रमाणं

वाटत आहे. तुझ्या सान्निध्याच्या अंतर्बाह्य सुखानं मी कृतार्थ झालो आहे. सर्वार्थानं सुखी बनलो आहे.

तुकोबांच्या या अभंगातून त्यांच्या दृढ भक्ती बरोबरच दृढ अशा आत्मप्रत्ययाचं-ही दर्शन घडतं. जावं तिथं, पाहावं तिथं, ऐकावं तिथं परमेश्वराचं रूप, त्याचा प्रेमळ स्पर्श, त्याचा आश्वासक असा धीर देणारा आवाज आणि सर्वत्र जाणवणारं त्याचं व्यक्तिमत्व जेव्हा भक्त अनुभवतो तेव्हा भक्त आणि परमेश्वर जणू परस्परांत मिसळून गेलेले असतात. तिथं मग द्वैत उरत नाही. सर्वच श्रेष्ठ भक्तांना हा साक्षात्कारी सुखानुभव आलेला आहे. नामदेवाशी देव बोलत होता, एकनाथांच्या घरात तो काम करीत होता. चोखामेळ्याच्या झोपडीत त्याला तो दिसत होता. जनाबाईच्या बरोबर तो दळणकांडण्यात मग्न होत होता. असं जे म्हटलं जातं ते 'परम' अर्थानं घ्यायचं असतं. वरवरच्या वाच्यार्थानं ही विधानं तपासायची नसतात. मातेच्या अंतःकरणात सदैव तिच्या तान्हुल्याचं वास्तव्य असतं त्याप्रमाणं भक्ताच्या हृदयात तो परमेश्वर घर करून बसलेला असतो. भक्तानं आपल्या जीवनाचं सारं स्वामित्व परमात्म्याकडं सोपवलेलं असतं. ही समर्पणशीलता आहे. पतिव्रता ज्याप्रमाणं पतीच्या सुखदुःखात बुडून पतिमय झालेली असते त्याप्रमाणं तुकोबांसारखा भक्त विठ्ठलरूप झालेला आहे. आणि म्हणूनच हा महान संत म्हणतो, तू माझ्या सुखदुःखात, जागृतीत आणि स्वप्नात सर्व अवस्थांत माझ्याबरोबर आहेस. परमेश्वर आपल्याबरोबर आहे यासारखं जीवनात दुसरं सुख कोणतं आहे ?

परमेश्वर स्वरूपाची ठिणगी प्रत्येकाच्याच अंतःकरणात असते. तिच्या अस्तित्वाची जाणीव होण्यासाठी मन मात्र जागरूक असावं लागतं. आपल्या तनामनात ईश्वरी चैतन्य भरलं आहे याचं भान आलं की मनुष्य आत्मविश्वासानं चालू लागतो. अखेर मनुष्य हेच देवाचं रूप नव्हे काय ? आपल्या अणुरेणूत ईश्वरी चैतन्य सामावलेलं आहे ही भावना भक्ताला प्रोत्साहित करणारी असते. श्रीकृष्णानं अर्जुनाला म्हटलं होतं, *'मां अनुस्मर युध्य च'* माझं स्मरण कर आणि युद्ध करायला लाग. याचा अर्थ मी तुझ्याबरोबर आहे. जिथंजिथं तू जाशील तिथं तिथं मी तुझा सांगातीच आहे. तुझ्या जीवनशक्तीच्या मुळाशी मीच आहे. याच अभिप्रायानं तुकोबांनी हा अभंग लिहिला आहे. साऱ्यांचा विरोध पत्करून देखील संत कधी कधी वेगळी वाट शोधतात तेव्हा त्यांना याच ईश्वरी शक्तीचा आधार असतो. ❑❑❑

**तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं ।।**
**मिळालिया संत संग । समर्पितां भले अंग ।।**
**तिर्थी भाव फळे । येथे अनाड ते वळे ।।**
**तुका म्हणे पाप । गेले गेल्या कळे ताप ।।**

लक्षावधी, कोट्यवधी लोक तीर्थयात्रा करतात. तीर्थवंदना केल्यामुळे आपली सर्व पातकांतून मुक्ती होते आणि आपल्याला मोक्षाची प्राप्ती होते असा समज असंख्य लोकांचा झालेला आहे. तीर्थक्षेत्रातल्या नदीत स्नान केलं की सर्व पातकं धुवून निघतात या कल्पनेमुळं पाण्यात बुचकाळी मारणं हे एक पवित्र कार्य आहे अशी धारणा लोकांची झालेली आहे. तुकाराम महाराजांच्या विचारात नेहमीच स्पष्टवक्तेपणा आणि तर्कशुद्धता असते. जे आपल्या अंत:करण प्रवृत्तीला पटतं ते सांगताना त्यांनी कुणाचाही मुलाहिजा ठेवला नाही. या संत पुरुषाच्या शब्दांत सडेतोडपणा आहे. तीर्थक्षेत्रांच्या संदर्भात या अभंगात त्यांनी व्यक्त केलेला विचार बुद्धिवादी असून तो लोकभ्रमावर प्रहार करणारा आहे. त्यांनी स्वच्छपणानं सांगितलं की तीर्थक्षेत्रांत असतं तरी काय ? धोंडा आणि पाणी याशिवाय तिथं काय दिसतं ? ज्या देवाच्या शोधात तुम्ही दूरदूरच्या यात्रा करता तो देव तीर्थक्षेत्रावर राहातो हे तुम्हाला कोणी सांगितलं ? देव धोंड्यात नसतो. देव पाण्यात नसतो. धोंड्याची पूजा करून आणि पाण्यात बुडी मारून तो महान परमेश्वर कसा प्राप्त होणार ? देवाचा निवास साधुसंतांत आणि सज्जनांत असतो. संतांचे हृदय हेच खरं तीर्थक्षेत्र. त्याच्या मनातल्या प्रेमगंगेत ज्याला स्नान करता येतं त्यालाचं परमेश्वर भेटू शकतो. खरं म्हटलं तर देव आणि सज्जन यांच्यात काहीच अंतर नाही. सज्जनाचं मन नेहमीच साऱ्या जगाविषयी करुणेनं आणि ममतेनं ओथंबलेलं असतं. तो कसलाच भेदभाव करीत नाही. त्याचं कुणाशीही शत्रुत्व नसतं. सज्जन वाणी म्हणजे वात्सल्याची अखंड वाहाणारी पवित्र नदी असते. ज्ञानेश्वरांनी सज्जनाचं वर्णन करताना म्हटलं आहे-

*जो खांडावेया घावो घाली । का लावणी जेयाने केली ।।*
*दोघां अेकचि साऊली । वृक्ष जैसा ।*

झाड ज्याप्रमाणं लावणी करणाऱ्यालाही सावली देतं आणि घाव घालणाऱ्यालाही तितक्याच आपुलकीनं सावलीत घेतं. त्याप्रमाणं संत सज्जन असतात.

अखंड प्रेम, निरुपाधिक प्रेम, सर्वांविषयी समदृष्टी ही दैवी लक्षणं त्यांच्यात असतात म्हणून एका अर्थानं तेच देव असतात. स्वत: तुकाराम महाराज याच योग्यतेचे महापुरुष होते. ज्ञानेश्वर याच कोटीतले होते. या दोन्ही संतांचा दुष्ट प्रवृत्तींनी कमी छळ केला नाही. पण त्यांच्या विषयी मनात या संतानी कटुता ठेवली नाही. संत सर्वांच्या कल्याणासाठी सर्वकाळ धडपडत असतात.

*'जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारे ॥*
*संतांचिया गावी । प्रेमाचा सुकाळ । नाही दु:ख तळमळ लवलेश ॥'*

हेच परमेश्वराचं स्वरूप आहे. हा परमेश्वर सज्जनांच्या रूपानं जगात अवतीर्ण होतो. आणि आपल्या जीवनाच्या माध्यमातून जगाचं कल्याण करतो. संतांची संगती लाभणं म्हणजेच परमेश्वराची प्राप्ती होणं! तुकोबांच्या या विचारात मानवतावाद, तर्कवाद यांचा सुंदर संगम झाला आहे. तीर्थयात्रा केल्यानं मुक्त होता आलं असतं तर जगाचे सारे प्रश्न केव्हाच सुटले असते. धोंडा आणि पाणी म्हणजे तीर्थ नव्हे. संत-सज्जनाच्या सहवासात, जीवनदृष्टीत, व त्यांच्या सेवेत मूर्तिमंत परमेश्वराचं दर्शन घडू शकतं. देव कुठं आहे ? तो केवळ सज्जनांतच सामावलेला आहे. माणसातच देव आहे. अत्यंत सुंदर व समर्पक उत्तर तुकोबांनी देऊन देवविषयक प्रश्नाला पूर्णविराम दिला आहे.

माणसातच देव असतो हे विधान तत्वत: बरोबर असलं तरी बहुसंख्य माणसं स्वार्थी प्रवृत्तींनी का पछाडलेली असतात ? त्यांच्या मनात क्रूरता, दांभिकता का असते ? हिंसाचार, रक्तपात, जाळपोळ, लुटालूट असल्या घृणास्पद व्यवहारांत माणसं का गुंतलेली आहेत ? हा प्रश्न उपस्थित करता येईल. याचं उत्तर 'अज्ञान' हेच आहे. या लोकांच्या ठायी सुद्धा परमेश्वर असतो पण त्यांना याची जाण नसते. ती जाणीव त्यांना करून देणं हे संतांचं कार्य असतं. तंतुवाद्यात सूर मूलत:च आहे. पण कलावंताच्या बोटानं तार छेडल्याशिवाय तो सूर प्रकट होत नाही . माणसातलं परमसंगीत जागं करणं हे संतांचं उद्दिष्ट आहे. म्हणूनच 'देव रोकडा सज्जनी' असं म्हटलं. सज्जन व्यक्तित्वातच परमात्म्याचा निवास असतो असं सांगून तुकोबांनी एक उदात्त, बुद्धिवादी विचार आपल्याला दिला आहे. माणूस हेच देवाचं सुंदर रूप आहे.

❑❑❑

**देही असोनिया देव । वृथा फिरतो निर्दैव ।।**
**देव आहे अंतर्यामीं । व्यर्थ हिंडे तीर्थ ग्रामीं ।।**
**नाभीं मृगाचे कस्तुरी । व्यर्थ हिंडे वनांतरीं ।।**
**साखरेचे मूळ ऊस । तैसा देहीं देव दिसे ।।**
**दुधीं असता नवनीत । नेणे तयाचे मथित ।।**
**तुका सांगे मूढजनां । देहीं देव का पाहाना ।।**

देव कुठे आहे ? या प्रश्नाचं तत्त्वशुद्ध उत्तर तुकाराम महाराजांनी या अभंगात दिलं आहे. देवाचा शोध करण्यासाठी माणसं रानावनात हिंडतात. डोंगर पर्वत पालथे घालतात. दूरदूरच्या तीर्थयात्रा करतात. नद्यात आणि समुद्रात तो परमेश्वर असेल म्हणून तिथे स्नान करतात. मंदिरात जातात. मूर्तीत देव आहे अशी समजूत करून घेतात. व्यर्थ हिंडत असतात. पण तो देवाधिदेव त्यांना दिसत नाही. सापडत नाही. कस्तुरीच्या गंधानं मोहित झालेल्या हरिणानं त्या सुवासाचा शोध करण्यासाठी रानावनातून उरी फुटेपर्यंत धावावं पण हा सुगंध कुठून येतो हे त्याला कळू नये असा हा प्रकार आहे. त्याच्या नाभीतच कस्तुरीचं केंद्र असतं. तो अलौकिक सुगंध त्याच्या इतका जवळ असतो की त्यामुळंच त्याला तो कुठं आहे हे कळत नाही. तो परमात्मा खरं सांगायचं तर बाहेर कुठंही नसतो. म्हणून तुकोबा म्हणतात, 'अरे, व्यर्थ कशाला वणवण फिरतोस ? इतक्या तीर्थयात्रा केल्यास, सापडला का तुला तो त्रैलोक्याचा अधिपती ? तू त्याला बाहेर पाहाण्याचा प्रयत्न केलास. तुझी दृष्टी तुझ्याच अंतरंगाचा शोध घेऊ दे. तू अंतर्मुख हो. निरखून पहा स्वत:च्याच मनात. देव तुझ्याच देहात आणि मनात कधीपासून थांबला आहे. पण तू मात्र त्याच्याकडे पाठ फिरवून साऱ्या जगाकडं पाहात राहिलास. देवाचा निवास भक्ताच्या अंतर्मनातच सदैव असतो. देह हेच त्याचं मंदिर. उसात जशी साखर असते त्याप्रमाणं आपल्या देहाच्या अणुरेणूत, प्रत्येक कणात तो दयाघन त्रैलोक्यनाथ सामावून गेला आहे. दुधातच लोणी असतं. पण ते माणसाला कळत नाही. मंथन केल्याशिवाय लोणी मिळत नाही. तसं आपल्या मनाचं आपण मंथन केलं पाहिजे. परमेश्वर प्रकट होऊन भक्ताला इतकंच म्हणेल, 'अरे वेड्या, माझी हाक तुला ऐकू येत नव्हती. तू बाहेरचे शेकडो आवाज ग्रहण करीत होतास. पण तुझ्याच हृदयसतारीवर झंकारित होणारं

दैवी संगीत मात्र तुला जाणवत नव्हतं. आता मी तुझ्या देहात, मनात, बुद्धीत, साऱ्या प्राणांत पूर्णपणे मिसळून गेलो आहे हे ध्यानात घे. जो बाहेर पाहातो त्याला मी भेटत नाही. जो आपल्या अंत:करणात आणि दैनंदिन जीवनात मला शोधतो त्याला मी तात्काळ दिसतो.'

तुकोबांची देवविषयक दृष्टी कशी सूक्ष्म आणि व्यापक होती याचं प्रत्यंतर या अभंगांतून येतं. साखर उसात असते आणि लोणी दुधात असतं हे सर्वांना परिचित असलेले दृष्टांत घेऊन तुकोबा देह आणि देव यांचं अभिन्नत्व सिद्ध करतात. सारं जगत् ह्या परमेश्वरी शक्तीचाच आविष्कार आहे. ह्या सिद्धांत या अभंगातून त्यांनी सुलभ रीतीनं मांडला आहे. तत्त्वज्ञानासारखा विषय तुकोबांच्या अभंगवाणीतून जेव्हा प्रकट होतो तेव्हा तो रसमय झालेला असतो. नुसता सिद्धांत ते सांगत नाहीत. तो पटवून देण्यासाठी दररोजच्या अनुभवातले सोपे दृष्टांत घेऊन देव कुठं आहे या प्रश्नाचं ते परिणामकारक उत्तर देतात. हा अभंग जसा पंडिताला समजेल तसाच तो सामान्यातल्या सामान्य माणसालाही कळेल म्हणूनच तुकोबाची वाणी ही प्रसादगुणानं नटलेली आहे. रस कुठं आहे या प्रश्नाचं उत्तर तो तुकारामांच्या अभंगातच आहे असंच द्यावं लागेल. त्याप्रमाणं विश्वाच्या अणूरेणूतच ती ईश्वरी शक्ती सामावलेली आहे. माणसाच्या मनात तर ती आहेच आहे. माणूस हे ईश्वराचंच रूप नव्हे काय ? ही देवविषयक जाणीव जितकी सखोल तितकीच सत्य आहे. विश्वरूप झालेल्या संतालाच हे भान येतं. आपण सामान्य माणसं मात्र शेंदूर फासलेल्या दगडाला देव मानतो. प्रेमानं समरसतेनं पाहिलं तर जनीं जनार्दन, जगीं जगदीश्वर आहे, आत्म्यात परमात्मा आहे याची अनुभूती येऊ शकते. यापुढे जाऊन मीच तो परमात्मा ही साक्ष पटते. पण यासाठी मनाभोवतीच्या साऱ्या भिंती नाहीशा कराव्या लागतात. तुकोबा मुक्त मनाने, मुक्त दृष्टीने जीवन व्यतीत करीत होते म्हणूनच ते म्हणतात, 'देव आहे अंतर्यामी.' अंतरीचा देव पाहाण्यासाठी स्थूलदृष्टीचा उपयोग नाही. दृष्टी सूक्ष्म आणि रसशोधक असावी लागते. खरं तर देव होऊनच देव पहावा लागतो. मग सारं विश्व विश्वंभराचं दर्शन घडवू शकतं. तीर्थयात्रेपेक्षा मनरूपी तीर्थाची यात्रा करावी.

❑❑❑

**रात्री दिवस आम्हां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ॥**
**जीवा ही आगोज पडती आघात । येऊनिया नित्य नित्य करी ॥**
**तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळे । अवघियांचे काळे केले तोंड ॥**

संत तुकारामांचे समग्र जीवन ही एका संघर्षाची कहाणी आहे. सुरवातीची वीस एक्वीस वर्षे तुकोबांच्या जीवनात फारशी खळबळ नव्हती. ज्या वाटेवरून ते चालले होते ती वाट साधी सरळ होती. फारसे खाचखळगे नव्हते पण पुढे दुष्काळाची आपत्ती आली. सारं घर धुवून निघालं. त्या भयानक दुष्काळात तुकोबांची पहिली पत्नी आणि मूल यांचा मृत्यू झाला. आईवडिलांचा मृत्यू आधीच झाला होता. वडील भाऊ सावजी पहिल्यापासूनच विरक्त होते. त्यांच्या पत्नीचं देहावसान झाल्यानंतर ते तीर्थयात्रेला जे घरातून निघून गेले ते परतलेच नाहीत. नियतीच्या वेगवान लाटेनं तुकारामांच्या आयुष्यात प्रचंड उलथापालथ केली. दुर्दैवाचे आघात झेलता झेलता तुकोबा अंतर्मुख झाले. परिस्थितीचं चिंतन करू लागले. उध्वस्त झालेल्या प्रपंचाचा खोलवर विचार करू लागले. विचारशील माणसाच्या मनातला वैचारिक आणि भावनिक संघर्ष तीव्र असतो. वावटळीत एखादं पान गिरक्या घेत राहावं तशी अवस्था तुकोबांची झाली. परमार्थाच्या दिशेनं त्यांच्या मनानं झेप घेतली. साऱ्या प्रापंचिक सुखदु:खांच्या पलीकडं जाण्याची ओढ त्यांच्या मनाला लागलेली होती. पंख झेप घेऊ पाहात होते. पण पाय मात्र जमिनीशी बांधलेले होते. या प्रकारचा अटीतटीचा संघर्ष प्रत्येक मुमुक्षूच्या मनात नेहमीच होत असतो. विशेष म्हणजे ज्या नानाविध संघर्षांना त्यांना तोंड द्यावं लागलं ते संघर्ष अनेक पातळ्यांवरचे होते. त्यांचं स्वरूप गुंतागुंतीचं होतं. तुकोबांच्या जागी दुसरा एखादा दुबळा माणूस असता तर तो केव्हाच खचून गेला असता. पुन्हा उठून उभाच राहिला नसता. पण सर्व प्रकारचे आघात सहन करीत हा वीर पुरुष चालतच राहिला. जे आपल्या अंत:करण प्रवृत्तीला पटेल तेच तो करीत राहिला.

तुकोबांचा लढा जितका स्वत:च्या मनाशी होता तितकाच तो बाह्य जगाशीही होता. आजूबाजूचं जग या श्रेष्ठ ध्येयवादी संताला ओळखू शकलं नाही. व्यापार उदीम करणारा आणि आता व्यवहारात बुडालेला एक सामान्य वाणी एवढीच जगाच्या हिशेबी त्यांची किंमत होती. तुकोबांच्या ठायी असलेले कवित्व आणि संतत्व, त्यांचं विचारसंपन्न

मन बाह्य जगाला लवकर उमजलं नाही. जातिव्यवस्थेतही त्यांना मिळालेलं स्थान खालचं होतं. म्हणूनच *'यातिशूद्र वैश्य केला वेवसाय. शूद्र वंशी जन्मलो, घोकाया अक्षर मज नाही अधिकार'* असे खिन्नतेचे उद्‌गार त्यांना अनेक ठिकाणी काढावे लागले. उच्चवर्णीय समजल्या जाणाऱ्या लोकांनी तुकोबांच्या वाटेत काटे पसरल्याचा इतिहास आहे. तथाकथित पंडितांनी तुकारामांची योग्यता न ओळखता त्यांचा मानसिक छळ केला. एकूण या संताचं संपूर्ण जीवन अनेक प्रकारच्या संघर्षांनी ओतप्रोत भरलेलं दिसतं. पण तुकोबा हे परमेश्वराचे अत्यंत उत्कट भक्त होते. तत्त्वचिंतक होते. सर्वसामान्य माणसांवर आपल्या मायेचा वर्षाव करून त्याचं दुःख हलकं करणारे मित्र होते. आणि आईच्या वात्सल्यानं रंजल्या गांजल्या लोकांना ते पोटाशी धरत होते. अंधाराशी लढायचं असेल तर अंतःकरणातला प्रेमाचा दीपक प्रज्वलित केला पाहिजे. मन प्रसन्न ठेवलं पाहिजे. आणि पायाखाली काटे असतानाही आपल्या हृदयातला सुगंध जगाला दिला पाहिजे ही त्यांची भूमिका होती. यासाठीच त्यांचा संघर्ष होता.

*'तुका म्हणे तुझ्या नामाचियां बळे । अवघियांचे काळे केले तोंड'*

विठ्ठलनामाच्या प्रभावानं आपण सर्व संकटं नाहीशी केली हा आनंदोद्‌गार तुकोबा काढतात.

जीवन हे लहान मोठ्या संघर्षांनी भरलेलं आहे. काही कवींनी आयुष्याला क्रीडांगणाची उपमा दिली पण हे जीवित एक रणांगण आहे हाच अनुभव बहुसंख्य लोकांना येतो. निकरानं संघर्ष करताना व्यक्तीचे गुण कसाला लागतात. दृढनिश्चयानं संघर्ष करूनही काही वेळां अपयश पदरी येतं. प्रत्येक संताला, क्रांतीकारकाला, महापुरुषाला पराभवाचे चटके सहन करावे लागतात. पण तो पराजयातूनही आत्मविजयाकडे निग्रहानं वाटचाल करीत राहातो. संघर्ष केल्याशिवाय मोठेपणा प्राप्त होत नाही. केवळ अपघातानं आलेला तात्पुरता मोठेपणा अल्पकाळ टिकतो. ज्ञानेश्वर--तुकारामांसारखे महनीय संत हे आंतरिक आणि बाह्य संघर्ष करीत करीत महानतेच्या ध्रुवताऱ्यापर्यंत पोहोचलेले आहेत हे लक्षात घेतलं पाहिजे. अशुभाशी, अन्यायाशी, अधर्माशी लढा देत देत उच्च मूल्यं विजयी होत असतात हा या अभंगाचा भावार्थ आहे.

□□□

**वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरें। पक्षीही सुस्वरे आळविती ॥**
**येणे सुखे रुचे एकांताचा वास। नाही गुणदोष अंगा येत ॥**
**आकाश मंडप पृथिवी आसन। रमे तेथे मन क्रीडा करी ॥**
**कंथा कमंडलू देह उपचारा। जाणविले वारा अवसरू ॥**
**हरिकथा भोजन पखडी विस्तार। करोनि प्रकार सेवू रुची ॥**
**तुका म्हणे होय मनासी संवाद। आपुलाचि वाद आपणांसी ॥**

ज्याचं मन आकाशासारखं मोकळं झालं आहे आणि ज्याच्या अंत:करणात कोणतीही भेदभावना उरलेली नाही, ज्याचे सगळे स्वार्थ गळून गेले आहेत असा साधुपुरुष भोवतालच्या सृष्टीशी समरस होऊन सदैव आनंदित असतो. प्रत्येक माणसाच्या हृदयात प्रेमभावना काही प्रमाणात असते पण संतांच्या हृदयात मात्र निखळ प्रेम ओसंडून वाहात असतं. द्वेष, मत्सर, कटुता, परकेपणा किंवा हे माझं म्हणून मला प्रिय, हे माझं नाही म्हणून ते अप्रिय असं त्यांच्या मनात कधी येतच नाही. साऱ्या सृष्टीशी संतांचा आत्मिक संबंध असतो. केवळ स्वत:साठी काही मिळावावं अशी आकुंचित इच्छाच उरलेली नसल्यामुळं सारं विश्व त्यांना आत्मरूपाचा आविष्कार आहे असा अनुभव येत असतो. तुकोबांच्या प्रेमशक्तीचा सतत विकास होत गेला. आधी तुकोबा लहान होते एखाद्या झऱ्यासारखे. पण ते चिंतनानं, तपस्येनं आणि अनुभूतीनं वाढत गेले. झऱ्याचं रुपांतर नदीत झालं. एक दिवस नदीच सागररूप बनली. त्याप्रमाणं तुकाराम साऱ्या सृष्टीच्या अंत:करणाशी संवाद करू लागले. *'अणुरणियां थोकडा। तुका आकाशाएवढा ॥'* हे स्वत:चं त्यांनी केलेलं वर्णन अगदी यथार्थ आहे. ज्ञानेश्वरांनीही एके दिवशी ताटीचं दार बंद केलं होतं. पण ते उघडलं आणि मग *'हे विश्वचि माझे घर'* अशी विशाल, व्यापक अनुभूती त्यांना आली. चराचराच्या ठायी आपण आहोत याची साक्ष त्यांना पटली. महापुरुषाच्या जीवनाचा असाच विकास होत असतो.

'वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे' हा तुकारामांचा एक प्रसन्न करणारा आणि त्यांच्या रसज्ञ वृत्तीचं व हृदयस्थ वत्सलतेचं दर्शन घडवणारा अभंग आहे. केव्हाही हा अभंग गुणगुणावा. मन समाधानानं भरून जातं. तुकोबा म्हणतात, वृक्ष आणि वेली, वनात राहाणारे प्राणी आणि सुस्वर गायन करणारे पक्षी हे आमचे सोयरे आहेत. तुकोबांचं झाडावरचं आणि वेलीवरचं हे प्रेम आपल्याला प्रेरणा देतं. वृक्ष, वेली, गवत, रानातले

वेगवेगळे पशू आणि पक्षी मला माझ्या अगदी जवळचे वाटतात. ही एकरूपता केवळ शाब्दिक नाही. सृष्टीचे आणि माझे जणू जन्मोजन्मीचे अनुबंध आहेत. तुकाराम महाराज हेही भक्तीच्या वृक्षावर बसून शांतीचे गीत गाणारा आनंदी पक्षी आहे. तो परमेश्वर अनंत रूपांनी, अनंत रंगांनी आपल्यासमोर दिसत आहे. सारी सृष्टी ही त्याच्याच व्यक्तित्वाची अभिव्यक्ती आहे अशी साक्ष तुकोबांना पटली होती. आपल्या सुखाचं वर्णन त्यांनी काव्यमय भाषेत केलं आहे. आकाशाच्या मंडपात सारी पृथ्वी हे आमचं आसन आहे. माझं मन सर्वत्र क्रीडा करू शकतं. हरिकथेचं आकंठ भोजन आम्ही करतो. त्याची रुची आगळीच आहे. या हर्षनिर्भर वातावरणात मी माझ्या मनाशी संवाद करतो. स्वत:शी वादविवादही करतो. तुकोबांच्या निर्मळ, निरुपाधिक मनाचं सोज्ज्वळ दर्शन या अभंगातून आपल्याला घडतं. आज आपण निसर्गापासून दूर गेलो आहोत. आजच्या यांत्रिक आयुष्यात वृक्षवेली आणि पशुपक्षी आपल्याला दिसतही नाहीत. तुकोबा वृक्षांच्या मेळाव्यात रमत होते आणि तुम्ही आम्ही सिमेंट कॉंक्रीटच्या जंगलात हरवून गेलो आहोत. टी. व्ही. वर दिसणारं झाड आम्हाला आवडतं. पण खरं झाड कधी डोळाभरून पाहात नाही. पक्ष्याचा मधुर आलाप कानावर येत नाही. फिल्मी धांगडधिंग्यात मात्र आपण रंगलो आहोत. सृष्टीशी मैत्री आपली कधी होतच नाही. चार भिंतीत कोंडून घेतलेल्या आजच्या 'मॉडर्न' माणसाला तुकोबांच्या या सुखाची कशी कल्पना येणार ? पृथ्वीच्या आसनावर निळ्या नभाखाली बसून वृक्षवेलीशी संवाद करणारे तुकोबा आपल्याला एकच संदेश देत आहेत - निसर्गावर प्रेम करा. सृष्टीचं संगीत हृदयानं ऐका.

निसर्गाच्या मनमोकळ्या सहवासात राहायला आणि त्यातला आनंद भरभरून घ्यायला मन खऱ्या अर्थानं जिवंत असायला हवं. माथ्यावरच्या आकाशाचंच उदाहरण घेतलं तर त्या आकाशाची अनेक रूपं मोहिनी घालणारी आहेत. पहाटेचं धूसर आकाश. सकाळचं सूर्यकिरणांनी उजळलेलं आकाश. रात्रीच्या अंधारात चमचमणाऱ्या चांदण्यांचं आभाळ, काळ्या ढगांनी भरलेलं आकाश. वृक्ष, वेली, हिरवंगार गवत, खळाळून वाहाणारे ओढे, गळणारी पानं आणि त्यांच्याजागी येत असलेली लालसर कोवळी चिमुकली पानं. सृष्टी तर सौंदर्याची आणि नावीन्याची कधीच न ओसरणारी आश्चर्ययात्रा आहे. या यात्रेत तुकोबा आनंदानं सहभागी झाले आहेत. आपल्यालाही त्यांच्याबरोबर दोन पावलं टाकता आली पाहिजेत.

❑❑❑

**आम्ही वैकुंठवासी । आलो याचि कारणासी ।**
**बोलिले जे ऋषी । साच भावे वर्ताया ।।**
**झाडू संतांचे मारग । आडराने भरले जग ।।**
**उच्छिष्टाचा भाग । शेष उरले ते सेवू ।।**
**अर्थे लोपली पुराणे । नाश केला शब्दज्ञानें ।।**
**विषयलोभी मन । साधने बुडविली ।।**
**पिटू भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।।**
**तुका म्हणे करा । जयजयकार आनंदे ।।**

*'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती, देह कष्टविती उपकारे'* तुकारामांनी ही संतांची व्याख्या केली आहे. जगताचं कल्याण हेच संतजीवनाचं एकमेव उद्दिष्ट असतं. लोककल्याणासाठी अविश्रांत कष्ट करण्याची संतांची प्रकृती असते. पाऊस पाडणं हे जसं मेघांचं कार्य, प्रकाश देणं हा जसा सूर्याचा स्वभाव त्याप्रमाणं जगाच्या सुखासाठी प्रयत्नशील राहाणं हा संतांचा धर्म असतो. आपला धर्म ते कल्पांतीही सोडत नाहीत. तुकोबा म्हणतात त्याप्रमाणं वैकुंठवासी असलेले संत माणसांच्या कल्याणासाठी पृथ्वीलोकावर येतात. ऋषी मुनींनी पूर्वी जे सांगितलेलं असतं त्याचं पुन्हा प्रतिपादन करून समाजजीवनाचा गाडा योग्य मार्गानं चालावा यासाठी साधुसंत प्रयत्न करीत राहातात. संत म्हणजे कोणीतरी निरुद्योगी, निरुपयोगी, निष्क्रिय असा माणूस हा अनेकांचा गैरसमज आहे. बाह्यत: पाहिलं तर संत कोणताच उद्योग व्यवसाय करीत नाहीत. ते आपल्या चिंतनात, आत्मध्यानात आणि भजन-कीर्तनात रमलेले असतात. संतांना स्वत:चा असा प्रपंच नसतो, असला तरी ते त्यात गुरफटलेले नसतात. लोकांच्या ज़ीवनात विचार-आचारांचं सात्विक सौंदर्य निर्माण व्हावं हाच त्यांना ध्यास लागलेला असतो. असे सामाजनिष्ठ वृत्तीचे संत म्हणजे जगाचे मार्गदर्शक असतात. तुकोबा म्हणतात, पूर्वीच्या संतांनी घालून दिलेले मार्ग पुन्हा खाचखळग्यांनी आणि धुळीनं, चिखलानं भरून गेलेले आहेत, ते झाडून पुन्हा स्वच्छ, सुंदर करण्याची आमची जबाबदारी आहे. हे जग आडरानातून चाललेलं आहे. वासना, विकार यांच्या आहारी गेल्यामुळं जगाला परमार्थ कळेनासा झाला आहे. स्वार्थाची पूजा आणि वासनेची तृप्ती यापलीकडं लोकांना जीवनाचा अर्थ कळत नाही. शब्दज्ञान्यांनी शास्त्र पुराणांचा अर्थ योग्य रीतीनं लावला

नाही. म्हणून हे अज्ञान नाहीसं करण्यासाठी 'आम्ही वैकुंठवासी आलो याचि कारणासाठी'.

या अंभगांतून तुकोबांनी आपल्या कार्याचं व्यापक स्वरूप स्पष्ट केलं आहे. प्राचीन ऋषीमुनींचा धर्म जो काळाच्या ओघात लुप्त झाला तो पुन्हा स्पष्टपणे समजावून सांगणं हेच आपलं ध्येय आहे. तुकोबांचं समाजनिरीक्षण चौफेर होतं. विषयांच्या आधीन झालेला हा समाज आपल्या जीवनात अनेक प्रकारच्या दु:खांची पेरणी करीत आहे. हे कुणीतरी त्याला पुन्हा पुन्हा आत्मीयतेनं, कधी रागानं तर कधी वात्सल्यानं सांगितलं पाहिजे. तुकोबांची ही भूमिका केवळ परमार्थी संताची नसून ती समाज घडवू पाहाणाऱ्या समाजसुधारकाची आहे. दोन प्रकारचे साधू असतात. पहिल्या प्रकारचे साधू केवळ आत्मकल्याणाला महत्त्व देतात, ते समाजाशी संपर्क ठेवीत नाहीत. ज्ञानाची आराधना, तपस्या यांच्या माध्यमातून त्यांना मुक्ती मिळवावयाची असते. दुसऱ्या प्रकारचे साधुसंत समाजावर मन:पूर्वक प्रेम करतात. *'अवघाचि संसार, सुखाचा करीन'* ही त्यांची प्रतिज्ञा असते. वासनाविकारांच्या जाळ्यात अडकून आत्मनाशाकडं झेपावणाऱ्या समाजाला बंधमुक्त करून त्याला शाश्वत सुखाची वाट दाखवणं हे त्यांचं कार्य असतं. ज्ञानदेव-तुकाराम-नामदेव हे दुसऱ्या कोटीतले महनीय संत आहेत. तुकोबांचा हा अभंग त्यांच्या कार्यपद्धतीवर स्वच्छ प्रकाश टाकतो.

पूर्वीच्या ऋषीमुनींनी जे सांगितलं तेच पुन्हा सांगण्यासाठी या पृथ्वीवर आलो आहोत असं तुकोबा म्हणतात. कोणताही संत सर्वार्थानं नवीन असं काही सांगत नाही. तुकारामांच्या पूर्वी हजारो वर्ष महापुरुषांनी हेच सांगितलं होतं. पण महात्म्यांच्या वाटा धुळीनं भरून जातात. पाऊलखुणा पुसून जातात. म्हणून पुन्हा या वाटा स्वच्छ कराव्या लागतात. काजळी चढलेली दिव्याची वात पुन्हा पुन्हा स्वच्छ करावी लागते. नाही तर अंधाराशिवाय पदरात काहीच पडणार नाही. *'उजळावया आलो वाटा'* असं तुकोबांनी म्हटलं आहे. भावार्थ दीपिकेची नवी ज्योत ज्ञानेश्वरांना लावावी लागली कारण गीतारुपी ज्योतीचा प्रकाश लोकांना स्वीकारणं कठीण होऊ लागलं म्हणून जुन्या ज्योतीवर नवी ज्योत पेटवणं आवश्यक होतं. जे एकदा सांगितलं ते पुन्हा पुन्हा विवरून सांगावं लागतं. संत हे कार्य करीत असतात. तुकोबांच्या हा अभंग संतांच्या कार्याची स्पष्ट कल्पना देणारा आहे.

❑❑❑

**आम्हां घरी धन शब्दाचीच रत्नें । शब्दाचीच शस्त्रें यत्न करू ।।**
**शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दें वाटू धन जनलोकां ।।**
**तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव । शब्देंचि गौरव पूजा करू ।।**

शब्द ही एक विलक्षण शक्ती आहे. शब्दांच्या माध्यमातूनच आपले विचार आणि भाव प्रकट होत असतात. शब्द नसते तर हे जीवन निस्सार झालं असतं. शब्दांतूनच संस्कृतीचं रक्षण झाल. शब्द आहेत म्हणूनच श्रीकृष्णाची स्फूर्तिदायक सुंदर वाणी रणांगणावर अर्जुनाला ऐकायला मिळाली. आणि त्याच्या निमित्तानं भगवंताची 'गीता' जगाला लाभली. शब्दांत तत्त्वज्ञान असतं. भावनांचे पाझर असतात. आईचा शब्द ऐकला की तान्हं मूल आनंदित होतं. शब्द हे तर साहित्याचं सामर्थ्य आहे. आज आपण तुकोबांचे शब्द ग्रंथित करून ठेवले त्यातूनच 'तुकाराम गाथा' आकाराला आली. सूर्य मावळल्यावर जसा अंधार होतो तसा वैचारिक अंधार शब्द मावळल्यानंतर निश्चित होईल.

तुकोबा हे मराठी भाषेला, काव्याला आणि ईश्वरभक्तीला गोमटं रूप देणारे शब्दांचे प्रभू आहेत. साऱ्याच संतांनी भाषेला आणि भावनेला इतकंच नव्हे तर संस्कृतीला व जीवनाला आपल्या शब्दांनी बळ दिलं. जीवनाचा रस दिला. स्वत: तुकोबांना आपल्या ठायी असलेल्या शब्दशक्तीची जाणीव होती. शब्दांचं माहात्म्य त्यांना माहीत होतं. म्हणूनच ते अभिमानानं म्हणतात, 'आमच्या घरी शब्दरत्नांचं अमूप धन आहे. आमच्या हातात शब्दरूपी शस्त्रं आहेत. हे शस्त्र घेऊनच आम्ही प्रयत्न करतो. परमेश्वर नामाची आणि भक्तीची असंख्य शब्दरत्नं आमच्या घरात साठवली आहेत. आमच्या जीवनाचं जीवन म्हणजे शब्द. हे शब्दरूपी धन आम्ही लोकांना वाटतो. शब्द हाच आमचा देव. शब्दांनीच आम्ही या देवाची पूजा करतो. अगदी थोडक्या शब्दांत शब्दांची महती तुकोबांनी स्पष्ट केली आहे. शब्द कमी पण अर्थ मात्र विशाल, व्यापक अशी तुकोबांची वाणी असते. त्यांचा प्रत्येक अभंग म्हणजे मोजक्या शब्दांत उभं केलेलं विस्तृत अर्थाचं शिल्प असतं. कवी हे शब्दसृष्टीचे ईश्वर असतात. याची साक्ष तुकोबांच्या अभंगांतून आपल्याला पटते. शब्द हा देव आहे हे सांगताना तुकोबांनी शब्दांचं पावित्र्य गृहीत धरलं आहे. त्यावरच त्यांचा भर आहे. नाही तर शब्दांत वासनाविकाराची दुर्गंधी असू शकते. सज्जनांच्या निंदेने बरबटलेले अपवित्र शब्दही असू शकतात. चांगल्या मूल्यांची

करू शकतो. लोखंडाचं सुवर्ण करणं हे परिसाचं कार्य संत महंत करीत असतो. एका अर्थानं हा अभंग संतांच्या व्यक्तित्वाचं आणि सामर्थ्याचं दर्शन घडवतो. छत्रपती शिवाजी राजांनी पाठवलेली सारी संपत्ती तुकोबांनी तिला स्पर्शही न करता परत केली. तुकोबांच्या चारित्र्याचा नाश करण्यासाठी काही दुष्ट लोकांनी एका सुंदर गणिकेला त्यांच्याकडं पाठवलं होतं. तुकोबांनी *'पराविया नारी रखुमाई समान'* असं म्हणून तिला आई अशी हाक मारली. त्या चंचल स्त्रीच्या मनात पश्चात्तापाची लाट उचंबळून आली. तुकोबांच्या पायांवर मस्तक ठेवून तिनं त्यांची क्षमा मागितली. आपला छळ करणाऱ्या लोकांविषयी त्यांनी कधी वाईट विचार केला नाही. द्वेषाची किंवा सूडाची किंचित्ही छटा त्यांच्या चित्तात उमटली नाही. सज्जनांचा सज्जनपणा हे मानवी जीवनात क्वचित आढळणारं पण अत्यंत मूल्यवान असं सौंदर्य आहे. दुर्जनांना सुजनांची किंमत कळत नाही त्याप्रमाणं मलयगिरीवर राहाणारी भिल्ल स्त्री चंदनाची योग्यता न ओळखता त्याचा चुलीसाठी जळण म्हणून वापर करते. जळतानाही चंदन सुगंधच देते. सज्जन मनाचं समग्र सामर्थ्य वर्णन करणारा हा तुकोबांचा अभंग त्यांच्याही जीवनावर स्वच्छ प्रकाश पाडतो.

कोणाचाही द्वेषमत्सर न करणं हा जसा सज्जनांचा धर्म असतो त्याप्रमाणं सज्जनांचा छळ करणं, त्यांच्या सुजनत्वाची कुणी स्तुती केली तर मत्सरानं भडकून उठणं, त्यांच्या मार्गात काटे पसरणं हा दुर्जनांचा धर्म असतो. भवभूती नावाच्या एका कवीनं म्हटलं आहे, सज्जनांना अकारण छळणं आणि साध्वी स्त्रियांबद्दल निष्कारण अपप्रचार करणं हे दुर्गुण दुष्टांच्या ठायी जन्मत:च असतात. हे द्वंद्व जगात कायम टिकणारं आहे. कदाचित दुष्ट अधिक आहेत म्हणूनच सज्जनांना जगात प्रतिष्ठा आहे. दुष्टत्वाची दुर्गंधी नाहीशी करून सुष्टत्वाचा चंदनगंध लोकजीवनात दरवळत राहावा यासाठी प्रत्येक काळात तुकोबासारखे संत आवश्यक आहेत. ते दुर्मिळ असतात हीच दु:खाची घटना आहे. काटेरी झुडपं सर्वत्र दिसतात चंदनाचं झाड मात्र केव्हातरी पाहायला मिळतं. महाराष्ट्राच्या भूमीवर तुकोबांच्या रूपानं एक सुगंधी चंदनवृक्ष आजही उभा आहे.

❑❑❑

**शुद्ध बीजा पोटी । फळ रसाळ गोमटी ॥**
**मुखी अमृताची वाणी । देह देवाचे कारणी ॥**
**सर्वांग निर्मळ । चित्त जैसे गंगाजळ ॥**
**तुका म्हणे जाती । ताप दर्शनें विश्रांती ॥**

काही माणसे दृष्टीला पडली की आपला कपाळशूळ उठतो. मन अत्यंत अस्वस्थ होते. कारण त्यांचे दर्शन मनाची शांती नष्ट करते. काही व्यक्तींच्या पोटात लपलेला भयानक स्वार्थ आणि दांभिकता त्यांच्या मुद्रेवर दिसते. काही लोक निर्दय असतात. एक प्रकारच्या निष्ठुरतेने आणि तुच्छतेने जगाकडे पाहात असतात. त्यांचा गर्विष्ठपणा, त्यांच्या नजरेतली स्नेहशून्यता आपल्याला जाणवते आणि आपले मन अशांत, अस्वस्थ होते. पण साधुसंतांच्या मुखमंडलावर एक प्रकारची तृप्ती आणि शांती असते. त्यांच्या डोळ्यांतून जणू वात्सल्याच्या धारा बरसत असतात. त्यांच्या शब्दांत मृदुता असते. त्या शब्दांतलं प्रेमाचं संगीत आणि माणुसकीची सुरावट आपल्याला ओढून घेते. संत ज्ञानेश्वरांनी अशा सत्पुरूषाचे वर्णन करताना म्हटलं आहे,

*स्वये श्वसणे चि ते सुकुमार । मुख मोहाचे माहेर ।*
*माधुर्या जाहले अंकुर । दशन तैसे ॥*
*पुढां स्नेह पाझरे । मागां चालती अक्षरे ।*
*शब्द पाठी अवतरे । कृपा आधी ॥*
*तैसे साच आणि मवाळ । मितले परि सरळ ।*
*बोल जैसे कल्लोळ । अमृताचे ॥*

त्याचं मुख प्रीतीचं माहेर असतं. त्याचे दात जणु माधुर्याचे अंकुर असतात. तो कोणाशीही बोलत असला तरी प्रथम प्रेम पाझरतं आणि मागून अक्षरं चालतात. कृपा आधी प्रकट होते. शब्द नंतर प्रकट होतात. कोणालाही न खुपणारं सरळ, सत्य असं त्याचं बोलणं म्हणजे अमृताच्या लाटाच असतात. हे संत सज्जनाचं चित्र आहे. संत तुकोबाही आपल्या शब्दांतून त्याचं असंच सुंदर चित्र रेखाटतात. बीज शुद्ध असलं म्हणजे त्यातून रसमय गोमटी फळं उत्पन्न होतात. संताचं अंतःकरण असंच शुद्ध असतं. त्याच्या मुखी अमृताची वाणी सामावलेली असते. आणि आपला देह तो देवकार्यासाठी

मी आलो तुझा पिसारा पसरून तू नृत्य कर असं मेघ मयूरांना सांगत नाही. चंदनाच्या विलक्षण सुगंधामुळे सारं रान भरून जातं. सूर्याच्या प्रकाशामुळे जग जागं होतं. मेघ आल्यावर मोर नाचू लागतो. हे सारं अंत:करणापासून घडतं. कोणाच्या सांगण्यामुळं किंवा आज्ञेमुळं हे घडत नाही. माझ्या अंत:करणात भाव दाटून येतात. ते आवेगानं माझ्या अभंगांतून प्रकट होतात. ते भाव आवरता येत नाहीत. जे खरं असतं ते लपवता येत नाही.

तुकोबांनी या अभंगांतून कलेचं आणि काव्याचं रहस्य फार मार्मिकपणानं स्पष्ट केलं आहे. *'जाळा वाचून कढ नाही आणि मायेवाचून रड नाही'* हा वाक्प्रचार सर्वांना माहीत आहे. तुकारामांचं काव्य असंच अकृत्रिम आणि अस्सल आहे. ते बावनकशी सोनं आहे. मुलाम्याचं नाणं नव्हे. काव्याच्या बाजारात तुकारामांचा अभंग म्हणजे खणखणीत वाजणारा बंदा रुपया आहे. जे मुळात सुंदर असतं त्याला जाहिरातीची जरूर नसते. जे मुळातच कुरूप असतं त्याला कितीही सजवलं तरी ते सुरूप होत नाही. कलेचा आणि उत्तम जीवनाचा एक महत्त्वपूर्ण सिद्धांत या अभंगातून त्यांनी सांगितला आहे.

'Art is a desire of a man to express himself ' तुकोबांना आपल्या ठायी कवित्वाची कला आहे याची जाणीव असावी असं वाटतं. पण आपल्या कलेच्या वर्तुळातच फिरणारा हा कलावंत नव्हता. तो मुख्यत: लोकमन घडवू इच्छिणारा मानवतावादी संत आणि प्रबोधनकार होता. तुकोबांच्या काव्यात जी प्रामाणिक तळमळ दिसते तीच त्यांच्या लोकमान्यतेला कारणीभूत ठरली. जनतेच्या मनात विठ्ठलभक्तीची आणि नीतीमूल्यांची बीजं पेरण्याची त्यांची इच्छा होती. हे कार्य करताना त्यांना स्वत:साठी काहीच नको होते. चंदनाचा सुवास साऱ्या रानासाठी असतो. आपण सुगंधित आहोत हे त्याला सांगावं लागत नाही. मराठी भक्तिकाव्यात तुकोबा म्हणजे एक चंदनवृक्ष आहेत. अंतर्बाह्य सुवासानं दरवळणाऱ्या या चंदनाचा गंध शतकानुशतकं घमघमत राहील. कारण हा सुगंध तुकारामांच्या जीवनाचा आणि अनुभवाचा अर्क घेऊन अवतरला आहे. तो मराठी सारस्वताचा जिवंत घटक बनला आहे.

❑❑❑

**आनंदाचे डोहीं आनंद तरंग । आनंदचि अंग आनंदाचे ।।**
**काय सांगो झाले कांहीचिया बाही । पुढे चाली नाही आवडीने ।।**
**गर्भाचे आवडी मातेचा डोहाळा । तेथींचा जिव्हाळा तेथे बिंबे ।।**
**तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा । अनुभव सरिसा सुखा आला ।।**

परमेश्वरी साक्षात्कारासाठी तुकारामांचे मन आसुसले होते. व्याकुळ झाले होते. भक्ताला भगवंताची प्रत्यक्ष भेट व्हावी आणि त्याचे रूप आपण डोळांभरून पहावे असं वाटत असतं. ईश्वरप्राप्ती हे भक्ताच्या चिंतनाचं, तपस्येचं, साऱ्या जीवनाचं एकमेव उद्दिष्ट असतं. परमेश्वर हा निर्गुण, निराकार आहे हे माहीत असूनही सगुण साकार रूपात त्यानं आपल्याला दर्शन द्यावं ही अदम्य इच्छा भक्ताच्या मनात सतत रुजत असते. प्रत्येक भक्ताच्या जीवनात तीन अवस्था येतात. पहिल्या अवस्थेत तो ईश्वरदर्शनासाठी सारखा तळमळत असतो.

*सावळे सुंदर रूप मनोहर । राहो निरंतर ह्रदयीं माझे ।*
*आणीक काही इच्छा आम्हा नाही चाड । तुझे नाम गोड पांडुरंगा ।।*
*जन्मोजन्मी ऐसे मागितले तुज । आम्हांसि सहज द्यावे आता ।।*

हाच अखंड ध्यास भक्ताला लागलेला असतो. जी मूर्ती आपण पाहातो ती आपल्या समोर सचेतन रूपात प्रकट व्हावी म्हणून भक्त देवाच्या विनवण्या करीत असतो. पण रात्रंदिवस नामस्मरण करूनही परमेश्वराची प्रत्यक्ष भेट होत नाही ही निराशा हळूहळू गडद होत जाते. आपल्यावर ईश्वराचा अनुग्रह होत नाही. तो परमात्मा आपल्याला भेटत नाही या वैफल्यानं भक्ताचं मन काळवडून जातं. तो हताश होतो. एक प्रकारच्या मानसिक अंधारात तो चाचपडत राहातो. प्रकाशाच्या एखादाही कवडसा त्याला दिसत नाही. या अवस्थेला 'आत्म्याची अंधारी रात्र- The dark night of the soul' असं म्हटलं जातं. तुकारामांच्या आयुष्यातही अशीच काळोखात बुडालेली रात्र आली. ते कमालीचे विषण्ण झाले. प्रार्थना करूनही ईश्वरत्वाचा प्रकाश दिसत नाही या दुःखानं विषण्ण झालेल्या तुकोबांना आता माझ्या लेखी देव उरला नाही, त्याच्याशी माझा संबंध नाही असे उद्गार काढावे लागले. प्रत्येक भक्ताला तीव्र निराशेची ही अनुभूती येतच असते. प्रवासाच्या वाटेत खाचखळगे आणि काटेकुटे असल्याशिवाय वाटसरूची परीक्षा होत नाही. तुकाराम

निग्रहानं चालत राहिले. देवाचा ध्यास मनात होताच. काट्याकुट्यांतून चालताचालता एका क्षणी सभोवतालचा अंधार वितळत आहे, प्रकाशाचे कोवळे किरण आपल्यासमोर येत आहेत अशी एक विलक्षण अनुभूती त्यांना आली. अंधार मावळून गेला. दिशा उजळल्या. ज्याचं स्वप्न रात्रंदिवस पाहिलं तो पांडुरंग आपल्या पुढ्यात उभा असून त्याची कृपादृष्टी आपल्या सर्वांगावरून फिरत आहे, इतकंच नव्हे तर तो विठ्ठल दशदिशांतून आपल्याला पाहात आहे, त्याच्या हृदयातली ज्योत आपल्या अंत:करणात प्रविष्ट झाली आहे ही अद्‌भुत जाणीव तुकोबांना झाली. यालाच 'साक्षात्कार' म्हणतात. ही इंद्रियातीत स्वरूपाची आत्मानुभूती आहे. जेवढं इंद्रियांना जाणवतं तेवढंच सत्य असं म्हणून चालत नाही. *'हे शब्देविण संवादिजे । इंद्रियां नेणता भोगिजे ।'* अशी ही मानसगम्य अवस्था आहे. या साक्षात्काराचं वर्णन तुकोबांनी 'आनंदाचा डोह' या शब्दांतून केलं आहे. 'काय सांगो झाले काहीचिया बाही' असं म्हणून हा 'शब्दातीत' अनुभव आहे तो माझ्या भाषेतून मी कसाबसा सांगतो असं त्यांनी म्हटलं आहे.

*'झाली हरिरूप अवघी सृष्टी'* ही आत्मप्रतीती म्हणजेच परमेश्वरी साक्षात्कार. या साक्षात्काराचं अत्यंत काव्यमय असं चित्रण तुकोबांनी केलं आहे. 'आनंदचि अंग आनंदाचे' असा 'आनंदाचा डोह' तुकोबांच्या हृदयात निर्माण झाला. हा अभंगही 'अभंग' 'आनंदाचा डोह' आहे.

ईश्वराच्या प्रत्यक्ष दर्शनासाठी रात्रंदिवस तळमळणाऱ्या भक्ताच्या मनोवृत्तीला 'आत्म्याची अंधारी रात्र' असे संबोधण्यात औचित्य आहे. कारण प्रकाशाचा एकही किरण लाभत नाही अशा स्थितीत भक्त वैफल्यानं खचून जातो. पण हळूहळू उजेड दिसू लागतो. हा साक्षात्कार म्हणजे भक्ताला झालेली ज्ञानात्मक जाणीव. हिलाच आत्मसाक्षात्कार, केवलज्ञान वगैरे शब्दांनी संबोधलं जातं. या अनुभूतीमुळं भक्त आशावादित्वानं प्रवास करू लागतो. एक अदृश्य हात आपल्या खांद्यावर आहे ही जाणीव म्हणजे साक्षात्कार होय. या अनुभूतीचं काव्योत्कट चित्रण या अभंगात करण्यात आलं आहे. तुकोबांच्या जीवनानुभूतीचं हे एक सर्वोत्कृष्ट दर्शन आहे असं म्हणायला हरकत नाही.

❑❑❑

**जे का रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ॥**
**तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥**
**मृदु सबाह्य नवनीत । तैसे सज्जनांचे चित्त ॥**
**ज्यासी आपंगिता नाही । त्यासि धरी जो हृदयी ॥**
**दया करणे जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥**
**तुका म्हणे सांगू किती । त्याचि भगवंताच्या मूर्ती ॥**

संत तुकारामांनी देव आणि साधू यांची अत्यंत सोपी व्याख्या केली आहे. त्यांना देवत्व कशात असतं, संतत्व कुणात असतं, ते यथार्थपणानं समजलेलं होतं. ज्या वाटेनं ते जन्मभर चालत गेले ती वाट देवत्वाचीच होती. संत जिकडे दृष्टी टाकतो ती दिशा देवरूप बनते. जिकडं त्याची पाउलं पडतात तो मार्ग ईश्वररूप होतो. संताच्या हृदयात नि:सीम करुणाभाव नांदत असतो. त्याचं सर्व प्राणिमात्रांवर अतूट प्रेम असतं. *'कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ॥'* द्वेष, मत्सर, क्रोध, लोभ यांच्यापासून अलिप्त राहिलेला संतसज्जन खरं तर देवत्वाच्याच आसनावर आरूढ झालेला असतो. तुकोबांनी 'जे का रंजले गांजले' या आपल्या प्रसिद्ध अभंगात जणू काही स्वत:चंच वर्णन केलं आहे. जे नित्य त्यांच्या हृदयात नांदत होतं ते त्यांनी आपल्या प्रसादपूर्ण शब्दांतून सांगितलं आहे. जे दु:खभारानं पिचून गेले आहेत त्यांना आपल्या हृदयाशी धरणं हे अत्यंत श्रेष्ठ भावनेचं लक्षण आहे. आपल्याला परदु:ख शीतल वाटतं. दुसऱ्याच्या दु:खवेदनेकडं आपण दुर्लक्ष करतो. वेदनेनं तळमळणाऱ्या प्राण्याला पाहून आपला करुणाभाव सहसा जागृत होत नाही. आडातच नसेल तर पोहोऱ्यात कुठून येणार ? शेजारच्या घरी काही दुर्घटनेमुळं आक्रंदन चालू असलं तर आपण त्यात गुंतत नाही. वरवर सहानुभूतीचे दोन नाटकी शब्द बोलतो आणि फ्लॅटचं दार बंद करून घेतो. हृदयाचंच दार लावून घेतो आणि वैयक्तिक ख्याली-खुषालीत रममाण होतो. पण संतहृदय अत्यंत संवेदनशील असतं. दुसऱ्याची तडफड पाहून सज्जनाचं मन तळमळू लागतं. त्याची भावशक्ती अत्यंत व्यापक असते. क्रौंचपक्षी बाण लागून जखमी झालेला पाहून वाल्मीकी ऋषींच्या चित्तात करुणेची लाट उचंबळून आली. त्या पक्ष्याला वाचवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. एखादा पक्षी जगला काय ? आणि तो मरून गेला काय मला काय करायचं

**चंदनाचे हात पाय ही चंदन । परिसा नाही हीन कोणी अंग ॥**
**दीपा नाही पाठी पोटी अंधकार । सर्वांगे साकर अवघी गोड ॥**
**तुका म्हणे तैसा सज्जनापासून । पाहता अवगुण मिळेचिना ॥**

सज्जनांच्या अंत:करणप्रवृत्तीचं वर्णन करताना तुकाराम महाराजांनी चंदन, परिस, दीपक आणि साखर ही चार प्रतीकं घेतली आहेत. चंदनाचं झाड मुळापासून शेंड्यापर्यंत चंदनरूप असतं. ते सुगंधानं ओथंबलेलं असतं. पायापासून मस्तकापर्यंत त्याच्या सुवासात अंतर पडत नाही. एखाद्या दुष्टानं त्या वृक्षावर कुऱ्हाडीनं प्रहार केला तर कुऱ्हाडीच्या पात्यालाही आपला सुगंध चंदनवृक्ष देत असतो. मारणाऱ्यालाही अंतरंगातल्या प्रेमाचा गंध चंदनाचं झाड देत असतं. याचा अर्थ कोणत्याही परिस्थितीत सुगंध देण्याचा आपला जन्मजात धर्म तो सोडीत नाही. त्याचं सर्वांग नव्हे सर्व जीवन सुवासिक असतं. दिवा हा प्रकाशरूप असतो. त्याला मागे आणि पुढे कुठेही अंधार नसतो. परिसाची प्रत्येक बाजू सारखीच सामर्थ्यवान असते. परिसाचं कोणतंही अंग गौण असत नाही. साखर देखील सर्वांगांनी गोडच असते. त्याप्रमाणं सज्जन सर्वार्थांनी सत्प्रवृत्तीचेच असतात. सुजनता हा त्यांचा आत्मधर्म आहे. तो त्यांचा स्वभाव आहे. त्यात कधीही परिवर्तन होणार नाही. धरणी दुभंग झाली किंवा मस्तकावर आकाश कोसळलं तरी संत सज्जनांच्या चित्तांतली सद्गुणांची वसती कधीच उठून जात नाही. सज्जनांच्या स्वाभाविक प्रवृत्तीवर तुकोबांनी केलेलं हे भाष्य खरं तर त्यांच्या स्वानुभवातूनच त्यांना स्फुरलेलं आहे. सज्जनांची ओळख सज्जनालाच पटते. तुकाराम महाराज हे अंतर्बाह्य सत्प्रवृत्त, सत्शील आणि सुविचारी होते. त्यांच्या शब्दांत जे होतं तेच त्यांच्या दैनंदिन आचारविचारातही उतरलेलं होतं. ओठात एक आणि पोटात दुसरंच ही दुर्जनांची पद्धती असते. '*मधु तिष्ठति जिव्हाग्रे, हृदये तु हलाहलम् ।*' जिभेवर साखर पण हृदयात जहर ही दांभिकांची रीत असते. स्वार्थ साधण्यासाठी साखरपेरणी करून दुसऱ्याचा सफाईनं गळा कापण्याची कृती दुर्जन करीत असतो. पण प्राणांतिक परिस्थिती आली तरी सज्जनांच्या बोलण्यात, वागण्यात आणि दृष्टिकोनात कधीही दुष्टत्वाची लेशमात्रही छटा येत नाही. कारण सज्जन मनुष्य चंदनाच्या वृक्षासारखा सुगंधी आणि शीतल असतो. प्रकाशमान दिव्याप्रमाणं त्याचं मन उजळलेलं असतं. परिसाप्रमाणं सज्जन माणूस दुर्जनाचं देखील सुजनात रूपांतर

करू शकतो. लोखंडाचं सुवर्ण करणं हे परिसाचं कार्य संत महंत करीत असतो. एका अर्थानं हा अभंग संतांच्या व्यक्तित्वाचं आणि सामर्थ्याचं दर्शन घडवतो. छत्रपती शिवाजी राजांनी पाठवलेली सारी संपत्ती तुकोबांनी तिला स्पर्शही न करता परत केली. तुकोबांच्या चारित्र्याचा नाश करण्यासाठी काही दुष्ट लोकांनी एका सुंदर गणिकेला त्यांच्याकडं पाठवलं होतं. तुकोबांनी *'पराविया नारी रखुमाई समान'* असं म्हणून तिला आई अशी हाक मारली. त्या चंचल स्त्रीच्या मनात पश्चात्तापाची लाट उचंबळून आली. तुकोबांच्या पायांवर मस्तक ठेवून तिनं त्यांची क्षमा मागितली. आपला छळ करणाऱ्या लोकांविषयी त्यांनी कधी वाईट विचार केला नाही. द्वेषाची किंवा सूडाची किंचित्‌ही छटा त्यांच्या चित्तात उमटली नाही. सज्जनांचा सज्जनपणा हे मानवी जीवनात क्वचित आढळणारं पण अत्यंत मूल्यवान असं सौंदर्य आहे. दुर्जनांना सुजनांची किंमत कळत नाही त्याप्रमाणं मलयगिरीवर राहाणारी भिल्ल स्त्री चंदनाची योग्यता न ओळखता त्याचा चुलीसाठी जळण म्हणून वापर करते. जळतानाही चंदन सुगंधच देते. सज्जन मनाचं समग्र सामर्थ्य वर्णन करणारा हा तुकोबांचा अभंग त्यांच्याही जीवनावर स्वच्छ प्रकाश पाडतो.

कोणाचाही द्वेषमत्सर न करणं हा जसा सज्जनांचा धर्म असतो त्याप्रमाणं सज्जनांचा छळ करणं, त्यांच्या सुजनत्वाची कुणी स्तुती केली तर मत्सरानं भडकून उठणं, त्यांच्या मार्गात काटे पसरणं हा दुर्जनांचा धर्म असतो. भवभूती नावाच्या एका कवीनं म्हटलं आहे, सज्जनांना अकारण छळणं आणि साध्वी स्त्रियांबद्दल निष्कारण अपप्रचार करणं हे दुर्गुण दुष्टांच्या ठायी जन्मतःच असतात. हे द्वंद्व जगात कायम टिकणारं आहे. कदाचित दुष्ट अधिक आहेत म्हणूनच सज्जनांना जगात प्रतिष्ठा आहे. दुष्टत्वाची दुर्गंधी नाहीशी करून सुष्टत्वाचा चंदनगंध लोकजीवनात दरवळत राहावा यासाठी प्रत्येक काळात तुकोबासारखे संत आवश्यक आहेत. ते दुर्मिळ असतात हीच दुःखाची घटना आहे. काटेरी झुडपं सर्वत्र दिसतात चंदनाचं झाड मात्र केव्हातरी पाहायला मिळतं. महाराष्ट्राच्या भूमीवर तुकोबांच्या रुपानं एक सुगंधी चंदनवृक्ष आजही उभा आहे.

❑❑❑

**शुद्ध बीजा पोटी । फळ रसाळ गोमटी ॥**
**मुखी अमृताची वाणी । देह देवाचे कारणी ॥**
**सर्वांग निर्मळ । चित्त जैसे गंगाजळ ॥**
**तुका म्हणे जाती । ताप दर्शनें विश्रांती ॥**

काही माणसे दृष्टीला पडली की आपला कपाळशूळ उठतो. मन अत्यंत अस्वस्थ होते. कारण त्यांचे दर्शन मनाची शांती नष्ट करते. काही व्यक्तींच्या पोटात लपलेला भयानक स्वार्थ आणि दांभिकता त्यांच्या मुद्रेवर दिसते. काही लोक निर्दय असतात. एक प्रकारच्या निष्ठुरतेने आणि तुच्छतेने जगाकडे पाहात असतात. त्यांचा गर्विष्ठपणा, त्यांच्या नजरेतली स्नेहशून्यता आपल्याला जाणवते आणि आपले मन अशांत, अस्वस्थ होते. पण साधुसंतांच्या मुखमंडलावर एक प्रकारची तृप्ती आणि शांती असते. त्यांच्या डोळ्यांतून जणू वात्सल्याच्या धारा बरसत असतात. त्यांच्या शब्दांत मृदुता असते. त्या शब्दांतलं प्रेमाचं संगीत आणि माणुसकीची सुरावट आपल्याला ओढून घेते. संत ज्ञानेश्वरांनी अशा सत्पुरूषाचे वर्णन करताना म्हटलं आहे,

*स्वये श्वसणे चि ते सुकुमार । मुख मोहाचे माहेर ।*
*माधुर्या जाहले अंकुर । दशन तैसे ॥*
*पुढां स्नेह पाझरे । मागां चालती अक्षरे ।*
*शब्द पाठी अवतरे । कृपा आधी ॥*
*तैसे साच आणि मवाळ । मितले परि सरळ ।*
*बोल जैसे कल्लोळ । अमृताचे ॥*

त्याचं मुख प्रीतीचं माहेर असतं. त्याचे दात जणु माधुर्याचे अंकुर असतात. तो कोणाशीही बोलत असला तरी प्रथम प्रेम पाझरतं आणि मागून अक्षरं चालतात. कृपा आधी प्रकट होते. शब्द नंतर प्रकट होतात. कोणालाही न खुपणारं सरळ, सत्य असं त्याचं बोलणं म्हणजे अमृताच्या लाटाच असतात. हे संत सज्जनाचं चित्र आहे. संत तुकोबाही आपल्या शब्दांतून त्याचं असंच सुंदर चित्र रेखाटतात. बीज शुद्ध असलं म्हणजे त्यातून रसमय गोमटी फळं उत्पन्न होतात. संताचं अंतःकरण असंच शुद्ध असतं. त्याच्या मुखी अमृताची वाणी सामावलेली असते. आणि आपला देह तो देवकार्यासाठी

झिजवीत असतो. त्याचं चित्त कसं असतं? तुकोबा म्हणतात 'चित्त जैसे गंगाजळ' गंगेच्या पाण्यासारखं शुद्ध आणि पवित्र मनं ज्याला लाभलेलं आहे तो सर्वांगी निर्मळ असावा यात कसलं बरं आश्चर्य? अशा विभूतींच्या दर्शनानं सारं पाप-ताप नाहीसं होतं.

खरं सांगायचं तर अशा प्रकारच्या पुण्यवंताचं, पवित्रात्म्याचं दर्शन फार क्वचित घडतं. पण जेव्हा ते घडतं तेव्हा आपण धवल चारित्र्याचा हिमालय पाहात आहोत अशी अनुभूती येते. कलंकरहित चंद्र आणि तापहीन सूर्य दृष्टीला पडला तर जीवन धन्य होईल. असे श्रेष्ठ साधुसंत मनाला केवळ आपल्या दर्शनानं निरतिशय शांती देतात. आपण आपले स्वार्थ विसरून जातो. आपले विकार आणि वासना वाहून जातात. पावित्र्याची आणि दिव्यत्वाची अनुभूती येते. तुकारामांनी अशा महनीय साधुत्वाचे केलेलं हे वर्णन खरं तर त्यांच्याच व्यक्तित्वाला आणि दर्शनाला यथार्थतेनं लागू पडणारं आहे असं मला वाटतं. कारण तुकोबा हे वत्सलतेचं, शांतीचं, आंतरिक समाधानाचं एक चालतं बोलतं प्रतीक होतं. त्यांची जीवनगंगा केवळ जनकल्याणासाठी वाहात राहाते. ज्ञानेश्वर तुकारामांसारखे श्रेष्ठ संत सदैव आनंदाचाच जगावर वर्षावर करतात. *'आनंदे भरीन तिन्ही लोक'* असं ज्ञानेश्वर म्हणतात तर *'आनंदाच्या कोटी । साठवल्या आम्हां पोटी'* असं तुकोबा म्हणतात. संत म्हणजे सर्वांग निर्मळ चित्त-जैसे गंगाजळ, संतांच्या वृत्तीत आणि कृतीत कडवटपणाचा लेशही नसतो. मन शुद्ध असलं की जीवनही स्वच्छ, पवित्र असतं.

'मुखी अमृताची वाणी' असे शब्द या अभंगात आहेत. सहज मनात विचार येतो, गोड शब्द बोलण्यासाठी मनात आणि वृत्तीत गोडी असावी लागते. दैनंदिन व्यवहारात आपण अनेकवेळा कठोर, बोचक, मर्मभेदक आणि विषारी शब्द बोलतो. आपलं ही मन कडवट होतं. दुसऱ्याचंही चित्त त्यामुळं कलुषित होतं. मधुर शब्दांचं आदान प्रदान करणं हा माणुसकीचा सुंदर आविष्कार आहे. पण सध्याच्या जगात प्रेममय शब्ददेखील कमालीचे महाग झाले आहेत. मधुर हा शब्द आता फक्त शब्दकोषात सापडतो. तुकोबांच्या शब्दांत काहीवेळां कठोरता आढळते. पण त्या शब्दांचं मूळ त्यांच्या वत्सलतेतच आहे. मनाच्या भूमीत शुद्ध विचारांचं बीज पडलं की त्यातून रसाळ गोमटी फळं निर्माण व्हावीत हा नियमच आहे.

❑❑❑

**दुधाचे घागरी मद्याचा हा बुंद । पडिलिया शुद्ध नव्हे मग ॥**
**तैसे खळां मुखें न करावे श्रवण । अहंकारें मन विटाळले ॥**
**काय करावी ती बत्तीस लक्षणें । नाक नाही तेणे वाया गेलीं ॥**
**तुका म्हणे अन्न जिरो नेदी माशी । आपुलिया जैशी संवसर्गे ॥**

ओठातून परमार्थाच्या गोष्टी आणि पोटात मात्र स्वार्थ दाटून भरलेला-असा माणूस काय उपयोगाचा? *'लोकां सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडा पाषाण'* अशा जातीचे काही लोक असतात. भक्तीच्या, ज्ञानाच्या आणि वैराग्याच्या पांडित्यानं भरलेल्या लांबलचक गोष्टी सांगणारे कित्येक उपदेशक अहंकारानं फुगलेले असतात. ज्याचं मन अहंभावनेनं विटाळलेलं आहे त्याला शहाणपणाच्या गोष्टी सांगण्याचा अधिकारच असत नाही. पण असे केवळ शब्दपंडित प्रत्येक कालखंडात आढळतात. एखाद्या वेश्येनं पातिव्रत्यावर प्रवचन करण्यात काही अर्थ असतो का? तिचं प्रवचन अर्थपूर्ण असेल, परिणामकारक असेल पण तिचा दैनंदिन आचार जर भ्रष्टतेनं बरबटलेला असेल तर पतिनिष्ठेबद्दल बोलण्याचा तिला कधीही अधिकार पोहोचत नाही. संत तुकारामांच्या कालखंडात शील आणि चारित्र्य नसलेले, व्यसनात बुडालेले, अंतर्यामी दुष्ट आणि स्वार्थी असलेले काही दांभिक संत व पंडित होते. अंगावर भगवी वस्त्रे आणि मनात विषयवासनेचा बाजार भरवणारे हे लोक जनतेला उपदेश करीत असत. या गोष्टीबद्दल तुकोबांना उद्वेग आलेला आहे. ते म्हणतात. दुधाच्या घागरीत दारूचा थेंब पडला तर ते दूध शुद्ध राहणं शक्य नाही. त्याप्रमाणे ज्याचं मन आढ्यतेनं आणि गर्वानं विटाळलेलं आहे अशा दुष्टाच्या तोंडून कधीही उपदेश ऐकू नये. तो उपदेश बाह्यतः चांगला वाटला तरी तो चांगल्या मुखातून येत नसल्यामुळं त्याज्य समजावा. हे सांगताना तुकोबा एक अतिशय समर्पक दृष्टान्त देतात. ते म्हणतात,

बत्तीस लक्षणी सौंदर्य आहे. पण फक्त नाक मात्र नाही. काय करावी ती बत्तीस लक्षणे? सारी वाया गेली. माशी आपल्या संगतीनं अन्न कधी पचू देत नाही. खाल्लेलं अन्न बाहेर येतं. म्हणून दुष्ट दांभिकाच्या मुखानं परमार्थाचा विचार ऐकणं कधीच हितकारक होत नाही.

या अभंगात जीवनातलं एक सत्य उत्तम प्रकारानं तुकोबांनी सांगितलं आहे. आपला सिद्धांत मांडताना मनाला जाऊन भिडणारे सहज, सोपे आणि दैनंदिन व्यवहारातले दृष्टान्त

देण्यात तुकोबांचं खरं कौशल्य आहे. जनतेला एखादी गोष्ट पटवून द्यायची असेल तर ती योग्य उदाहरणांच्या माध्यमातून पटवली पाहिजे याची जाणीव लोकमानसाचा अभ्यास केलेल्या तुकोबांना निश्चित होती. म्हणून त्यांनी इथं दुधाची घागर आणि मद्याचा थेंब, बत्तीस लक्षणं असणं पण नाक नसणं आणि अन्नाच्या घासाबरोबर आलेली माशी अशी तीन ठळक उदाहरणं घेतली आहेत. निष्कर्ष हा की, ज्याच्या विचारात आणि वर्तनात शुद्धता असते, ज्याचं चारित्र्य निष्कलंक असतं, जो स्वार्थ आणि अहंकार, दंभ आणि दुष्टता यांच्यापासून सर्वस्वी अलिप्त असतो त्याच्या मुखातल्या शब्दांना नैतिक बळ असतं. त्यांचं जीवन हाच त्यांचा उपदेश असतो. त्यांनाच लोकप्रबोधन करण्याचा नैतिक अधिकार असतो. असा अधिकार असलेले साधुसंत हे स्वतःबरोबर लोकांचाही उद्धार करू शकतात. विचारांच्या सामर्थ्याला आचाराचं अधिष्ठान नसेल तर एखाद्या रक्तपिपासू लांडग्यानं अहिंसेचा संदेश देण्यासारखं आहे. लांडग्याच्या ढोंगाला काही मूर्ख मेंढरं बळी पडतात. त्याप्रमाणं पायघोळ संताच्या दांभिक प्रवचनामुळं भोळे भाबडे फशी पडतात. त्यांना सावध करण्यासाठी तुकोबांनी हा अभंग लिहिला आहे त्याचं चिंतन आपण केलं पाहिजे.

उक्ती आणि कृती यातली विसंगती पाहून तुकोबा नेहमी अस्वस्थ होत असत. जे लोक समाजाचं वैचारिक नेतृत्व करतात ते पुराणिक, कीर्तनकार, प्रवचनकार आणि स्वतःला संत म्हणवून घेणारे भगव्या कपड्यातले स्वार्थी लोक यांनी समाजाची चालवलेली फसवणूक आणि लूट याविरुद्ध तुकोबांनी प्रहार केले. दुधाला दुधाचं पावित्र्य पाहिजे. त्यात मद्याचा थेंब पडला की मग ते दूध अशुद्ध , अपवित्र होतं. म्हणूनच साधुसंतांचे नुसते विचार चांगले असून चालत नाही तर त्यांच्या वर्तनातही चांगुलपणा असला पाहिजे हा तुकोबांचा आग्रह. *'बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले ॥'* ही तुकोबांची उक्ती सर्वप्रसिद्ध आहे. विचार आणि आचार यांची एकवाक्यता असावी ही अपेक्षा योग्य आहे. पण भिन्नभिन्न मुखवटे घेऊन वावरणाऱ्या स्वार्थसाधूकडून ही अपेक्षा पूर्ण होत नाही याबद्दलची तीव्र खंत तुकारामांनी व्यक्त केली आहे. ज्ञानाला चारित्र्याची आणि विचाराला आचाराची जोड मिळावी ही अपेक्षा आहे. आज ज्ञान आणि चारित्र्य यांची फारकत झालेली दिसते. त्यामुळं मुखात शांतीचा पाठ आणि हातात धारदार सुरी अशी विसंगती दिसते. त्यावर तुकोबांची ही मार्मिक टीका आहे.

❑❑❑

**काय बा करीसी सोवळे ओवळे । मन नाही निर्मळ वाउगे चि ।।**
**काय बा करीसी पुस्तकांची मोट । घोकिता हृदयस्फोट हाता न ये ।।**
**काय बा करीसी टाळ आणि मृंदग । जेथे पांडुरंग रंगला नाही ।।**
**काय बा करीसी ज्ञानाचिया गोष्टी । करणी नाही पोटी बोलण्याची ।।**
**काय बा करीसी दंभ लौकिकाते । हित नाही माते तुका म्हणे ।।**

सोवळे -ओवळे, जप- जाप्य, पूजा-अर्चा, होम-हवन वगैरे कर्मकांडाचा अतिरेक करणारे लोक पुष्कळ आहेत. शरीराला सोवळे गुंडाळणारे हे कर्मठ लोक क्रियाकांडात बुडून गेलेले असतात. अतिरेकी आचारकांड केवळ हास्यास्पद असतं. सोवळ्या-ओवळ्याचं कित्येक वेळां स्तोम माजवलं जातं. तुकाराम महाराज अशा गोष्टीवर परखडपणानं टीका करून प्रश्न विचारतात, 'अरे, कशासाठी या सोवळ्या-ओवळ्याचं बंड माजवून ठेवलं आहेस? सोवळ्या वस्त्रानं काय साधणार आहे ? मन जोपर्यंत स्वच्छ होत नाही तोपर्यंत या बाह्य अवडंबराला कसलीही किंमत नाही. शरीर सोवळ्यात आणि मनात मात्र नानाप्रकारच्या वैषयिक इच्छांचा घाणेरडा बाजार भरलेला आहे, अशा परिस्थितीत हे सोवळ्याचं सोंग कशाला काढलंस?' तुकोबांचा प्रश्न मर्मभेदक आहे. भक्तीची एखादीही रेषा अंतःकरणांत नाही पण मोठमोठ्यानं मंत्रोच्चार करीत होमात तेल-तूप जाळीत बसलेला माणूस कोणत्याही अर्थानं धार्मिक ठरत नाही. धर्म सोवळ्यातही नाही, ओवळ्यातही नाही. धर्म अंतर्मनात नांदत असला पाहिजे. संत चोखामेळा हा अस्पृश्य असल्यामुळं त्याला विठ्ठलाचं दर्शन कधीच घडलं नाही. अस्पृश्य हा ओवळा असतो अशा अज्ञानी समजुतीमुळं त्याला मंदिरात जाण्याची बंदी घातली होती. पण चोखा हा नावाप्रमाणं शुद्ध आणि स्वच्छ होता. तो अंतर्बाह्य सोवळा होता. त्याच्या मनातच विठ्ठलाचा निवास होता. संत जनाबाईनं म्हटलं आहे,

*चोखामेळा संत भला । तेणे देव भुलवीला ।।*
*भक्ती आहे ज्याची मोठी । त्याला पावतो संकटी*
*चोखामेळ्याची करणी । देव केला ऋणी ।।*
*लागा विठ्ठलचरणी । म्हणे नामयाची जनी ।।*

सोवळं आणि ओवळं आणि इतर कर्मकांड यापेक्षा सहस्त्रपटीनं मनातली भक्ती आणि मनाची शुद्धी श्रेष्ठ असते. तुकोबा आणखी विचारतात,

अरे ही पुस्तकांची मोट बांधून तू काय करणार ? टाळ आणि मृदंग वाजवून काय होणार ? ज्ञानाच्या पोकळ गोष्टी बोलून तरी काय होणार आहे? तुझ्या पोथ्या पुस्तकांत तो पांडुरंग कधीच दिसणार नाही. टाळ मृदंगातून पांडुरंग प्रकट होणार नाही. जोपर्यंत तुझ्या कृतीत शुद्धता नाही, जोपर्यंत तुझ्या वासना-विकारांना ओहोटी लागत नाही.जोपर्यंत प्रामाणिक भक्तीनं आणि शुद्ध मनानं तू त्याला साद घालीत नाहीस तोपर्यंत तो परमात्मा, तो विश्वात्मा तुला दिसणार नाही, भेटणार नाही. तू तुझ्या लौकिकासाठी दांभिकतेनं वागतोस यात तुझं कसलंही हित नाही.

तुकारामांचे हे विचार तर्कशुद्ध आहेत. शब्दज्ञानानं, सोवळ्या-ओवळ्यानं आणि केवळ टाळ-मृदंगानं, कीर्तन-प्रवचनानं परमेश्वर मिळतो हा एक भ्रम आहे. बाह्य अवडंबर केलं म्हणून अंतरंग निर्मळ होत नाही. वरवरच्या रंगाला पांडुरंग कसा भुलणार ? चोखामेळ्यानं *'काय भुललासी वरलिया रंगा ?'* असा प्रश्न विचारलेला आहेच. शेकडो दुधाच्या घागरी ओतून अभिषेक केला तरी तो देवाला पावत नाही. पण एखाद्या भक्तवत्सल दरिद्री म्हातारीच्या डोळ्यांतल्या अश्रूचा एक थेंब देखील ईश्वराला अंतर्बाह्य भिजवून टाकतो. जिथं अस्सल भक्ती असते तिथं कोणत्याही बाह्य उपचारांची जरूर नसते. हेच तुकाराम महाराजांना तुमच्या आमच्या मनावर या अभंगातून बिंबवायचं आहे.

संतांनी कर्मकाण्डाचं अवडंबर माजवू नका असं सांगितलं तरी माणसं बाह्योपचाराला अवास्तव महत्व देतात.जिभेवर परमेश्वरी नाव असेल पण अंतःकरणात मात्र वासनाविकारांचा खेळ चालू असेल तर जिभेवरचं रामनाम निरुपयोगीच आहे. भक्तीच्या मार्गात शुद्ध आणि उत्कट असं भावपूर्ण मन हेच सर्वात अधिक महत्त्वाचं ठरतं. टाळ-मृदंग आहे पण चित्ती पांडुरंग मात्र नाही, ही विसंगती तुकोबांना टोचत राहाते. म्हणूनच ते मनाच्या शुद्धीची आवश्यकता पटवून देतात. परमेश्वरप्राप्तीसाठी होमहवन नको, जपजाप्य नको, केवळ भावोत्कट, एकाग्र असं समर्पणशील मन पाहिजे. सोवळ्याओवळ्याला आणि पूजेअर्चेला काही अर्थ नाही. कवितेत जसा शब्द मध्यवर्ती नसतो, भाव प्रधान असतो त्याप्रमाणं भक्तिमार्गातली भक्ती शुद्धमनाची असावी.

□□□

सोवळं आणि ओवळं आणि इतर कर्मकांड यापेक्षा सहस्त्रपटीनं मनातली भक्ती आणि मनाची शुद्धी श्रेष्ठ असते. तुकोबा आणखी विचारतात,

अरे ही पुस्तकांची मोट बांधून तू काय करणार ? टाळ आणि मृदंग वाजवून काय होणार ? ज्ञानाच्या पोकळ गोष्टी बोलून तरी काय होणार आहे? तुझ्या पोथ्या पुस्तकांत तो पांडुरंग कधीच दिसणार नाही. टाळ मृदंगातून पांडुरंग प्रकट होणार नाही. जोपर्यंत तुझ्या कृतीत शुद्धता नाही, जोपर्यंत तुझ्या वासना-विकारांना ओहोटी लागत नाही.जोपर्यंत प्रामाणिक भक्तीनं आणि शुद्ध मनानं तू त्याला साद घालीत नाहीस तोपर्यंत तो परमात्मा, तो विश्वात्मा तुला दिसणार नाही, भेटणार नाही. तू तुझ्या लौकिकासाठी दांभिकतेनं वागतोस यात तुझं कसलंही हित नाही.

तुकारामांचे हे विचार तर्कशुद्ध आहेत. शब्दज्ञानानं, सोवळ्या-ओवळ्यानं आणि केवळ टाळ-मृदंगानं, कीर्तन-प्रवचनानं परमेश्वर मिळतो हा एक भ्रम आहे. बाह्य अवडंबर केलं म्हणून अंतरंग निर्मळ होत नाही. वरवरच्या रंगाला पांडुरंग कसा भुलणार ? चोखामेळ्यानं *'काय भुललासी वरलिया रंगा ?'* असा प्रश्न विचारलेला आहेच. शेकडो दुधाच्या घागरी ओतून अभिषेक केला तरी तो देवाला पावत नाही. पण एखाद्या भक्तवत्सल दरिद्री म्हातारीच्या डोळ्यांतल्या अश्रूचा एक थेंब देखील ईश्वराला अंतर्बाह्य भिजवून टाकतो. जिथं अस्सल भक्ती असते तिथं कोणत्याही बाह्य उपचारांची जरूर नसते. हेच तुकाराम महाराजांना तुमच्या आमच्या मनावर या अभंगातून बिंबवायचं आहे.

संतांनी कर्मकाण्डाचं अवडंबर माजवू नका असं सांगितलं तरी माणसं बाह्योपचाराला अवास्तव महत्व देतात.जिभेवर परमेश्वरी नाव असेल पण अंत:करणात मात्र वासनाविकारांचा खेळ चालू असेल तर जिभेवरचं रामनाम निरुपयोगीच आहे. भक्तीच्या मार्गात शुद्ध आणि उत्कट असं भावपूर्ण मन हेच सर्वात अधिक महत्त्वाचं ठरतं. टाळ-मृदंग आहे पण चित्ती पांडुरंग मात्र नाही, ही विसंगती तुकोबांना टोचत राहाते. म्हणूनच ते मनाच्या शुद्धीची आवश्यकता पटवून देतात. परमेश्वरप्राप्तीसाठी होमहवन नको, जपजाप्य नको, केवळ भावोत्कट, एकाग्र असं समर्पणशील मन पाहिजे. सोवळ्याओवळ्याला आणि पूजेअर्चेला काही अर्थ नाही. कवितेत जसा शब्द मध्यवर्ती नसतो, भाव प्रधान असतो त्याप्रमाणं भक्तिमार्गातली भक्ती शुद्धमनाची असावी.

❑❑❑

**विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ ।।**
**आइका जी तुम्ही भक्त भागवत। कराल ते हित सत्य करा ।।**
**कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।**
**तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुख दुःख जीव भोग पावे ।।**

संतांच्या मनात कसलीही भेदभावना असत नाही. ते सर्वांकडं समदृष्टीनं पाहू शकतात. त्यांच्या हिशेबी कोणी उच्च नाही किंवा कोणी नीच नाही. ही विशाल सर्वसमावेशक दृष्टी संतांच्या ठायी असते. सर्वसामान्य माणूस मात्र अनेक प्रकारच्या भेदभावना मनात बाळगून असतो. तो कोणाला वरिष्ठ मानतो. कोणाला कनिष्ठ मानतो. कोणाशी आदरानं लवून बोलतो तर कोणाशी तुच्छता बुद्धीनं बोलतही नाही. जात, संप्रदाय, वर्ण वगैरेमुळं तो भेदवादी झालेला असतो. संत मात्र भेदांचा लोप करून अभेदाकडं गेलेले असतात. त्यांचं सर्वांवर सारखंच प्रेम असतं. इतकं की आपल्यावर प्रहार करणाऱ्या दुष्टांबद्दलही त्यांच्या मनात क्षमाभाव आणि आपुलकी असते. यांचं महत्त्वाचं कारण असं की या विश्वाच्या अणुरेणूत परमात्म्याचं अस्तित्व आहे हे ज्ञान त्यांना झालेलं असतं. सारं जगत हा परमेश्वराच्या अस्तित्वाचा आणि प्रेमभावनेचा आविष्कार आहे याची अनुभूती संतांनी आपल्या अंतःकरणानं घेतलेली असते. त्यामुळं कोणत्याही प्रकारच्या भेदाचा विचार त्यांच्या मनाला स्पर्शही करीत नाही. जगदात्म्याशी एकरूपत्व अनुभवल्यावर हा लहान हा मोठा, हा ब्राह्मण आणि हा अस्पृश्य असले विषमतावादी विचार लेशमात्रही उरत नाहीत. सर्व जगत् एक आहे ही जाणीव म्हणजे ज्ञान आणि सर्व विश्व माझ्याच ठायी आहे. आणि मी विश्वाच्या ठायीं सामावलो आहे ही अनुभूती होय. संत यामुळंच ज्ञानी असतात. प्रत्येक वस्तुजातात भगवंत नांदत आहे आणि साऱ्या विश्वात परमेश्वरी संगीत भरून उरलं आहे हा अनुभव येणारे संत धन्य आहेत. तुकाराम महाराज यांची ही अनुभूती होती. त्यांचा प्रत्येक अभंग हा त्यांच्या व्यापक मनाचा आविष्कार आहे. ते म्हणतात,

हे सारं जग विष्णूमय आहे. हे जाणणं हाच वैष्णवांचा धर्म आहे. अहो भागवत भक्तांनो, भेदाभेदाचा विचार ही अमंगळ गोष्ट आहे. कोणत्याही जीवाचा मत्सर करू नका.

त्याच्याबद्दल आत्मीयता ठेवा. म्हणजेच परमेश्वराचं पूजन होईल. कारण हा विश्वाचा निर्माता जो परमेश्वर तो मातीच्या प्रत्येक कणात, पाण्याच्या प्रत्येक थेंबात सामावून गेला आहे. अशा परिस्थितीत उच्चनीच भाव व्यर्थ आहे. ज्ञानेंद्रियं आणि कर्मेंद्रियं एकाच देहाचे अवयव आहेत. सुख दुःख भोगणारा जीव एकच आहे.

संत तुकारामांच्या समतावादी दृष्टीचं सौंदर्य या अभंगात आपल्याला जाणवतं. आजच्या जगात ज्ञानाचा विकास झाला असं आपण मानतो पण नानाप्रकारच्या क्षुद्र आणि निरर्थक भेदांनी हे जग बुजबुजलेलं आहे.दुःखाचं आणि अस्वस्थतेचं हेच कारण आहे. जोपर्यंत माणूस विषमतावादी विचार सोडून समतेच्या प्रवाहाशी समरस होत नाही तोपर्यंत भेदभावना कशी नाहीशी होणार? आकाश जसं सर्वत्र निळं आहे आणि त्याच्या निळेपणाला कधी बाधा येत नाही त्याप्रमाणं माणूस सर्वत्र माणुसकीच्या विचारानं समपातळीवर आला पाहिजे. सर्वच संतांचं हे मंगल आणि भव्य स्वप्न आहे. तुकोबांच्या प्रतिभेला हे स्वप्न दिसावं यात आश्चर्य नाही. पण त्यांचं हे महनीय स्वप्न पूर्ण करण्याच्या दिशेनं जोपर्यंत आपण एकही पाऊल टाकीत नाही तोपर्यंत 'विष्णुमय जग, वैष्णवांचा धर्म. भेदाभेदभ्रम अमंगळ.' असं म्हणण्याचा आपल्याला अधिकार आहे काय?

अनेक धर्मपुरुषांनी भेदभावनेच्या तटबंदी पाडण्याचा प्रयत्न केला. संप्रदायांच्या चिठ्ठ्या चिकटवण्यात आल्या. संतमहंतानाही जातीपातींच्या चौकटीत अज्ञानी लोकांनी बसवलं. भेदाभेदांचा अमंगळ भ्रम लोकांच्या हाडीमासी रुजला आहे. विचारवंतांना आव्हान देणारी ही घटना आहे. प्रेमातून मानवी एकात्मता साधली पाहिजे. मानवी एकतेचे आदर्श स्वप्न साकार करण्याची प्रतिज्ञा घेऊन विषमतावादी प्रवृत्तीवर घाव घातले पाहिजेत. एकात्मता हेच सत्य: त्याची उपासना केली पाहिजे.

सारं जग परमेश्वरानं व्यापलं आहे. म्हणूनच हे विश्व विष्णुमय आहे. पण अतिशहाण्या माणसानं उच्च-नीचपणाची विषारी कल्पना जगात पेरली.माणसामाणसांत अंतर पडत गेलं. त्यातून लढाया आणि रक्तपात यांचं दुष्टचक्र सुरू झालं. प्रेमाचा प्राणवायू घेऊन आपल्याला जगायचं आहे हे या अभंगातून सुचवलं आहे.

❑❑❑

**नाही निर्मळ जीवन । काय करील साबण ।।**
**तैसे चित्तशुद्धि नाही । तेथे कोण करील काई ।।**
**वृक्ष न धरी पुष्पफळ । काय करील वसंतकाळ ।।**
**प्राण गेलिया शरीर । काय करील वेव्हार ।।**
**तुका म्हणे जीवनेवीण । पीक नव्हे नव्हे जाण ।।**

एका व्यसनी तरुणाचे कपडे स्वच्छ होते. दररोज सुगंधी साबणाने तो आपलं शरीर सकाळ संध्याकाळ धुवून काढायचा. स्वच्छतेची त्याला आवड होती. अनेक प्रकारची सुगंधी अत्तरे त्याला प्रिय होती. पण अनेक प्रकारच्या व्यसनात तो बुडून गेलेला होता. अंगाला सुवासिक द्रव्य चोपडून किंवा चंदनी साबण लावून फार तर अंग स्वच्छ करण्याची क्रिया तो करीत होता. त्याच्या जीवनाचं आणि मनाचं वस्त्र मात्र अमंगळ, घाणेरडं झालेलं होतं. आता त्याचं आंतरिक जीवन जोपर्यंत निर्मळ होत नाही तोपर्यंत बाह्य शरीराला कितीही सुवासिक साबण लावले गेले तरी काय होणार आहे ? केवळ अंग शुद्ध होऊन चालत नाही. अंतरंग म्हणजेच मन आणि बुद्धी - शुद्ध, स्वच्छ करण्याची आवश्यकता असते. जोपर्यंत मनाची स्वच्छता नाही तोपर्यंत देहाच्या स्वच्छतेला काहीच किंमत नाही. मळलेल्या मनाची, भ्रष्ट चारित्र्याची आणि रोगट वासनांच्या चिखलात लोळणारी अनेक माणसे आहेत. त्यांनी परदेशातून आयात केलेला सर्वोच्च सुगंधी साबण दररोज वापरला म्हणून मनातली अस्वच्छता आणि अभद्रता धुवून जाईल काय ? संत मनाला, आत्म्याला महत्त्व देतात. चारित्र्यसंपन्न आणि निर्मल मनाच्या माणसाचा सहवास आपल्याला लाभला तर त्या माणसाच्या व्यक्तित्वाचा पवित्र सुगंध आपल्याला जाणवत राहातो. दारूबाज, जुगारी प्रवृत्तीचा माणूस अत्यंत उंची तलम वस्त्रांत असला तरी त्याच्या संबंधी आपल्याला घृणा येते. एका नाटक काराने म्हटले आहे, माझे पैसे चोरीला गेले तर थोडेसे नुकसान होईल. माझे घरदार लुटले तर अधिक नुकसान होईल. पैसे आणि घरदार पुन्हा मिळवता येईल  पण माझे शील आणि चारित्र्य मळून गेले तर मात्र मी सर्वस्व गमावून बसलो असा त्याचा अर्थ होईल.

स्वच्छ आणि साध्या जीवनातलं उच्च सौंदर्य या अभंगात तुकोबा समजावून

सांगतात. ज्याचे चित्त शुद्ध नाही त्याला बोध करूनही उपयोग नाही. श्रीकृष्णानं दुर्योधनाला बोध केला, पण त्या बोधामृताचे घोट दुर्योधन घेऊ शकला नाही. विकारग्रस्त मनाला ज्ञानाचे शब्द रुचत नाहीत. पचतही नाहीत, वसंत ऋतू येऊन सुद्धा एखाद्या वृक्षाला फुलं-फळं येत नाहीत त्याला तो वसंत ऋतू काय करणार ? प्राणच निघून गेल्यावर शरीराचा व्यवहार कसा चालणार? पाणी मिळाले नाही तर पीक कसं येणार ? हे एकापेक्षा एक मार्मिक प्रश्न विचारून तुकोबांनी मनःशुद्धीचे आणि जीवनशुद्धीचे माहात्म्य प्रकट केले आहे. चारित्र्यावर म्हणजेच नैतिक आचार विचारांवर त्यांनी भर दिला आहे. ज्ञान असूनही शील नसेल तर ते ज्ञानही कलंकित ठरते. आजच्या बाह्य सौंदर्याच्या आणि स्वच्छतेच्या नादी लागलेल्या जगाला तुकाराम महत्त्वाचा संदेश देत आहेत. तऱ्हेतऱ्हेची साबणे, सुगंधी तेलं, अत्तरं ही खऱ्या स्वच्छतेची साधनं नव्हेत. शरीराचा तुकतुकीतपणा ठीक आहे पण मन आणि जीवन स्फटिकासारखं स्वच्छ पाहिजे हा चिरंतन महत्त्वाचा विचार या अभंगातून तुकोबांनी स्पष्ट केला आहे.

आजच्या जगाला या विचाराची नितांत आवश्यकता आहे. पाश्चात्य देशातल्या अनेक नगरातले रस्ते, उपाहारगृहं, तऱ्हेतऱ्हेची दुकानं स्वच्छ असतात. रस्त्यावरून चालणाऱ्या माणसांच्या अंगावरची वस्त्रं मोलाची असतात. पण त्यांची अंतःकरणं मात्र अनेक वासनांनी दुर्गंधी झालेली असतात अशी तक्रार एका पाश्चिमात्य तत्त्वचिंतकानं केली आहे. आमच्या देशातही हीच परिस्थिती आहे. हॉटेलातलं टेबल स्वच्छ आणि किंमती असतं, त्यावर शुभ्र कापडाचं आच्छादन असतं पण त्या टेबलावर दारूची बाटली आणि ताटात मांसाचे पदार्थ असतात. या विसंगतीला काय म्हणावं ? देहाला एकादशी मनात मात्र शिमगा ही परिस्थिती सर्वत्र दिसते. साधुसंतांना या गोष्टीची तीव्र खंत वाटते. शरीर स्नानासासाठी सुगंधी साबण वापरायला हरकत नाही. गांधीजी तर एका दगडानं अंग घाशीत असत. मनाच्या आणि आत्म्याच्या सुगंधाकडं संत अधिक लक्ष देतात. सर्वांसाठी त्यांचा हा उपदेश आहे. 'दूरदर्शनवर' नाना प्रकारच्या साबणांची प्रचंड जाहिरात केली जाते. पण आत्म्याला सुगंधित करणाऱ्या साबणाची जाहिरात मात्र कधीच दिसत नाही. जगात सुवासिक साबण असूनही जग उत्तरोत्तर अधिकाधिक दुर्गंधयुक्त होत जावं ही या जगाची शोकांतिका आहे. निर्मल विचार आणि आचार यासाठीच आवश्यक आहेत.

□□□

**ऐसे संत झाले कळी। तोंडी तंबाखूची नळी ॥**
**स्नानसंध्या बुडविली। पुढे भांग वोढविली ॥**
**भांग भुर्का हे साधन। पची पडे मद्यपान ॥**
**तुका म्हणे अवघे सोंग। तेथे कैचा पांडुरंग ॥**

सर्व क्षेत्रांत दांभिकता भरलेली आहे. ढोंगी माणसे प्रत्येक व्यवसायात आणि भिन्न भिन्न जीवन व्यवहारात नको तितकी पाहायला मिळतात. प्रामाणिकपणा, सत्याविषयीची चाड, निर्लोभी वृत्ती, ध्येयवाद, चारित्र्याची उदारता हे गुण जगात दुर्मिळ झालेले दिसतात. श्रेष्ठ संतत्व सध्या तर शब्दकोशातच पाहायला मिळतं. ही अवस्था कालही होती. आजची तर आहेच. पण उद्यासुद्धा ती बदलू शकेल असं चिन्ह दिसत नाही. माणसं फसवण्यासाठी तोंडावर नाना प्रकारचे मुखवटे धारण करतात. साधारण मनुष्य त्या मुखवट्याला फसल्याशिवाय राहात नाही. सर्वांनी ऐकलेली एक जुनी कथा आठवते. कोणा एका साधूच्या भगव्या कफनीला खिसे शिवलेले होते. एका भक्तानं त्यांना नम्रतेनं विचारलं, 'महाराज, हे खिसे कशासाठी आहेत?' हातातल्या माळेचे मणी मागेपुढे करीत महाराजांनी उत्तर दिले, 'मासे ठेवण्यासाठी मला त्यांचा उपयोग होतो.' भक्ताला धक्काच बसला. त्यानं विचारलं, 'आपण मासे खाता?' 'नेहमी खात नाही दारू प्याल्यानंतर खावेसे वाटतात.' आता भक्त हादरून गेला. 'म्हणजे आपण दारूही पिता?' 'नेहमी पीत नाही. जुगारात पैसे मिळाले म्हणजे पितो.'

ही कथा बाह्यतः विनोदी वाटली, काल्पनिक वाटली तरी ती एका विदारक सत्याचं दर्शन घडवते. अध्यात्माच्या क्षेत्रात देखील संताची वेशभूषा करून लुच्चे लफंगे जटा-संन्यासी वावरत असतात आणि भोळसट भक्तांच्या संपत्तीचं, आयुष्याचं शोषण करीत असतात. या गोष्टीची संत तुकोबांना मनस्वी चीड होती. म्हणूनच त्यांनी दांभिकतेवर आणि दुर्जनतेवर कठोरातले कठोर प्रहार केले आहेत. ते म्हणतात. 'तोंडात तंबाखूची नळी ठेवणारे संत या कलियुगात दिसतात. भांग आणि दारू त्यांच्या पचनी पडलेली आहे. सोगंढोंग करणारे हे लोक पाहिले म्हणजे तिथे पांडुरंग कसा राहील? 'तुका म्हणे अवघे सोंग, तेथे कैचा पांडुरंग?' दंभ, अनीती, कपट विचार आणि भ्रष्ट आचार जिथं आहे तिथं परमेश्वर कसा नांदेल?

*तुका म्हणे सोंग, दावी बाहेरील रंग ।*
*तुका म्हणे त्याचे हाणोनी फोडा तोंड ॥*

आपल्या तप्त शब्दांचे निखारे या तथाकथित संतांवर तुकोबांनी त्वेषानं टाकले आहेत. चोर आणि दरोडेखोर एकवेळ परवडतात. कारण ते सरळच दरोडे घालून लूट करतात. पण भगवे कपडे घालून घाणेरडे आचार विचार करून व्यसनात लोळणारे हे धूर्त लोक अज्ञानी जनतेला आपल्या कह्यात घेतात आणि त्यांच्या सर्वस्वाची लूटमार करतात. तुकोबांनी या आशयाचे अनेक ओजस्वी अभंग लिहून अज्ञानी जनतेचं प्रबोधन केलं आहे. बुवाबाजीवर त्यांनी आपल्या शब्दांचा घणाघाती प्रहार करून ढोंगी संतांचे मुखवटे ओढून काढले आहेत. लोकमनातली अंधश्रद्धा आणि अज्ञान दूर करण्यासाठी त्यांनी सावधगिरीचा इशारा दिला आहे. एका अभंगात ते म्हणतात,

*ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करोनी म्हणती साधू ।*
*अंगी लावूनियां राख । डोळे झाकूनि करिती पाप ।*

तुकोबांच्याच शब्दांत सांगायचं तर *'तुका म्हणे ऐशा नरा । मोजुनी माराव्या पैजारा ॥'*

संतत्वाचा देखावा करून आपली तुंबडी भरणारे, स्वतःची -प्रतिष्ठा वाढवणारे ढोंगी संत हे तुकोबांचं 'लक्ष्य' आहे. असल्या लोकांमुळं खरं संतत्व उपेक्षित राहातं. केवळ मुलामा दिलेली नाणी बाजारात खपू लागली तर सुवर्णमुद्रेला कोण विचारणार? आध्यात्मिक क्षेत्रातल्या भोंदूपणावर तुकाराम महाराज तुटून पडले याचं कारण ते एक सच्चे भक्त आणि संत आहेत. असत्य अनीती आणि दांभिकता यांच्यावर तुकोबांनी प्रखर हल्ले चढवून लोकांना जागृत केलं. संताचं सोंग वठवणारे ढोंगी लोक समाजाशी शत्रुत्व करतात. या समाजद्रोही प्रवृत्तीला तुकोबांनी कधीच क्षमा केली नाही. 'मोजून माराव्या पैजारा ।' हे त्यांचं वचन अशा दांभिकांच्या संदर्भातच आहे. असत्य सत्याचा मुखवटा घेऊन जगात वावरतं. अनीतीला नीतीचे कपडे परिधान करावे लागतात. कसाई अहिंसेचे शब्द उच्चारतो हा भोंदूपणा अधिक तापदायक आहे. 'अवघे सोंग तेथे कैचा पांडुरंग ?'

□□□

**दया तिचे नाव भूतांचे पालन। आणिक निर्दळण कंटकांचे ॥**
**धर्म नीतीचा हा ऐक वेव्हार। निवडीले सार असार ते ॥**
**पाप त्याचे नाव न विचारी मीत। भलतेचि उन्मत्त करी सदा ॥**
**तुका म्हणे धर्म रक्षावयासाठी। देवासही आटी जन्म घेणे ॥**

संत तुकोबांच्या जीवनदृष्टीची स्पष्ट आणि स्वच्छ जाणीव देणारा हा एक तेजस्वी अभंग आहे. संतविचार दुबळा असतो, त्यात सामर्थ्याची शिकवण नसते, संतांनी सदैव मवाळपणा शिकवून मर्दपणाचं खच्चीकरण केलं अशी टीका करणाऱ्या अज्ञानी टीकाकारांनी या अभंगातल्या विचारांचा नीट अभ्यास करावा. संतांनी अहिंसा, करुणा, प्रेम यांचा संदेश दिला याचं कारण समाजजीवनाच्या उभारणीसाठी या मूल्यांची नितांत आवश्यकता आहे हे त्यांनी ओळखले होते. त्यांच्या स्वतःच्या जीवनात या मूल्यांनीच सामर्थ्य निर्माण केलेलं होतं. प्राणिमात्रांचं पालन, संगोपन संरक्षण करण ही दया आहे. पण दयेचा इतकाच मर्यादित अर्थ तुकोबांनी केला नाही. लोकजीवनाचं प्रतिपालन करण्यासाठी कंटकांचं उच्चाटन करणं नितांत आवश्यक असतं. कारण लोकजीवन कलुषित करणाऱ्या अनेक दुष्ट शक्ती आजूबाजूला असतात. त्यांचा निःपात केल्याशिवाय समाजाचं संरक्षण होऊ शकत नाही. हा भगवद्गीतेतला विचार या अभंगात विवरून सांगितला आहे. उत्तम पीक यायचं असेल तर त्याला कीड लागू नये म्हणून शेतकरी जपत असतो. किडीचा नाश करून टाकल्याशिवाय अन्नधान्य पदरात पडत नाही. माजलेलं विषारी गवत नाहीसं करावं लागतं. ते करण्यात कसूर होऊ नये. दुष्ट दुर्जनांना कठोर शासन करून सत्प्रवृत्ती आणि सज्जन यांचं पालन म्हणजेच दया. द्रौपदीची अब्रू अभंग राहायची असेल तर दुःशासनाचे हात निर्दयपणे उखडून टाकणारी भीमशक्ती जगात नांदली पाहिजे. गीतेत म्हटलं आहे *'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।'* या श्लोकातला आशय तुकोबांच्या अभंगात परिणामकारक रीतीनं आला आहे. ते म्हणतात,. धर्म आणि नीतीचा हाच अर्क आहे. न्यायनीतीकडं न पाहाता मनाला वाटेल त्याप्रमाणं वागणं हा धर्म नव्हे ते पाप आहे. 'तुका म्हणे धर्म रक्षावयासाठी देवासही आटी जन्म घेणे.'

धर्मरक्षणासाठी देवाला सुद्धा पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागतो. हा सिद्धांत त्यांनी मांडला आहे. या अभंगावरून तुकारामांची दया आणि करुणा ही समर्थाची दया आणि

करुणा होती, ती दुबळ्याची नव्हती हे लक्षात येतं. रावण उन्मत्त झाला तर त्याचा नाश करणारी आणि सज्जनांना अभय देणारी रामाची वीरशक्ती उदयाला आली पाहिजे. जग असंच चालत असतं. म्हणून तर गीतेत कृष्णानं अर्जुनाला झडझडून सांगितलं आहे की नेभळ्यासारखा वागू नकोस, तुझ्या हातात धनुष्यबाण आहे. दुर्योधनप्रवृत्तीचं उच्चाटन करण्याची नैतिक, धार्मिक जबाबदारी तुझ्यावर आहे. ज्यांना जग सुंदर बनवायचं असेल त्यांनी कुरुपतेचा आणि रोगट आचारविचारांचा विध्वंस केलाच पाहिजे हा महत्त्वपूर्ण विचार तुकोबांनी उचलून धरला आहे. यावरूनच ते भावडे करुणावादी नसून समर्थ जीवनवादी होते हे स्पष्ट झालं. म्हणूनच तुकोबांची अभंगवाणी ही अभंगविचारांची वाणी आहे हे मान्य केलं पाहिजे. लोकजीवन समर्थ, प्रतिकारक्षम व्हावं हीच त्यांची भूमिका आहे.

समाजाचं पोषण आणि संवर्धन करताना तो समाज न्यायी मूल्यांच्या रक्षणासाठी संघर्ष करणारा असावा अशीच ही अपेक्षा आहे. सज्जन दुबळे असतील तर दुर्जन आपल्या दुष्ट सामर्थ्यानं समाजजीवनाची घडी पार विस्कटून टाकतात हा इतिहास आहे. दुष्टत्वाला दडपून टाकणारी - दुःशासनाला उखडून टाकणारी भीमशक्ती सज्जनांच्या बाहूत आल्याशिवाय सुसंस्कृत जगाची निर्मिती होऊ शकत नाही. या सिद्धांताचं तडाखेबंद समर्थन संत तुकारामांनी केलं आहे. गीतेत म्हटल्याप्रमाणं दुष्टांच्या विनाशासाठी आणि सज्जनांच्या रक्षणासाठी सामर्थ्याचा सदुपयोग झाला पाहिजे. म्हणूनच दैत्यप्रवृत्तीचा चेंदामेंदा करण्यासाठी देवप्रवृत्ती सदैव सिद्ध असावी ही भूमिका या अभंगातून व्यक्त झाली आहे. तुकोबांचं जीवनविषयक तत्त्वज्ञान कसं धारदार आहे याची यावरून कल्पना येते. भल्याला कासेची लंगोटी देणारे पण दुर्जनांच्या माथ्यावर काठीचा तडाखा देणारे विचार हेच सुसंस्कृत समाजाची घडण करू शकतात. आपण सारेच भले आहोत ही विचारसरणी चुकीची आहे. जे उत्तम आहे ते जोपासावं. जे अधम आहे ते उखडून टाकावं हीच जीवनदायी नीती आहे. संत या नीतीचे पुरस्कर्ते असतात.

❑❑❑

**कस्तुरीचे रूप अति हीनवर । माजी असे सार मोल तया ।।**
**आणिकही तैसी चंदनाची झाडे ।। परिमळे वाढे मोल तया ।।**
**काय रूपे असे परीस चांगला । धातु केली मोला वाढ तेणे ।।**
**फिरंगी आटिता नये बारा रुके । गुणे मोले विके सहस्रवरी ।।**
**तुका म्हणे नाही जातीसवे काम । ज्याचे मुखी नाम तोचि धन्य ।।**

मनुष्याची योग्यता त्याच्या जातीवरून, वर्णावरून आणि कुळावरून ठरवण्याची एक अतिशय चुकीची अशास्त्रीय पद्धती किंवा परंपरा प्राचीन काळापासून आपल्या देशात रूढ होती. आजही त्या रुढीचं निराकरण झालेलं नाही. खरं तर माणूस म्हणून माणसाला अंगभूत प्रतिष्ठा असली पाहिजे. मग तो ब्राह्मण असो की शूद्र असो, त्याचा रंग काळा असो की गोरा असो, माणसामाणसांत या भिंती कशासाठी उभ्या करायच्या? माणूस योग्य किंवा अयोग्य हे त्याच्या आचारविचारावरून ठरवता येतो. तो जातीच्या किंवा वंशाच्या आधारानं मोठा ठरत नाहीत. पण आपल्या जातीयवादी, वर्णवादी विचारसरणीमुळं श्रेष्ठ व्यक्तींची जगात कुचंबणा झाली आहे. मग तो महाभारतातला कर्ण असेल किंवा आधुनिक भारतातला आंबेडकरांसारखा विद्वान असेल, स्वतः तुकोबांना देखील जातीच्या कारणावरून हीन लेखणारी आणि त्यांचा उपहास करणारी प्रवृत्ती होती. ज्ञानेश्वर देखील बहिष्कृत ठरवण्यात आले. संत चोखामेळ्याला तर पांडुरंगाचं दर्शनसुद्धा घडू शकलं नाही. तो भक्त जन्मभर दर्शनासाठी तळमळत राहिला आणि अखेर तसाच मरून गेला. एका अर्थानं ही माणुसकीची हत्या आहे. संत तुकोबांनी या संबंधात म्हटलं आहे, 'नाही जातीसवे काम, ज्याचे मुखी नाम तोचि धन्य ' आपला विचार स्पष्ट करताना त्यांनी जी उदाहरणं घेतली आहेत ती मार्मिक आहेत. कस्तुरी दिसायला चांगली नसते. पण तिच्यात जो सुगंध असो तो त्यामुळं कमी प्रतीचा.ठरतो काय? चंदनाची झाडंही दिसण्यात सुंदर नसतात. सामान्यच वाटतात.पण अंगभूत सुवासामुळं चंदनाला मोल येतं. लोखंडाचं सोनं करणारा परीस तरी रूपानं कुठं चांगला असतो? पण लोखंडाचं सोनं करण्याचं सामर्थ्य त्याच्यात सामावलेलं असतं. चांगली तरवार आटवली तर तिला किंमत राहात नाही पण तरवार आपल्या गुणांवर मूल्यवान ठरते. हे एकापेक्षा एक सरस दृष्टांत देऊन जात आणि वर्ण यांचा योग्यतेशी संबंध नसून तो कार्याशी आहे हा विचार तुकोबा आपल्या

मनात बिंबवतात.

ते स्वतः कुणबी वाणी होते. म्हणून त्यांना कीर्तन करण्याचा, उपदेश करण्याचा, कवित्व करण्याचा अधिकार नाही असं परंपरावादी कर्मठ लोकांचं म्हणणं होतं. कारण ते जन्मावरून माणूस उच्च किंवा नीच ठरतो असं मानीत होते. पण या सिद्धान्ताला तुकोबांनी आपल्या स्वतःच्या उदाहरणानं जबरदस्त सुरुंग लावला. देहूचा हा वाणी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर वारकरी पंथाचा कळस बनला. मराठी भाषेचा आणि साहित्याचा मुकुटमणी झाला. अणुरेणूहून लहान असलेला तुका आकाशाएवढा झाला. कारण त्याच्यात माणुसकी होती, प्रतिभा होती, समाजनिष्ठा होती आणि सर्वांकडं समान दृष्टीनं पाहाण्याची समतावादी भूमिका होती. म्हणूनच तुकोबांसारखा माणूस हा समतेचा आणि ममतेचा आधारस्तंभ बनला. आजच्या जगानं हे विचार स्वीकारले पाहिजेत. आचारात आणले पाहिजेत. परमेश्वर जात किंवा वंश पाहात नाही. तो केवळ प्रामाणिक भक्तीचा आणि प्रेमाचा भुकेला आहे. हा मध्यवर्ती विचार तुकोबांनी काव्यमय पद्धतीनं या अभंगात सांगितला आहे.

'नाही जातीसवे काम' हा विचार आवेशपूर्ण शैलीतून इथं सांगितला गेला याचं कारण तुकारामांच्या कनिष्ठ जातीचा उल्लेख तथाकथित वरिष्ठ जातीतले लोक उपहासाने करीत असतं. ईश्वरनिष्ठा, कवित्व, कीर्तन-प्रवचनातलं नैपुण्य, चारित्र्य या सर्व अंगांनी तुकाराम कोणापेक्षाही वरिष्ठ होते. पण मानीव उच्चत्वाच्या कल्पनेनं धुंद झालेले लोक तुकोबांना मत्सरामुळं विरोध करीत होते. जात ही खरं तर एक कल्पना आहे. जातीपातीतलं उच्चनीचपण ही भ्रांतिष्ट कल्पना आहे. तुकोबांना शूद्र मानायचं तर महाराष्ट्र संत मालिकेत आणि काव्यसाहित्याच्या क्षेत्रात हा शूद्र मूर्धस्थानी जाऊ शकला याचं कारण जात किंवा वंश नसून त्याच्या ठायी असामान्य कर्तृत्व होतं. ज्यांच्यापाशी हा गुण नसतो ते वर्णजातीचं काल्पनिक भांडवल घेऊन जगत असतात. आता ही जातिनिष्ठ उच्चनीचपणाची कल्पना झटकून टाकली पाहिजे. आता जातीसवे काम नाही ही घोषणा स्वागतार्ह आहे.

जातीपातींच्या आणि क्षुद्र भेदांच्या मजबूत भिंती आजवर उभ्या राहिल्या त्यामुळं समतेचे वारे वाहू शकले नाहीत. या भिंती जमीनदोस्त करण्याची व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याची आज गरज आहे. उद्याचा इतिहास त्यातून घडेल.

❑❑❑

**पतिव्रतेची कीर्ती वाखाणिता । सिंदळीच्या माथा तिडिक उठे ॥**
**आमुचे तो आहे सहज बोलणे । नाही विचारून केले कोणी ॥**
**अंगे उणे त्याच्या बैसे टाळक्यात । तेणे ठिणग्या बहुत गाळीतसे ॥**
**तुका म्हणे आम्ही काय करणे त्यासी । ढका खवंदासी लागतसे ॥**

जगात जशी सुंदरता आहे. त्याप्रमाणंच कुरूपताही आहे. सुगंध कमी पण दुर्गंध मात्र वाटेल तितका. प्रकाश थोडा. अंधार मात्र पसरत चाललेला. या जगात सज्जनांची संख्या अल्प. दुष्ट दुर्जन मात्र ठायी ठायी भेटतात. पण म्हणून निराश होण्याचं कारण नाही. दुर्गंधाचं रूपांतर सुगंधात करण्याचा प्रयत्न माणसानं चालू ठेवला पाहिजे. काटे फार झाले ही तक्रार करण्यात अर्थ नसतो. काटेकुटे नष्ट करावे लागतात. संत तुकारामांची ही भूमिका होती. संत कधीही निष्क्रिय नसतात. जगात साचलेली घाण नाहीशी करून ते स्वच्छ करण्यासाठी संतांची धडपड चाललेली असते. जमिनीत पेरणी करण्यासाठी प्रथम त्या जमिनीतलं तण उपटून काढावं लागतं. जमीन नांगरून काढावी लागते.पेरणीसाठी नांगरणी ही एक आवश्यक प्रक्रिया आहे. तुकोबांनी सुजनतेचा प्रभाव वाढावा म्हणून दुर्जनतेवर प्रहार केले आहेत. अशावेळी तुकोबांची भाषा प्रखर होते. मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास पण 'कठीण वज्रासि भेद् ऐसे ' असं त्यांनी आपल्याबद्दल जे म्हटलं ते अगदी यथार्थ आहे. तुकोबांच्या शब्दांत तीव्रता आणि भेदकता अशा वेळी येते. कारण त्यांच्या हृदयातच सद्भावनेचे स्फुल्लिंग आहेत. अशिवाला जाळण्याची शिवशक्ती ज्या संतांच्या शब्दांतून प्रकट होते त्यांत तुकोबा हे आहेत. ते म्हणतात,

'आम्ही सहजपणानं बोलतो. कोणाला तरी लागावं म्हणून हेतुपूर्वक बोलत नाही. पण ज्याच्या ठिकाणी दोष आहे, दांभिकता आहे, दुष्टता आहे त्याला आपल्याच टाळक्यावर प्रहार केला असं वाटतं. अहो, साहजिकच आहे. पतिव्रतेचा गौरव केला तर शिंदळीच्या मस्तकात तिडीक उठते त्याला आम्ही काय करणार ? ज्याला जखम झाली आहे त्याला सहज धक्का बसतो याला आमचा निरुपाय आहे. तुकोबांनी या अभंगातून आपलं उद्दिष्ट स्पष्ट केलं आहे. सत प्रवृत्तीची स्तुती केली की दुष्प्रवृत्ती दुखावली जाते. न्यायाचा जयजयकार केला की अधर्म आणि अनीती प्रक्षुब्ध होते. धर्मराजाची प्रंशसा केली, भीमार्जुनाला मान दिला की दुर्योधन् दुःशासनाच्या मनात मत्सराचा अग्नी पेटून

उठतो. पण हे असंच चालणार. घाणेरड्या मत्सरानं आणि द्वेषानं पछाडलेले क्षुद्र जीवजंतू फुलांच्या सुगंधाला शिव्या देत राहाणार. कावळ्यानं कोकिळेचा मत्सर करावा तसं हे आहे. पण साधुसंतांनी सदैव धर्माचा आणि नीतीचा ध्वज उंच धरला आहे. त्यांनी चंदनवृक्षाचा सद्‌भावनेनं जयघोष केला. बाभळीची काटेरी झुडपं जळफळत बसली म्हणून चंदनसुवासाला उणेपणा येत नाही. सुवासाची स्तुतिस्तोत्रं संतांनी गायची नाहीत तर मग कुणी गायची ? तुकोबा आपल्या एका अभंगात म्हणतात, *'झाडू संतांचे मारग, आडरानी भरले जग.'* आडरानात भरकटत राहिलेल्या जगाला योग्य मार्गदर्शन करून त्याची वाट स्वच्छ करण्याची जबाबदारी संतांच्या सात्विक, रचनात्मक शक्तीनं उचललेली असते. हे कार्य करताना कोणाच्या रागालोभाची पर्वा करण्याची त्यांना जरूर नसते. जमीन नांगरताना दगडगोट्यांवर आणि विषारी तणांवर आघात होणारच. तो झालाच पाहिजे. विकृतीवर शस्त्रक्रिया केल्याशिवाय प्रकृती निकोप होत नाही. संत तुकाराम हे विकृतीचे विध्वंसक आणि प्रकृतीचे उपासक होते. जीवनाच्या शुद्धीकरणासाठी ते अखंड झगडत होते. तुकोबांचा हा एक वैशिष्ट्यपूर्ण अभंग असून तो त्यांच्या समर्थ व्यक्तित्वाची साक्ष देणारा आहे.

सत्प्रवृत्तीचा गौरव दुष्प्रवृत्तीला रुचत नाही. तुकारामांची लोकप्रियता हळूहळू वाढत गेली. त्यांचं शिष्यत्व उच्चवर्णियांनीही स्वीकारलं. लोकभाषेतून लोकमनाला जागवणाऱ्या या संताच्या कीर्तन प्रवचनाला जनसमूह लोटू लागला. हे दृश्य मत्सरी लोकांना टोचू लागलं असा तत्कालीन संदर्भ या अभंगाच्या पाठीशी आहे असंही मला वाटतं. तुकोबांची प्रशंसा म्हणजे पतिव्रतेचा गुणगौरव. तो एखाद्या शिंदळीला कसा सहन होणार ? तुकोबांच्या अभंगांची शैली सुगम आणि परिणामकारक आहे. दृष्टान्त सहजपणे अर्थ स्पष्ट करतात. या अभंगांतून तुकोबांच्या व्यक्तित्वाचंही स्पष्ट दर्शन होतं. त्यांना लोकमानसात स्थित्यंतर व्हावं आणि लोकजीवनाला सुयोग्य आकार मिळावा ही तीव्र आकांक्षा होती. तुकोबांनी केलेली टीका काहीशी आक्रमक वाटली तरी ती वैद्यानं केलेल्या शस्त्रक्रियेसारखी हितकारक आहे. गळू फोडावेच लागते.ते कुणी प्रेमानं सांभाळीत नाही. तुकोबांच्या टीकेत रचनात्मकता आहे, विध्वंसकता नाही.

❑❑❑

**जोडोनिया धन उत्तम वेव्हारे। उदास विचारे वेच करी ॥**
**उत्तमचि गती तो एक पावेल। उत्तम भोगील जीव खाणी ॥**
**परउपकारी नेणे परनिंदा। परस्त्रिया सदा बहिणी माया ॥**
**भूतदया गाई पशूंचे पालन। तान्हेल्या जीवन वनामाजी ॥**
**शांतिरूपे नव्हे कोणाचा वाईट। वाढवी महत्त्व वडिलांचे ॥**
**तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ। परमपद बळ वैराग्याचे ॥**

आदर्श जीवनाचं चित्र या अभंगात तुकारामांनी मनःपूर्वक रंगवलं आहे. जीवन कसं जगावं, सुख आणि समाधान मिळवण्याचे घटक कोणते, इहलोकात आणि परलोकात शांती व समाधान कोणत्या आचारविचारातून मिळू शकतं याचा एक तर्कशुद्ध विचार तुकोबांनी सांगितला आहे. सुखाची अज्ञानी माणसाची कल्पना काय असते? आपल्याला भरपूर संपत्ती मिळाली पाहिजे. ती मिळवताना वाकड्या वाटेनं चालावं लागलं, कोणावर अन्याय करावा लागला, कोणाच्या हक्काचा जमीनजुमला मस्तवालपणानं ओरबाडून घ्यावा लागला, लाचलुचपतीच्या आणि भ्रष्ट आचारातून पैसा आणि अधिकार मिळावावा लागला तरीही हरकत नाही. कारण शेवटी सुखसमाधान जर सोन्यानाण्यात, वस्त्रालंकारात, वाड्यामाड्यात आणि घोड्या -गाड्यात असेल तर नीतीचा, धर्माचा विचार करून ते कसं मिळेल? धर्म आणि नीती रसातळाला गेली तरी चालेल. शील आणि सदाचार समुद्रात बुडाले तरी चालतील. पैसा आणि मालमत्ता याच गोष्टी सुखासाठी आवश्यक आहेत. ज्याच्याजवळ पैसा आहे , त्यालाच प्रतिष्ठा मिळते. सगळी सुखसाधनं त्याच्याकडं धावत येतात. तोच सद्गुणी ठरतो. *'सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते ।'* अशी ही विचारसरणी आहे. या विचाराप्रमाणं बहुतेक लोक चालतात. गरीबांचं शोषण करून त्यांच्या हक्काचा पैसा गिळंकृत करणं ही चोरी आहे. अशाप्रकारचे चोर आणि दरोडेखोर जगात पुष्कळ आहेत. पण ते खरोखरच सुखात आहेत काय? त्यांचं मन शांत आणि तृप्त असतं काय? हे लोक सारखे वखवखलेले असतात. त्यांचा हावरेपणा वाढतच असतो.

संत तुकोबांनी मात्र शांतीचा आणि तृप्तीचा एक सुंदर विचार आपल्यासमोर ठेवला आहे. ते आपल्याला सांगतात. बंधूनो चांगला व्यवहार आणि व्यापार करून धन मिळवा.

आणि त्या धनाचा व्यय उदासीन वृत्तीने करा, 'उदास विचारे' यांचा अर्थ हे धन माझं नाही. त्याच्याविषयी मला लोभ नाही. उदासीन म्हणजे दुःखी नव्हे. उदासीन याचा अर्थ अलिप्त. असं कार्य जो करील त्यालाच उत्तम गती प्राप्त होईल. तोच उत्तम सुख मिळवू शकेल. जो दुसऱ्याची कधी निंदा करीत नाही. परहित करण्यात जो तत्पर आहे आणि परस्त्रियांना जो आपल्या आई-बहिणीप्रमाणं मानतो तो सुखी समाधानी होतो. सर्व भूतमात्रांवर प्रेम करावं. गायीचं आणि पशुंचं पालन करावं. तहानेल्याला पाणी द्यावं, कोणाशी वाईट न वागता जो मानासिक शांती ठेवतो आणि आपल्याहून वडिलांना मान देतो. तोच माणूस खऱ्या अर्थानं सुखसंपन्न असतो. हाच आदर्श गृहस्थाश्रम आहे. परमस्वरूपाचं पद यामुळंच प्राप्त होतं.

आजच्या द्रव्याची पूजा बांधणाऱ्या आणि सत्तेसाठी सर्व नैतिक मूल्यांचा बळी देणाऱ्या माणसाला तुकोबांचा हा संदेश कितपत रुचेल हे सांगता येणार नाही. गोड दुधाचं रूपांतर विषात करण्याची दुष्ट शक्ती सर्पाच्या ठिकाणी असते. तुकोबांच्या पूर्वीही शतकानुशतकं हा उपदेश साधुसंतांनी, तत्त्ववेत्यांनी, तीर्थंकरांनी, आचार्यांनी केला आहे पण माणूस होता तिथंच आहे. त्यांचं वाकडं शेपूट सरळ होत नाही. पण तरीही संतांनी उपदेश केलाच पाहिजे. मेघांनी पाऊस पाडलाच पाहिजे. तुकोबांच्या वाणीतून सुख शांतीच्या अमृतधारा बरसल्याच पाहिजेत. उदंड धन मिळवलं म्हणजे सुख मिळू शकतं हा एक भ्रम आहे हे आता सिद्ध झालं आहे. सुखाची साधनं संपत्तीमुळं मिळू शकतील पण सुख कसं प्राप्त होईल? शांती आणि प्रीती, प्रसन्नता आणि समाधान यातच खऱ्या सुखाचे झरे लपले आहेत. पैशाच्या पाठीमागं धावणाऱ्या आणि पैशासाठी व्याकुळ होणाऱ्या जगाच्या लक्षात हे कसं येणार? **The love of money and the love of learning seldom meet** पैशावर प्रेम करणारे विद्येवर प्रेम करीत नाहीत. पण काही म्हटले तरी संपत्तीपेक्षा ज्ञान, सुविचार आणि संस्कृती श्रेष्ठ आहे. रस्किन या तत्वचिंतकानं संस्कृतीची व्याख्या करताना म्हटलं आहे 'संस्कृती म्हणजे सुसंस्कृत व्यक्तींची निपज' संपत्तीतून संस्कृती निर्माण होत नाही. संस्कृतीमुळं संपत्ती निर्माण होते. तुकारामांनी हाच विचार आपल्या पद्धतीनं अधिक परिणामकारक भाषेत मांडला आहे.

❑❑❑

**बोलिलो ते काही तुमचिया हिता । वचन नेणता क्षमा की जे ॥**
**वाट दावी तया न लगे रुसावे । अतित्याई जीवे नाश पावे ॥**
**निंब दिला रोग तुटाया अंतरी । पोभाळिता वरी आत चरे ॥**
**तुका म्हणे हित देखण्यासी कळे । पडती आंधळे कूपामाजी ॥**

संताचं प्रमुख लक्षण असं असतं की संत संपूर्णपणे परोपकार निरत असतात. त्यांचा कोणताही स्वार्थ नसतो. धरित्रीला जलधारांनी न्हाऊ घालण्यात मेघाचा कोणता स्वार्थ असतो? पथिकाला सावली देण्यात वृक्षाचा किंवा तृषार्ताला पाणी देण्यात झऱ्याचा काही स्वार्थ असतो का? जगाला प्रकाश देताना सूर्यचंद्राला काही वैयक्तिक स्वार्थ साधायचा असतो काय? या साऱ्या गोष्टी लोककल्याणासाठी ते करीत असतात. संत आपलं सारं जीवन लोकहितासाठीच समर्पित करतात. त्यांना केवळ त्यातून एक आंतरिक समाधान मिळतं. दुःखानं व्याकुळ झालेल्या माणसाचं दुःख निरसून टाकणाऱ्या निःस्वार्थी व्यक्तीला जे समाधान मिळतं ते महत्त्वाचं असतं. संत तुकारामांनीही जनतेला याच भावनेनं उपदेश केला. तुकोबांच्या भाषेत काही वेळा तीव्रता आली आहे. अन्यायासंबंधीची चीड आणि सोंगढोंगावरचा आपला राग प्रकट करताना त्यांच्या शब्दांत काही ठिकाणी कडवटपणा आला आहे. त्यांची वाणी कित्येक स्थळी आक्रमक बनली आहे. ज्याला जग सुधारायचं आहे त्याला कधी कधी फटकळपणानं बोलणं भाग पडतं, कोणी गोड शब्दांनी सुधारतो. पण कित्येकांच्या पाठीवर कठोर शब्दांचा आसूड त्यांच्याच हितासाठी उडवावा लागतो. तुकोबांचे शब्द काही ठिकाणी फुलासारखे कोमल आहेत. आणि आवश्यक तिथं ते शब्द ज्वालाग्राही बनले आहेत. दुर्जनाबद्दल बोलताना ते रागावून म्हणतात, *'तुका म्हणे ऐशा नरा । मोजूनी माराव्या पैजारा ।'* मुर्दाड लोकांबद्दल बोलताना एका अभंगात त्यांनी म्हटलं आहे, *' किती सांगो तरी नाईकती बटकीचे, पुढे सिंदळीचे रडतील'* या शब्दांत त्यांच्या अंतःकरणातली क्षोभाची भावना प्रकट झाली आहे. पण या क्षोभाच्या मागे लोकांसंबंधीचं अतूट प्रेम आहे. लोकांच मंगल व्हावं, लोक सन्मार्गाकडे वळावेत. त्यांच्या आयुष्याला, जगण्याला, नैतिकतेचं अधिष्ठान लाभावं हीच त्यांची एकमेव इच्छा आहे. हट्टी दुराग्रही मुलाला आई एखाद्या वेळेस संतापून एखादं अभद्र विशेषण देते. पण त्या संतापाच्या मुळाशी तिच्या अंतरीचा प्रेमभाव ओथंबलेला असतो.

कोणताही संत मातेच्या वत्सल दृष्टीनंच जगाकडं पाहातो. तो कधी जगावर रागावला, काही बोलला, तरी त्याला स्वतःला काहीच मिळवायचं नसतं. तुकोबा प्रांजलपणानं म्हणतात मी केवळ तुमच्या हितासाठी बोललो पण माझं वचन आवडलं नसेल, त्यातला हेतू समजला नसेल तर मला क्षमा करा. वाट दाखवणाऱ्या माणसावर खरं तर रागावू नये. त्यानं योग्य वाट दाखवलेली असते. पण सरळ रस्ता सोडून दुराग्रहानं आडरस्त्यानं गेलात तर नाश होईल. अंतरातला रोग नाहीसा व्हावा म्हणून मी कडुनिंब दिला. पण ते औषध पोटात न घेता नुसतं अंगाला लावलं तर रोग बरा होणार नाही. जे विवेकी आहेत त्यांना आपलं हित कळतं पण ज्यांना विचारदृष्टी नाही ते खोल विहीरीत पडतात.

तुकोबांचे हे शब्द सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजेत. सत्य कडवट असतं पण ते सांगणाऱ्याचं मन कडवट नसतं. हिताचे शब्द दाहक असतात. पण त्यातला आशय शीतल आणि कल्याणकारक असतो. गोड बोलून गळा कापणाऱ्या दुर्जनापेक्षा रोखठोक वचन उच्चारून सरळ रस्त्यानं नेणाऱ्या मार्गदर्शक विचारवंतामुळं जग सुधारू शकतं. तुकोबांसारखे झडझडून बोलणारे, आणि प्रसंग विशेषी आपल्या कठीण शब्दांची गोफण फिरवणारे निःस्वार्थी तत्त्ववेत्ते आणि समाजसुधारक आजच्या जगाला पाहिजे आहेत. म्हणूनच आम्हाला तुकोबा सदैव हवे आहेत.

तुकोबांचा स्पष्टवक्तेपणा, फटकळपणा जनकल्याणासाठी होता. संत आणि विचारवंत असेच सत्य सांगणारे, आवश्यक तेव्हा परखड बोलणारे असावेत. आजच्या जगातले कित्येक विचारवंत काय बोलतात ते त्यांचे त्यांनाच कळत नाही. कारण डोक्यातल्या कल्पना स्पष्ट नसतात. दुष्प्रवृत्तीचा झडझडून धिःक्कार करणारे शब्द ते बोलत नाहीत कारण ते मिंधे तरी असतात किंवा भित्रे तरी असतात. तुकोबा हे निर्भय विचारवंत होते. त्यांचं मन निर्मळ होतं. त्यांना स्वतःला काहीच नको होतं. म्हणून ते म्हणतात, 'बोलिलो ते तुमचिया हिता ।' आजचे तथाकथित विचारवंत स्वार्थ साधण्यासाठी बोलतात. समाज हा त्यांचा केंद्रबिंदू नसतो. स्वतःला केंद्रवर्ती मानून ते व्यवहारी दृष्टीनं बोलतात. कौरवांच्या दरबारात मिंधे झालेले विद्वान पुष्कळ होते. आज देखील तीच अवस्था आहे. म्हणूनच आजच्या जगाला तुकोबाची नितांत आवश्यकता आहे.

❑❑❑

**वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा। येरांनी वाहावा भार माथां।**
**स्वादल्याची गोडी देखिल्यासी नाही। भार धन वाही मजुरीचे ।।**
**उत्पत्ति पाळण संहाराचे निज। जेणे नेले बीज त्याचे हाती ।।**
**तुका म्हणे आम्हां सापडले मूळ। आपणचि फळ आले हाता ।।**

संतश्रेष्ठ तुकारामांना वेदपठणाचा अधिकार नव्हता. ज्ञानेश्वरांनी वेदांच्या संदर्भात म्हटलं आहे की वेद हे फक्त त्रैवर्णिकांपुरतेच मर्यादित असल्यामुळं शुद्रातिशुद्रांना त्यातील ज्ञानाचा लाभ होत नाही. वेद उदार असले तरी या बाबतीत ते कृपण असून त्यांनी शूद्रवर्णाला ज्ञानापासून वंचित ठेवलं आहे. वैदिक परंपरा विषमतावादी आहे. ब्राह्मण हा सर्वश्रेष्ठ. त्यानंतर क्षत्रिय आणि वैश्य व सर्वात शेवटी शूद्र आणि अतिशूद्र अशी उतरंड मानलेली आहे. याचा परिणाम असा झाला की शूद्रांना धर्मग्रंथ वाचण्याची आणि मंदिरात जाण्याचीही बंदी करण्यात आली. सर्वसामान्य माणूस अशा प्रकारच्या कठोर बंधनात अज्ञानी राहिला तर त्यात आश्चर्य नाही. सर्व प्रकारच्या सामाजिक आणि विशेषतः आध्यात्मिक अधिकारापासून शूद्रांना कर्मठ परंपरेनं दूर ठेवलं होतं. तुकोबांसारख्या संत सज्जनाला आणि परम भक्ताला याचं केवढं वैषम्य वाटत असेल याची आपण कल्पना करू शकतो. तुकारामांनी स्वतःच आपल्या दुःखाचं, वंचनेचं वर्णन केलं आहे. *'घोकाया अक्षर मज नाही अधिकार,' 'यातिहीन, मति हीन, कर्महीन माझे सांडोनिया सर्व लज्जा शरण आलो तुज '* अशा प्रकारचे न्यूनगंडात्मक उद्गार त्यांच्या सुरवातीच्या काही अभंगात आढळतात. पण विषमता मूलक परंपरेचं त्यांनी पुढं कधीच समर्थन केलं नाही. भक्ती - प्रामाणिक उत्कट ईश्वरभक्तीनंच माणूस श्रेष्ठ ठरू शकतो. जो भक्तिहीन आहे तो मात्र कनिष्ठ असतो. असं त्यांनी आपल्या एका अभंगात म्हटलं आहे. *'अभक्त ब्राह्मण जळो त्याचे तोंड,'* आणि *'वैष्णव चांभार धन्य त्याचे कुळ'* हे तुकोबांचे उद्गार महत्त्वपूर्ण आहेत. माणसाची उच्चनीचता त्याच्या अंतःकरण-प्रवृत्तीवर अवलंबून असते. जात आणि वर्ण यांच्याशी त्या गोष्टीचा काडीइतकाही संबंध असत नाही. *'तुका म्हणे नाही जातीसवे काम'* हे त्यांचे उद्गार सुप्रसिद्ध आहेत.

'वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा' हा अभंग तुकोबांच्या आत्मप्रत्ययाचा द्योतक आहे. उच्चकुलीन म्हणवणारे ढोंगी लोक त्यांनी पाहिले आहेत आणि त्याबरोबरच चोखा

मेळा, गोरा कुंभार, सावता माळी, सेना न्हावी, यासारखे अकुलीन असलेले पण श्रेष्ठ भगवद्भक्त-मग त्यात नामदेव आणि जनाबाईही येतात.सोयराबाई आणि कान्होपात्राही येतात. या श्रेष्ठ संतांच्या जीवनात प्रत्यक्ष पांडुरंग अवतरलेला होता हे त्यांनी जाणलं होतं. म्हणून वेदवेत्त्या कर्मठ पंडितांना उद्देशून तुकाराम आत्मविश्वासानं म्हणतात,

'अरे, वेदांचा अर्थ, त्यांचा आत्मा आम्हालाच माहीत आहे. इतरांनी मात्र वेदाचा केवळ भार मस्तकावर वाहावा.' वेदपाठ म्हणणाऱ्यांना वेद कळलेच नाहीत. प्रत्यक्ष खाणाऱ्याला गोडी कळते. पाहाणाऱ्याला नाही. तुम्ही धन वाहून नेणारे मजूर आहात. तुम्हाला ते धन मिळू शकत नाही. आम्हाला मात्र उत्पत्ती-स्थिती आणि विलय यांचं मूळ असलेला प्रत्यक्ष पांडुरंग भेटलेला आहे. आणि त्याचं फळही आम्ही चाखत आहोत. मस्तकावरून वेद वाहून नेणाऱ्यांना ते कळत नाहीत.आमच्या अंतःकरणातच वेदाचा अर्थ सामावलेला आहे.'

तुकोबांचे हे अस्मितापूर्ण उद्‌गार स्फूर्तिदायक आहेत. 'तुका आकाशा एवढा' कसा आहे हे या अभंगातून समजतं. जात आणि वर्ण, कुळ आणि वंश या कल्पनांपेक्षा परमेश्वराची निस्सीम भक्ती अधिक महत्वाची. भक्तीतूनचं निखळ ज्ञानाची प्राप्ती होते. असं म्हणून वेदपाठकांना तुकोबांनी हिणवलं आहे. वेदपठण करणारे ब्राह्मण वेदाच्या अर्थाशी परिचित असतातच असं नाही. घोकंपट्टी आणि पोपटपंची करणाऱ्या लोकांना अर्थाशी काही कर्तव्य नसतं. वेद न वाचताही वेदातलं सार आपल्या आचार-विचारात उतरवणारे संत झाले आहेत. नामदेव, तुकाराम , चोखामेळा, गोराकुंभार हे वेदज्ञ नसूनही त्यांच्या जीवनातून वेदार्थ प्रकट होत होता. मी सहजवाणीनं बोलतो. माझ्या घरी वेदान्त पाणी वाहात आहे. या उद्‌गारात दर्प किंवा दंभ नाही. त्यात निखळ सत्य आहे. साऱ्या जीवमात्रांवर प्रेमवात्सल्याची पाखर घालणारे तुकाराम खऱ्या अर्थानं वेदवेत्ते होते. केवळ पाठांतर करणारे मात्र भारवाहक राहिले. श्रीखंडाच्या पातेल्यातल्या पळीला श्रीखंडाची चव कधी कळते का? खाणाऱ्यालाच ती समजते. केवळ शब्दज्ञान कोरडं असतं. ते जीवनात रस निर्माण करू शकत नाही. ज्ञान हे अंतःकरणात उतरून रक्ताच्या प्रत्येक थेंबात जोपर्यंत रुजत नाही तोपर्यंत ते निरर्थक ठरतं. ज्ञानातून क्रिया घडावी. *'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे.'*

❑❑❑

**आसावले मन जीवनाचे ओढी । नामरूपी गोडी लावियेली ।।**
**काय तुझे पायी नाही भांडवल । माझे मिथ्याबोल जाती ऐसे ।।**
**काय लोखंडाचे पाहे गुणदोष । सिवोन परीस सोने करी ।।**
**तुका म्हणे माझे अवघे असो द्यावे । आपुले करावे ब्रीद साच ।।**

वारकरी पंथानं नामःस्मरणाचा सुलभ मार्ग भक्तांना दाखवला. विठ्ठलाच्या नावात एक अपूर्व गोडी भक्ताला जाणवते. परमेश्वराला कोणत्याही नावानं साद घालावी. त्याला राम म्हणा, कृष्ण म्हणून संबोधा किंवा शिव, विष्णू अथवा विठ्ठल म्हणा. परमेश्वराची ही सारी नावं माधुर्यानं ओथंबलेली आहेत असंच भक्ताला वाटत असतं. ते नाव भक्ताच्या चित्तात रुजलेलं असतं. विठ्ठल म्हटल्याबरोबर ती सावळी सुंदर सगुण मूर्ती डोळ्यांसमोर उभी राहाते आणि भक्ताचं मन अपूर्व आनंदानं ओसंडून वाहू लागतं. अनेक भक्तकवींनी नामाचा गौरव उत्कटतेनं केला आहे. तुकोबांचा हा अभंग नाममाहात्म्य स्पष्ट करणारा आहे. आणखी एका अभंगात ते म्हणतात.

*गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ।*
*आनंदले मन । प्रेमे पाझरती लोचन ।।*

नामाचा अनिवार छंद भक्ताला लागलेला असतो. ईश्वरनामाची होडी करून आपण संसारसागर तरून जाऊ शकतो असा विश्वास त्याला वाटत असतो. विठ्ठल हेच आपल्या जीवनाचं सर्वस्व. जोपर्यंत विठ्ठलनाम आपल्यापाशी आहे तोंपर्यंत आपल्याला कळिकाळाचीही भीती नाही. म्हणून तुकोबांनी म्हटलं आहे,

*घेई माझे वाचे । गोड नाम विठोबाचे ।*
*गोड तुझे रूप । गोड तुझे नाम ।*
*देई मज प्रेम । सर्व काळ ।*

विठ्ठल या तीन अक्षरांत अमृताच्या रसाहून अधिक गोडी आहे. *'जिव्हे गोडी तीन अक्षरांचा रस । अमृत जयास फिके पुढे ।।'* भक्ताचं मन आणि ईश्वरनाम दोन्ही एकरूप झालेली असतात. प्रतिक्षणी नामःस्मरण केल्याने चित्तवृत्ती प्रफुल्लित होतात. जीवनाचा उत्साह वाढतो. हा अनुभव भक्तालाच मिळू शकतो. जन्मदात्री आई आणि आपली जन्मभूमी यांचं नाव जसं आपल्याला आनंदित करतं त्याप्रमाणं ईश्वरनामाच्या ज्योतीभोवती

भक्तमनाचा पतंग सतत उत्साहानं घिरट्या घालीत राहातो. मीरेचं मन --नव्हे सारं जीवन, फार काय तिचा श्वासोच्छ्वास सुद्धा कृष्णनामानं, कृष्णप्रेमानं भरलेला होता. तशीच अवस्था भक्तश्रेष्ठ तुकोबांचीही झाली आहे. ते म्हणतात, तुझ्या नामरूपानं मला गोडी लावली. मन आशावादी बनलं. जीवनाची ओढ वाटू लागली. माझ्याजवळ कसलंही भांडवल नाही. पण लोखंडाचं सोनं करताना परीस त्या लोखंडाचे गुणदोष पाहात नाही. त्याप्रमाणं मी तुझी नामभक्ती करतो आहे. तुझं रूप पाहातो आहे. आता तू मला तृप्त कर. माझ्या आयुष्याचं सोनं कर. *'धाव घाली आई । आता पाहतेसि काई ।'* अशी करुणा या अभंगातून तुकारामांनी व्यक्त केली आहे. भावोत्कटता हा कवितेचा प्रधान गुणधर्म असतो. या अभंगातली भावना आर्तसुंदर आणि परमोत्कट आहे. आपल्या हृदयस्थ स्वरातून तुकोबा परमेश्वराला कशी साद घालतात त्याचं हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे यात शंका नाही.

काव्य म्हणजे हृदयस्थ भावनेचा उत्कट आविष्कार. या कवितेतला आविष्कार उदात्त आहे. तुकोबांच्या जीवाचे जीवन म्हणजे विठ्ठलभक्ती. भक्तीचा आनंद सामान्य माणसाला कळू शकत नाही. ज्याचं मन रुक्ष आहे. ज्याला एखादं अनन्य श्रद्धास्थान नाही तो भक्तीतली तृप्ती आणि आनंद समजू शकणार नाही.भक्तीचे देखील अनेक प्रकार असू शकतात. देश, धर्म, समाज, कला, साहित्य किंवा एखादी व्यक्ती हेदेखील भक्तीचे विषय असू शकतात. तुकारामांची भक्ती दृढ आणि खोल अशी ईश्वरभक्ती आहे. या भक्तीतूनच ते प्रेममार्गी आणि मानवताधर्मी बनले. भक्तिभावनेमुळं त्यांच्या जीवनाला सूर सापडला. त्यांच्या अभंगवाणीतलं खरं सामर्थ्य या भावनेतच सामावलं आहे.

भक्तीचा ओलावा असेल तर जीवनाचा हिरवेपणा कायम राहातो. भक्ती ही एक शक्ती आहे. व्याकुळ मनाला शांती देणारी ती संजीवनी आहे. भक्तीत समर्पणाचा भाव असतो. रामभक्त हनुमान, कृष्णभक्त सुदामा आणि अर्जुन, विठ्ठलभक्त तुकाराम ही सारी भक्तीची असामान्य प्रतीकं आहेत. जी भक्ती निखळ आणि निर्मळ असते ती शांती व तृप्ती देते. म्हणूनच भक्तिप्रेमाची महती आहे.

❑❑❑

**डोळियांचे दैव आजि उभे ठेले । निधान देखिले पंढरीचे ॥**
**काय ते वानावे वाचेचे पालवे । वेदा न बोलवे रूप ज्याचे ॥**
**आनंदाच्या रसें ओतीव चांगले । देखता रंगले चित्त माझे ॥**
**तुका म्हणे मी तो सगळा विरालो । विठ्ठलाचे झालो दर्शनाने ॥**

भक्ताच्या मनःस्थितीचं सूक्ष्म, सुंदर, गहिरं चित्र तुकोबांनी आपल्या शब्दांतून रेखाटलं आहे. भक्ताच्या मनात एकच आस असते. त्याचा श्वास एकाच गोष्टीसाठी चालू असतो. त्याच्या दृष्टीला एकच ओढ असते. ध्यानी, मनी, स्वप्नी एकाच गोष्टीसाठी तो आसुसलेला असतो. त्याला हवं असतं देवाचं सगुण, साजरं रूप. ते रूप त्याला दिसलं की कृतार्थतेची, विलक्षण तृप्तीची एक चैतन्यपूर्ण लहर त्याच्या अंगागांतून खेळू लागते. तुकोबांना विठ्ठलाचं सगुण, साकार दर्शन व्हावं , आपण ते दिव्यरूप आपल्या हृदयात उतरून घ्यावं हा ध्यास लागलेला होता. प्रत्येक आर्त भक्ताची हीच इच्छा असते. एकदा तरी त्या सावळ्या ब्रह्मानं आपल्याला सगुण स्वरूपात दर्शन द्यावं. भक्ताची ही इच्छा उचितच आहे. रूप आणि गुण यांच्या पलीकडं परब्रह्म असतं. तो परमेश्वर निराकार आहे, निर्गुण आहे. त्यानं सारं विश्व व्यापलेलं आहे. तो विश्वात्मक देव एखाद्या मर्यादित रूपात आणि रंगात सामावला जाऊ शकत नाही हे तुकोबांसारख्या ज्ञानी भक्ताला समजत नव्हतं असं नाही. ज्ञानेश्वरांनीही निर्गुण असलेल्या ईश्वराचे सगुण रूप मनात साठवलेलं होतं. माणूस भावनाशील असल्यामुळं त्यानं परमेश्वरालाही विशिष्ट रंगरूप दिलं, आकार दिला. विठ्ठलाला शामल रूपात विटेवर उभं केलं.

तुकोबा म्हणतात, *'तुज घालोनिया पूजितो संपुष्टी । परि तुझ्यापोटी चवदा भुवने ।'* जे विशाल आहे ते भक्त आपल्या समाधानासाठी एका संपुष्टात स्थापन करतो आणि सगुण पूजनात रममाण होतो. नामदेवही म्हणतात, *'निर्गुणीचे वैभव आले भक्तिवेषे । ते हे विठ्ठलवेषे ठसाविले ॥*ज्ञानेश्वरांनी म्हटलं आहे, *हा निर्विकल्प देव येतसे रूपा ।करावया कृपा भक्तजना ॥*

परमेश्वर कोणत्यातरी रूपात पाहिल्याशिवाय भक्ताची तहान शमत नाही. सगुण भक्ती हा भावनेचा, जिव्हाळ्याचा विषय आहे. निर्गुण भक्तीत एकप्रकारचा कोरडेपणा जाणवतो.

माणूस हा रस, रूप, रंग, गंध आणि स्पर्श यांचा भोक्ता असतो. परमेश्वर आपल्याला इंद्रियांनी देखील अनुभवता आला पाहिजे ही भक्ताची भूक असते.

म्हणूनच तुकाराम म्हणतात, *'दाखवी आपुले सगुण रूपडे । वंदीन मी कोडे पाय तुझे । न लगे तो मोक्ष मज सायुज्यता ।'* तुझं मुखदर्शन झालं की माझं समाधान होईल. विठ्ठलाचं दर्शन घडणं हे डोळ्यांचं नव्हे साऱ्या जीवनाचं सौभाग्य आहे. कारण वेद देखील ज्याचं वर्णन करताना असमर्थ ठरतात ते आनंदरसात ओतलेलं परब्रह्म प्रत्यक्ष समोर उभं ठाकावं यासारखं दुसरं सुदैव ते कोणतं ? पंढरीराय मला दिसला. मला भेटला आणि त्याच्या रूपात मी विरून गेलो हे माझं सर्वोच्च भाग्य आहे. देव पाहता पाहता भक्तच देवरूप होतो. हीच भक्तीतली शक्ती आहे. विठ्ठलदर्शनाची दिवाळी अनुभवलेल्या तुकोबांच्या सुखसोहळ्याचं त्यांनी स्वतःच या अभंगात चित्रण केलं आहे. *तुझे रूप पाहता देवा । सुख झाले माझ्या जिवा । जन्मोजन्मीचे सुकृत । तुझे पायी रमे चित्त ।* हे त्यांचे शब्द आहेत.

अखिल ब्रह्मांड व्यापून उरलेला परमेश्वर वस्तुतः निर्गुण आणि निराकार आहे पण भक्ती त्याला सगुण आणि साकार बनवणार. ज्ञानवंताला निर्गुणाची पूजा करता येते. पण भक्त मात्र मूर्तीचा म्हणजेच आकाराचा आग्रह धरतो. विठोबाची सावळी मूर्ती दृष्टीला पडली की ज्ञानेश्वरांसारखा ज्ञानराजा देखील *'रूप पाहाता लोचनी । सुख जाले वो साजणी'* यासारखा प्रेममय अभंग लिहितो. ईश्वराचं सगुण रूप मनाला आधार देतं. मनाची तहान त्यामुळं शमते. मूर्तिपूजा नसणाऱ्या धर्मपंथातही अन्य प्रकारानं मूर्तीची पूजा म्हणजेच सगुणाची पूजा चालू आहे असं दिसतं. आपली भक्ती निर्गुणापेक्षा सगुणत्वाकडं झुकलेली असते हाच याचा अर्थ.

निर्गुण परमेश्वराची उपासना भावनेला रुचत नसल्यामुळं त्याची सगुण प्रतिमा साकार करून भक्त आनंद मिळवतो. वस्तुतः मूर्ती म्हणजे परमात्मा नव्हे. ते तर प्रतीक आहे. पण त्यातच ईश्वरत्व सामावलेलं आहे ही कल्पना आनंद आणि उत्साह देते. सगुण पूजेला भावनिक अर्थ आहे. तो समजून घेतला पाहिजे.

❑❑❑

**चला आळंदीला जाऊ। ज्ञानदेवा डोळां पाहू ॥**
**होतिल संतांचिया भेटी। सुखाचिया सांगो गोष्टी ॥**
**ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर। मुखीं म्हणता चुकता फेर ॥**
**तुम्हां जन्म नाही एक। तुका म्हणे माझी भाक ॥**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांविषयी संत तुकोबांनी लिहिलेला हा एक भावोत्कट अभंग आहे. संताचं माहात्म्य संतच जाणू शकतो. ज्ञानेश्वर आणि तुकाराम ही व्यक्तित्वं महनीय आहेत. महाराष्ट्रानं आपल्या हृदयाच्या देव्हाऱ्यात या दोन महान संतांच्या मूर्ती जतन करून ठेवल्या आहेत. भागवत संप्रदायाला उदारता, व्यापकता आणि सर्वसमावेशकता ज्ञानेश्वर-तुकारामांनी दिली. हे केवळ भागवत संप्रदायाचे शिल्पकार नसून मानवतावादाचे महाराष्ट्रातले प्रणेते आणि प्रवक्ते आहेत. असं निःशंकपणानं म्हणता येतं.

*'ज्ञानदेवें रचिला पाया'* आणि *'तुका झालासे कळस'* ही उक्ती किती यथार्थ आहे हे त्यांनी केलेल्या कार्यावरून जाणवतं. ज्याला ज्ञानेश्वर माहीत नाही, ज्याला तुकाराम माहीत नाही असा कुणी कपाळकरंटा या महाराष्ट्रात असेल असं वाटत नाही. ज्ञानेश्वर आणि तुकाराम हे केवळ आत्मचिंतन करणारे संत नव्हते तर आत्मीयतेनं समाजमनाचं आणि जीवनाचं शिल्प उभं करणारे रचनाकार होते. भागवत धर्माचं आणि महाराष्ट्राचं जीवनमंदिर ज्या संतांच्या परिश्रमातून निर्माण झालं त्यांत ज्ञानोबा आणि तुकोबा अग्रगण्य आहेत. मी नेहमी म्हणतो, ' ज्ञानेश्वरी म्हणजे महाराष्ट्र सरस्वतीच्या कपाळावरील कुंकवाचा टिळा आहे. ' आणि तुकयाची अभंगवाणी म्हणजे तिच्या गळ्यातलं मंगळसूत्र आहे. या दोन ग्रंथांनी, या दोन संतांनी आमची मराठी भाषा घडवली. मराठी साहित्याला यांनी वैभव दिलं. मराठी भूमीत उगवलेले दोन कल्पवृक्ष म्हणूनच मी ज्ञानेश्वर-तुकारामांचा उल्लेख करतो. प्रस्तुत अभंगात ज्ञानदेवांविषयीच्या तुकोबांच्या भक्तीचं सुंदर दर्शन घडतं. ज्ञानेश्वर तेराव्या शतकातले आणि तुकाराम सतराव्या शतकातले. तुकारामांनी ज्ञानदेवांना उत्कट भावनेनं वंदन करावं हे स्वाभाविकच आहे. आळंदीला जाऊन ज्ञानदेवाला आपल्या डोळ्यांत साठवून घेऊ, त्या महापुरुषाचं स्मरण करू. गुणसंकीर्तन करू .ज्ञानेश्वर हा आपल्या चिंतनाचा आणि मननाचा एकमेव विषय बनवू . या संताच्या भेटीत सुखाच्या गोष्टी सांगता ऐकता येतील. तुकोबांचं म्हणणं असं की, 'ज्ञानेश्वरांच्या पवित्र नावाचा उच्चार

केला तर अनेक जन्मांचा हा फेरा चुकेल. त्यांच्या विधानात केवळ श्रद्धा नाही तर श्रद्धेबरोबर एक महत्त्वाचा विचार आला आहे तो असा, संत महंतांच्या महापुरुषांच्या वास्तव्यानं पावन झालेली तीर्थस्थानं आपल्याला प्रेरणा देऊ शकतात. आळंदीलाच सातशे वर्षापूर्वी ज्ञानेश्वरांनी संजीवन समाधी घेऊन आपलं लौकिक जीवन संपवलं. पण त्यांचं अलौकिक असं दिव्य जीवन मात्र आजही एखाद्या तेजस्वी दीपमाळे सारखं तेवत आहे. आळंदी हे तीर्थक्षेत्र बनलं. तिथं जाणं आणि त्या समाधिस्थलाचं दर्शन घेणं हा देखील एक मनाला घडवणारा, विचारभावनेला उन्नत करणारा संस्कार आहे. आळंदी हे तुकारामांना सुखाचं आणि आनंदाच निधान वाटतं. तुकोबांच्या अंतःकरणातून उचंबळून आलेल्या ज्ञानेश्वरभक्तीची लाट या अभंगातून समूर्त झाली आहे. एका महात्म्यानं आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या महात्म्याला केलेलं हे कृतज्ञ अभिवादन खरोखरच आनंददायक आहे. आपणही तुकोबांच्या शब्दांत म्हणू या, *'चला आळंदीला जाऊ। ज्ञानदेवा डोळां पाहू।'*

आळंदी प्रमाणंच देहू हेही एक पुण्यक्षेत्र बनलं आहे. या देहू गावातच तुकोबांची पावन वाणी घराघरात दुमदुमली. तुकोबांच्या सान्निध्यामुळे देहूलाही अर्थ आला. भक्तांच्या भावनेला हे गाव उचंबळ आणू शकतं. ज्ञानेश्वर आणि तुकाराम ही महाराष्ट्राला घडवणारी दोन महनीय व्यक्तित्वं आहेत. तुकोबांनी म्हटलं त्याच चालीवर आपणही म्हणू, *'चला देहू गावा जाऊ, तुकाराम डोळां पाहू '* केवळ इच्छा व्यक्त केली तरीही आनंद होतो. संतदर्शन हे आनंदनिधान असतं.

ज्ञानेश्वर आणि तुकाराम ही नावं उच्चारली तरीही हृदयात आनंदतरंग निर्माण होतात. या नावांच्या मागं दोन महनीय व्यक्तित्वं उभी आहेत. या नावांचं स्मरण स्फुरण देतं. नावात काय आहे असा प्रश्न मला निरर्थक वाटतो. कर्तृत्वामुळं काही नावं अजरामर होतात. ती सदैव आपल्या अभिमानाचा विषय होतात. ज्ञानेश्वर हा नामोच्चारही तुकोबांच्या मनातला 'आनंदाचा डोह' ठरतो. नाव लहान वाटलं तरी ते महान असू शकतं.

❑❑❑

**अणुरणिया थोकडा । तुका आकाशाएवढा ॥**
**गिळुनि सांडले कळिवर । भव भ्रमाचा आकार ॥**
**सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटी ॥**
**तुका म्हणे आता । उरलो उपकारापुरता ॥**

जे आपल्याला सामान्य वाटतं. कळाहीन क्षुद्र वाटतं त्यात देखील असामान्यत्वाची ठिणगी दडून बसलेली असते. कोळशासारख्या तुच्छ वस्तूत एक प्रकारचं सुप्त सामर्थ्य असतं. एक दिवस ते धगधगून लागतं. मग तो कोळसा उरत नाही. तो एक जळजळीत निखारा बनतो. ओबडधोबड दगडाला देखील देवपण येऊ शकतं. प्रत्येक वस्तूत, प्रत्येक व्यक्तीत दिव्यत्वाचा अंश मूलतःच असतो. तो प्रयत्नानं जागृत करता येतो. एखादी जमीन अत्यंत टाकाऊ, खडकाळ नापीक असते पण त्या जमिनीतूनच प्रयत्न केला तर सोन्याचं पीक काढता येतं. माणसात देखील परमात्मा असाच दडून बसलेला आहे. जो स्वतःचा शोध घेतो, त्यासाठी आकाशपाताळ एक करतो त्याला एक क्षण असा भेटतो की तो त्याला तूच परमात्मा आहेस म्हणून सांगतो. पण क्षुद्रपणाला देखील भव्यत्वाकडं झेप घेण्याची बलवत्तर ओढ लागली पाहिजे. मातीच्या कणातही हिमालयाची उत्तुंग शक्ती असते हे जाणून ती अखंड प्रयत्नानं जागी केली पाहिजे. एक पुराणकथा आहे, टिटवीची पिलं समुद्रानं गिळली. ती परत मिळवण्यासाठी तिनं सागराला विनंती केली. त्यानं गर्वानं उत्तर केलं, तू लहानशी टिटवी माझ्यासारख्या विशाल सागराला काय करू शकतेस ? देत नाही तुझी पिलं. टिटवीच्या अंतःकरणातला आत्मविश्वासाचा अग्नी उफाळून उठला. 'छंद लागला टिटवीला तिने समुद्रही आटवीला,' या कथेचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे.

अणुरेणूहून लहान असलेला तुकाराम आकाशाएवढा उन्नत आणि महान बनू शकतो. देहूचा हा तुकोबा साऱ्या विश्वाला आणि त्यातल्या परमात्मरूपाला मिठी मारू शकला, याचं कारण तो केवळ आपल्या देहापुरताच राहिला नाही. साऱ्या सृष्टीशी तदात्म होण्याची समरसता आणि सहानुभूती या लहान माणसाच्या मनात लहरत होती. तुकोबाच्या दृष्टीत, वृत्तीत राम अवतीर्ण आला. प्रत्येकाच्या अंतर्मनात तो असतोच पण आपण राम आहोत, आपण विठ्ठल आहोत, आपण जगदात्म्याचे अविभाज्य घटक आहोत हे फार थोड्या लोकांना

कळतं. ज्यांना ते कळतं आणि वळतं ते आकाशाएवढे होतात. संत तुकोबा त्यांपैकीच एक आहेत. स्वार्थ संपला. अज्ञान नाहीसं झालं. आत्मबोधाचा प्रकाश झगमगू लागला. पण हे करण्यासाठी तुकोबांना कठीण तपस्या करावी लागली. इच्छा वासनांचा होम करावा लागला. आत्मध्यानात सारं आयुष्य व्यतीत करावं लागलं. रंजल्या गांजल्यांना त्यांनी पोटाशी घेतलं. अज्ञानाविरुद्ध बंड उभं केलं. मग त्यांना अनुभूती आली की *'दीप उजळला घटी'* आता नवीन प्रकाशाचा दीपक उजळला. आता आपण केवळ परहितासाठी जगणार आहोत. व्यक्तित्वाचा अत्युच्च विकास ज्ञान, करुणा, प्रेम, सर्वसमभाव यातून होत असतो. देहूचा एक वाणी मानवतेचा कंठमणी झाला. याचा अर्थ त्यानं स्वतःला जाणलं आणि साऱ्या विश्वाला आपल्या हृदयात स्थान दिलं. आज आमच्या मनात असलेला तुकोबा आभाळाएवढा आहे.

आपल्या आयुष्याच्या पहिल्या वीस एकवीस वर्षांत तुकाराम सामान्याहून सामान्य होते. पण दुःख आणि संकटं यांच्याशी संघर्ष करीत ते आत्मशक्ती वाढवीत गेले. अंतरीचा वन्ही फुलवीत राहिले. चिंतनातून, तपस्येतून त्यांच्यातला पुरुषार्थ त्यांनी स्वतःच विकसित केला. आपलं जीवन आपल्यालाच जगावं लागतं. आपलं मरण आपल्यालाच मरावं लागतं हे ज्याला समजतं तो आपला विकास प्रयत्नपूर्वक करतो. तुकाराम आकाशाएवढे झाले हा चमत्कार नव्हे. आकाशी झेप घेण्याची प्रवृत्ती जोपासली म्हणूनच हा संतकवी गगनालाही जिंकू शकला. तुकोबांना लौकिक अर्थानं कोणी गुरू नव्हता. ते स्वतःच स्वतःचे गुरू झाले. आयुष्याच्या प्रयोगशाळेत अनुभव नावाच्या गुरूकडून त्यांनी धडे घेतले. आजूबाजूचं वातावरण प्रतिकूल होतं. पण हा आध्यात्मिक मार्गावरील प्रवासी परिस्थितीशी झगडत चालतच राहिला. *'सत्य असत्यासी मन केले ग्वाही । मानियेले नाही बहुमता ।'* ही दृढ भूमिका घेऊन ते चालत राहिले. चालता चालता झेप घेतली.

❑❑❑

**मुंगी आणि राव । आम्हा सारखाची जीव ॥**
**गेला मोह आणि आशा । कळिकाळाचा हा फासा ॥**
**सोने आणि माती । आम्हां समान हे चित्तीं ॥**
**तुका म्हणे घरा आले । वैकुंठ हे सावळे ॥**

ज्याची स्वार्थभावना गळून गेलेली असते आणि जो समदृष्टीनं साऱ्या जगाकडं पाहात असतो त्याला कोणत्याही प्रकारचा मोहपाश बांधू शकत नाही. संत तुकोबांचं वैराग्य बावनकशी सोन्यासारखं झगझगीत होतं. लोभ आणि मोह यांची पिशाच्चं तुमच्या आमच्या सारख्या सामान्य माणसांच्या मानगुटीवर ठाण मांडून बसलेली असतात. ती काही केल्या आपल्याला सोडीत नाहीत. पण निःस्पृह, निर्मोही संताच्या वाटेला जाण्याचं धैर्य या पिशाच्यांच्या ठायी असत नाही. लोभ आणि मोह असेल तर त्याला संत म्हणण्यात काय अर्थ आहे ? हे म्हणजे एखाद्या भेकडाला शूर-वीर म्हणण्यासारखं आहे. निर्बुद्धाला पंडित म्हणण्यासारखं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी तुकोबांकडे उंची वस्त्रं, अलंकार अब्दागिरी आणि घोडा व अन्य संपत्ती पाठवली होती ते पाहून त्यासंबंधी तिळमात्रही आकर्षण तुकोबांच्या चित्रात निर्माण झालं नाही. खरं तर त्यांचा प्रपंच कसाबसा त्यांची पत्नी कष्टानं रेटीत होती. तुकोबांच्या घरात आणि मनात आध्यात्मिक श्रीमंती अमाप असली तरी आर्थिक दारिद्र्यात त्यांचं कुटुंब पिचत होतं. आता न मागता लक्ष्मी घर चालून आली होती. पण तुकोबांनी छत्रपतीकडून आलेल्या एका तनसडीलाही स्पर्श केला नाही. आज लोभ आणि मोह, संपत्तीची हाव यांचं पेव फुटलं आहे. भली भली समजली जाणारी माणसं द्रव्यासाठी पवित्र मूल्यांचा बिनादिक्कत बळी देत आहेत. तुकोबांच्या या अभंगात त्यांच्या स्थिर, शान्त, मोहरहित, स्वच्छ मनाचं दर्शन घडतं आणि विरक्तीच्या या मूर्तिमंत प्रतीकासमोर आपण नतमस्तक होतो. या संतश्रेष्ठानं म्हटलं आहे, 'आम्हाला मुंगीपासून राजापर्यंत सारे जीव सारखेच आहेत.'

आपण मुंगीला क्षुद्र मानतो आणि राजाला महत्त्व देतो. पण संतमनात समानतेचा भाव रुजलेला असतो. मोह आणि आशा हा काळिकाळाचा फासा आहे असं त्यांना वाटतं. सोनं काय आणि माती काय संतदृष्टीत दोन्हीही समानच आहे. तुकाराम म्हणतात सारं वैकुंठ, तो विश्वचालक परमेश्वर माझ्या घरी येऊन राहिला आहे. ज्याच्या घरातच वैकुंठ आहे त्याला

भौतिक संपत्तीची आंठवणसुद्धा होणं शक्य नाही. तुकोबांचं अवघं जीवित विठ्ठलमय झालं होतं. त्यांच्या धमन्यांतून खेळणाऱ्या रक्तात देखील ईश्वरी संगीत भरलेलं होतं. वैकुंठीचं वैभव त्यांच्या मनात सामावलेलं होतं. ते तृप्त होते. क्षुद्र संपत्तीकडं त्यांनी ढुंकूनही पाहिलं नाही. तुकोबांच्या परम निःस्वार्थ चारित्र्यावर प्रकाश टाकणारा हा अभंग म्हणजे त्यांचे स्वगत उद्गार आहेत. आपल्या लोभाला अंत नसतो. घरदार, तऱ्हेतऱ्हेचे उंची वस्त्रालंकार, दाराशी मोटार, नोकर चाकर आणि कोटीकोटी संपत्ती मिळाली तरी आपला मोह पराकोटीचा असतो. आणखी मिळालं पाहिजे म्हणून आपण संपत्तीच्या पाठीमागं धापा टाकीत धावत असतो. घरात संपत्ती असूनही मनानं आणि वृत्तीनं दरिद्रीचं राहातो. या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर निरिच्छ, निर्लोभी आणि म्हणूनच परम आनंदात रममाण झालेल्या संतांचं मानसिक ऐश्वर्य किती विशाल असतं याची कल्पना येते. तुका आकाशा एवढा का झाला आणि कसा झाला याचं मर्म या अभंगात साठवलेलं आहे. मनुष्य सुखी होतो तो भौतिक संपत्तीनं नव्हे ज्याच्यापाशी आत्मिक संपत्ती आहे, उदात्त जीवनमूल्यांचं जो प्राणपणानं जतन करतो तोच खरा सुखी असतो.

मुंगी आणि राजा या दोघांनाही समान लेखणारी तुकोबांची समदृष्टी केवढी उदार आहे. संत कबीर पहाटे स्नानासाठी नदीवर निघाले होते. पाठीमागून त्यांचा मुलगा कमाल येत होता. कबीरांना पहाटेच्या अंधुक उजेडात रस्त्यावर पडलेला एक सोन्याचा दागिना दिसला. त्यावर त्यांनी मूठभर माती टाकली. हेतू हा की मुलाला तो दागिना दिसला तर त्याला कदाचित मोह होईल. कमालनं ते पाहिलं आणि म्हटलं, 'कशाला उगीच मातीवर माती टाकलीत?' संताला माती आणि धनदौलत सारखीच. त्यांची वैचारिक आणि आध्यात्मिक संपत्ती असीम असते. दृष्टीत समता व ममता असते. म्हणून तर ते संत असतात. सत्ता आणि संपत्ती यांची आंधळेपणानं पूजा करीत बसलेल्या अज्ञानी जगाला बहुधा या अभंगातला विचार मानवणार नाही. पण हे सारे बाह्य पदार्थ आहेत. त्यांचं स्तोम माजवण्यामुळं आपण दुःखी होत आहोत हा विचार केला पाहिजे. मोहाच्या गळफासातून स्वतःची सुटका करून घेण्याचा दृढ निश्चय केला पाहिजे.

□□□

**आता तरी पुढे हाचि उपदेश । नका करू नाश आयुष्याचा ॥**
**सकळांच्या पाया माझे दंडवत । आपुलाले चित्त शुद्ध करा ॥**
**हित ते करावे देवाचे चिंतन । करूनिया मन एकविध ॥**
**तुका म्हणे लाभ होय तो व्यापार । करू काय फार शिकवावे ॥**

संतांची भूमिका लोककल्याणाची असते. लोकजीवनाला सुयोग्य आकार यावा, समाज सर्वार्थानं सुखी व्हावा त्याचं ऐहिक आणि पारमार्थिक जीवन उन्नत व्हावं, यापरतं संतमनात काहीही नसतं. सर्व जीवांविषयी निखळ प्रेम आणि त्यांचं आत्यंतिक मंगल चिंतणं हाच संतहृदयीचा धर्म असतो. भ. महावीर म्हणाले होते. 'माझी सर्व प्राणिमात्रांशी मैत्री आहे. माझं कुणाशी कसलंही वैर नाही. ' भ. बुद्धाचं जीवनही असंच करुणेनं आणि सर्वांविषयीच्या आत्मीयतेनं व्यापलेलं होतं. ' बहुजनहिताय, बहुजनसुखाय' हे तर त्याचं ब्रीद होतं. ज्ञानेश्वरांच्या पसायदानात त्यांची सर्वव्यापक करुणादृष्टी आणि वत्सलता दिसून येते. साऱ्या जीवमात्रांच्या सुखशांतीसाठी धडपडणारी वृत्ती हेच संतांचं भांडवल असतं. संत तुकाराम सर्वांच्या पारमार्थिक उत्कर्षासाठी, लोककल्याणासाठी झटत होते. '*बुडता हे जन, न देखवे डोळां, म्हणुनी येतो कळवळा*' असं त्यांनीच म्हटलं आहे. जग आनंदी झाल्याशिवाय महात्म्याच्या चित्तात आनंदाचे तरंग उमटत नाहीत. रोम शहर जळत असताना स्वतःला सारंगीच्या सुरात बुडवून घेणारा नेरो नावाचा राजा आपण ऐकून आहोत . असली लोकविन्मुख, स्वार्थपरायण वृत्ती आणि संतवृत्ती यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. सारेच स्वार्थाच्या बाजारात हिंडत राहिले तर परमार्थाची सुगंधी झुळुक सुद्धा जगाला लाभणार नाही. स्वार्थासाठी जिवाचा आटापिटा करणाऱ्या लोकांना आपुलकीनं तुकोबा सांगतात,

'आपल्या आयुष्याचा नाश करू नका. आपल्या अंतःकरणात शुद्ध भाव रुजू द्या. हाच माझा तुम्हाला उपदेश आहे. 'सकळांच्या पाया माझे दंडवत' असं ते नम्रतेनं सांगतात. अज्ञानी जगाला ज्ञान देण्यासाठी संतसज्जन त्याच्या पायी दंडवत घालतात आणि आपल्या आयुष्याचा विनाश करू नका असं कळवळून म्हणतात हे संतांचे केवढे उपकार आहेत. सूर्य प्रकाश देतो आणि मेघ वृष्टी करतो, धरित्री अन्न देते, त्याप्रमाणं संत प्रेम देतो म्हणून तर हे जग चाललं आहे. म्हणून तर या जगात काही सूर आनंदाचे उमटतात. म्हणून तर

अंधारातही तारे चमकतात. म्हणून तर काट्यांतही फुलं उमलतात. अश्रूतही हास्याची लहर उमटते. संतांचं प्रेम म्हणजे दुःखसंतप्त झालेल्या जगाला शीतल सुखाचं वरदान देणारी अमृतवाऱ्याची एक विलक्षण लाट आहे. तुकोबा पुढं म्हणतात, 'परमेश्वराचं चिंतन आणि मनन करा. तुमच्या मनात ईश्वरनिष्ठा दृढ राहू द्या. ज्यात आपलं हित आहे तेवढंच करीत राहा. तुम्हाला फार काय सांगायचं? आपल्या आयुष्याचा नाश करू नका.' तुकोबांचे शब्द किती साधे, सोपे आणि सरळ आहेत ! या शब्दांत आईची माया आहे. मायेच्या उत्कट स्पर्शानं माखलेले हे शब्द तुकोबांच्या अपार वात्सल्याचं, त्यांच्या उदार मनाचं दर्शन घडवतात.

साऱ्या संत-महंतांनी शेकडो हजारो वर्षांपासून मानव जातीला हेच सांगितलं नाही काय ? अरे, आयुष्याचा नाश करू नका. पण हा उपदेश म्हणजे पालथ्या घड्यावर पाणी. हे शब्द वाहून गेले, ते राहून गेले असते, लोकमनात रुजले असते तर आजचं जग ज्ञानेश्वर-तुकारामांच्या कल्पनेप्रमाणं सुंदर झालं असतं. स्वच्छ झाल असतं. पण तरीही हरकत नाही. अजूनही वेळ गेलेली नाही. अजून देखील आपण तुकोबांच्या उपदेशाप्रमाणं वागू शकतो नका करू नाश आयुष्याचा, आपुलाले चित्त शुद्ध करा.'

संतांनी स्वतःसाठी काही मागितलेले नाही. स्वार्थ विसर्जित करून परमार्थाची उपासना करणारे संत आपल्या भोवतीच्याच नव्हे तर साऱ्या समाजाचं जीवन सुखमय व्हावं या इच्छेतून ते समाजप्रबोधन करीत राहातात. *'सर्वेऽपि सुखिनः सन्तु'* याच आकांक्षेनं भारलेलं संतमन आंतरिक तळमळीनं आपल्या आयुष्याचं गोमटं करा असं विनवून सांगत आहे. *'ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभावीण प्रीती ।'* ही उक्ती संतांना सर्वार्थानि लागू पडते. तुकोबांच्या मनाचा तळ किती शुद्ध आणि स्वच्छ होता हे या अभंगातून आपल्याला जाणवतं.

महाभारतकार व्यासांनी अत्यंत दुःखानं असे उद्गार काढले की, ' मी दोन्ही बाहू उभारून लोकांना सांगत आहे धर्म हाच तुमचा रक्षणकर्ता आहे. अर्थ आणि काम यांना धर्माचं अधिष्ठान असावं पण माझं कुणीही ऐकत नाही'. आपल्या आयुष्याचा नाश करू नका, ते सात्त्विक आनंदानं फुलवा. हा विचार त्यांनी आणि अनेक तत्त्वचिंतकांनी मांडला आहे.

❑❑❑

लाजलज्जा मी आता सोडून दिली आहे. मला कशाचीच भीती नाही. जग काय म्हणेल ते म्हणू द्या. मी आता हरीशी रममाण झाले आहे.

व्यभिचारिणी स्त्रीचं रूपक घेऊन हा अभंग तुकोबांनी लिहिला आहे. परद्वार करणारी स्वैरिणी लोकनिंदेची क्षिती बाळगत नाही कारण तिच्या मनातली प्रियकर विषयक ओढ अदम्य असते. वेगवान लाटेप्रमाणं तिच्या भावनेला आवेग आलेला असतो. ती उचंबळत राहाते. लौकिक नीतीच्या मर्यादा तिला बांधू शकत नाहीत. स्वैर वर्तन करणाऱ्या प्रेमी स्त्रीच्या प्रतीकातून आपली अतूट अशी उत्कट भक्ती तुकोबांनी व्यक्त केली आहे अशा अभंगाचा अर्थ वाच्यार्थानं घ्यायचा नसतो. भावदर्शनासाठी अशी रूपकं संतांच्या काव्यात येतात. सूफी संतांच्या कवितेतली भूमिका अशीच पण थोडी वेगळी आहे. परमेश्वर ही प्रेयसी आहे. आणि आपण तिचा अनुनय करणारे प्रेमिक आहोत या भूमिकेत सूफी कवी लिहितात. विठ्ठलभक्तीचं एक आगळं पण हृदयस्पर्शी रूप तुकोबांच्या या विराणीमधून प्रकट झालं आहे. मधुराभक्तीनं ओसंडणाऱ्या अशा कविता मनाला रोमांचित करतात, आनंद देतात, आणि भक्तीचं प्रमत्त दर्शन घडवतात.

मधुराभक्ती हा भक्तीचा एक सुंदर प्रकार आहे. प्रियकराच्या सहवासात प्रणयिनी अशी स्वतःला विसरून जाते आणि त्याच्याशी एकरूप होते त्याप्रमाणं ही मधुराभक्ती भक्ताला आपल्या वल्लभाच्या व्यक्तित्वात समरसून टाकते. भक्तीचा हा उत्कट प्रकार भक्ती साहित्यात अनेक ठिकाणी दिसतो. स्त्री प्रकृतीतून परमात्म्याची केलेली आळवणी अधिक आर्त कोमल बनते. सर्वस्व समर्पणाच्या जवळ घेऊन जाते. मधुराभक्तीत आराध्य५ ताशी तन्मय होण्याची आणि त्याच्यात मिसळून जाण्याची प्रवृती असते.

❑❑❑

**आलिया भोगासी असावे सादर। देवावरी भार घालूनिया ॥**
**मग तो कृपासिंधू निवारी साकडे। येर ते बापुडे काय रंक ॥**
**भवाचिया पोटी दुःखाची रासी। शरण देवासी जाता भले ॥**
**तुका म्हणे नव्हे काय त्या करिता। चिंतावा तो आता विश्वंभर ॥**

जीवन दुःखमय आहे हे सांगायला कोणा तत्त्ववेत्याची जरूर नाही. नाना प्रकारच्या दुःखांच्या काटेरी वाटेनं आयुष्यभर माणसाला चालावं लागतं. या वाटेवर फार थोड्या ठिकाणी फुलं पडलेली असतील पण काटे मात्र बहुतेक ठिकाणी असतातच. आयुष्याचा प्याला नियतीनं दुःखांनी भरून ठेवला आहे हा अनुभव तुम्हा आम्हाला प्रत्ययी येतो. तुकारामांच्या जीवनातही दुःखं आली, संकटं आली, दारिद्र्य तर पाठीशीच लागलेलं होतं. अपमानाच्या अनेक ठेचा त्यांना आयुष्यात लागत राहिल्या पण त्यांनी या दुःखाकडं शांतपणानं पाहिलं. स्थिर दृष्टीनं पाहिलं आणि ते म्हणाले *'सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे'* त्यांच्या शब्दांत वैफल्य आहे असं मला वाटत नाही. जीवन जगताना आलेल्या अनुभवांचं मंथन करून जो निष्कर्ष हाती आला तो त्यांनी थोडक्यात सांगितला. जीवनाचं स्वरूप असंच असतं. तुकोबांनी आपल्या आयुष्यात पावलोपावली, रात्रंदिन संघर्ष केला आहे. त्यातूनच त्यांनी आपलं जीवित घडवलं आहे. तुकोबा हे अवास्तव स्वप्नं पाहाणारे कवी नव्हते. तटस्थपणानं जीवनाचं संशोधन करणारे ते तत्त्वचिंतक होते. त्यामुळं त्यांची अभंगवाणी वास्तव जीवनाचा शोध घेणारी, मार्गदर्शन घडवणारी उपदेशवाणी आहे. आपल्या अभंगांच्या माध्यमातून आपले अनुभव सांगताना माणसाला त्यांनी काही शाश्वत विचार दिले हेच त्यांचं श्रेष्ठपण आहे. सामान्य कवी आपल्या वैयक्तिक दुःखाचं जन्मभर तुणतुणं वाजवतात. तुकोबा दुःखातून विवेकाकडे आणि लोकप्रबोधनाकडे वळले.

'आलिया भोगासी असावे सादर। देवावरी भार घालुनिया।' या त्यांच्या उद्गारात दुःख-संकटांना सामोरं जाण्याची शिकवण आहे. देवावर भार घालावा आणि आपत्ती-विपत्तीला तोंड द्यावं असं ते म्हणतात. देव संकटाचं निवारण करतो याचा अर्थ तो काही चमत्कार करतो असा नाही. आपण निश्चयानं आणि निग्रहानं संकटापुढं गेलो म्हणजे आपल्या ठायी असलेलं वीरत्व जागं होतं. संकट मोठं असेल पण मी त्याच्यासमोर पाय रोवून उभा आहे. तो परमेश्वर मला संकटमुक्त करणारच आहे हा प्रचंड विश्वास मनुष्याला

सामर्थ्य देतो. भयभीत झालो तर दुःख वाढत राहातं. ते भोगायचंच आहे तर शूरपणानं त्याचं स्वागत का करू नये ? वाघ म्हटलं काय? वाघोबा म्हटलं काय तो खाणारच असेल तर त्याला वाघ्या का म्हणू नये ? असा हा व्यावहारिक मंत्र आहे. देवाला शरण जावं याचा अर्थ दैववादी व्हावं असा नव्हे. झगडण्याची शक्ती आपला अंतरात्मा आपल्याला देणारच आहे हा दृढ भाव मनात ठेवला तर डोंगराएवढं संकट मुंग्यांच्या वारुळासारखं क्षुद्र वाटायला लागतं. असा भाव या अभंगाचा आहे. जो केवळ देवावर श्रद्धा ठेवतो आणि स्वतः काहीच धडपड करीत नाही त्याला देव साहाय्य करू शकत नाही. म्हणूनच आपण आपल्या दुःखभोगाला सामोरं गेलं पाहिजे. आयुष्याच्या आखाड्यात आपण दंड थोपटून सिद्ध राहिलं पाहिजे. परमेश्वर अशा वीरांच्या पाठीशी उभा राहातो. हे सदैव लक्षात ठेवलं पाहिजे. *'देवो दुर्बल घातकः'* हे वचन या दृष्टीनं विचार करण्यासारखं आहे.

आपत्तीत आणि विपत्तीत आपल्या मनाचं संतुलन बिघडू देऊ नये. जे होईल ते भोगायला मी समर्थ आहे. अशी कणखर वृत्ती असली म्हणजे संकटांना तोंड देता येतं. कित्येक वेळां केवळ संकटांच्या कल्पनेनं देखील माणसं मरगळून जातात. त्यांच्यासाठी हा विचार आहे. स्वतः तुकाराम अनेक संकटांच्या छायेत वावरले पण त्यांचं धैर्य, तितिक्षा, शांतवृत्ती अभंग राहिली. म्हणून तर ते येणाऱ्या भोगाला आपण सादर असावं असं सांगू शकतात. आपत्तींचा प्रतिकार करताना ईश्वराचं विस्मरण मात्र होऊ नये. ईश्वर हे सामर्थ्य आहे. ईश्वर हा शक्तीचा अखंड प्रवाह आहे ही त्यांची धारणा होती. श्रद्धेचं एखादं अधिष्ठान माणसाला प्रेरणा देतं यात कसलाही संदेह नाही. ईश्वर आपली सारी संकटं निवारतो ही कल्पना तर्कदृष्ट्या बरोबर नसेल पण माझ्या पाठीशी ईश्वरी शक्ती ठामपणानं उभी आहे हा विश्वास माणसाला बळ देतो. श्रद्धेतून उगवणारी शक्ती आयुष्याला घडवू शकते. पण प्रयत्नशीलता मात्र आवश्यक आहे. निष्क्रिय माणसाला दैवी साहाय्य कसं मिळणार ? 'आलिया भोगासी असावे सादर' असं म्हणून सिद्ध झालं पाहिजे.

❑❑❑

**आम्हा भय धाक कोणाचा रे पाहे । काळ मशक काय मानव हे ।।**
**आम्हासी ते काय चिंता या पोटाची । माउली आमुची पांडुरंग ।।**
**काय करावी हे कोणाची मान्यता । करिता अनंता कोण वारी ।।**
**नाही शीण आम्हा झाले कवतुक । पुनीत हे लोक करावया ।।**
**तुका म्हणे खातो आनंदाचे लाडू । नका चरफडू घ्या रे तुम्ही ।।**

विलक्षण आत्मप्रत्ययानं भरलेला हा अभंग ऐकताना तुकोबांच्या निर्भय आणि नि:स्पृह वृत्तीची जाणीव होते. त्यांना कशाचीच अपेक्षा नव्हती. एखाद्या लौकिक लाभासाठी सामान्य माणसं केविलवाणी धडपड करीत असतात. तो लाभ झाला नाही तर दु:खी होतात. त्यांच्या मनात कुणाची तरी भीती असते. धाक असतो. आपल्या पदरात काहीतरी पडावं, मानमान्यता मिळावी ही अपेक्षा असते. पण संतत्वाच्या उच्च पातळीवर गेलेले तुकोबा निरपेक्ष होते आणि त्यामुळंच ते सर्वार्थानं निर्भय होते. एका साधूची अशी गोष्ट सांगतात की जगज्जेत्या सिकंदरानं त्या साधूला आपल्या दरबारात घेऊन येण्याविषयी सेवकांना फर्मावलं. तो राजसेवक झाडाखाली बसलेल्या साधूला उद्धटपणानं म्हणाला,

'अरे गोसावड्या, महाराजाधिराज सिकंदरानं तुला दरबारात हजर होण्याची आज्ञा केली आहे. तावडतोब चल.' साधू शांतपणानं म्हणाला, 'कोण सिकंदर? त्याला मी ओळखत नाही. मी फक्त एक महाराजाधिराज जाणतो. त्याच्याच म्हणजेच परमेश्वराच्या दरबारात मी बसलो आहे. त्या सिकंदराकडं माझं काहीही काम नाही. मी येणार नाही.' सेवकाला आश्चर्य वाटलं. सिकंदराची आज्ञा सहजपणानं धुडकावून लावणारा हा साधू खरोखरच तेजस्वी आहे याची त्याला खात्री पटली. त्या साधूप्रमाणंच संत तुकारामही तेजस्वी होते. त्यांना कोणाचीच भीती वाटण्याचं कारण नव्हतं. म्हणून ते या अभंगात स्पष्टपणानं म्हणतात, 'आम्हाला म्हणजे विठ्ठलभक्तांना कोणाचं भय आहे ? काळ देखील एखाद्या क्षुद्र चिलटासारखा आहे मग माणसाची काय कथा ? आम्हाला आमच्या पोटाचीही चिंता नाही. पांडुरंग ही आमची माउली आहे. कोणाची मान्यता मिळवून तरी आम्हाला काय करायचं आहे? लोकजीवन शुद्ध आणि पवित्र करणं इतकंच आमचं काम आहे. आम्ही श्रीहरीला मानलं आणि त्यानं आम्हाला मान्यता दिली यातच सर्व काही मिळालं.

लोकहो आम्ही आनंदाचे लाडू खातो, त्याचं सेवन तुम्हीही करा.

हा अभंग ऐकताना मन आनंदित होतं. तुकोबा नावाचा एक हरिभक्त आपल्या भावबळावर प्रत्यक्ष काळालाही आव्हान देऊ शकतो आणि केवळ हरिसत्तेलाच प्रमाण मानतो. याचा अर्थ ईश्वराची भक्ती सामान्य माणसाच्या अंतःकरणातही शक्तीची ज्योत पेटवते , त्याला स्वाभिमानी बनवते याचं हे द्योतक आहे. भक्तीतून मानवाचा महामानव होऊ शकतो. कारण भक्ताचा स्वार्थ संपून गेलेला असतो. त्याच्या दृष्टीनं परमेश्वर हीच महनीय सत्ता आणि संपत्ती असते. लौकिक सत्तेला आणि भौतिक संपत्तीला विनाशाचं ग्रहण केव्हाही लागू शकतं. जग जिंकणारा सिकंदर मातीत मिसळून गेला. पण हरीची भक्ती करणारे संत लोकांच्या हृदयात प्रस्थापित झाले. त्यांनी लोकजीवनाला प्रकाश दिला. संस्कृतीला आकार दिला. *'आम्ही विठ्ठलाचे वीर, फोडू कळिकाळाचे शीर'* हे तुकोबांचे शब्द केवळ शब्द नव्हते ते त्यांचं आत्मबळ प्रकट करणारे निश्चयाचे बोल आहेत. जो सर्वकाही सोडून देतो त्याला सर्व काही आपोआप मिळतं. आनंदाचे लाडू तुकारामांना मिळतात. कोट्यावधी रुपयांच्या मालकालाही हे लाडू दुर्मिळच असतात. तुकाराम हे भक्तीचं, विरक्तीचं, शक्तीचं एक उच्च, उत्तुंग प्रतीक आहे यात शंका नाही.

निष्काम भक्ती भक्ताला हजार हत्तींचं बळ देऊ शकते. स्वार्थ आणि मोह गळून गेल्यावर धैर्यानं आणि आत्मिक विश्वासानं माणूस खंबीरपणानं चालू लागतो. प्रत्यक्ष काळसुद्धा त्याच्यासमोर अवनम्र होतो. तो भक्त आत्मानंदात लहरत असतो. ज्याच्या मनातच परमेश्वराचा निवास आहे त्याला कोणाची मानमान्यता मिळवण्याचं कारणच नाही. तुकोबा हे अशा कोटीतले समर्थ आणि सदैव तृप्त असे संत होते. हा अभंग त्यांच्या जीवनविचाराचा कणा आहे.

❑❑❑

**धन मेळवूनि कोटी । सवे न ये रे लंगोटी ।।**
**पानें खाशील उदंड । अंती जासी सुकल्या तोंडे ।।**
**पलंग न्याहाल्या सुपती । शेवटी गोवऱ्या सांगाती ।।**
**तुका म्हणे राम । एक विसरता श्रम ।।**

मनुष्याची सर्वांत मोठी संपत्ती म्हणजे त्याचं शील आणि चारित्र्य. त्यानं केलेली सत्कृत्यं हीच त्याला अखेरपर्यंत सोबत करतात. त्याची सत् प्रवृत्ती त्याला खऱ्या अर्थानं संपन्न बनवीत असते. आपली श्रीमंतीची आणि दारिद्र्याची व्याख्याच मुळात चुकीची आहे. ज्याच्यापाशी बंगला आहे, गाडी आहे, उंची वस्त्र प्रावरणं आहेत आणि धनदौलत आहे त्याला आपण श्रीमंत मानतो. व्यावहारिक अर्थानं तो धनिक असेल पण त्याच्या अंतःकरणात माणुसकीचा थेंबही नाही, तो कुणावर कधी दया करीत नाही, दुःखीकष्टी लोकांना मदतीचा हात देत नाही अशी परिस्थिती असेल तर असल्या धनवानाला दरिद्रीच म्हणायला पाहिजे. खरं तर त्याची ही समृद्धी वरवरची असते. हव्यासानं मिळवलेली सारी स्थावर जंगम संपत्ती त्याला इथंच ठेवून स्मशानाची वाट धरावी लागते. वातानुकूलित बंगला टेंपररी असतो. स्मशान मात्र कायमचं कपाळी लिहिलेलं असतं हेच त्याच्या ध्यानात येत नाही. शाश्वत मूल्यांकडं पाठ फिरवून सवंग बाजारी गोष्टीत जो माणूस जन्मभर मोहानं आणि लोभानं गुंतून पडतो त्याला संत तुकोबा सांगतात, 'शेवटी गोवऱ्या सांगाती'. हेच जीवनातलं दाहक, विदारक सत्य आहे. पैशाच्या मागं बेभानपणानं आयुष्यभर धावायचं आणि एक दिवस उरी फुटून मरायचं याला जीवन म्हणता येईल काय? तुकारामांनी या वेड्या माणसाला अत्यंत समर्पक परिणामकारक भाषेतून सांगितलं आहे.

'अरे वेड्या माणसा, कोटि कोटींनी धन जोडून काय होणार ? तुझ्याबरोबर कमरेची लंगोटी सुद्धा येणार नाही. मसालेदार चविष्ट पानांचे विडे उदंड खाशील पण शेवटी तुला सुकल्या तोंडानं जायचं आहे हे ध्यानात ठेव. उंची आसनं, मऊ बिछाने, पलंग हे सारं सोडावंच लागणार आहे. पेटत्या गोवऱ्यांच्या शय्येत अखेरची विश्रांती तुला घ्यायची आहे हे लक्षात घेऊन परमेश्वराचं स्मरण कर. रामनामच तुला तारणार आहे. रामाची आठवण चित्तात ठेव.' तुकोबांच्या या शब्दांत सत्यानं परिपूर्ण असा विचार सामावलेला आहे. ज्या गोष्टी क्षणभंगुर आणि तात्पुरत्या असतात त्यांचाच पाठलाग आपण जन्मभर अविचारानं

करीत राहातो. आयुष्याचं सोनं देऊन जे मातीमोल आहे ते मात्र विकत घेतो. श्रेयाकडं दुर्लक्ष करतो, प्रेय असेल त्याकडं खेचले जातो. भुकेल्या माणसानं अन्न सोडून रत्नं वेचीत बसावं पण त्यातून भूक अल्पांशानंही भागू नये अशीच ही आत्मवंचना नव्हे काय? आत्मवंचनेवर तुकोबांनी या अभंगातून प्रखर टीका केली आहे. आजच्या केवळ चंगळवादी बनलेल्या भोगलोलुप माणसाला शुद्धीवर आणण्यासाठी तुकोबांचे शब्द निश्चितच उपयुक्त आहेत. पण कित्येक शहाणे अशी टीका करतील की धन आणि अन्य संपत्ती, सुखाची साधनं माणसानं मिळवू नयेत काय? तुकोबा संत होते. त्यांच्या गरजा फार कमी होत्या. पण आम्हाला अनेक प्रकारच्या गरजा असतात. पावलोपावली पैशाशिवाय काहीच चालत नाही. नुसतं रामनाम घेऊन काय होणार ? प्रश्न बरोबर आहे. व्यापार उद्योगाला आणि संपत्ती मिळवण्याला तुकोबांनी विरोध केलेला नाही. उत्तम व्यवहार करून धन जोडावं पण धनलोभाच्या वेटोळ्यात आणि भोगवादी प्रवृत्तीच्या मगरमिठीत सापडू नये ही त्यांची भूमिका आहे. गृहस्थाश्रम चालवताना धनाची जरूर असते हे त्यांना कळत होते. पण केवळ पैसा, केवळ उपभोग या गोष्टी आत्मनाशाला कारणीभूत होतात म्हणून ईश्वराचं स्मरण ठेऊन गरजे इतकी मर्यादित संपत्ती जोडावी असा विचार त्यांनी मांडला आहे.

आजचं जग कदाचित या विचाराला जुनाट ठरवून मोकळं होईल. पण पैशांनी वाटेल ती साधनं विकत मिळू शकली तरी खरं सुख आणि मानसिक शांती मात्र मिळू शकत नाही. पैसा हे जीवनाचं प्राणभूत तत्त्व होऊ शकत नाही. अमेरिकेसारख्या समृद्ध देशात मनोरुग्णांची संख्या वाढत चालली आहे . बँकेच्या वहीत आपल्या नावे किती रक्कम आहे यापेक्षा चित्रगुप्ताच्या वहीत आपल्या नावावर किती बॅलन्स जमा आहे हेच अधिक महत्त्वाचं आहे. भोगाची लाट विनाशाकडं घेऊन जाते हे सत्य तुकोबासारखा निःस्पृह संत अधिकारवाणीनं सांगू शकतो. ईश्वरनामाची आणि भक्तिप्रेमाची संपत्ती ज्याच्याजवळ आहे तो धन्य आहे. तोच खरा सुखसंपन्न आहे. *'ज्याचे मुखी नाम तोचि धन्य.'* म्हणूनच *'तुका झालासे कळस'* *हे वचन अर्थपूर्ण वाटतं.* जगण्यासाठी पैसा हवा हे खरं आहे. पण माणसं पैशासाठीच जगतात आणि मरतात हे दृश्य तुकोबांना केविलवाणं वाटावं यात आश्चर्य नाही.

❑❑❑

**माझिया जातीचे मज भेटो कोणी । आवडीची धणी फेडावया ।।**
**आवडे ज्या हरि अंतरापासूनि । ऐसियांचे मनीं आर्त माझे ।।**
**तयालागीं जीव होतो कासावीस । पाहातील वास नयन हे ।।**
**सकळ हा जन्म होईल तेथून । देतां आलिंगन वैष्णवांसी ।।**
**तुका म्हणे तोचि सुदिन सोहळा । गाऊ या गोपाळा धणीवरी ।।**

या अभंगातून तुकोबांनी आपली आंतरिक उत्कट इच्छा प्रकट केली आहे. माझ्या जातीचं मला कुणीतरी भेटावं हे त्यांचं मनोवांछित आहे. जातीचा याचा अर्थ स्वभावाचा, प्रवृत्तीचा. जात या शब्दाचा अलीकडचा अर्थ अगदीच आकुंचित आहे. मला माझ्या गुणधर्माचा माझ्या अभिरुचीचा, माझ्याप्रमाणंच हरिभजनात रस घेणारा विष्णुदास भेटावा आणि त्याच्या संगतीत आयुष्य सफल व्हावं असं तुकोबांना वाटत ' देता आलिंगन वैष्णवांसि।' असे शब्द या अभंगात आहेत वैष्णव म्हणजे केवळ विष्णूच्या कर्मकांडात्मक पूजाअर्चेत जो सहभागी होतो तो वैष्णव असं तुकोबांचं म्हणणं नाही. वैष्णव म्हणजे ज्याच्या मनातली अहंता आणि भेदभावना गळून गेली आहे. ज्याला भेदाभेद भ्रम अमंगळ वाटतो. जो सर्वांकडं समदृष्टीनं पाहातो, जो दुःखितांना पोटाशी धरतो, जो सर्व भूतमात्रांवर प्रेमाचा वर्षाव करतो अशा वैष्णवाच्या भेटीची ओढ या संताला लागलेली आहे. कारण तुकोबा हे उदार मनाचे, विशाल अंतःकरणाचे मानवतावादी संत आहेत. अशाच संताची संगत लाभली तर आपलं जीवन कृतार्थ होईल हा विश्वास त्यांच्या मनात आहे. दुसऱ्या एका अभंगात ते म्हणतात, *'आमुचे जीवन कथा अभंग । आणिकही संतासमागम ।'* संतांचा समागम हाच आनंदसुखाचा अक्षय ठेवा असतो. हरिकथेच्या अमृताचं पान हेच संतांचं जीवन असतं. पण संताला संताची संगत लाभेलच अस सांगता येत नाही संतसज्जन पाहून त्याच्या भोवती स्वार्थी कुटिल लोकांचा गराडा पडतो. साधूंची संगत दुर्जन लोकांना मनापासून नको असते. पण आपल्या रक्षणाचं कवच म्हणून संतांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न असे लोक करीत असतात.

सज्जनांची संगत लाभणं खरोखरचं दुर्मिळ आहे हा अनुभव सार्वत्रिक आणि सार्वकालिक आहे. स्वतः तुकोबांना हा अनुभव आलेला होता. त्यांचं मन आणि जीवन गंगाजलासारखं स्वच्छ होतं पण तरीही त्यांचा छळ करणारे, त्यांना अपमानित करणारे

पुष्कळ लोक त्यांच्या अवती भवती होते. चंदनाच्या झाडाभोवती विषारी सर्पांचा निवास असतो त्याप्रमाणं संतानाही अशा विषारी प्रवृत्तीच्या लोकांनी घेरलेलं असतं. या गोष्टीचा मनस्ताप तुकारामांना जन्मभर सहन करावा लागला. पण या परिस्थितीशी सदैव झगडत या संताची वाटचाल सुरू होती. त्यांचं एकच मागण होतं. ज्यांना हरिभक्तीची ओढ आहे, जे हरिकीर्तनात देहभान विसरतात, ज्यांचं सारं मन आणि जीवन हरीनं व्यापलं आहे असा हरिपरायण सज्जन मला भेटावा. सत् प्रवृत्त व्यक्तींच्या अंतरंगाचं दर्शन या अभंगातून होतं. 'माझिये जातीचा मज भेटो कोणी' । ही उत्कट आकांक्षा संताचीच असू शकते. आज सर्वत्र भक्तिहीनतेचं अश्रद्धेचं वातावरण पसरलेलं आहे. आज ठकाला महाठक भेटतो. चोर दरोडेखोरांच्या समूहात सज्जन भेटण्याची शक्यताच उरलेली नाही. दारूचा दर्प प्रिय वाटणाऱ्या दारूबाजांना केशराच्या सुवासाचं मोल कसं कळणार? संतांचं मन याच निराशेनं उद्विग्न झालेलं असतं. म्हणूनच तुकोबा प्रार्थना करतात. सज्जनांच्यासाठी माझा जीव व्याकुळ होत आहे. मी त्यांची डोळांभरून वाट पाहात आहे. खऱ्या वैष्णवाला आलिंगन देण्यासाठी मी उत्सुक आहे. त्याची भेट होईल तोच सुखाचा समाधानाचा दिवस ठरेल. परमेश्वरा, माझ्या जातीचा माणूस मला भेटू दे.

या संतानं सत्ता मागितली नाही. संपत्तीची आणि सुखसाधनांची याचना केली नाही. त्याला फक्त पवित्र आनंददायक असा संतसहवास पाहिजे. संतांचिया भेटी व्याकुळ झालेल्या एका संत अंतःकरणातला हा आर्त सूर तुकारामांच्या मनोवृत्तीवर स्वच्छ प्रकाश टाकतो. सारीच माणसं या प्रकारच्या इच्छेनं प्रार्थना करू लागली तर, *' भूतां परस्परे पडो मैत्र जीवांचे'* ही ज्ञानवंताची भूमिका सफल होईल.

संताचा सहवास मन आणि जीवन उजळून टाकतो. सामान्य माणसाचेही काही क्षण संतसमागमानं धन्य व्हावेत. सज्जन-संगतीचा आनंद हा उच्च प्रतीचा असतो. 'देव रोकडा सज्जनी' संतांतच देवत्व असतं. म्हणूनच मला माझ्या जातीचा कोणी भेटावा ही इच्छा तुकोबा प्रकट करतात.आजच्या जगात पैसा भेटावा म्हणून माणसं तळमळत आहेत. पण आपल्याला एखादा साधुसज्जन भेटावा या तहानेनं व्याकुळ झालेला कुणी दिसत नाही. अमृत हे अमृत आहे हेच ज्या जगाला कळत नाही ते जग अमृत समजून विषालाच जवळ करतं, या कर्माला काय म्हणावं?

❑❑❑

**आपुलिया बळें नाही मी बोलत । सखा भगवंत वाचा त्याची ।।**
**साळुंकी मंजूळ बोलतसे वाणी । शिकविता धणी वेगळाची ।।**
**काय म्यां पामरे बोलावी उत्तरे । परि त्या विश्वंभरें बोलविले ।।**
**तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा । चालवी पांगळा पायांविण ।।**

मराठी काव्याच्या इतिहासात तुकारामांचं स्थान विलक्षण महत्त्वाचं आहे हे सांगण्याचंही प्रयोजन नाही. देहूच्या या सामान्य वाण्याची वाणी महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून अन्य प्रांतातही वाहात गेली. तुकोबांची अभंगवाणी म्हणजे भक्तिभावनेची चंद्रभागा आहे. तिनं केवळ पंढरीच्या विठ्ठलालाच प्रदक्षिणा घातली असं नव्हे तर सामान्य माणसाच्या, शेतकऱ्याच्या, कष्टकऱ्याच्या माणुसकीला जाग आणण्याचा प्रयत्न केला. तुकोबांची कविता रंजल्यागांजल्यांना आपुलकीनं पोटाशी धरते. या काव्यात प्रेम, भक्ती, समाजसुधारणेचा विचार, सुखदुःखाचा विवेक, दांभिकता आणि अन्याय यांच्यावर प्रहार आणि देवत्वाला वंदन असे अनेक रंग आणि गंध आढळतात. एका प्रतिभावंतानं श्रेष्ठ मूल्यांची मनःपूर्वक केलेली पूजा म्हणजे ही कविता आहे. यात नुसते शब्द नाहीत, जिवंत अंतःकरणाचे उत्कट सूर यात तुकोबांनी भरले आहेत. आपल्या कवितेबद्दल त्यांनी काढलेले हे उद्‌गार त्यांच्या विनम्रतेचे द्योतक आहेत. मी माझ्या बळानं बोलत नाही. खरं तर माझी वाणी माझी नव्हेच मुळी. ती तर भगवंताची आहे. त्याच्या प्रेरणेनं मी बोलतो. हे उद्‌गार म्हणजेच विनयाचं सोज्ज्वळ रूप आहे. ज्याचं मन अष्टौप्रहर पांडुरंगमय झालं आहे त्याची शब्दशक्ती त्या पांडुरंगाचीच आहे असं म्हणता येत. तुकोबा एक दृष्टांत देतात,

'साळुंकी मंजुळ बोलते पण तिचा मधुर सूर घडवणारा धनी वेगळाच असतो. त्याप्रमाणं माझ्यासारखा पामर काय बरं बोलू शकणार? पण तो विश्वंभर मला बोलण्याची प्रेरणा देतो. शब्द देतो. विचार देतो. त्या परमात्म्याचं सामर्थ्य आपण कसं जाणू शकणार ?
'चालवी पांगळा पायांविण'

त्या करुणाघन ईश्वराची सत्ता साऱ्या विश्वावर आहे. तोच आपल्याला काव्य करण्याची स्फूर्ती देतो. त्याच्या कृपाप्रसादामुळं आणि मार्गदर्शनामुळं आपल्या वाणीला आकार आला आहे असं श्रेय तुकोबा परमेश्वराला देतात. आपलं कर्म ते ईश्वरार्पण करतात

आपण केवळ निमित्त आहोत. 'बोलविता धनी वेगळाचि' असं ते सांगतात. एका अर्थानं त्यांचं विधान संयुक्तिक आहे. सर्व सामर्थ्यांचा स्त्रोत म्हणजे परमेश्वर. तोच फुलात सुगंध ओततो. तोच बालकाच्या गालावर हसू फुलवतो. पाखरांना पंख तोच देतो. आकाशाला आणि झाडाझुडुपांना तोच रंग देतो. कवीला प्रतिभेचं दान तोच करतो. पणतीतल्या ज्योतीपासून सूर्यापर्यंत साऱ्या तेजांना तोच प्रकाशित करतो. तुकोबांनी आपल्या कवित्वाचं श्रेय ईश्वराला द्यावं यात काहीच आश्चर्य नाही. संताचं ईश्वरविषयक भान आणि भक्ती कधीच सुटत नाही. पण तुम्ही आम्ही सामान्य माणसं मात्र एखादी क्षुल्लक गोष्ट घडली तरी ती मी केली, माझ्यामुळेच ती घडली. मी महान आहे. माझ्या पराक्रमामुळंच सारं घडलं, मी होतो म्हणून हे कार्य यशस्वी झालं. असला व्यर्थ अहंकार आपल्याला घेरून टाकतो. पण संत विनयी, शालीन असतात. खरा ज्ञानी मनुष्य विनम्रच असतो. माझ्यासारख्या पामरानं कवित्व करावं ही लीला भगवंताची आहे. अहो आपलं सारंच जीवन हे ईश्वराचं देणं आहे, ही वस्तुनिष्ठ जाण ज्याला असते तो ज्ञानवंत. हे सारं माझंच आहे. मीच कर्तुमकर्तुम आहे ही फुशारकी केवळ अज्ञानाची द्योतक आहे.

तुकोबांच्या या अभंगातून त्यांची ईश्वरविषयक असीम श्रद्धा प्रकट झाली आहे. त्यामुळे या अभंगाला एकप्रकारचं सौंदर्य प्राप्त झालं आहे. काही जणांना शौर्याचा, कित्येकांना रूपयौवनाचा, कुणाला सत्ता-संपत्तीचा तर कुणाला ज्ञानाचा गर्व चढलेला असतो. पण या साऱ्याच गोष्टी इतक्या चंचल आणि क्षणभंगुर आहेत की त्या ओसरल्याबरोबर ती माणसं सर्वार्थानं दुबळी होतात. तुकोबा स्वतःला पामर म्हणून घेत असले तरी ते मराठी अभंगवाणीचे कुबेर आहेत यात तीळभरही शंका नाही. तुकोबांच्या हातातल्या एकतारीतून सरस्वतीचा वीणाझंकार ऐकू येतो. ज्यांना गर्वज्वर चढला आहे, त्यांनी हा अभंग जरूर वाचावा. म्हणजे अभंग काय आणि भंगणारं काय हे त्यांच्या लक्षात येईल. बोलविता धणी वेगळाचि हेच खरं. प्रतिभा ही उच्च प्रतीची नवनिर्माणक्षम शक्ती असते. ती कृत्रिम उपायांनी मिळवता येत नाही. निसर्गतःच ज्याच्या हृदयात कवित्वाचा झरा झुळझुळत असतो तो उत्तम कवी होतो. तुकोबांच्या हृदयात काव्याचा आणि माणुसकीचा जिवंत झरा झुळझुळत होता म्हणूनच ते संत आणि कवी झाले.

❑❑❑

**हिरा ठेवितां ऐरणी। वांचे मारितां जो घणीं॥**
**तोचि मोल पावे खरा। करणीचा होय चुरा॥**
**मोहरा होय तोचि अंगें। सूत न जळे ज्याचे संगे॥**
**तुका म्हणे तोचि संत। सोसी जगाचे आघात॥**

हिऱ्याची परीक्षा ऐरणीवर होते. हातोड्याचा घाव घातला तरी जो फुटत नाही, ज्याच्या तेजात अंतर पडत नाही. प्रहार झाला तरी जो अभंग राहातो तोच खरा अस्सल हिरा असतो. नकली हिरे चमकतात खरे पण असले हिरे ऐरणीवर ठेवले आणि त्यांची हातोड्याशी भेट झाली तर त्यांचं चूर्ण होऊन जातं. म्हणूनच या नकली हिऱ्यांना अकृत्रिम हिऱ्याची कधीच बरोबरी करता येत नाही. सोन्याची परीक्षा अग्नीत होते. हिऱ्याची परीक्षा ऐरणीवर होते. माणसाची परीक्षा संकटात होते आणि संतांची परीक्षा लोकनिंदेच्या भट्टीत होऊ शकते, *'तुका म्हणे तोचि संत। सोशी जगाचे आघात।'* जगानं कितीही कठोर आघात केले तरी संत आपल्या तपापासून, प्रबोधनकार्यापासून विचलित होत नाहीत. सुगंध हा जसा फुलाचा आत्मा आहे, प्रकाश हा जसा ज्योतीचा प्राण आहे. शील आणि चारित्र्य हा जसा कुलवतीचा गुणधर्म आहे त्याप्रमाणं शांती आणि प्रेम हा संताचा स्वभाव आहे. कितीही संकट आली, जगानं कितीही प्रहार केले तरी संताच्या अंतरंगातली शांती अभंगच राहाते टाकीचे घाव झेलल्याशिवाय दगडालाही देवपण येत नाही. त्याप्रमाणं विरोध झाला, आक्रमण झालं, दुष्ट लोकांनी कितीही छळ केला तरी संतहृदयातली प्रेमाची ज्योत तेवतच राहाते. तुकोबांचं सारं आयुष्य या विधानाची साक्ष देईल.

या जगानं अज्ञानानं आणि दुष्टत्वानं साधूंच्या वाटेवर नेहमीच काटे पेरून ठेवले. या काट्यांचं शल्य सहन करीत, काटे पेरणाऱ्यांनाही आशीर्वाद देत रक्ताळलेल्या पायांनी संत चालतच राहिले. त्यांच्या रूपानं मूर्तिमंत शांती, क्षमा आणि करुणा नांदत राहिली. संत एकनाथांच्या अंगावर कोणी दुर्जन अनेक वेळा थुंकला, एकनाथ शांतपणे नदीवर स्नान करून परतायचे. पुन्हा पुन्हा त्या अधम वृत्तीच्या माणसानं एकनाथांचा तसाच अपमान केला. अखेर त्यानं एकनाथांची क्षमा मागितली. दुर्जनांच्या मनात सज्जन आपल्या क्षमावृत्तीनं परिवर्तन घडवू शकतात. तुकोबांच्या जीवनाचं देखील हेच सार आहे.

या अभंगात हिऱ्याचा जो दृष्टांत घेतलेला आहे तो यथार्थ आहे. तुकोबांच्या काळात स्वतःला संत आणि कवी म्हणवून घेणारे कित्येक अहंकारी लोक होते. पण केवळ भगवे कपडे वापरणं, हातात जपमाळ घेणं, दाढी वाढवून बसणं आणि दिखाऊ संतत्वाच्या भांडवलावर स्वार्थ साधणं हे प्रकार करणारे पुष्कळ पायघोळ संत होते. कसोटीला मात्र ते उतरू शकले नाहीत. सर्वांचेच पितळ उघडं पडलं, या पार्श्वभूमीवर तुकोबा नावाचा हिरा ऐरणीवर निश्चल उभा होता. त्याचं अस्सलपण सोशीत हा महापुरुष आपलं प्रबोधनकार्य करीत राहिला म्हणूनच 'तुका आकाशाएवढा' ठरला. साडेतीनशे वर्षांचा काळ उलटून गेला पण संत मालिकेतला हा हिरा अखंड राहिला, 'तुका झालासे कळस' असं जे वचन आहे ते पूर्णपणानं खरं ठरलं. काळाच्या ऐरणीवर ठेवल्यानंतर शेकडो नकली हिरे घणाघात झाल्याबरोबर फुटून गेले. त्यांचा चुराडा झाला पण सरस्वतीच्या कंठातला हा तुकोबा 'तेजस्वी कंठमणी' ठरला. यात शंका नाही. संत या पदवीला तुकोबांनीच नवी प्रतिष्ठा मिळवून दिली.

अकृत्रिम हिऱ्याला देखील कठोर परीक्षा द्यावी लागते हा जगाचा नियम आहे. सीतेसारख्या पुण्यश्लोक सतीलाही अग्निपरीक्षेच्या दिव्यातून जावं लागलं. कधी कधी या परीक्षापद्धतीची चीड येते पण ती आहे हेच एका अर्थानं ठीक आहे. तुकोबा आणि मंबाजी यात खरा संत कोण हे कसं ओळखायचं? नैसर्गिक फुलांपेक्षा कागदी रंगीत फुलं बरी दिसतात. पण भुंगे चुकूनही कागदी, बनावट फुलांकडं वळत नाही. संत ओळखताना अशीच अभिज्ञता दाखवावी लागते. संतांची मनःप्रकृती अस्सल हिऱ्यासारखी असते. कोणत्याही ऐरणीवर हा हिरा कितीही घाव घातले तरी भंगत नाही. नकली हिरे आघात झाला की त्यांचे चूर्ण होऊन जाते. नानाप्रकारच्या आघातातून आणि आपत्तीतून संत पुन्हा कणखरपणानं हास्यमुखानं उभे राहतात. कारण त्यांची मानसिक शांती व सहनशक्ती विलक्षण असते. ते स्वतः जगतात आणि इतरांनाही जगवतात. तोच त्यांचा धर्म.

❑❑❑

**ज्यासी आवडी हरिनामाची । तोचि एक बहु शुचि ।।**
**जपतो हरिनाम बीज । तोचि वर्णांमाजी द्विज ।।**
**तुका म्हणे वर्णा धर्म । अवघे आहे सम ब्रह्म ।।**

कोणाला पवित्र म्हणावं ? कोण शुद्ध असतो ? या प्रश्नांची उत्तरं तुकोबांनी या अभंगात दिली आहेत. तो पवित्र, ज्याला हरिनाम अत्यंत आवडतं. तो शुद्ध ज्याच्या हृदयात हरिनाम रुजून बसलं आहे. हरिनाम हे ज्याचं सर्वस्व आहे, ज्याच्या चिंतनात भजन-कीर्तनात आचार-विचारात, साऱ्या जीवनातच हरिनाम सामावलेलं आहे. तोच शुद्ध असतो. पवित्र असतो असा निर्णय या संतानं दिला आहे. जो पदोपदी परमेश्वराच्या नावाचा जप करतो तो शुचिमान. हा निष्कर्ष एका अर्थानं बरोबर आहे. स्वतः तुकोबांचं जीवन अखंड विठ्ठलनामानं संस्कारित आणि पवित्र बनलं होतं, ते म्हणत असत *'विठ्ठल हा चित्तीं । गोड लागे गाता गीतीं । आम्हा विठ्ठल जीवन । विठ्ठल विठ्ठल वाणी । अमृत हे संजीवनी । रंगला या रंगे । तुका विठ्ठल सर्वांगे ।।'* विठ्ठल जीवनाच्या अणुरेणूत सामावून गेला. श्वासोच्छ्वासात मिसळून गेला. विठ्ठल हा सर्वांगात संचारला. जेव्हा परमेश्वर आपल्या जीवनाचा अधिष्ठाता आणि नियंता आहे हे समजतं तेव्हा जीवन शुद्ध होत जातं. अशुद्धता निरसून जाते. वासना, विकार ओसरू लागतात. चित्त पांडुरंगमय झाल्यामुळं साऱ्या आयुष्याला पवित्रतेचा सुगंध येऊ लागतो. संतमहंताच्या जीवनाचं हे स्वरूप असतं. पण केवळ हरिनाम नाटकीपणानं घेतलं तर पवित्रता येणार नाही. काही दुष्ट प्रवृत्तीचे लोक नामस्मरणाचं नाटक करतात. 'मुखमे राम और बगलमे छुरी' अशा स्वभावाच्या लोकांनी हरिनाम घेतलं म्हणून काय होणार ?

तुकोबांनीच म्हटलं आहे. *'वृंदावन फळ घोळिले साकरा । भीतरील थारा मोडेचि ना ।'* कारले साखरेत घोळले तरी ते कडूच राहाणार ! तुकोबांनी या अभंगात हरिनामाचा प्रमाणिकपणे अखंड जप करतो तो सर्ववर्णांतला श्रेष्ठ असतो असं म्हटलं आहे. श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या वर्णात जन्मला म्हणून माणूस श्रेष्ठ ठरत नाही. जातीची आणि वर्णाची श्रेष्ठता जन्मावरून ठरवणं चुकीचंच आहे. म्हणूनच तुकारामांनी एका अभंगात *'अभक्त ब्राह्मण जळो त्याचे तोंड'* असं म्हटलं आहे. भक्तिहीन नीतीहीन ब्राह्मणसुद्धा त्यांच्या दृष्टीनं हे [illegible] विषय आहे. पण ज्याच्या अंतःकरणात सदैव पांडुरंग आहे तोच सर्वश्रेष्ठ

मानलेला आहे.

तुकोबांची ही भूमिका त्यांच्या जीवनविषयक विचारांशी अत्यंत सुसंगत आहे. स्वतः तुकाराम खालच्या सामाजिक स्तरांतून आलेले होते. त्यांना तत्कालीन ब्रह्मवृंदानं शूद्र मानलं होतं. पण हा कुणबी आपल्या हृदयातल्या उत्कट भावबळावर श्रेष्ठ संताच्या पदवीला पोहोचला आणि त्याचं शिष्यत्व रामेश्वरभट्टासारख्या ब्राह्मण पंडितालाही स्वीकारावसं वाटलं, याचं कारण तुकोबांचं अवघं जीवन विठ्ठलभक्तीनं व्यापलेलं होतं. भक्ताला खरं तर जातीची आणि वर्णाची उपाधी नसते. चोखामेळा, कान्होपात्रा, जनाबाई यांच्या जातीची चिकित्सा करणारे टीकाकार मूर्ख आहेत हे आपोआपच सिद्ध झालं. माणसाच्या श्रेष्ठकनिष्ठतेचं मोजमाप कुळ आणि जात यांच्या मापट्यांनी कधीच होऊ शकत नाही. रामायण-महाभारतासारखे जगद्वंद्य ग्रंथ लिहिणारे वाल्मिकी आणि व्यास यांच्या जातीचा विचार करणाऱ्या लोकांना त्यांच्या प्रतिभेची जात कळलीच नाही.

सर्व वर्ण धर्म हे ब्रह्ममय आहेत. श्रेष्ठ कनिष्ठत्वाचा विचार म्हणजे एक भ्रम आहे. 'ज्यासी आवडी हरिनामाची । तोचि एक बहुशुची' ॥ हेच तुकोबांचं वचन अंतिम सत्य आहे. 'तुका झालासे कळस' कारण तुकोबांच्या मुखात आणि अंतःकरणात हरिनामाचं अमृत सतत होतं. शुद्ध मनानं जो परमेश्वराचं नामस्मरण करतो त्याची शुद्धता निखळ असते. त्याचा वर्ण आणि जात श्रेष्ठच असते. मानसिक शुद्धता हाच निकष भक्तीच्या क्षेत्रात प्रमाण मानला जातो. शरीराला सोवळं गुंडाळून पुष्कळ ओवळ्या मनाचे लोक भक्तीचं नाटकी प्रदर्शन करू शकतात. साऱ्या जगाकडं समभावानं पाहाण्याची ज्याची दृष्टी आहे तोच आध्यात्मिक उन्नतीच्या शिखरापर्यंत पोहोचतो. हरिनाम त्याला उन्नत करतं. नामस्मरणानं, नामसंकीर्तनानं मन आणि जीवन स्वच्छ होत गेलं तरच त्या नामगजराला अर्थ आहे.

❑❑❑

**तांबियाचे नाणे न चले खऱ्या मोले । जरी हिंडविले देशोदेशीं ।।**
**करणीचे काही न मने सज्जना । यावे लागे मना वृद्धांचिया ।।**
**हिरियासारखा दिसे शिरगोळा । पारखी ते डोळां न पाहाती ।।**
**देऊनिया भिंग कामावले मोती । पारखिया हातीं घेतां न ये ।।**
**तुका म्हणे काय नटोनिया व्यर्थ । आपुले हे चित्त आपणा ग्वाही ।।**

या अभंगात तुकारामांनी अस्सल आणि नक्कल यांच्यातलं अंतर स्पष्ट केलं आहे. खोटी नाणी जगाच्या बाजारात चालत नाहीत. कदाचित काही लोक सुरवातीला फसतात. तांब्याचं नाणं सोन्याचांदीचं समजून घेणारे अज्ञानी लोक थोडेफार असू शकतात. पण त्यांनाही यथार्थ जाणीव झाली की मग त्या नकली नाण्याचं मोल वास्तविक किती आहे हे समजतं. संत तुकारामांच्या काळात कवित्वाची आणि संतत्वाची पिसं लावून मिरवणारे काही कावळे अध्यात्माच्या क्षेत्रात नाचत होते. भोळ्या भाबड्या लोकांकडून प्रतिष्ठा मिळवीत होते पण तुकोबांसारखा एक जातिवंत संत आणि कवी या क्षेत्रात स्वयंतेजानं तळपू लागला. तेव्हा मात्र ही खोटी नाणी कोणी स्वीकारीना. जोपर्यंत अस्सल समोर येत नाही, तोपर्यंत कृत्रिमालाच प्रतिष्ठा मिळते. वेलीवर फुललेलं फूल आणि रंगीत कागदाचं बनवलेलं फूल यातलं अंतर स्पष्ट झाल्यावर आपली चूक लोकांना कळून येते. तुकारामांच्या बाबतीत हेच घडलं होतं. तुकाराम ही एक सुवर्णाची मुद्रा होती. पण तांब्याची चिल्लर नाणी काही काळ प्रचलित होती. उथळ पाण्याला खळखळाट फार या न्यायानं काही दांभिकांची चलती होती. कृत्रिम काय आणि अकृत्रिम काय याची समाजमनाला हळूहळू जाणीव झाली. शहाणे आणि सज्जन लोक नकली नाण्यांना कधीच भुलत नाहीत. गारगोटी हिऱ्यासारखी चमकते हे खरं. पण जे पारखून घेणारे तज्ज्ञ असतात ते गारगोट्याकडं दृष्टिक्षेपही करीत नाहीत. काचेचा मोती परीक्षक हातात देखील घेत नाही.

संत तुकोबांनी हे वेगवेगळे दृष्टांत घेऊन जे अस्सल आहे तेच अखेर टिकतं आणि समाज त्याचाच स्वीकार करतो हा विचार ठाशीवपणे मांडला आहे. सर्वच क्षेत्रांत सध्या कृत्रिम गोष्टींचं अवडंबर माजवलं जातं. जे चकाकतं ते सारंच सोनं नसतं. कितीही उलथापालथ झाली तरी सुवर्णाला स्वतःचं अंगभूत मूल्य असतं. दिखाऊ गोष्टी खपवण्याचा

धूर्त लोक प्रयत्न करतातं. पण नुसत्या दर्शनाला अर्थ नसतो. जसं दिसतं तसं आहे की नाही हे पारखून घेण्याची शक्ती समाजात असतेच. तुकारामांच्या काळातले भोंदू संत आज आपल्याला माहीत नाहीत. त्या काळातही ते थोडे दिवस लोकांसमोर होते. पण सत्य स्वभावतःच समर्थ असल्यामुळं ते असत्यावर एक दिवस मात करू शकतं. तुकारामांनी हा जीवनवादी विचार आपल्या अभंगांतून उत्तम रीतीनं मांडला आहे अभंगाच्या शेवटी ते म्हणतात,

'तुका म्हणे काय नटोनिया व्यर्थ । आपुले हे चित्त आपणा ग्वाही।' व्यर्थ देखावा करून आणि नटून सजून काय होणार आहे ? आपलं मन आपल्याला ग्वाही देत असतं. तुकोबांची एका अर्थानं ही आत्मकहाणी आहे. त्यांच्या चरित्राच्या संदर्भात या अभंगाचं वाचन केलं तर हे लक्षात येतं. जगाच्या बाजारात आजपर्यंत अनेकांनी सर्वच क्षेत्रांत खोटी नाणी चालवण्याचा प्रयत्न केला. एक सुभाषित असं आहे तुम्ही काही लोकांना सर्वकाळ फसवू शकाल. पण सर्वांना सर्व काळ फसवणं कुणालाच शक्य नाही. चुकून चलनात आलेली खोटी नाणी चाणाक्ष लोक बाजूला फेकून देतात आणि कदाचित ती चाललीच तर खऱ्या नाण्यांच्या सहवासात असल्यामुळं खपतात. शेवटी प्रामाणिक भक्ती, प्रामाणिक वृत्ती, प्रामाणिक धार्मिकता आणि नैतिकता हीच तारते. सोंग आणि ढोंग याचा शेवट ठरलेलाच आहे. मंबाजी केव्हाच विसरला गेला. तुकोबा मात्र शतकानुशतकं आपल्या हृदयात राहील.

खोटी नाणी जशी अर्थव्यवहारात चालत नाहीत त्याप्रमाणं आध्यात्मिक क्षेत्रातही नकली नाणी चालू शकत नाहीत. शिरगोळा थोडासा हिऱ्यासारखा चमकतो. म्हणून त्याला हिऱ्याची पदवी मिळू शकते. पण हिऱ्याचं अंगभूत तेज आणि अभंगसामर्थ्य शिरगोळ्यात कधीतरी येऊ शकेल का? सत्य लपत नाही हेच खरं ! लपवण्याचा प्रयत्न करूनही ते लपणार नाही. कारण ते सत्य आहे म्हणूनच ते समर्थ आहे.

❑❑❑

**ब्राह्मण तो याती अंत्यज असतां । मानावा तत्वता निश्चयेसी ।।**
**रामकृष्ण नामें उच्चारी सरळे । आठवी सावळे रूप मनीं ।।**
**शांती क्षमा दया अलंकार अंगीं । अभंग प्रसंगी धैर्यवंत ।।**
**तुका म्हणे गेल्या षडउर्मी अंगें । सांडूनिया मग ब्रह्म तो चि ।।**

सर्वच संतांनी मनुष्याची योग्यता त्याच्या जातीवरून किंवा वंशावरून किंवा वर्णावरून न ठरवता त्याच्या आंतरिक सद्भावनेवरून आणि कर्मावरून ठरवली आहे. जात, कुळ आणि वर्ण यांच्यामुळं मनुष्य उच्च किंवा नीच कसा काय ठरू शकतो? एखाद्याचा जन्म ब्राह्मण कुळात झाला म्हणून त्यानं स्वतःला श्रेष्ठ समजावं हे हास्यास्पद आहे किंवा शूद्र वंशात जन्म झाला म्हणून एखाद्यानं स्वतःला कनिष्ठ समजावं हा वेडेपणा आहे. जात आणि कुळ हे केवळ अपघात आहेत. त्यांचा माणसाच्या कर्तृत्वाशी अर्थाअर्थी काहीही संबंध असत नाही. पण हिंदु समाजाच्या आजपर्यंतच्या इतिहासात जात आणि वर्ण यांना अकारण, अवास्तव महत्त्व दिलं गेलं. या चुकीच्या विचारामुळं हजारो लोकांचं कर्तृत्व आणि महत्त्व नाकारण्यात आलं. त्यांच्या पराक्रमाला आणि पौरूषाला संधीच मिळू शकली नाही. याच जातिव्यवस्थेनं ज्ञानेश्वर, नामदेव, चोखामेळा, तुकाराम, कबीर वगैरे महनीय संतांना एकेकाळी अव्हेरलं होतं. त्यांच्या अंतःकरणाची आणि बुद्धीची उंची लक्षात न घेता त्यांच्या कुळावर आणि जातीवर कर्मठ लोकांनी बोट ठेवून त्यांचा छळ केला होता. हा सारा लाजिरवाणा इतिहास आहे.

महाभारतातल्या कर्णाचं उदाहरण प्रसिद्ध आहे. एकलव्याला तर विद्याही नाकारण्यात आली. सूतपुत्र म्हणून कर्णाचा उपहासानं उल्लेख करण्यात येत होता. त्या काळातले विद्वान आचार्य देखील जात आणि कुळ यांच्यावर माणसाची श्रेष्ठ कनिष्ठता अवलंबून असते असं मानीत होते. कर्णानं काढलेले उद्गार सुप्रसिद्ध आहेत. तो म्हणाला, *'दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम्'* 'कोणत्या कुळात जन्म व्हायचा हे दैवाहाती आहे पण पराक्रम करणं पौरुष गाजवणं हे माझ्या हाती आहे.' कर्णाचे हे उद्गार महत्त्वपूर्ण आहेत.

'ब्राह्मण तो याती अंत्यज असता' या अभंगात संत तुकारामांनी स्पष्टपणानं सांगितलं आहे. शूद्र यातीचा असला तरी जो रामकृष्णांचं नामस्मरण आणि उच्चारण भक्तिभावानं

करतो, श्रीहरीच्या श्यामल सुंदर रूपाचं मन:पूर्वक चिंतन करतो, ज्याच्या अंगावर शांती, क्षमा आणि दया हेच अलंकार आहेत, जो धैर्यशील आणि उत्कट भक्त आहे. जो विकाररहित झाला आहे, तो खऱ्या अर्थानं ब्राह्मणच मानला पाहिजे. तुकोबांचे हे विचार अत्यंत आदर्श आहेत. ब्राह्मण या शब्दाचा मूळ अर्थ ज्याला ब्रह्म जाणता येतं, ज्याच्या ठायी सद्‌भावनांचा अखंड निवास आहे. जो सर्वांचं शुभ चिंतितो आणि शुभ करण्याची धडपड करतो तोच ब्राह्मण असा आहे. पण कुळाच्या अभिमानानं उन्मत्त झालेले लोक इतरांचा उल्लेख कनिष्ठ किंवा शूद्र असा करू लागले आणि त्यांना माणूस म्हणून जगण्याचाही हक्क नाकारू लागले तेव्हा तुकारामांनी असल्या ब्राह्मणांचा स्पष्ट निषेध केला आहे, एका अभंगात त्यांनी म्हटलं आहे. *'अभक्त ब्राह्मण जळो त्याचे तोंड' 'वैष्णव चांभार धन्य त्याचे कुळ'*

दुसऱ्या एका अभंगात ते म्हणतात, *'महारासी शिवे कोपे ब्राह्मण तो नव्हे'* यावरून तुकोबांच्या विचारातली तर्कशुद्धता आणि व्यापकता दिसून येते. संत माणसामाणसांत फरक करीत नाहीत. *'जे जे भेटे भूत ते ते जाणिजे भगवंत'* ही त्यांची वृत्ती असते. कोणताही भेदभाव ते मानीत नाहीत कारण *'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेदभ्रम अमंगळ'* हे जीवनाचं सर्वोच्च तत्त्वज्ञान तुकोबा सांगतात. हाच खरा वेदान्त. *' तुका बोले तरी सहज वाणी । त्याचें घरी वेदान्त वाहे पाणी ॥'*

संतांना जातीच्या चौकटीत बसवणारी अज्ञानी प्रवृत्ती हास्यास्पद आहे. तुकारामांचा उल्लेख एक श्रेष्ठ निबंधकार सदैव 'शूद्रकवी' असा करीत असत. खरं तर कवी हा केवळ कवी असतो. तो ब्राह्मण नसतो किंवा शूद्रही नसतो. प्रतिभेला जातपात नसते. संतत्वालाही जातीपातीत बांधून ठेवण्याचा प्रयत्न म्हणजे लाजिरवाण्या अज्ञानाचं रोगट लक्षण आहे. *'ज्याचे मुखी नाम तोचि धन्य'* हे तत्त्व केव्हा कळणार कुणास ठाऊक ! पण ते कळलं नाही तर सर्वांचं दुर्दैव ठरेल.

❑❑❑

**कमोदिनी काय जाणे तो परिमळ । भ्रमर सकळ भोगीतसे ॥**
**तैसे तुज ठावे नाही तुझे नाम । आम्हीच ते प्रेमसुख जाणो ॥**
**माते तृण बाळा दुधाची ते गोडी । ज्याची नये जोडी त्यासी कामा ॥**
**तुका म्हणे मुक्ताफळ शिंपीपोटी । नाही त्याची भेटी भोग तिये ॥**

परमेश्वराच्या नावातली गोडी परमेश्वराला कशी समजणार? ती केवळ भक्तालाच अनुभवता येते. विठ्ठलाचं नाव हे भक्ताच्या जीवनाचं सर्वस्व असतं. कारण ते नुसतं नाव नसतं, त्या नावात भगवंताचं स्पष्ट दर्शन भक्ताच्या आंतरिक दृष्टीला मिळू शकतं. भक्ती आणि प्रेम असल्यावर कोणतंही नाव मधुर वाटतं. श्रीकृष्णाला त्याचे भक्त शेकडो नावांनी संबोधतात. कोणी त्याला कान्हा म्हणतो, कोणी नंदलाल म्हणून संबोधतो, कुणी श्याम म्हणतो तर कोणी राधावल्लभ म्हणून साद घालतो. मुरारी, मुरलीधर, केशव, हरी. भक्तांनी या परमेश्वराला अनेक नावांनी आळवलं आहे. प्रत्येक नाव त्यांच्या दृष्टीनं माधुर्याचं निधान आहे. हे नाव भक्ताच्या साऱ्या जीवनाशी एकरूप होऊन जातं. नावाला फारसं महत्त्व नसतं हे म्हणणं केवळ वरवरचं किंवा नाममात्र आहे. नाव हा केवळ शब्दव्यापार नसतो. हृदयाला हालवण्याची आणि मनाला आनंद उत्साह देण्याची शक्ती प्रभुनामात सामावलेली असते.

संत तुकोबा एका अभंगात म्हणतात, *'नाम गोड नाम गोड । पुरे कोड सकळही । रसना येरा रसा विटे । घेता घोट अधिक हे ॥ तुका म्हणे आहार झाला । हा विठ्ठल आम्हांसी ॥ '*

विठ्ठल नामातला रस आस्वादिल्यानंतर जन्म मृत्यूरूप संसार तुटून जातो इतर रस अधिक झाले तर त्यांचा वीट येतो. पण विठ्ठल नाम रसाचा कधीच वीट येत नाही. रामकृष्णहरी या नावांत अमृत साठवलेलं आहे असं भक्तांना वाटावं यात आश्चर्य नाही. कृष्णरूपी नावेत बसून 'कृष्ण कृष्ण' हे नाव घेत मीरा पैलतीराला गेली. पण या कृष्णप्रीतीवर तिनं कितीतरी मधुर काव्यं लिहिली. 'कृष्ण कृष्ण' हे नाव घेत ती कृष्णरूप झाली. आपल्या नावातली गोडी कृष्णाला जेवढी कळली नव्हती तेवढी ती त्याच्या भक्तांना कळलेली होती. आपल्याला मोल आहे हे रत्नाला कधी कळत नाही. आपल्यात सुगंध आहे हे फुलांना समजत नाही. आपल्यात जीवनशक्ती आहे हे अमृताला जाणवत नाही.

म्हणूनच या अभंगात तुकोबा म्हणतात, 'कमलिनीला आपला परिमळ समजत नाही. त्या सुवासाचा आस्वाद भ्रमर घेत असतो. 'तैसे तुज ठावे नाही तुझे नाम, आम्हीच ते प्रेमसुख जाणो !' गायीच्या दुधाची गोडी वासराला माहीत असते, मोत्याची किंमत शिंपलीला कळत नाही. विठ्ठल नावाचं सुख आणि सामर्थ्य विठ्ठलापेक्षा आम्हालाच समजलेलं आहे.

तुकारामांनी गायिलेलं नाममाहात्म्य खरोखरच वास्तविक आहे. *'तुझ्या नामाची आवडी आम्ही विठो तुझी वेडी'* हे विठ्ठला तुझ्या नामाच्या आवडीनं आम्ही वेडावलो आहोत. *'काय वैकुंठ बापुडे । तुझ्या प्रेमसुखापुढे ।'* तुझं नाव, तुझं प्रेम या सुखापुढं आम्हाला ते वैकुंठ सुद्धा तुच्छ वाटतं. त्यामुळं सर्वच संतांनी हरिनामाचा गजर केला आहे. परमेश्वराचं नामसंकीर्तन करताना या संतांच्या दृष्टीसमोर त्रैलोक्याचा राणा उभा राहात होता आणि मग त्याच्याबरोबर त्यांचा हृदयसंवाद होत होता. नावात काय आहे? असा प्रश्न विचारणाऱ्यांना नामाची महती कळली नसावी. आणखी एका अभंगात तुकोबा सांगतात, हरिनामाचा उच्चार केल्यावर तो जगजेठी भगवंत समोर उभा राहातो. याचा अर्थ राम किंवा कृष्ण म्हटल्यावर त्यांचं श्रेष्ठ समर्थ असं जीवनच भक्ताला दिसू लागतं आणि मग तो भक्त त्या व्यक्तित्वाशी समरस होण्याची धडपड करू लागतो. तुकोबांच्या अत्युत्कट भक्तिभावनेचा हा एक परिणामकारक अभंग आहे. आज तर आपल्या दृष्टीनं तुकाराम या नावालाही महत्व आहे. नावाच्या भोवती प्रकाशाचं वलय कर्तृत्वामुळं निर्माण होतं. राम, कृष्ण ही नावं हजारो वर्षे भक्तांना आनंदित करतात याचं कारण रामकृष्णांनी लोकोद्धाराचं कार्य करून आपलं जीवन सार्थ केलं. नाव हे व्यक्तित्वाशी जोडलं जातं. तुकाराम म्हटलं की एका वत्सल संतमूर्तीचं आपल्या मनाला दर्शन होतं. आपल्या नावातली गोडी देवाला कळत नाही. भक्तांना मात्र त्यातली अवीट माधुरी आस्वादिता येते.

❑❑❑

**अंतरीची ज्योती प्रकाशली दीप्ति । मुळींची जे होती आच्छादिली ।।**
**तेथीचा आनंद ब्रह्मांडी न माये । उपमेशी काये देऊ सुखा ।।**
**भावाचे मथिले निर्गुण संचले । तेहे उभे केले विटेवरी ।।**
**तुका म्हणे आम्हां ब्रह्मांड पंढरी । प्रेमाची जे थोरी साठवण ।।**

भक्ताच्या अंतःकरणात जी ज्योत असते ती सतत चिंतनानं, नामस्मरणानं अधिकाधिक प्रकाशित होते. तिची दीप्ती वाढत जाते. खरं तर प्रत्येकाच्याच हृदयांत एक ज्योत जन्मतःच असते. पण या ज्योतीच्या अस्तित्वाची ओळखसुद्धा बहुसंख्य लोकांना होत नाही. आंतरिक ज्योती म्हणजे ईश्वरत्वाचा प्रकाशकिरण. आपल्या ठायी सर्व जीवनाला उजळून टाकणारा एक दैवी किरण आहे हे मात्र जाणण्याची शक्ती आपल्याजवळ नसते. आपण केवळ साचेबंद जीवन जगतो. इंद्रियांच्या तात्पुरत्या आनंदात बुडून जातो. संपत्ती आणि कीर्ती यांच्या मागे धावत राहातो. प्रपंचाच्या फसव्या पाण्यात गळ्यापर्यंत बुडालेले असतो. आपल्या नाभीत कस्तुरी आहे हे ज्याप्रमाणं कस्तुरीमृगाला कळत नाही त्याप्रमाणंच दैवी प्रकाशाचा एक कवडसा आपल्याही अंतःकरणाच्या कोपऱ्यात आहे, याचं भान राहात नाही. हा किरण हळूहळू अज्ञानानं वेढला गेल्यामुळं अंधुक होऊ लागतो आणि अखेर तो नाहीसा होतो. कारण आपलं जगणं हे केवळ शरीराचं जगणं असतं. शरीराचीच सुखदुःखं आपल्याला महत्वपूर्ण वाटतात. पण तुकारामासारखा तत्त्वचिंतक संत अंतर्यामीच्या ज्योतीचा शोध करू शकतो. माझ्याही व्यक्तित्वात परमेश्वरी तेजाची एक ज्योत तेवत आहे. तिचा उजेड मी प्रतिक्षणी माझ्या दृष्टीत साठवला पाहिजे अशी त्याला जाणीव होते.

संत आणि सामान्य माणूस यांच्यात हाच फरक असतो. एक अंतर्मुख तर दुसरा बहिर्मुख. संत विचारशील तर सामान्य माणूस विचाराकडे पाठ फिरवून उभा असलेला. म्हणूनच या अभंगात जी विलक्षण अनुभूती तुकोबांनी प्रकट केली आहे ती बाह्य जीवन -व्यवहारात गुरफटलेल्या सामान्य माणसाला कधीच येत नाही. तुकोबा आपल्या दिव्यानुभवाचं काव्यमय वर्णन करताना म्हणतात, 'माझ्या अंतर्मनातली ज्योत आता पूर्ण प्रकाशित झाली आहे. ती मुळात होती, पण तिच्यावर अविद्येचं आच्छादन होतं. आता या ज्योतीमुळं मला जो अपूर्व आणि आत्यंतिक आनंद झाला आहे तो ब्रह्मांडातही

सामावला जाणार नाही. या सुखाला मी कोणतीच उपमा देऊ शकत नाही. जे निर्गुण होतं ते एकनिष्ठेनं मंथन करून त्याला मी सगुण स्वरूपात विटेवर उभं केलं. ज्योतीच्या प्रकाशात तो ब्रह्मांडाचा अधिनायक मला दिसू लागला. पंढरी हेच आमचं ब्रह्मांड. तिथेच प्रेम आणि भक्ती यांची साठवण आहे..' या प्रकारचा अनुभव केवळ ज्ञानवंताला घेता येणार नाही. उत्कट भक्तीच्या आणि श्रद्धेच्या अधिष्ठानावर जे ज्ञान उभं असतं तेच या परमआनंदाचा आणि प्रकाशाचा आस्वाद घेऊ शकतं. देव चित्तात ठसला पाहिजे. तो इतका मुरला पाहिजे की भक्तहृदयाच्या विटेवर उभा राहिला पाहिजे. हे एकाएकी साधत नाही. ही गूढ अनुभूती सार्वत्रिक होऊ शकत नाही. ती फार थोड्या भक्तांच्या वाट्याला येते. ती नामदेव जनाबाईला आली होती. हीच अनुभूती कबीराच्याही पदरात पडली होती आणि तुकोबांच्याही जीवनाला या अनुभूतीनं श्रीमंत बनवलं. ईश्वरस्वरूपीचा प्रकाशकिरण मिळवण्यासाठी घनदाट अंधारातून आणि खाच-खळग्यांतून खडतर प्रवास करावा लागतो. तुकोबा अशी पायपीट वर्षानुवर्षं करीत होते. नंतर एका उत्कट क्षणी त्यांना आनंदाचा डोह दिसला आणि अंतःकरणातली ज्योती आत्मतेजानं तेवू लागली. तुकोबा या दुर्मिळ अनुभवाचं निवेदन आपल्या काव्यमय भाषेतून करू लागतात, त्याचं दर्शन म्हणजे हा अभंग आहे. 'अंतरीची ज्योती प्रकाशली दीप्ती।' या प्रकारच्या अद्‌भुत आनंदाला सारं ब्रह्मांड अपुरं पडतं.

ही दिव्यानंदधारा केवळ आत्मासाक्षात्कारी संतालाच अनुभवता येते. संताची प्रेमदृष्टी व्यापक आणि विकसित असते. त्यांना सर्व जीवन, सर्व जग ईश्वरी आनंदानं ओथंबून गेल्याची प्रतीती येते. क्षुद्र स्वरूपाची दुःखं आणि विवंचना मावळून जातात. सर्वसामान्य लोकांना हे सारंच अगम्य वाटतं. त्यांचे अनुभव ढोबळ असतात. आपल्या आत्म्याच्या ठायी एक ज्योती आहे याचीच त्यांना जाण नसते. मग प्रकाशाचा साक्षात्कार त्या पामरांना कसा व्हायचा ? प्रत्येकाच्याच हृदयात एक ठिणगी निसर्गानं ठेवलेली आहे. तिचं भान ज्याला येतं तो ती ठिणगी प्रयत्नपूर्वक फुलवीत राहातो. अज्ञानानं झाकल्यामुळं बहुसंख्य लोकांना या ठिणगीची कल्पनाही नसते. तपस्येनं आणि चिंतनानं आत्मज्योती प्रकाशित केली पाहिजे.

❑❑❑

**आलिया संसारा उठा वेग करा । शरण जा उदारा पांडुरंगा ॥**
**देह हे देवाचे धन कुबेराचे । तेथे मनुष्याचे काय आहे ॥**
**देता देवविता, नेता नेवविता । येथे याची सत्ता काय आहे ॥**
**निमित्याचा धनी केला असे प्राणी । माझे माझे म्हणोनि व्यर्थ गेला ॥**
**तुका म्हणे का रे नाशवंतासाठी । देवासवे आटी पाडितोसी ॥**

संत तुकारामांचे काही अभंग संसारावर भाष्य करणारे आहेत. संतांच्या दृष्टिकोनातून संसार हा नाशवंत आहे. क्षणभंगुर आहे. मनुष्य स्वतःला सत्ताधीश मानतो पण खरं तर त्याची सत्ता मृगजळासारखी असते. आपण धनी आहोत. काळावर आणि परिस्थितीवर आपण स्वार होऊ शकतो, हा माणसाचा एक भ्रम आहे. त्यानं सर्वशक्तिमान परमेश्वराला शरण जावं. कोणत्याही भ्रमांच्या भोवऱ्यात सापडू नये असा उपदेश संतांच्या काव्यात अनेक ठिकाणी आढळतो. संत कबीरानंही हा विचार आपल्या पद्धतीनं मांडला आहे. तो म्हणतो, 'या जगात काहीच स्थिर नाही. समर्थ रावणाच्या लंकेतही दिवा लावायला कोणी उरला नाही. सारं जीवितच पाण्यावरच्या बुडबुड्याप्रमाणं चंचल आणि अर्थहीन आहे.' हा विचार निराशावादी आहे हे खरं, पण त्यातलं सत्य आपल्याला स्वीकारलंच पाहिजे. तुकोबा म्हणतात. 'आपला देह काळाच्या स्वाधीन आहे. आपली संपत्ती कुबेराच्या मालकीची आहे. मनुष्याचं या जगात काहीच नाही. देव देतो आणि देवच घेऊन जातो. मनुष्य निराधार आहे. पण हे न समजल्यामुळं त्याचं सारं जीवन व्यर्थ होतं. म्हणून अरे माणसा, तू त्या उदार पांडुरंगाला शरण जा. तोच तुझं कल्याण करील. उशीर करू नकोस. कारण देहाचा भरंवसा देता-येत नाही.'

हा विचार अस्वस्थ करणारा आहे. जीवनाच्या चिंतनाला चालना देणारा आहे. माणसाची अगतिकता आणि दुर्बलता या अभंगातून तुकोबांनी विदारक पद्धतीनं मांडली आहे. अंतिम अर्थानं विचार केला तर मानवी जीवनाचा हा अन्वयार्थ खरा वाटू लागतो. ज्या जीवनाचा आपण जयघोष करतो ते जीवन खरोखरच आपल्या स्वाधीन आहे का? धन मिळवण्यासाठी रात्रंदिवस धडपड करणाऱ्या माणसाची त्या धनावर खरोखरच सत्ता असते का? आपल्या देहावर जिथं आपली सत्ता नाही तिथं उंची वस्त्रालंकार, सोनं नाणं, जमीनजुमला

आणि माड्या हवेल्या यांच्यावर आपल्याला हक्क सांगता येईल का? या प्रश्नाच्या उत्तराचा शोध करताना मनुष्य हतबल होतो. आपली आपल्यावरही सत्ता नाही हे दाहक सत्य त्याला जाणवतं.

सत्यासंबंधीची सुजाण जाणीव माणसाला करून देण्यासाठी तुकोबांनी हा अभंग लिहिला. पण याचा विपरीत अर्थ करून माणसानं जीवनात काहीच मिळवू नये असा तुकोबांचा निष्कर्ष आहे ही समजूत काढून टाकावी. *'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे ।'* असं सांगणारे तुकाराम धनाचे आणि जीवनाचे द्वेष्टे नव्हते. त्यांचं म्हणणं इतकंच की कर्ता करविता असा तो उदार पांडुरंग मनात नेहमी राहावा. कारण तोच जगाचं आदिकारण आहे. विश्वजीवनाची सूत्रं त्याच्याच हातात आहेत. त्याला विसरून माणूस सत्ता आणि संपत्ती यांच्या आहारी गेला तर त्याचा सर्वनाश झाल्याशिवाय राहाणार नाही. संसारातल्या तुच्छ सुखसाधनांच्या भोवती आशाळभूतपणानं प्रदक्षिणा घालणाऱ्या अज्ञानी माणसाला केलेला हा हितोपदेश औचित्यपूर्ण आहे यात संदेह नाही. पण देवाला शरण जाणं याचा अर्थ आपल्या कर्तृत्वाला विसरणं असा मात्र करू नये. तुकोबा आपल्या स्वबळावर अध्यात्माच्या क्षेत्रात उच्चस्थानी विराजमान झाले. त्यांच्या ठायी प्रयत्न होता. आकांक्षा होती. पुरुषार्थ होता, ते विचारशील होते. म्हणूनच 'तुका झालासे कळस' हे लक्षात ठेवले पाहिजे. जीवन चंचल आहे म्हणून तर लवकरात लवकर जीवनाचं सार्थक केलं पाहिजे. आपल्या जीवनाला परमेश्वरी अधिष्ठान असलं पाहिजे.

बहुसंख्य माणसं स्वप्नरंजनात स्वतःला गुरफटून घेतात. कल्पनेच्या विलासात सुख असलं तरी ते भ्रामक आहे. त्याला वास्तवाचा स्पर्श झाला की ते सुखस्वप्न वितळून जातं. देह हे परमसत्य नव्हे. रामकृष्णासारख्या युगपुरुषांनाही देह ठेवावा लागला. म्हणूनच ईश्वरचिंतनाचा व सुखाचा शाश्वतमार्ग तुकोबा आग्रहानं आणि आपुलकीनं सांगतात. श्रेय काय आणि प्रेय काय हे नीटपणे समजून घेतलं पाहिजे. जे प्रेय असेल त्याच्यातच मनुष्य गुंतून पडतो. श्रेयाकडं त्याचं दुर्लक्ष होतं. यातच दुःखाचं मूल कारण आहे. क्षणिक आणि चिरकालिक याचा विचार जो करतो आणि त्याप्रमाणं जो वर्ततो तोच नर भला असं म्हटलं पाहिजे. जीवनावर भाष्य करणारा हा अभंग प्रत्येकानं मनात जपला पाहिजे.

□□□

**दसरा दिवाळी तोचि आम्हां सण । सखे संत जन भेटतील ।।**
**आमुप जोडल्या सुखचिया राशी । पार या भाग्यासी न दिसे आता ।।**
**धन्य दिवस आजि जाला सोनियाचा । पिकली हे वाचा रामनामें ।।**
**तुका म्हणे काय होऊ उतराई । जीव ठेवू पायी संतांचिये ।।**

दसरा आणि दिवाळी म्हणजे उत्साहाचा आणि आनंदाचा उत्सव. दिवाळीच्या दीपमालिका आपल्या मनातला अंधार उजळून काढतात. प्रसन्नतेच्या किरणांनी मन भरून जातं. त्यामुळं दसरा दिवाळीची वाट आपण उत्सुकतेनं पाहातो. पण तुकारामासारख्या संतश्रेष्ठाची दिवाळी वेगळी आहे. हा संत जीवनातल्या मांगल्याचा आणि शुभंकर प्रवृत्तीचा पूजक आहे. सामान्य माणसाची दसरा दिवाळी आणि संताची उत्सव कल्पना यात अंतर असतं. आपलं सुख पक्वान्नांचा आस्वाद घेण्यात, उत्तमोत्तम वस्त्रं अंगावर घालण्यात सामावलेलं असतं. पंचेंद्रियांना तृप्त करणाऱ्या गोष्टी मिळाल्या म्हणजे आपली दिवाळी साजरी होते. पण तुकोबा आपल्याप्रमाणं शारीर पातळीवरचं सुख अपेक्षित नाहीत. त्यांची आनंदाची जाणीव उच्च पातळीवरची आहे. 'तुम्हाला कोणती गोष्ट आनंदाची वाटते हे मला सांगा म्हणजे मी तुमची संस्कृती काय आहे ते सांगतो' असं एका तत्त्ववेत्त्यानं म्हटलं आहे. सामान्य सुखं सामान्यांना प्रिय असतात. पण जगाच्या कल्याणा देह कष्टविणारा तुकाराम इंद्रियांच्या सुखांना महत्व कसा बरं देईल? मनाच्या विकासावर, अभिरुचीच्या संस्कारिततेवर सुख आणि आनंद कल्पना अवलंबून असते. तुकोबा म्हणतात, 'मला प्रिय असलेले हरिभक्त जेव्हा मला भेटतील तेव्हा दसरा दिवाळीचे सण आल्याचा आनंद मला होईल. हरिभक्तांची, संतांची भेट हीच खरी दिवाळी ! आज हा सुयोग आला आहे यामुळं मी पुण्याच्या राशी जोडल्या. या पुण्याची गणती कशी बरं करता येईल? आजचा दिवस खरोखर सोन्याचा झाला. कारण माझ्या वाणीला रामनामाचं पीक आलं. संतांच्या भेटीमुळं हे अपूर्व घडून आलं. त्यांच्या पायातळी माझा जीव मी ठेवीन. त्यांच्यामुळं मी कृतार्थ झालो. तृप्त झालो.

तुकोबांच्या या अभंगात जो तृप्तीचा आनंदपूर्ण सूर आहे तो उत्कट वाटतो. संतांचिया भेटी संतांची तृप्ती असावी यात आश्चर्य नाही. विरहिणीला दीर्घप्रतीक्षेनंतर तिचा प्रियकर भेटावा. किंवा अंधाऱ्या रात्रीला चंद्र भेटावा, तहानेल्या पक्षिणीला पाणी दिसावं, तापलेल्या

धारित्रीवर पर्जन्य कोसळावा आणि मग आनंदाची दिवाळी साजरी व्हावी तशी विलक्षण अवस्था तुकोबांची झाली आहे. *'माझिया जातीचा मज भेटो कोणी'* ही तर त्यांची प्रार्थना आहे. आणि आता कामनांची पूर्ती झाली. सखे संतजन भेटले. संतांच्या रूपात जणू तो वैकुंठीचा राणा तुकोबांना भेटायला आला. जणू अमृताचा घन बरसला.

तुकोबांच्या या अभंगात संतांच्या आनंदविषयक कल्पनेचं सुंदर चित्रण आहे. कोणतीही क्षुद्र सुखाची अपेक्षा अशा व्यक्तींना नसते. सामान्य माणूस मात्र भौतिकाच्या पलीकडं केवढा अलौकिक आनंदाचा प्रदेश पसरला आहे हे समजू शकत नाही. एक साधू म्हणाला, 'रामनामाचं रत्न माझ्या पदरात पडलं. आता मिळवण्यासारखं काहीच उरलं नाही माझ्या आनंदाला आता आकाश ठेंगणं पडलं.' त्याप्रमाणं तुकोबांच्या वाणीला राम भेटला. सान्निध्यात हरिभक्त आले. जणू कल्पवृक्षाचीच प्राप्ती झाली. *'सोनियाचा दिन आजी अमृतें पाहिला'* हे ज्ञानेश्वरांचे शब्द या आनंद सोहळ्याचं वर्णन करायला पुरेसे आहेत.

*'आनंदाचे डोही आनंद तरंग'* हा तुकोबांचा अभंग या संदर्भात आपल्याला आठवतो. *'सतां सद्भिः संगः कथमपि ही पुण्येन भवति'* 'सज्जनांना सज्जनांचा सहवास पुण्योदयानंच प्राप्त होतो.' भवभूतीचं हे वचन सार्थ आहे. आनंदाला निरपेक्षतेची बैठक असेल तर तो आनंद उदात्त म्हणता येतो. पण आपले पुष्कळसे आनंद स्वार्थमूलक व द्वेषमत्सरातून उद्‌भवतात 'आनंद' ही संज्ञा त्यांना देता येणार नाही. 'Happiness is the crowning grace of moral life' नैतिक जीवनातच खरं सुख व समाधान आहे. अनैतिक आणि अधार्मिक जीवन जगणारे अनेक लोक बाह्यतः सुखी दिसतात. पण अंतर्यामी मात्र ते दुःखांनी अस्वस्थ, अशांत झालेले असतात. वाममार्गानं पैसा मिळू शकेल पण तो मार्ग आनंद मात्र देऊ शकत नाही. निर्विकार मनातच आनंदाची वेल फुलू शकते. तुकोबांना साधुसंतांच्या सान्निध्यात सुख सापडलं. त्यांच्या मनी मानसी आनंदाचा निर्झर खळाळत राहिला. निसर्गावर, देवावर आणि संतांवर प्रेम करणारा सदैव सुखी असतो.

❑❑❑

**थोर ती गळाली पाहिजे अहंता । उपदेश घेता सुख वाटे ।।**
**व्यर्थ भराभर केले पाठांतर । जोवरी अंतर शुद्ध नाही ।।**
**घोडे काय थोडे वागविते ओझे । भावेविण तैसे पाठांतर ।।**
**तुका म्हणे धरा निष्ठावंत भाव । जरी पंढरी राव पाहिजे तो ।।**

मनुष्याच्या अनेक व्याख्या करण्यात येतात. पण मनुष्य हा एक अहंकार बाळगणारा प्राणी आहे ही व्याख्या कदाचित अधिक सार्थ ठरेल. माणसं कशाकशाचा अहंकार बाळगतील ते सांगणं कठीण आहे. कोणाला कुळजातीचा गर्व असतो. कोणाला रूपाचा तर कोणाला धनाचा गर्व असतो. कोणी आपल्यासारखा विद्वान कोण आहे या अहंकारी कल्पनेनं फुगून गेलेला असतो. तारुण्याची आणि सत्तेचीही 'हवा' अनेकांच्या डोक्यात गेलेली असते. तपस्व्यांमध्ये सुद्धा आपल्या तपश्चर्येचा अहंकार वागवणारे साधू असू शकतात. संत नामदेवाला आपल्या भक्तीचा विलक्षण अभिमान होता आणि म्हणून मुक्ताबाईनं, *'अखंड जयाला देवाचा शेजार काय अहंकार गेला नाही'*। असं म्हटलं. संत गोरा कुंभारानं नामदेवाच्या मस्तकावर आपलं थापटणं ठोकून सांगितलं होतं 'हे मडकं अद्यापी कच्चं आहे. ते भाजून काढलं पाहिजे.' याचा अर्थ नामदेवांचा अहंकार ओसरून गेला पाहिजे. तुकोबांच्या काळातही स्वतःला महान पंडित आणि प्रवचनकार समजणारे काही दांभिक संत होते. तुकोबांनी अशा पंडितवर्यांचा आपल्या अनेक अभंगांतून उपहास केला आहे. अहंकाराचं निरसन झाल्याशिवाय खऱ्या ज्ञानाची प्राप्ती होत नाही हेच खरं.

या अभंगात तुकारामांनी साधकाला केलेला उपदेश अर्थपूर्ण आहे. ते त्याला म्हणतात, 'अरे गुरुचा उपदेश घेताना तुला सुख वाटतं हे खरं. पण प्रथम तुझी अहंता गळून गेली पाहिजे. जोपर्यंत दुराभिमान, अहंमन्यता तुझ्या डोक्यात असेल तोपर्यंत सम्यक ज्ञानाचा लाभ तुला होणं शक्य नाही. तू पाठांतर भराभर केलं असशील पण त्यातून शब्दज्ञानापलीकडं तुला काय मिळणार आहे ? अंतःकरण शुद्ध निर्मळ, निरहंकारी झाल्याशिवाय ज्ञानाला अर्थ नाही. आपला हा विचार स्पष्ट करताना तुकोबांनी घेतलेला दृष्टांत मार्मिक आहे. ते विचारतात, 'घोड्यावर थोडं ओझं असतं काय? ते पुष्कळ भार पाठीवर वागवतं पण त्याचा त्याला स्वतःला काहीच उपयोग होत नाही त्याप्रमाणं भावाशिवाय पाठांतर निरुपयोगी आहे. पंढरीचा विठ्ठल भेटावा आणि श्रेष्ठ ज्ञानाची प्राप्ती

व्हावी असं वाटत असेल तर तुझ्या मनात दृढ निष्ठा पाहिजे. गर्व सारा समूळ निरसून गेला पाहिजे. एकनिष्ठेनं आणि विनीत वृत्तीनं तू उपासना कर. तो पंढरीराया तुझाच आहे.'

तुकोबांनी केलेला हा उपदेश अत्यंत मौलिक स्वरूपाचा आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत कार्य करणाऱ्या माणसांना हे मार्गदर्शक शब्द प्रेरणा देऊ शकतील. यशाच्या वाटेवर एखाद दुसरं पाऊल पडलं की माणूस स्वतःला श्रेष्ठ आणि इतरांना तुच्छ समजू लागतो. यश आणि कीर्ती यांचा उन्माद वाढत जातो आणि तिथूनच त्याच्या अधःपाताला सुरुवात होते. विद्येच्या आणि बलाच्या, वैभवाच्या आणि कर्तृत्वाच्या अहंगंडानं पछाडलेल्या लोकांनी हे ध्यानात ठेवावं. लीनता असावी. उद्धटपणाला अर्थ नाही. तुकोबांनीच म्हटलं आहे, *'महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळे वाचती'* ॥ पूर आला की ताठ उभी असलेली झाडं आडवी होतात आणि वाहून जातात. लव्हाळी मात्र लीनतेनं वाकतात. पाणी निघून जातं. त्या लव्हाळ्यांचं रक्षण होतं. ज्ञान आणि विनय, कर्तृत्व आणि नम्रता, शौर्य आणि सौजन्य, श्रीमंती आणि आर्जव यांचा संयोग झाला तर मानवी जीवन अधिक सुंदर होईल. म्हणूनच तुकोबांच्या शब्दांत म्हटलं पाहिजे. 'थोर ती गळाली पाहिजे अहंता ।'

मनुष्याला अहंकार कशाकशाचा वाटतो? रूपाचा, तारुण्याचा, बुद्धिमत्तेचा, शक्तीचा, सत्ता आणि संपत्तीचा. गर्वाचे विषय अनेक आहेत. घमेंडखोर लोक स्वतःला उच्च मानून इतरांना तुच्छ लेखतात. ज्या ज्या गोष्टींचा गर्व वाटतो ती ती गोष्ट चंचल आहे आणि बुडबुड्यासारखी फुटून जाणार आहे याचा विवेक अशा व्यक्तींच्या मनात नसतो. रावण गर्विष्ठ होता. त्याचा गर्वज्वर उतरवण्यासाठी त्याला राम भेटला. सत्तेच्या मदानं उन्मत्त झालेल्या कौरवांना भीम आणि अर्जुन भेटले. अहंकाराला छेद देणारी आणि तो नष्ट करून टाकणारी शक्ती जगात असते हे लक्षात घेतलं पाहिजे. अभिमानी असावं पण अहंकारी असू नये. तुकोबांसारखा संत *'तुमच्या लागतसे पाया'* असं शालीनतेनं म्हणतो. ज्ञानेश्वर हेही विनीत वृत्तीचे होते. खरा ज्ञानी नम्रच असतो. सौजन्याच्या कोंदणात ज्ञानाचं रत्न शोभून दिसतं. अहंता गळून गेल्याशिवाय ज्ञान होत नाही. आणि ज्ञान झाल्याशिवाय भेदबुद्धी नाहीशी होत नाही.

❑❑❑

**ओले मूळ भेदी खडकाचे अंग। अभ्यासासी सांग कार्यसिद्धी ॥**
**नव्हे ऐसे काही नाही अवघड। नाही कईवाड तोचि वरि ॥**
**दोरे चिरा कापे पडिला कांचणी। अभ्यासे सेवनी विष पडे ॥**
**तुका म्हणे कैचा बैसण्यासी ठाव। जठरी बाळा वाव एकाएकी ॥**

हा अभंग प्रयत्नवादाची महती स्पष्ट करणारा आहे. एखादं उद्दिष्ट केवळ कल्पनेनं साध्य होत नाही. त्यासाठी योजनाबद्ध प्रयत्न करावा लागतो. तुकारामांनी प्रयत्नवाद आणि पुरुषार्थ यांचा स्पष्ट पुरस्कार आपल्या अभंगांतून केला आहे. ते केवळ प्राक्तनवादी होते *'आले देवाजीच्या मना, तेथे कोणाचे चालेना'* असं म्हणून देव आणि दैव यांच्यावर ते अवलंबून राहिले, 'त्यांची शिकवण प्रारब्ध शरण वृत्तीची आहे' असे आक्षेप काही टीकाकारांनी तुकोबांवर घेतले आहेत. सारेच संत वाङ्मय प्रारब्धवादी, दुर्बळ विचारांनी भरलेलं आहे, पुरूषार्थ आणि अभ्युदय या गोष्टी संतांच्या साहित्यात फारशा दिसत नाहीत, अशा अर्थाची टीका कित्येकांनी केली आहे. पण ही सगळी टीका अज्ञानावर आधारल्यामुळं विपर्यस्त झाली आहे. प्रत्येक संतानं आपलं व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी साधना केली. गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार या संतांनी देखील आपलं कर्म उत्तम रीतीनं पार पाडीत ईश्वराची भक्ती केली. त्यांनी प्रपंच सोडला नाही आणि केवळ ते रात्रंदिवस टाळ कुटीत बसले नाहीत. आपला व्यापार उद्योग ते प्रयत्नपूर्वक करीत होते. हेच ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यांच्या संदर्भात म्हणता येतं. लोकांत राहूनच लोकजीवनाला नैतिक मूल्यांची बैठक देण्याचा प्रयत्न या संतांनी केला. त्यामुळं संतांनी दैववादाचं निराश गाणं पुन्हा पुन्हा आळवलं अशा अर्थाची ज्यांनी टीका केली त्यांच्या अज्ञानाबद्दल अधिक बोलण्याचं कारण नाही.

एका उत्तम, मार्मिक दृष्टांतातून अभ्यासाची म्हणजेच यत्नवादाची कास माणसानं धरली पाहिजे असं तुकोबा सांगतात. जिवंत मूळ हळूहळू खडकाचं अंग फोडून भूमीचा ठाव घेतं. त्याप्रमाणं सतत अभ्यासानं कार्य सिद्ध होतं. प्रयत्नाला अमुक एक गोष्ट साध्य होत नाही असं मानणं चुकीचं आहे. पण प्रयत्न मात्र निकराचा केला पाहिजे. आणखी एक उदाहरण घेऊन आपला विचार तुकोबा दृढतेनं सांगतात. ते म्हणतात, 'दोराच्या सतत घर्षणानं मोठा दगड देखील कापला जातो. आणि अभ्यासानं, सरावानं विष देखील पचनी पडतं . मातेच्या उदरात नऊ महिन्यांचं मूल सामावण्याएवढी जागा सुरवातीला असते का? पण

हळूहळू ते मूल राहाण्याइतका अवकाश होत राहातो.' दुसऱ्या एका अभंगात त्यांनी म्हटलं आहे, *'साहोनिया टाकी घाये, पाषाण देवचि झाला पाहे'* दगडालाही देवकळा प्राप्त होते ती टाकीचे घाव सोसल्यानंतर. त्याप्रमाणं जीवनाचा उत्कर्ष आणि विकास प्रयत्नानं होतो. नशीबानं होत नाही. नशीबाची रडगाणी गात बसणारे लोक दुबळे असतात. तुकोबांवर तर आकाश कोसळलं होतं. दुःख आणि संकट यांच्या विळख्यात सापडलेल्या या माणसानं देवाचं नाव जरूर घेतलं पण सतत अभ्यास केला, तपस्या केली, जीवनाचं चिंतन केलं. स्वतःच ते स्वतःचे गुरू झाले. निर्धारानं पाऊलं टाकीत राहिले, ते निष्क्रिय नव्हते. क्रियाशील विचारवंत आणि संत म्हणूनच तुकोबांचा उल्लेख करावा लागतो. त्यांनी भल्यांच्या पाठीवर शाबासकी दिली आणि नाठाळांच्या माथी प्रहार केले. म्हणून तर तुकोबा हे महाराष्ट्र संस्कृतीचे आणि साहित्याचे एक शिल्पकार बनले. तुकोबा नावाच्या वृक्षाची ओली मूळं कठोर खडकाला भेदून मराठी भूमीत खोलवर रुजली याचं कारण ते प्रयत्न करीत राहिले. जिभेवर विठ्ठलाचं नाम आणि हातानं समाजमन घडवण्याचं काम ते करीत राहिले

*'यत्न तो देव जाणावा'* हे समर्थ रामदासांचं वचन प्रसिद्धच आहे. अग्नी चेतवावा लागतो. तो आपोआप प्रकट होत नाही. तुकोबांच्या काळात शिवबा स्वराज्य स्थापनेच्या महाप्रयत्नात गुंतले होते. ध्यानी, मनी, स्वप्नी त्यांना स्वराज्याशिवाय काही सुचत नव्हतं. आपल्या समशेरीच्या बळावर ते स्वराज्य त्यांनी निर्माण केले. तो दैवी प्रसाद नव्हता. अथक प्रयत्नांची ती परिणती होती. संत वाङ्मयात केवळ दैववाद आहे अशी टीका करणाऱ्या विद्वानांनी संतांचं कार्य आणि काव्य नीट तपासून पहावं. संत हे प्रयत्नशील होते, संघर्षशील होते. लोक प्रबोधनावर त्यांचा भर होता, म्हणूनच सामाजिक जागृतीचं प्रकाशयुग त्यांच्या प्रयत्नातून निर्माण झालं. प्रयत्न आणि पुरुषार्थ यातून संस्कृतीला उजाळा मिळतो. परिस्थिती कितीही खडतर असली, काळ कितीही प्रतिकूल असला तरी दोन हात करण्याची झुंजार प्रवृत्ती ज्याच्या ठिकाणी असते तो अखेर विजयश्री खेचून आणतो. नियतीला वाकवण्याचं कार्य पुरुषार्थी व्यक्ती करू शकतात हा विचार या अभंगात गुंफलेला आहे.

❑❑❑

**मृगाचिये अंगी कस्तुरीचा वास । असे ज्याचा त्यास नसे ठावा ।।**
**भाग्यवंत घेती वेचूनिया मोलें । भारवाही मेले वाहता ओझे ।।**
**चंद्रामृते तृप्तीपारणे चकोरा । भ्रमरासी चारा सुगंधाचा ।।**
**अधिकारी येथे घेती हातवटी । परीक्षवंता दृष्टी रत्न जैसे ।।**
**तुका म्हणे काय अंधळिया हातीं । दिले जैसे मोती वाया जाय ।।**

अनेक प्रकारच्या अन्वर्थक, मार्मिक दृष्टांतांतून आपला आशय तुकोबा प्रकट करतात. या बाबतीत ज्ञानेश्वरांशी त्यांची तुलना होऊ शकते. ज्ञानेश्वरांचे दृष्टांत भव्य असतात. तुकोबांचे दृष्टान्त मात्र तुमच्या आमच्या सामान्य जीवनव्यवहारातून घेतलेले असतात. पण ते यथार्थ असतात. औचित्यपूर्ण उदाहरणं होऊन आपलं प्रतिपाद्य सुगम करण्यात तुकोबांचा हातखंडा आहे. त्यांना या अभंगातून प्रत्यक्ष अनुभूती आणि केवळ वरवरचं ज्ञान यातला फरक स्पष्ट करायचा आहे. दृष्टी नसलेल्या अंधाच्या हातात मोती दिला तरी त्याचं मोल त्याला समजणं शक्य नाही.परीक्षा करण्यासाठी मर्मज्ञता आवश्यक असते. अज्ञानी मनुष्य रत्नाची पारख करू शकेल का? अमूल्य रत्न ओळखण्यासाठी जी सूक्ष्म दृष्टी आणि रत्नासंबंधीचं ज्ञान आवश्यक असतं तेच नसल्यामुळं हातातल्या रत्नाची किंमत त्याला कळणं शक्य नाही. नुसता वेदांचा अभ्यास असून चालत नाही. प्रत्यक्ष अंतःकरणात वेदातलं ज्ञान अनुभूतीच्या रूपानं उतरलं पाहिजे. वेद मुखोद्गत असणाऱ्यांना वेदांचा खरा अर्थ कळत नाही यावर तुकोबांची ही टीका आहे.

शास्त्राध्ययन करणाऱ्या शास्त्रीपंडितांना ज्ञानाच्या अहंकारानं वेढलेलं असतं. आपण ज्ञानवंत आहोत या भावनेच्या वलयात गुरफटलेल्या या लोकांना प्रत्यक्ष अनुभव मात्र मिळत नाही. कारण ते खरे पारखी नसतात. ज्यानं साखरेची गोडी कधीच घेतली नाही त्यानं साखरेसंबंधी प्रवचन करण्यात काय अर्थ आहे? साखरेची माहिती असणं आणि तिची गोडी अनुभवणं या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. तुकोबांनी इथं आपण अनुभव घेणाऱ्यांच्या मालिकेत आहोत असं सांगितलं आहे. त्यांचं समग्र जीवन आणि त्यांची काव्यवाणी लक्षात घेतली तर तुकोबा हे आत्मानुभवी श्रेष्ठ संत आहेत याबद्दल संदेह उरत नाही. ज्ञानरुपी चंद्रातल्या अमृताचं प्राशन करणारा हा संत तुकाराम चकोरपक्षी आहे हे निर्विवाद .

ते म्हणतात, 'कस्तुरीमृगाच्या नाभीत कस्तुरी असली तरी त्या सुगंधाचं मोल त्याला कळत नाही. जे भाग्यवंत परीक्षक आहेत ते धन देऊन कस्तुरी विकत घेतात. बाकीचे मात्र केवळ भारवाहक असतात. चंद्रातून झरणारं अमृत पिऊन चकोर तृप्त होतो. भ्रमराला सुगंधाचं खाद्य मिळालं की तो संतुष्ट असतो. 'भ्रमरासी चारा सुगंधाचा'. जे अधिकारी परीक्षक आहेत ते दृष्टिक्षेपातच रत्नाची पारख करू शकतात. याच्या उलट अंधाच्या हातात बहुमूल्य मोती दिला तरी त्याला त्याची पारख होऊ शकत नाही.' यातून तुकोबांना हे सुचवायचं आहे की आपल्या ठायी असलेला परमात्मा आपल्याला ओळखता येत नाही. प्रत्येकाच्या अंतःकरणात तो विश्वात्मक देव राहिलेला आहे. त्याची अनुभूती येणं आणि त्या ईश्वरी तत्त्वाशी समरस होणं हेच ज्ञानवंताचं खरं लक्षण आहे. पण ज्ञानवंत कोरडेच राहातात. पवित्र गंगेत स्नान करून सुद्धा त्या गंगेचा स्पर्श त्यांच्या हृदयाला होत नाही. तो केवळ शरीराला होतो. जे ज्ञान अनुभूतीशी संबंधित नाही त्याचा काय उपयोग होणार आहे? जो अनुभव घेतो तोच खरा ज्ञानसंपन्न असतो. कस्तुरीमृग आपणच आहोत. आपणच सुगंधाची अनुभूती घेत आहोत हे जोपर्यंत त्या मृगाला कळत नाही, तोपर्यंत कस्तुरीमृगाचा स्वतःला काहीच लाभ होत नाही.

अभंगात चारपाच दृष्टांत आलेले आहेत. मृग, चंद्र आणि चकोर, भ्रमर आणि अंधाच्या हातातील रत्न हे सर्व परिचित दाखले घेऊन आपला मध्यवर्ती आशय तुकोबांनी फुलवला आहे. त्यामुळं तो आशय अधिकच गहिरा बनला आहे. तुकोबांचा पिंड हा संताचा होता त्याप्रमाणंच तो कवीचाही होता याचं सुगम दर्शन या अभंगात घडतं . तुकयाची अभंगवाणी नानाविध अशा अर्थवाही दृष्टांतानी भरलेली आहे. सज्जनाच्या चित्ताचं वर्णन करताना ते अगदी सहज घरगुती दृष्टांत घेऊन म्हणतात, '*मृदु सबाह्य नवनीत। तैसे सज्जनाचे चित्त॥*' मृदु हृदयाचं वर्णन करताना मऊ लोणी कवीला आठवावं हे त्याच्या नवनिर्माणशील कवित्वाचं लक्षण आहे. 'मृगाचिये अंगी कस्तुरीचा वास' किंवा 'भ्रमरासी चारा सुगंधाचा' ही रचना प्रसादपूर्ण आहे. इतकी सुगम आणि सहजसुंदर रचना मराठी काव्यात तुकारामांनी केली त्यामुळं अशी कविता घरोघरी पोहोचावी यात आश्चर्य नाही. ज्याला तुकारामाची कविता आवडणार नाही त्याला मी म्हणेन, 'तुका म्हणे काय आंधळिया हाती। दिले जैसे मोती वाया जाय।'

❑❑❑

**नाही संतपण मिळत हे हाटीं । हिंडता कपाटी रानीं वनीं ।।**
**नये मोल देता धनाचिया राशी । नाही ते आकाशी पाताळी तें ।।**
**तुका म्हणे मिळे जिवाचिये साटी । नाही तरी गोष्टी बोलो नये ।।**

पैशाच्या बळावर जगाच्या बाजारात अनेक वस्तू विकत घेता येतात. पदव्यादेखील विकत मिळतात. पदवी आणि गुणवत्ता यांचा आता फारसा संबंध उरलेला नाही. शिक्षणक्षेत्रातल्या पदव्या संपत्तीच्या बळावर किंवा सत्तेच्या जोरावर मिळू शकतात हेही आता सर्वांना माहीत आहे. पण जी पदवी विकत मिळते ती अर्थशून्य असते. लौकिकात मिरवण्यासाठी तिचा उपयोग होऊ शकतो. पण संतत्व मात्र कुठंही विकत मिळत नाही. संतपणा ही बाहेरून मिळणारी पदवी नव्हे. संतत्व हा हृदयाचा, व्यक्तित्वाचा गुणधर्म आहे. संतत्वासाठी शेती, जमीन जुमला किंवा बँकेतली ठेव किंवा शासनाचं प्रशास्तिपत्र असल्या गोष्टी मुळीच चालत नाहीत. संतत्व ही वृत्ती आहे. जीवन जगण्याची ती एक प्रकृती आहे. अंगावर भगवे कपडे घातले आणि हातात जपमाळ घेतली की आपण संत झालो असं वाटणारे खुळचट लोक जगात कमी नाहीत. भगव्या वस्त्रांना फसणारे अंधःश्रद्धाळू वाटेल तितके आहेत, हे तुकारामांना माहीत होते. म्हणूनच त्यांनी एका अभंगात *'घरोघरी जाले जोगी'* असं म्हणून या दांभिकांचा योग्य समाचार घेतला आहे.

संतपणाची तुकोबांची व्याख्या व्यापक आहे. जो जगाचे प्रहार शांतपणानं सहन करून त्यांना आत्महिताची वाट दाखवतो तो संत. जो समाजकल्याणासाठी सर्व प्रकारचे कष्ट सहन करतो तो संत. ज्याच्या मनात क्षुद्र स्वार्थ नाही, वासना- विकार ज्यानं जिंकले आहेत आणि जो दीनदुःखितांना वात्सल्यभरानं पोटाशी धरतो तो संत. ज्याच्या हृदयात पांडुरंग असतो तो संत. ही संतत्वाची खरी कसोटी आहे. केवळ कपड्यांमुळं, जटा वाढवल्यामुळं आणि अंगारे धुपारे देत बसण्यामुळं संतत्व प्राप्त होत नाही. 'गुहेत राहाणारा तपस्वी असं म्हणायचं असेल तर कोल्हे सुद्धा गुहेत राहातात !' असा उपहासाचा सार्थ उद्गार तुकोबांनी काढला आहे. संत हे आत्मानंदात निमग्न असतात. कोणतीही भौतिक इच्छा त्यांच्या मनात उरलेली नसते. ते 'स्व' चं विसर्जन करतात म्हणूनच संत होतात. याप्रकारचं संतपण बाजारहाटात मिळत नाही. रानावनात संचार केला म्हणूनही सापडत नाही. संपत्तीच्या राशी ओतल्या तरी संतत्व भेटत नाही. आकाशपाताळ एक

केलं तरी सुद्धा संतत्वावर अधिकार सांगता येत नाही. संतपण ही एक उच्च प्रतीची मानसिक अवस्था आहे. आपलं संतत्व हा खरे संत कधी प्रदर्शनाचा विषय करीत नाहीत. ज्याच्याठायी ते नसतं तेच त्याची आरास मांडून बसतात आणि आपल्या तथाकथित संतत्वाचे स्वतःच आणि आपल्या भक्तांकडून ढोल बडवीत बसतात. *'ऐसे संत अडक्याचे तीन'* । किंवा *'असले दिखाऊ संत पैशाला पासरी'* म्हटलं तरी चालेल.

एका गाढवानं सिंहाचं कातडं पांघरलं. दोन चार दिवस इतर पशू त्याला फसले. पण एक दिवस ते गाढव ओरडू लागलं तेव्हा साऱ्या पशूंनी त्याला पळता भुई थोडी केली. या कथेप्रमाणं संतत्वाचा मुखवटा घेतला तरी तो फार लवकर गळून पडतो. उपासनेतून, सेवेतून, प्रेमातून, वासनात्यागातून आणि सर्वांचं कल्याण व्हावं या इच्छेतून व धडपडीतून संतत्व प्राप्त होतं. म्हणूनच तुकोबा म्हणतात, 'प्राणार्पण करण्याची हिंमत असेल, जनता जनार्दनासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची प्रवृत्ती असेल तर संतत्व चालत येतं. नाहीतर उगीच बोलण्यात काय अर्थ आहे ? पण आजचं जग मुखवट्यांचं आहे. *'बोले तैसा चाले'* असे लोक आढळत नाहीत. दानशूर म्हणवणारा कृपण असतो. शूरत्वाच्या गोष्टी बोलणारा नेभळा असतो. देवधर्माचं अवडंबर माजवणारा गरीबांचं शोषण करीत असतो आणि तरीही आपण संतसज्जन असल्याची दवंडी पिटीत राहातो. असली दृश्यं पाहूनच तुकोबांनी हा अभंग लिहिलेला आहे. म्हणून त्यांनी परखडपणानं सांगितलं आहे 'अरे, जिवाचं मोल द्यावं, सारं जीवन परमेश्वरचरणी अर्पण करावं तेव्हा संतत्व मिळतं. संतत्व ही बाजारात विक्रीसाठी ठेवलेली तुच्छ वस्तू नव्हे

संतांची महती संत तुकोबांच्याच शब्दांत सांगितली पाहिजे. *'संत मारगी चालती त्यांची लागो मज माती ॥ तुका म्हणे संतापायी । जीव ठेविला निश्चयी ॥'* असे वंदनीय संत दैवयोगानं भेटतात. त्यांचा सहवास लाभणं, त्यांचं मार्गदर्शन मिळणं ही अधिक सौभाग्याची घटना आहे.

❑❑❑

ओस जाल्या दिशा मज भिंगुळवाणे। जीवलग नेणे मज कोणी ॥
भय वाटे देखे श्वापदांचे भार। नव्हे मज धीर पांडुरंगा ॥
अंधकारापुढे न चलवे वाट। लागतील खुंट काटे अंगा ॥
एकला नि:संग फाकली मारग। भितो नव्हे लाग चालावया ॥
तुका म्हणे वाट दावूनि सद्गुरू। राहिला हा दुरू पांडुरंग ॥

परमार्थाची वाट काट्याकुट्यांनी भरलेली असते. परमेश्वराचं नाव घेतलं की ताबडतोब ही वाट सुगंधी फुलांनी भरून जाते अशी अनेकांची भाबडी कल्पना आहे. ज्याला पारमार्थिक उद्दिष्ट गाठायचं आहे त्याला पावलोपावली संकटांशी सामना करावा लागतो. आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचं असेल तर अपार कष्ट करावे लागतातच. मग परमकोटीचा असा पारमार्थिक आनंद प्राप्त करून घ्यायचा असेल तर कष्टाची पराकाष्ठा करावी लागते. आपण बसल्या जागी परमेश्वर आपल्यासमोर मुक्तीचं गाठोडं आणून ठेवील अशा भ्रमात राहाणारी माणसं अज्ञानी आहेत. नुसत्या नामसंकीर्तनानं, भजन-पूजनानं देव मिळाला असता तर देव मिळवण्याइतकी दुसरी सोपी गोष्ट नव्हती. तुकाराम भक्ती करीत होते. भक्ती ही सुळावरची पोळी आहे हे त्यांना समजत होतं. त्यांच्या वाटचालीत त्यांना कुणाचीही साथ नव्हती. एका रूपकाचा आश्रय करून आपल्या हताश मनःस्थितीचं ते वर्णन करतात. साऱ्या दिशा उजाड झाल्या. 'माझं मन सर्व बाजूंनी निराशेच्या अंधारात बुडून गेलं आहे. कोणाचा आधार नाही. सभोवताली काट्याकुट्यांचं रान पसरलेलं. श्वापदांची भीती ठायी ठायी वाटते. आता ही वाट चालवत नाही. काटेरी झुडुपं अंग ओरबाडून काढीत आहेत. या अंधारात मी एकटाच चालत आहे. अनेक वाटा फुटलेल्या आहेत. पांडुरंगानं प्रथम वाट दाखवली आणि आता मात्र तो दूर कोठेतरी आहे.'

साधकाच्या मानसिक अवस्थेचं हे सूक्ष्म आणि परिणामकारक चित्र तुकोबा आपल्या शब्दांतून रेखाटतात. तुकोबांच्या आत्मचरित्रातलं हे एक प्रकरण आहे . 'आनंदाचा डोह' शोधायला निघालेल्या तुकोबांना अंधाराच्या लाटा सर्व बाजूंनी जखडून टाकीत आहेत असा हा अनुभव आहे. खरं तर ही प्रत्येक साधकाच्या मानसिक स्थितीची निराश कहाणी आहे. कितीही चाललं तरी मुक्कामाचं ठिकाण जवळ येत नाही आणि चालण्याची वाटही सापडत नाही. या आध्यात्मिक प्रवासातल्या अपरिहार्य अडचणी असतात. हा मनानं करण्याचा,

आत्म्यानं करण्याचा प्रवास आहे. म्हणूनच तो अवघड आहे. डोंगर चढून जाणाऱ्याची वाट जशी लवकर संपत नाही आणि मग प्रवासी चालणं सोडून देतो तशी ही कथा आहे. मला श्वापदांचं भय वाटतं असं तुकोबांनी म्हटलं. ही श्वापदं आपल्या मनाच्या रानावनात आणि दऱ्याखोऱ्यात दबा धरून बसलेली असतात. कामक्रोध, मोह, लोभ, क्षोभ कधी आपल्यावर जीवघेणा हल्ला चढवतील ते सांगता येत नाही. ईश्वराची साथ आहे असं सुरवातीला वाटतं. नंतर तो ईश्वर कुठं तरी अदृश्य होतो. मतमतांतरांच्या वाटा पुष्कळ असतात. या अवस्थेतून प्रत्येक साधकाला खडतर प्रवास करावाच लागतो. कोणाचा प्रवास दोनचार वर्षात संपतो तर कोणी प्रवास करता करताच संपून जातो. प्रत्येकाच्या मानसिक सामर्थ्यावर हे अवलंबून आहे.

तुकोबांना या कष्टप्रद वाटचालीत बऱ्याच उशीरानं परमात्म्याची साथ मिळाली. चालणाऱ्याबरोबर परमात्माही चालतो. झोपी गेलेल्या आळशाकडे मात्र तो ढुंकूनही पाहात नाही किंवा परमात्मा मिळवण्यासाठी स्वतःच्या आत्म्यातच परमत्वाची कष्टपूर्वक पेरणी करावी लागते. 'भितो नव्हे लाग चालावया', वाट चालण्याची मला भीती नाही हे तुकोबांचे शब्द त्यांच्या आत्मप्रत्ययी मनाचं दर्शन घडवतात. हा अभंग निराश मनाचं चित्र दाखवीत असला तरी हे नैराश्य सर्वच ध्येयवादी व्यक्तींच्या वाट्याला येतं. तुकोबांच्या मनात आशा निराशेच्या छाया प्रकाशाचा खेळ कसा चालू होता याची साक्ष हा अभंग देतो.

जीवनातलं परमोच्च मंगल ज्याला मिळवायचं आहे त्याला अंधार, काटेकुटे, रानातले हिंस्त्र पशु, झाडाझुडपांच्या गर्दीत हरवून गेलेल्या वाटा यांची पर्वा करायची नसते. वाऱ्यावादळात पुन्हापुन्हा विझत चाललेला आत्मविश्वासाचा दीपक त्यानं पुन्हापुन्हा पेटवायचा असतो आणि प्रत्येक पाऊल निर्धारानं टाकायचं असतं. हे प्रत्येक पाऊल देवत्वाकडं जात आहे असा विश्वास बाळगायचा असतो. मग एक क्षण असा येतो की 'ओस जाल्या दिशा', असं म्हणण्याऐवजी 'उजळल्या या दिशा, मज प्रकाश हा भेटे' असं आनंदानं म्हणता येईल. भिंगुळवाण्या मनात प्रकाशगाणं आकार घेईल.

कोणत्याही ध्येयवादी, क्रांतिकारकाच्या आणि परमार्थी पथिकाच्या मानसिक आंदोलनाचं हे वास्तव चित्र आहे. तुकोबा कोणत्या प्रकारची वाट धीरानं चालत होते आणि त्यांना कसा पदोपदी संघर्ष करावा लागत होता याचं हे दर्शन आहे.

❑❑❑

**आधिल्या भ्रतारे काम नव्हे पुरा । म्हणोनि व्यभिचारा टेकलिये ।।**
**रात्रंदिवस मज पाहिजे जवळी । क्षण त्या निराळी न गमे घडी ।।**
**नाम गोष्टी माझी सोय सांडा आता । रातले अनंता तुका म्हणे ।।**

संत तुकारामांनी व्यभिचारिणी स्त्रीचं रूपक घेऊन लिहिलेला हा एक अभंग. स्वैरिणी परद्वाराच्या आश्रय करते. सारी नैतिक बंधनं ती झुगारून देते. पतिनिष्ठेकडे तिनं पाठ फिरवलेली असते. वासना तृप्तीसाठी तिनं नवीन प्रियकर जोडलेला असतो. लोकलज्जेची, प्रचलित नीतीकल्पनांची कुंपणं बेदरकारपणे ओलांडताना तिला केवळ आपलं शारीरिक सुख दिसत असतं. अशी स्त्री जग काय म्हणेल, लोक आपली निंदा करतील वगैरे गोष्टींची मुळीच कदर करीत नाहीत. तिला तो परपुरुष सर्वस्वी हवा असतो. कारण तो तिला इच्छित सुख देऊ शकतो. हे काहीसं चमत्कारिक रूपक घेऊन तुकोबांनी विठ्ठलाविषयीची आपली अनन्य भक्ती प्रकट केली आहे. कृष्णाच्या प्रेमात बुडालेली राधा विवाहित होती. पतीकडं पाठ फिरवून ती कृष्णाच्या ठायी रममाण झाली, इतकी की, राधाकृष्ण हे नाव एकत्रितपणानं उच्चारलं जाऊ लागलं. या अर्थानं पाहिल्यास राधेला आणि मीरेला 'स्वैरिणी' हे संबोधन देता येईल. हृदयात दाटून आलेली अनिवार अशी प्रेमभावना लौकिक बंधनं ओलांडू शकते याचं हे उदाहरण. तुकोबा हे परमेश्वराचे परमभक्त होते. प्रपंचाच्या पाशात राहिले होते पण तो प्रपंच त्यांना सुखी करू शकत नव्हता. हे पाश तोडून परमेश्वराच्या बाहुपाशात त्यांच्या प्रेमवृत्तीनं झेप घेतली. या वस्तुस्थितीचं चित्र या अभंगातून स्पष्ट होतं.

व्यभिचारिणीच्याच रूपकातून हे चित्र का बरं रेखाटलं असावं ? तसं करणं औचित्याला धरून होईल का ? बालक आणि माता, पक्षिणी आणि पिलू ही वात्सल्याची रूपं अधिक प्रसन्न असताना विवाहित स्त्री आणि तिचा प्रियकर या उदाहरणाच्या माध्यमाची आवश्यकता होती का? याचं उत्तर असं की, परपुरुषाचं वेड लागलेली भोगलालस विवाहित स्त्री सारी लौकिक आणि मानसिक बंधनं तोडून आपल्या कामनापूर्तीसाठी बंड करते या उदाहरणात अधिक उत्कटता आहे. विषयसुखाची बलवत्तर ओढ स्त्री-पुरुषांना बेलगाम बनवते. हे सर्वपरिचित उदाहरण तुकोबाप्रमाणेच अन्य संतांनीही आपल्या अभंगातून घेतलं आहे. मधुराभक्तीचे अभंग याच भावनेवर आधारलेले आहेत. तुकाराम म्हणतात,

'पहिल्या पतीच्या संगतीनं कामना तृप्त होत नाही म्हणून मी श्रीहरीशी संग करण्यासाठी

तयार झाले. तो रात्रंदिवस माझ्याजवळ पाहिजे. एक क्षण देखील त्याच्याशिवाय मी राहू शकत नाही. माझं नाव गाव आता तुम्ही सोडून द्या. मी आता त्या अनंताशी रममाण झाले आहे.' दुसऱ्या एका अभंगात ते म्हणतात, *'हाचि नेम आता न फिरे माघारी । बैसले शेजारी गोविंदाचे । घर रिघी झाले पट्टराणी बळे । वरिले सावळे परब्रह्म । बळियाचा अंगसंग झाला आता । नाही भय चिंता तुका म्हणे ॥'*

या अभंगात 'आधिला भ्रतार' म्हणजे हा संसार. संसाराच्या संगतीत राहून पदरात कोणतंच सुख पडत नाही म्हणून मग परमेश्वराच्या चरणी हे आयुष्य समर्पित केलं. संसाराशी लागलेलं लग्न मोडून टाकलं. आणि परपुरुष असलेला पांडुरंग निःसंकोचपणानं, निःसंगपणानं जवळ केला. आता त्याच्याच सान्निध्यात रात्रंदिवस राहण्यात खरं सुख आहे. आता त्या परमेश्वराच्या नामरूपात, व्यक्तित्वात मी पूर्णपणे रमून गेलो आहे. हा अभंग तुकोबांच्या मनस्वी बंडखोर प्रकृतीची साक्ष देतो. परमेश्वराची आराधना करणारा भक्त प्रेयसीची आर्तता घेऊन -नव्हे प्रेयसी होऊनच उपासना करतो तेव्हा ती भक्ती सुंदर आणि समर्थ बनते. अशा भक्तीला 'मधुरा भक्ती' ही संज्ञा शोभून दिसते. तुकोबांच्या आर्त प्रेमभक्तीचं उत्कट रूप चित्रित करणारा हा अभंग त्यांच्या कवित्वारही प्रकाश टाकतो.

सर्व भावनांत रती ही अत्युत्कट भावना मानली जाते. जीवनाला सुख किंवा दुःख देणारी ही ज्वलंत भावना असल्यामुळं तिच्या माध्यमातून आपल्या ईश्वरप्रेमाचं दर्शन घडवण्याची बहुतेक संत कवींची पद्धती आहे. तुकारामांनी हीच शैली स्वीकारून असे काही अभंग लिहिले आहेत.

❑❑❑

**सर्व सुखे आजी येथेचि वोळली । संतांची देखिली चरणांबुजे ।।**
**सर्व काळ होतो आठवीत मनीं । फिटली ते धणी येणे काळे ।।**
**तुका म्हणे वाचा राहिली कुंठित । पुढे झाले चित्त समाधान ।।**

सुखाच्या आणि आनंदाच्या प्रत्येकाच्या कल्पना भिन्न असतात. सामान्य माणसाचं सुख इंद्रियानिष्ठ असतं. स्पर्श, रूप, रस, गंध यांच्या पलीकडं सुखाचा प्रदेश असेल असं त्याला वाटत नाही. कोणाला मद्यप्यांच्या मैफलीत सुख भरभरून वाहातं असं वाटतं. कोणी शरीरस्पर्शालाच महत्व देतो. कामवासनेच्या तृप्तीला सुख समजण्याची त्याची प्रवृत्ती असते. कित्येक लोक खाणं आणि पिणं यातच जीवनाचा सर्व आनंद सामावला आहे असं समजतात. या गोष्टीत किंचितही सुख नाही असं विधान करण्याचं कारण नाही. थोडं फार सुख देण्याची शक्ती या बाह्य पदार्थात आहे म्हणूनच त्यांचा पाठलाग मनुष्य करीत असतो. पण इंद्रियांच्या माध्यमातून मिळणारी सुखं फार लवकर संपून जातात. पाण्यावर काठीनं एखादी रेषा निर्माण करावी आणि क्षणार्धात ती नाहीशी व्हावी त्याप्रमाणं ही सुखं क्षणभंगुर आहेत. सुख उडून जातं आणि दुःख मात्र जीवनाला कायमचं चिकटून बसतं हा सर्वांचा अनुभव आहे. पण अनुभवातून माणसं शहाणी होत नाहीत. ती लोचटपणानं इंद्रियसुखाची जन्मभर अपेक्षा करीत राहातात.

संतांनी मात्र असल्या क्षणिक आनंदाचा निषेध केला आहे. ते चिरकालिक आनंदाचे उपासक असतात. त्यामुळं तुकोबांना संत-सज्जनांच्या सहवासातच सुख मिळवता येतं. ते म्हणतात, 'संतांचा सहवास हा मला दसरा दिवाळी सारखा अत्यंत आनंददायक सण वाटतो. त्यांच्या सान्निध्यात मी अपूर्व सुखाच्या राशी मिळवू शकतो. हेच माझं सौभाग्य आहे. माझी वाणी रामनामानं आता पिकली आहे. संत भेटले. आता हा दिवस सोन्याचा झाला. त्यांचे उपकार मला कधीच फेडता येणार नाहीत. त्यांच्या चरणतळी आपलं जीवन समर्पित करावं हीच इच्छा आहे.' सुखाची ही कल्पना अत्यंत उदात्त स्वरुपाची आहे. कोणाला कशात सुख वाटतं यावर त्याच्या संस्कृतीचं मूल्यांकन होऊ शकतं. घोड्यांच्या शर्यतीवर जुगार खेळणारे लोकही एक प्रकारचं उन्मादक सुख मिळवू शकतात. नाईट क्लबमध्ये आनंदाची दिवाळी साजरी करता येते अशा भ्रामक कल्पनेनं पछाडलेले हरीचे लाल थोडे नसतात. पण तुकारामासारखा हरिभक्त संतांच्या संगतीत पूर्णपणें आनंद

**सर्व सुखे आजी येथेचि वोळली । संतांची देखिली चरणांबुजे ।।**
**सर्व काळ होतो आठवीत मनीं । फिटली ते धणी येणे काळे ।।**
**तुका म्हणे वाचा राहिली कुंठित । पुढे झाले चित्त समाधान ।।**

सुखाच्या आणि आनंदाच्या प्रत्येकाच्या कल्पना भिन्न असतात. सामान्य माणसाचं सुख इंद्रियानिष्ठ असतं. स्पर्श, रूप, रस, गंध यांच्या पलीकडं सुखाचा प्रदेश असेल असं त्याला वाटत नाही. कोणाला मद्यप्यांच्या मैफलीत सुख भरभरून वाहातं असं वाटतं. कोणी शरीरस्पर्शालाच महत्व देतो. कामवासनेच्या तृप्तीला सुख समजण्याची त्याची प्रवृत्ती असते. कित्येक लोक खाणं आणि पिणं यातच जीवनाचा सर्व आनंद सामावला आहे असं समजतात. या गोष्टीत किंचितही सुख नाही असं विधान करण्याचं कारण नाही. थोडं फार सुख देण्याची शक्ती या बाह्य पदार्थात आहे म्हणूनच त्यांचा पाठलाग मनुष्य करीत असतो. पण इंद्रियांच्या माध्यमातून मिळणारी सुखं फार लवकर संपून जातात. पाण्यावर काठीनं एखादी रेषा निर्माण करावी आणि क्षणार्धात ती नाहीशी व्हावी त्याप्रमाणं ही सुखं क्षणभंगुर आहेत. सुख उडून जातं आणि दुःख मात्र जीवनाला कायमचं चिकटून बसतं हा सर्वांचा अनुभव आहे. पण अनुभवातून माणसं शहाणी होत नाहीत. ती लोचटपणानं इंद्रियसुखाची जन्मभर अपेक्षा करीत राहातात.

संतांनी मात्र असल्या क्षणिक आनंदाचा निषेध केला आहे. ते चिरकालिक आनंदाचे उपासक असतात. त्यामुळं तुकोबांना संत-सज्जनांच्या सहवासातच सुख मिळवता येतं. ते म्हणतात, 'संतांचा सहवास हा मला दसरा दिवाळी सारखा अत्यंत आनंददायक सण वाटतो. त्यांच्या सान्निध्यात मी अपूर्व सुखाच्या राशी मिळवू शकतो. हेच माझं सौभाग्य आहे. माझी वाणी रामनामानं आता पिकली आहे. संत भेटले. आता हा दिवस सोन्याचा झाला. त्यांचे उपकार मला कधीच फेडता येणार नाहीत. त्यांच्या चरणतळी आपलं जीवन समर्पित करावं हीच इच्छा आहे.' सुखाची ही कल्पना अत्यंत उदात्त स्वरुपाची आहे. कोणाला कशात सुख वाटतं यावर त्याच्या संस्कृतीचं मूल्यांकन होऊ शकतं. घोड्यांच्या शर्यतीवर जुगार खेळणारे लोकही एक प्रकारचं उन्मादक सुख मिळवू शकतात. नाईट क्लबमध्ये आनंदाची दिवाळी साजरी करता येते अशा भ्रामक कल्पनेनं पछाडलेले हरीचे लाल थोडे नसतात. पण तुकारामासारखा हरिभक्त संतांच्या संगतीत पूर्णपणे आनंद

मिळवू शकतो. खरं तर ही संगत ईश्वरी प्रेमानं भारलेली असते. हरिनामाच्या अमृतानं न्हालेली असते. या संगतीत कोणतीही स्वार्थी वासना प्रवेश करू शकत नाही. वासनांना ओहोटी लागलेली असते. भक्तीप्रेमाच्या भरतीच्या लाटा संतांच्या भेटीतून उचंबळत असतात. हा आनंद उच्च प्रतीचा असतो. साऱ्या जीवनाला तो तृप्तीचं वरदान देऊ शकतो. अशा आनंदाचे तुकोबा भुकेले होते. इथं मनात सहजच एक विचार येऊन जातो. प्रसिद्ध कवी उमरखय्याम हा मद्यपूजक होता. त्याच्या सुखाच्या कल्पनेत मद्याची सुरई, प्रेयसीची संगत आणि भाकरी या वस्तू होत्या. वारुणी आणि तरुणी यांच्या पलीकडे पाहाण्याची कवीला दृष्टी नव्हती असं म्हणता येईल. तो तत्त्वचिंतक होता पण त्याच्या चिंतनाला मद्याचा दर्प होता. वैषयिक प्रेमाची बैठक होती. तुकोबा हेही कवी आणि तत्त्वचिंतक होते. पण त्यांच्या चिंतनाचा केंद्रबिंदू परमेश्वर होता. हा परमेश्वर ते साऱ्या सृष्टीत पाहू शकत होते. रंजल्या-गांजल्यांना पोटाशी धरणं आणि संतसज्जनांच्या सहवासात हरिनामरसाची गोडी चाखणं हेच त्यांच्या समग्र जीवनाचं सर्वस्व होतं. तुकोबांची आठवण यासाठीच पुन्हा पुन्हा करायची. त्यांच्याच शब्दांत थोडा बदल करून आपण आपल्या आनंदाविषयी असं म्हणू की,

-दसरा दिवाळी तोचि आम्हां सण । संत तुकाराम भेटतील ॥

धन्य दिवस आजि जाला सोनियाचा । पिकली हे वाचा तुकयानामे ॥

सुखाचा शोध बाहिर्मुख वृत्तीने पाहाणाऱ्याला कधीतरी लागू शकेल का ? अंतर्मुख - आत्माभिमुख झाल्याशिवाय श्रेष्ठ आनंदाची अनुभूती येऊ शकत नाही. बाह्य सुखदुःखांच्या मगरमिठीत सापडलेलं जग खऱ्या आनंदाला पाठमोरं झालेलं आहे. हीच या जगाची शोकांतिका आहे. संतांनी यावर विचार करून शाश्वत आनंदाचा मार्ग दाखवला आहे. पण जे क्षणजीवी आहे, जे मुळातच दुःखमूलक आहे त्याच्या दिखाऊ दर्शनानं भुलून अविचारानं त्याच्या मागं धापा टाकीत पळणाऱ्या जगाला सुखाची प्राप्ती कशी होणार हाच यक्षप्रश्न आहे. पुष्कळांना हे कळतं पण त्यांना ते वळत नाही. ज्ञान आणि आचरण, उक्ती आणि कृती यांची एकरूपता झाली पाहिजे. तुकोबांसारखे संत ज्ञानवंतही असतात. आणि कृतिवंतही असतात म्हणूनच त्यांना 'सोनियाचा दिन' भेटू शकतो. ते भाग्यवंत ठरतात.

□□□

**पाया जाला नारू । तेथे बांधला कापूरु ॥**
**तेथे बिबव्याचे काम । अधमासि तो अधम ॥**
**रुसली घरची दासी । धणी समजावी तियेसी ॥**
**तेथे बटकीचे काम । अधमासि तो अधम ॥**
**देव्हाऱ्यावरी विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ।**
**तेथे पैजाराचे काम । अधमासि तो अधम ॥**
**तुका म्हणे जाती । जातीसाठी खाती माती ॥**

तुकोबांचा जीवनविषयक विचार कसा रसरशीत आहे हे या अभंगावरून समजतं. संत आदर्शवादी असतो हे खरं. पण वास्तवाकडं पाठ फिरवून केवळ आदर्शाच्या कल्पनेत संत जर गुरफटून गेला तर समाजाचं नीट नियमन होणार नाही. सामाजिक वास्तवतेचं भान ठेवल्याशिवाय समाजाचं प्रबोधन कोणालाही करता येणार नाही. केवळ परमार्थाचा आणि पारलौकिकाचा उपदेश करीत बसलेले अनेक अध्यात्मवादी संत असू शकतात. लौकिक व्यवहाराकडं त्यांनी पाठच फिरवलेली असते. पण तुकोबा या कोटीतले संत नव्हते. ते विचारवंत होते. सुख आणि शांती समाजात निर्माण व्हावी यासाठी ते आपल्या कीर्तनांच्या माध्यमातून लोकांना प्रबोधित करीत होते, प्रेरणा देत होते. त्यांचा तत्त्वविचार लोकजीवनाशी निगडित होता. जीवनातल्या नानाविध समस्यांचं त्यांना आकलन झालेलं होतं. त्यामुळं यांची अभंगवाणी अनेक अर्थांनी मार्गदर्शक बनली आहे. या अभंगात आपल्या विचाराच्या समर्थनासाठी त्यांनी जे दृष्टांत घेतले आहेत ते मार्मिक आहेत.

पायाला नारू झाल्यावर तिथं कापूर बांधण्यात काय शहाणपणा आहे? असा प्रश्न विचारून ते त्याचं उत्तर देतात, 'तेथे बिबव्याचे काम । अधमासि तो अधम ।' रोग जहाल असेल तर त्याला नष्ट करण्यासाठी तसंच जहाल औषध परिणामकारक ठरतं. कापरासारखा सुगंधी, सौम्य पदार्थ नारूचा नायनाट कसा करील ? अधमाला अधमच पाहिजे. घरातली हलकं सलकं काम करणारी दासी काही कारणानं रुसली, रागावली तर तिची समजूत घालण्यासाठी स्वतः घरच्या यजमानानं येण्याचं कारण नाही. रुसलेल्या दासीला दुसरी एखादी बटकी ताळ्यावर आणू शकते. आणखी एक अत्यंत अन्वर्थक दृष्टांत घेऊन तुकोबा आपला आशय स्पष्ट करतात. देवपूजा करीत असताना देव्हाऱ्यावर विंचू आला तर प्रथम त्याला पैजारेनं सडकून काढावा असा विचार ते मांडतात. देव्हाऱ्यावर येणारा विंचू देवपूजेसाठी

येत नाही. नांगी मारणं हा त्याचा धर्म आहे. म्हणून त्याला दया दाखवण्यापेक्षा पायतणाखाली ठेचणं संयुक्तिक आहे. विंचू आणि पायताण एकमेकांना योग्य आहेत. अधमाला अधमच वापरला पाहिजे. हाच व्यवहारधर्म आहे. एखादा दयाळू माणूस विंचवावर दयेचा प्रयोग करू लागला तर त्याच्यावर नांगीचा प्रयोग झाल्याशिवाय राहाणार नाही. नारूसाठी बिब्बा, दासीसाठी बटकी आणि विंचवासाठी पैजार हेच आवश्यक असतात. हा पूर्ण न्यायोचित सिद्धांत तुकोबांनी विवरून सांगितला आहे. 'शठं प्रति शाठ्यं' हाच सिद्धांत फलदायी ठरतो हे त्यांच्या सांगण्याचं सार आहे. संत तुकाराम हे व्यवहारशून्य होते, भोळेभाबडे होते असं मानणाऱ्या टीकाकारांनी हा अभंग लक्षपूर्वक वाचला पाहिजे. माझ्या मते यातला आशय चिरंतन महत्वाचा आहे. ज्या कालखंडात तुकोबा वावरत होते त्या कालखंडात देव्हाऱ्यावर येणारे विंचू पुष्कळ होते. त्यांची प्रार्थना करून उपयोग नव्हता किंवा त्यांच्याकडं दयाबुद्धीनं पाहाण्यातही अर्थ नव्हता. लोकजीवन सुरक्षित, शांतीपूर्ण राहाण्यासाठी समाजात घुसणाऱ्या अपप्रवृत्ती कठोरपणे नष्ट केल्या पाहिजेत. झाड जगवायचं असेल तर त्याच्यांवरची बांडगुळं सपासप कापून काढली पाहिजेत. पीक चांगलं यावं यासाठी जमिनीतलं विषारी तण उपटून काढावं लागतं. बांडगूळ हातानं कापता येत नाही. धारदार शस्त्र घ्यावं लागतं. काट्यानं काटा काढावा लागतो. काट्याकडं दुर्लक्ष केलं तर काट्यांची पैदास वाढते हे लक्षात घेण्याची जरूर आहे.

तुकारामाचं हे जीवनविषयक तत्त्वज्ञान सर्वार्थांनी समर्थनीय आहे. व्यक्तीला, समाजाला आणि राष्ट्राला या तत्त्वज्ञानाचा स्वीकार करावाच लागेल. कारण त्याशिवाय निर्वेधपणानं जगता येणार नाही. आपण सज्जन असलो तरी सारेच सज्जन नसतात. आपण कोणाशी शत्रुत्व करीत नसलो तरी आपल्यांशी निष्कारण वैर करणारे लोक जगात असतात. ते आपला छळ करीत असतात अशा प्रवृत्तीला चिरडून टाकणं हीच नीती आहे. देवपूजेत व्यत्यय आणणारे विषारी जीवजंतू भरडून काढावे लागतात. देवत्व जगवायचं असेल तर दैत्यांचा संहार करावाच लागेल. हीच शिकवण गीतेनंही दिली आहे. 'सज्जनांच्या रक्षणासाठी दुर्जनांचं निर्दालन केलं पाहिजे. म्हणून मी प्रत्येक युगात जन्म घेतो,' असं श्रीकृष्णानं म्हटलं आहे. 'खळांची व्यंकटी सांडो' असं ज्ञानेश्वर म्हणतात. ज्या खळांची व्यंकटी कोणत्याही उपायानं सांडत नाही, ज्या खळांना कधीच सुबुद्धी होत नाही असे खळ नष्ट केले पाहिजेत. ही तुकोबांची भूमिका तर्कशुद्ध आहे यात शंका नाही. भला

भेटला तर त्याला कासेची लंगोटी देखील द्यायला हरकत नाही. पण नाठाळाशी प्रसंग आला तर त्याच्या माथ्यावर काठीचा प्रहार केलाच पाहिजे. अहिंसेचा आणि क्षमेचा विचार देखील आत्यंतिक टोकापर्यंत जाऊन करण्याचं कारण नाही. अतिरेकी अहिंसा, अनाठायी क्षमा हे दुर्गुण आहेत, सद्‌गुण नव्हेत. सदैव ध्यानात ठेवण्याची गरज आमच्या देशाला आहे. तुकोबांचा हा अभंग म्हणजे त्यांच्या जीवनाविचाराचा एक तेजस्वी भाग आहे.

तुकारामांच्या या विचारात सामाजिक वास्तवाचं भान आहे. कोणत्याही प्रसंगी कधीही हिंसा करू नये. एका गालावर मारले तर दुसरा गाल पुढे करावा ही आत्यंतिक अहिंसावादी शिकवण गृहस्थाला उपयोगी पडण्यासारखी नाही. आपल्या क्षमाशीलतेला आपले विरोधक नेभळटपणा व नामर्दपणा समजतील आणि क्षमावृत्तीचा गैरफायदा घेतील. हे लक्षात ठेवून व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांनी ठोशाला ठोसा दिलाच पाहिजे. यासाठी सज्जन सर्वार्थानं समर्थ बनले पाहिजेत. प्रेमळ भेटला तर प्रेम द्यावे. पण कोणी प्रेमाची परतफेड शत्रुत्वाने करू लागला तर त्याच्या दुष्ट प्रवृत्तीची नांगी ठेचून काढली पाहिजे हा विचार न्यायसंगत आहे. तुकोबांचं सामाजिक तत्त्वज्ञान आदर्श असलं तरी त्याला वास्तवाची बैठक आहे. म्हणूनच तुकोबा महाराष्ट्राचे आदर्श संत आहेत.

❑❑❑

**शूद्रवंशी जन्मलो । म्हणोनि दंभे मोकलिलो ।।**
**अरे तूचि माझा आता । मायबाप पंढरीनाथा ।।**
**घोकाया अक्षर । मज नाही अधिकार ।।**
**सर्वभावें दीन । तुका म्हणे यातिहीन ।।**

संत कबीरांचं एक वचन आहे, *'जाति न पूछो साधुकी पूछ लीजिये ग्यान । मोल करो तलवारका पडा रहन दो म्यान ॥'* साधुपुरुषाची जात कोणती आणि वंश कोणता, असली निरर्थक चिकित्सा करू नये. साधुसंतांचं ज्ञान आणि तपस्या पहावी. पण काही लोक तलवारीचं मोल करण्याऐवजी म्यान किती सुरेख आहे याचाच विचार करतात. खरं तर संतांचीच काय पण सामान्य माणसाची सुद्धा जात लक्षात घेण्याचं कारण नाही. जात हा मनुष्याच्या योग्यतेचा निकष असू शकत नाही. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की कुळ, जाति, वर्ण यांची चौकट आजही अभेद्य राहिलेली दिसते. ज्ञान आणि कर्तृत्व यांच्या कसोटीवरच माणसाची गुणवत्ता तपासून घेतली पाहिजे. जात आणि वंश हे विषय निरर्थक आहेत. पण याच घटकांना शतकानुशतकं- हजारो वर्ष महत्व देण्याची तर्कदुष्ट प्रथा आपल्या भारतीय जीवनपद्धतीत खोलवर शिरून बसली आहे. इथं ज्ञानेश्वरालाही जात विचारली गेली. नामदेवालाही जातिव्यवस्थेत कनिष्ठ स्थान मिळालं. चोखामेळा, गोरा कुंभार, सावता माळी या सर्वांना साखळदंडांनी बांधून ठेवण्यात आलं होतं. म. फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्याही कपाळावर जातीपातींचे अर्थशून्य शिक्के मारण्यात आले. व्यक्तिप्रेरणांची गळचेपी करणारी ही अशास्त्रीय व्यवस्था उखडून टाकली पाहिजे. माणूस हा त्याच्या माणुसकीवरून ओळखायचा असतो. कुळावरून नव्हे. हा विचार बुद्ध, महावीर, बसवेश्वर यांच्यासारख्या श्रेष्ठ विचारवंतांनी मांडला. पण त्यांच्याही अनुयायांत जातिभेद निर्माण झालेले दिसतात. संत तुकाराम हे जातिव्यवस्थेचे एक बळी आहेत. त्यांच्या मनात आणि वर्तनात कसलीही भेदभावना नव्हती. ते सर्वांनाच समान लेखीत होते. समतेचा उपदेश करीत होते.

*'नाही जातीसवे काम । ज्याच्या मुखी नाम तोचि धन्य ! ।'* असं सांगणाऱ्या तुकोबांच्या वाट्याला समाजानं शूद्रत्व दिलं. आपण खालच्या जातीचे आहोत. आपल्याला वेद वाचण्याचा अधिकार नाही. हलक्या जातीत जन्मल्यामुळं आपण त्या अधिकाराला वंचित झालो हे दुःख त्यांना एखाद्या शल्यासारखं खुपत होतं.

वस्तुतः निष्कलंक चारित्र्य, विठ्ठलाविषयीची विशुद्ध भक्ती, मानवतेविषयी उदंड

प्रेम, निःस्वार्थ वृत्ती, आणि ज्ञानाची उपासना हे गुण तुकारामांच्या ठायी अखंड नांदत होते. पण या महात्म्यालाही 'शूद्र' म्हणून महत्त्व न देणारी एक अतिकर्मठ विचारपरंपरा त्या काळात होती. तुकोबांनी आपल्या मनातलं दुःख अनेक अभंगांतून व्यक्त केलं आहे. हा अभंगही त्या दुःखाचं दर्शन घडवू शकतो. ते म्हणतात,

'मी शूद्र वंशात जन्मलो म्हणून माझ्या ठिकाणी दांभिकता नाही. अरे पंढरीनाथा तूच माझा मायबाप आहेस. वेदांची अक्षरं वाचण्याचा माझ्यासारख्या यातिहीनाला अधिकार नाही. मी सर्वभावे दीन झालो आहे.' या उद्गारातली आर्तता हृदय पिळवटून टाकणारी आहे. यातिहीनतेचा उल्लेख तुकारामांनी अनेक वेळा केला आहे. कारण ते दुःख त्यांच्या आयुष्याला वेढा घालून बसलेलं होत. पण यातिशूद्र असलेल्या तुकोबांनी आध्यात्मिक क्षेत्रात असामान्य अधिकार प्रस्थापित केला. इतका की तथाकथित उच्चवर्णीय देखील त्यांचं शिष्यत्व पत्करू लागले. ज्या रामेश्वर भट्टानं तुकोबांची निंदा केली होती आणि आपल्या वर्णश्रेष्ठत्वाचा टेंभा मिरवला होता त्याला देखील ज्ञानसंपन्न तुकोबांचं शिष्यत्व पत्करावं लागलं.

रामेश्वर भट्टानं तुकोबासंबंधी म्हटलं आहे, *'पंडित वैदिक अथवा दशग्रंथी । परि सरी न पवती तुक्याची ।'* वेदसंपन्न पंडित, किंवा दशग्रंथी विद्वान झाला तरी त्याची बरोबरी तुकारामांशी होऊ शकत नाही. पण तुकारामांसारख्या श्रेष्ठ व्यक्तीला जातीनं कुंठित करावं ही दारुण शोकांतिका आहे. *'जे जे भेटे भूत ते ते जाणिजे भगवंत'* ही उदार भूमिका प्रत्यक्ष व्यवहारात उतरू नये याचा खेद वाटतो. हा दुर्दैवी इतिहास घडून गेला. समतेचा नवा इतिहास आपण निर्माण करू शकतो. कोणत्याही रंगाचा, कोणत्याही कुळातला अथवा वंशातला माणूस असो तो मुख्यतः खरं तर सर्वतः माणूस आहे हेच त्याच्या बाबतीतलं सत्य लक्षात घेतलं पाहिजे. जात आणि वर्ण ही केवळ टरफलं आहेत. फळाचा गाभा टाकून टरफलांचं स्तोम माजवण्याची ही जुनाट परंपरा आता टाकून दिली पाहिजे. माणसा-माणसांत भेद करणारी विचारसरणी समूळ झिडकारल्याशिवाय आणि भेदाभेदभ्रम टाकून दिल्याशिवाय मानवी संस्कृती निकोप होणार नाही. संतांच्या जीवनाचा इतिहास चाळून पाहिला तर कित्येक संतांना जाती पातींच्या अतिक्षुद्र नगण्य कारणांवरून जन्मभर उपेक्षा आणि मानसिक छळ सहन करावा लागला. आमची भारतीय संस्कृती मूलतः समतावादी असूनही तिच्यात विषमतावादी विचारांचे भोवरे निर्माण झाले ही घटना संस्कृतीच्या अधःपतनाची द्योतक आहे. माणसाचं माणूसपण हेच त्याचं व्यवच्छेदक लक्षण मानलं पाहिजे. यापेक्षा अधिक काय सांगायचं ?

**तोवरि तोवरि शोभतील गारा । जंव नाही हिरा प्रकाशला ।।**
**तोवरि तोवरि शोभती दीपिका । नुगवता एका भास्करासी ।।**
**तोवरि तोवरि सांगती संताचिया गोष्टी । जंव नाही भेटी तुक्यासवें ।।**

संस्कृतातलं एक वचन असं आहे- *'निरस्तपादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते.'* याचा अर्थ वृक्ष नसलेल्या प्रदेशात एरंडाच्या झुडपाला देखील वृक्षपण प्राप्त होतं. तसे जोपर्यंत हिऱ्याचा प्रकाश पसरत नाही तोपर्यंत गारेलादेखील महत्त्व येते. सूर्याचा उदय होत नाही तोपर्यंत लहान लहान दिवट्या देखील शोभून दिसतात. तुकाराम म्हणतात, 'जोपर्यंत माझ्याशी भेट होत नाही तोपर्यंत संतपणाच्या गोष्टी बोलल्या जातील.' भावार्थ असा की खऱ्या संतत्वाचं दर्शन माझ्यात होऊ शकेल. तुकारामांचं हे वचन वरवर पाहिलं तर गर्वयुक्त वाटेल. पण हे वचन त्यांनी प्रामाणिकपणानं उच्चारलेलं आहे. वीरानं स्वतःला वीर म्हणवून घेतलं तर त्यात काय चुकलं ? तो त्याचा अधिकारच आहे. तुकोबांसारखा नम्र वृत्तीचा एक संतपुरुष जेव्हा अभिमानानं स्वतःविषयीची महती गातो तेव्हा आपल्याला काहीसं आश्चर्य वाटतं. ज्ञानेश्वरांसारख्या श्रेष्ठ संताला वंदन करणारे तुकाराम स्वतःचा उल्लेख अत्यंत विनयानं 'पायाची वहाण पायी बरी' असा करतात. अनेक अभंगांतून त्यांचा पराकोटीचा विनय व्यक्त झाला आहे. असं असताना या अभंगात त्यांच्या ठायी असलेली अल्पशी अहंता का प्रकट व्हावी ? खरं तर इतरांनी आपल्याला महनीय, वंदनीय, श्रेष्ठ, संतशिरोमणी म्हणावं यात अर्थ आहें. पण आपणच आपल्या संतत्वाची आणि श्रेष्ठत्वाची द्वाही का फिरवावी ? या प्रश्नाचं उत्तर शोधलं पाहिजे.

तुकारामांनी आणखी एका अभंगातून असाच आशय प्रकट केला आहे. ते म्हणतात, *'तोवरी तोवरि जम्बूक करी गर्जना । जंव या पंचानना देखिले नाही ॥ तोवरि तोवरि माळामुद्रांची भूषणे । जंव तुकयाचे दर्शन झाले नाही ॥'*

सिंह पाहिला नाही तोपर्यंतच कोल्हा कोल्हेकुई करतो. आणि जोपर्यंत माझं दर्शन घडलं नाही तोपर्यंत माळामुद्रांची भूषणं मिरवणाऱ्या संन्याशाला महत्त्व. या उद्गारातही अहंकार आहे. तो कितीही सार्थ असला तरी एका महान संताच्या शब्दातून तो व्यक्त व्हावा याचं नवल वाटतं. तुकाराम सत्य तेच सांगत आहेत. पण या सत्याला अहंकाराचा स्पर्श व्हावा हे क्षणभर उचित वाटत नाही.

तुकोबांनी या प्रकारचे उद्‌गार काढले त्याला तत्कालीन परिस्थिती कारणीभूत आहे. तुकोबा हे विठ्ठलाचे परमोच्च भक्त होते. स्वार्थाचा लवलेशही त्यांच्या मनात कधी आलेला नव्हता. समाजविषयक अपार करुणेनं आणि सहानुभूतीनं त्यांचं अंतःकरण व्यापलेलं होतं. प्रत्येक जीवाच्या ठायी ईश्वरत्व आहे.,यावर त्यांचा विश्वास होता. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी अध्यात्मसाधना केली होती. शांती आणि विरक्ती यांची मूर्ती म्हणजे तुकाराम महाराज. असं असतानाही त्यांचा उत्कर्ष सहन न झालेल्या अनेक अप्रबुद्ध लोकांनी तुकोबांची सर्व प्रकारे निंदानालस्ती चालवली होती. कोणी त्यांच्या तथाकथित शूद्रत्वावर बोट ठेवून उपहास करायचा. कोणी त्यांच्या कवित्वावर आक्षेप घ्यायचा. कोणी त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवायचा. सतत होणाऱ्या या मानसिक छळाला कंटाळून तुकारामांनी आपल्या निंदकांना कोल्ह्याची उपमा दिली. आणि स्वतःकडं सिंहत्व घेतलं तर ते यथोचितच म्हणावं लागेल. श्रेष्ठ व्यक्तीलाही आपल्या गुणांचं आणि कर्तृत्वाचं वास्तव भान असलं पाहिजे. ज्ञानेश्वरांनाही आपल्या प्रतिभेचं असंच सुयोग्य भान होतं. ते म्हणाले, '*'म्हणोनि माझे नित्यनवे श्वासोच्छ्‌वासही प्रबंध होआवे*' किंवा 'मी तुमच्या बुद्धीवर भावार्थाचा फुलोरा निर्माण करीन. माझे मराठी बोल अमृतालाही जिंकतील.' या उद्‌गारात अहंभावना आहेच. पण ती सत्य आहे. त्याप्रमाणं केव्हातरी आपल्या निंदकांविषयी आणि स्वतःला मिरवू पाहाणाऱ्या दांभिक संन्याशांविषयी तुकोबांनी अभिमानयुक्त उपहासाचे उद्‌गार काढले तर ते योग्य आहे असंच म्हणावं लागेल. जेव्हा काजवे स्वतःला सूर्य म्हणून नाचू लागतात तेव्हा सूर्यानं स्वतःचा उल्लेख सूर्य म्हणून करायला काय हरकत आहे ? तुकोबांच्या अस्मितेचा प्रत्यय देणारा हा अभंग मला आवडतो. पराकोटीच्या विनयापेक्षा वस्तुस्थितीचा साभिमान उल्लेख अधिक संयुक्तिक आहे. तुकारामांच्या मनाचा हा पीळ आम्हाला आवडतो.

स्वतःच्या ठायी योग्यता नसताना आपण महान आहोत अशा अहंगंडानं पछाडलेले भ्रमिष्ट लोक जगात कमी नसतात. स्वतःची 'येन केन प्रकारेण' जाहिरात करीत राहाणं आणि प्रसिद्धीच्या प्रकाशझोतात राहाण्यासाठी नाना प्रकारच्या खटपटी आणि लटपटी करीत राहाणं हे अशा महाभागांचं कर्तव्य असतं. शौर्य नसताना शूरत्वाचा, ज्ञान नसताना पांडित्याचा आणि चातुर्य नसताना शहाणपणाचा अभिनय हे करीत राहातात. पण किती दिवस ? जोपर्यंत खऱ्या वीराचं आगमन होत नाही किंवा खऱ्या ज्ञानवंताचं दर्शन होत

नाही तोपर्यंतच. कागदाची फुलं तोपर्यंत बरी दिसतात जोपर्यंत अस्सल, सुवासिक रंगीबेरंगी नैसर्गिक फुलं हातात पडत नाहीत तोपर्यंत. जटा वाढवून बसलेले पायघोळ संत लोकांना काही काळ हसवतात. पण जेव्हा एखादा ज्ञानवंत तपस्वी अवतीर्ण होतो तेव्हा भगव्या संन्याशांना कोण विचारणार ? तुकोबापुढे मंबाजीचा काय पाड लागणार ? हिऱ्यासमोर गारगोटी कशी चमकणार ?

तुकोबांनी निंदकांची निंदा अनेक वर्ष सहन केली. मानसिक छळ होत असतानाही क्षमाभाव धारण केला. पण तुकोबा विषयीच्या मत्सरानं जळत राहिलेल्या रोगट मनाच्या निंदकांत कसलीच सुधारणा होत नव्हती. संत नम्र असतात हे ठीक आहे. पण संतानंही कधी तरी संतप्त होऊन स्वतःविषयीचं सत्य स्पष्टपणानं सांगितलं पाहिजे. हत्तीवर भुंकणाऱ्या कुत्र्याला त्यानं म्हटलं पाहिजे, 'तू एक क्षुद्र कुत्रा आहेस. मी गजराज आहे. याचं भान तुला नसेल तर ते मी एका क्षणार्धात आणून देऊ शकतो'

प्रस्तुत अभंगात तुकोबांनी याच प्रकारचे समर्थनीय उद्‌गार काढले आहेत. संतालाही स्वाभिमान असतो हे दुष्टांनी ध्यानात ठेवणं त्यांच्या हिताचं असतं.

❑❑❑

**क्षमाशस्त्र जया नराचिया हातीं । दुष्ट तयाप्रती काय करी ॥**
**तृण नाही तेथे पडिला दावाग्नि । जाय तो विझोनि आपसया ॥**
**तुका म्हणे क्षमा सर्वांचे स्वहित । धरा अखंडित सुखरूप ॥**

क्षमा भावाची महती गाणारा हा अभंग तुकारामांच्या जीवनावर आणि प्रवृत्तीवर प्रकाश टाकणारा आहे. तुकोबा हे शांतीचे, करुणेचे आणि क्षमाशीलतेचे माहेरघर आहेत. आघात करणाऱ्यावरही प्रेम करणारी मनोवृत्ती केवळ संत महात्म्यांचीच असू शकते. ज्ञानेश्वरांचा तत्कालीन समाजानं असह्य मानसिक छळ केला. पण छळणाऱ्या लोकांबद्दल किंवा आपल्याला भोगाव्या लागलेल्या दुःखाविषयी, अपमानासंबंधी एकही अक्षर त्यांनी उच्चारलेलं नाही. अशीच सहिष्णुता आणि शांती तुकोबांच्याही मनात नांदत होती. *'तुका म्हणे तो चि संत । सोशी जगाचे आघात ॥'* समाजानं आपल्यावर केलेले प्रहार अज्ञानानं केलेले आहेत म्हणूनच त्या प्रहार करणाऱ्या हातांना आपण क्षमा केली पाहिजे ही त्यांची तर्कशुद्ध भूमिका होती. संत आणि क्षमाशीलता यांचं एक दृढ समीकरण झालेलं असतं. आपल्या अंगावर थुंकणाऱ्या दुष्टाला संत एकनाथांनी क्षमा केल्याचं उदाहरण प्रसिद्धच आहे. तुकोबांचा मानसिक आणि शारीरिक छळ काय कमी झाला ? त्यांच्या अंगावर उकळतं पाणी टाकून त्यांना दुःख देणारा पुढं त्यांचा एकनिष्ठ शिष्य बनला. ही तुकोबांच्या चरित्रातली एक विलक्षण कथा आहे. अंगाचा दाह होऊ लागल्यावर त्यांनी परमेश्वराचा धावा केला.

*जळे माझी काया लागला वोणवा । धाव रे केशवा मायबापा ॥*
*तुका म्हणे माझी तू होसी जननी । आणिक निर्वाणी कोण राखे ? ॥*

ज्यानं तुकोबांच्या अंगावर कढत पाणी ओतलं त्यालाही त्यांनी क्षमा केली. ज्यांनी त्यांचे अभंग इंद्रायणीत बुडवून आपल्या द्वेषमत्सराचं घाणेरडं प्रदर्शन केलं त्या विरोधकांनाही त्यांनी क्षमा केली. क्षमा हे दुबळेपणाचं प्रतीक नसून ते एक वीराचं शस्त्र आहे. जो वीर असतो तोच क्षमा करू शकतो. क्षमा करणं म्हणजे क्रोधाला आणि क्षोभाला, शत्रुत्वाला आणि सूडाच्या विचाराला पूर्णविराम देणं. संतांच्या मनात हे विकारच उत्पन्न होत नाहीत. कारण सुविचाराच्या आणि सद्भावनेच्या सिंचनानं हे विकार हळूहळू विरून जातात. भारतीय इतिहासात करुणा, दया, प्रेम शांती आणि क्षमाशीलता यांचे कितीतरी हृदयस्पर्शी

आविष्कार झालेले आढळतात. बुद्ध आणि महावीर हे करुणेचे आणि क्षमेचे अवतारच होते. सर्व जीवांविषयी त्यांच्या मनात क्षमाभाव, आत्मीयता होती. जीवमात्रांकडं स्नेहभावनेनं, आत्मीयतेनं पाहाण्याची शक्ती असणं हे माणुसकीचं सर्वोच्च लक्षण आहे. तुकोबांनी अनीती आणि दांभिकता यावर कठोर प्रहार केले आहेत. पण त्यामागं त्यांचं हृदय समाजाविषयीच्या प्रेमानंच ओथंबलेलं होतं. या अभंगात तुकोबांनी क्षमेचं माहात्म्य सांगताना म्हटलं आहे, 'जिथं गवत नाही तिथं प्रलयाचा अग्नी पडला तरी तो आपोआप विझून जातो त्याप्रमाणं ज्याच्या हातात क्षमेचं शस्त्र आहे त्याला दुष्ट मनुष्य काही करू शकत नाही. क्षमावृत्तीनं सर्वांचं हित होणार आहे म्हणून तुम्ही आपल्या मनात सदैव हा भाव ठेवावा.'

हा तुकोबांचा उपदेश त्यांचा उन्नत जीवनविचार व्यक्त करणारा आहे. ठोशाला ठोसा द्यावा, अरेला कारे म्हणावं हा व्यवहारी उपदेश काही वेळां आवश्यक असतो. पण जगण्यासाठी आणि जगवण्यासाठी 'जशास तसं' ही वृत्ती फारशी उपयोगी पडत नाही. क्रोधातून क्रोधच वाढतो. वैरातून वैर पोसलं जातं. आगीतून आग फोफावत जाते. ती शमवायची असेल तर तिच्यावर पाणी ओतणं हाच मार्ग आहे. अधम प्रवृत्तींना जिंकायचं असेल तर उदात्त मूल्यांचा सुवास पसरवला पाहिजे. हेच संतांचं कार्य आहे. तुकोबांच्या चरित्रात क्षमा आणि शांती यांचे पाझर वाहाताना दिसतात. त्यांच्या हातात मधुर झंकार करणारी वीणा होती आणि त्यातून क्षमेचे सुस्वर उमटत होते. संतांच्या मालिकेत तुकोबांचं स्थान त्यामुळं उच्चप्रतीचं असावं यात आश्चर्य नाही.

*'भले तरी देऊ कासेची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊ माथा ॥'* हे शब्दही याच संताचें आहेत. काटेकुटे उखडून टाकल्याशिवाय, दुष्टांचं निर्दालन केल्याशिवाय भूतमात्राचं पालन होणार नाही ही भूमिका तर्कसंगत आहे. पण *'खळांची व्यंकटी सांडो । भूतां परस्परे पडो मैत्र जिवांचे'* असंच सर्व संतांना मनापासून वाटतं. चित्त शुद्ध असेल तर शत्रूही मित्र होतात हे तुकोबांचं वचन सर्वपरिचित आहे. अत्यंत अपरिहार्य प्रसंगी केली जाणारी हिंसा गीतेनं मान्य केली आहे. क्षमेनं आणि करुणेनं दुष्टाचं हृदयपरिवर्तन होत नसेल तर त्याला शासन करणं म्हणजे त्याच्यावर दया करण्यासारखंच आहे. दुबळ्यानं केलेली क्षमा आणि वीरानं केलेली क्षमा यात महदंतर आहे हे लक्षात ठेवलं पाहिजे.

करुणा आणि क्षमाशीलता यांच्यामुळं माणसांची मनं एकत्र येतात. जुळतात.

आणि त्यातून प्रेमाचं संगीत निर्माण होतं. क्षमा करणं याचा अर्थ दुसऱ्याला नीट समजून घेणं हा आहे. आपण केवळ आपल्याच भूमिकेवरून विचार करीत असल्यामुळं दुसऱ्याच्या विचारांचं, वर्तनाचं आकलन करून घेऊ शकत नाही. त्यातूनच द्वेष, मत्सर, क्रोध आणि सूडभावना निर्माण होते. *'आत्मवत् सर्व भूतेषु'* हा विचार रुजला पाहिजे. 'मी' हे परमसत्य नसून आपण सर्व मिळून सत्य साकार व्हावं. हे संतांचं स्वप्न आहे. म्हणून तर -

*जो खांडावेया घावो घाली । का लावणी जेयाने केली ॥*
*दोघां येकचि साऊली । वृक्ष जैसा ॥*

ही ज्ञानेश्वरांची ओवी आणि तुकोबांचा प्रस्तुत अभंग दोहोंचाही अर्थ एकच आहे.

❑❑❑

**ज्ञानियांचा गुरू राजा महाराव । म्हणती ज्ञानदेव ऐसे तुम्हां ।।**
**मज पामरा हे काय थोरपण । पायीची वाहाण पायीं बरी ।।**
**ब्रह्मादिक जेथे तुम्हां वोळगणे । इतर तुळणे काय पुरे ।।**
**तुका म्हणे नेणे युक्तीची ते खोली । म्हणोनि ठेविली पायी डोई ।।**

हा अभंग म्हणजे एका संतश्रेष्ठानं दुसऱ्या महनीय संताला केलेलं कृतज्ञ वंदन आहे. संतच संतत्वाला नमन करू शकतो. तुकारामांनी ज्ञानेश्वरांना अत्यंत विनम्रतेनं, सर्वभावे वंदन केलं आहे.ज्ञानदेवांविषयी तुकोबांच्या मनातला आत्यंतिक पूज्यभाव इथं प्रकट झाला आहे. ज्या भागवत मंदिराचा तुका कळस झाला त्या मंदिराचा पाया ज्ञानदेवांनी रचला आणि हे महन्मंगल मंदिर उभं राहिलं. अखेर एखादा धर्मसंप्रदाय म्हणजे त्या संप्रदायातले सत्पुरुषच असतात. त्यांच्या श्रमातून, विचार-आचारातून संप्रदायाची उभारणी होते. ज्ञानदेव, नामदेव आणि तुकाराम व एकनाथ हे वारकरी संप्रदायाचे प्रमुख शिल्पकार. त्यातही पाया आणि कळस यांना विशेष महत्व असतं. थोड्याशा चमत्कृतिपूर्ण भाषेतून बोलायचं झाल्यास कळसानं पायाला भक्तिभावानं अभिवंदन केलं आहे. ज्ञानेश्वर आणि तुकाराम हे दोन संत, हे दोन प्रतिभावंत मराठी भाषेचे आणि साहित्याचे आधारस्तंभ आहेत. यांच्या आधारानंच मराठी कवितेला अपूर्व वैभव प्राप्त झालं. ज्ञानेश्वरांनी महाभारताची प्रशंसा करताना काही विलक्षण काव्यमय ओव्या लिहिल्या आहेत, त्याच ओव्यांच्या आधारानं मी असं म्हणतो की, ग्यानबा तुकारामांनी आपल्या अमृतमधुर भाषेनं चातुर्याला शहाणपण दिलं. त्यांच्या काव्यानं रसांना सुरसता आली. ज्ञानाची कोमलता दुणावली. प्रमेय रुचकर बनलं. सुखाचं सौभाग्य पोसलं. माधुर्याला मधुरता प्राप्त झाली. आणि पुण्याला पराक्रमाची जोड मिळाली. खरोखरच या दोन महाकवींच्या साहित्यानं आणि कार्यानं हे अद्‌भुत चमत्कार घडले ही वस्तुस्थिती आहे. 'ज्ञानेश्वरी' आणि 'तुकोबांची गाथा' हे महाग्रंथ म्हणजे महाराष्ट्राच्या वैचारिक आणि भावनिक वैभवाची दोन उत्तुंग शिखरं आहेत. तुकोबांनी या अभंगात ज्ञानेश्वरांविषयी जे विनयोत्कट उद्गार काढले आहेत ते त्यांच्या शालीनतेवर स्वच्छ प्रकाश टाकतात. *'बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले'* असं म्हणणारे तुकाराम ज्ञानेश्वरांच्या चरणांवर आपलं

मस्तक ठेवतात. हे दोन महापुरुष एकाच तेजाची दोन रूपं आहेत. एकरूप तेराव्या शतकात प्रकट झालं. आणि दुसरी प्रतिमा सतराव्या शतकात उदयाला आली.

तुकोबा म्हणतात, 'आपल्या ठायी महान ज्ञान आहे. म्हणून तुम्हाला ज्ञानदेव म्हणतात. आपण ज्ञानियांचे राजे आहात. माझ्यासारख्या पामराला हे थोरपण येणं शक्य नाही. पायीची वहाण पायी बरी. मी आपल्या पायीची वहाण आहे. ब्रह्मादिक देवसुद्धा जिथं आपल्याला शरण येतात तिथं तुमची इतरांशी कशी तुलना करता येईल? आपल्याला कोणती उपमा देता येईल? आपण अनुपम आहात. मी काही ज्ञानाची, कलाकुसरीची आपल्यासारखी खोली जाणू शकत नाही. म्हणून आपल्या पायी हे मस्तक ठेवतो.'

आणखी एका अभंगात तुकोबा म्हणतात,

*जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगी ऐसे बळ रेडा बोले*
*करील ते काय नव्हे महाराज । परि पाहे बीज शुद्ध अंगी ॥*
*जेणे हे घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥*
*तुका म्हणे तेथे सुखा काय उणे । राहे समाधाने चित्ताचिया ॥*

ज्याच्या दारात सोन्याचा पिंपळ आहे, जो रेड्यासारख्या निर्बुद्धाला बोलता करू शकतो, ज्यानं वैष्णवांची मांदियाळी मिळवली आणि मुक्तीचं अन्नछत्र घातलं, त्या ज्ञानेश्वरांच्या ठिकाणी सुखाला कसली उणीव आहे? त्यांचा आश्रय करावा आणि समाधान मिळवावं. ज्ञानदेवांसंबंधीचा तुकोबांचा हा विलक्षण भक्तिभाव आनंदकारक आहे.

आपल्या पूर्वसूरींविषयी संतकवी जी कृतज्ञता बुद्धी व्यक्त करतात ती खरोखरच अनुकरणीय आहे. आदर्श आहे. आजचे लेखक, कवी मात्र कालच्या श्रेष्ठ वाङ्मयकारांविषयी निंदानालस्तीचे आणि टवाळकीचे उद्‌गार काढताना दिसतात. नम्रता, कृतज्ञता हे गुण आजच्या साहित्यसृष्टीत दुर्मिळ झालेले दिसतात. या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तुकोबांचा हा अभंग पुष्कळच सांगून जातो. ज्ञानेश्वरांनीही आपल्या गुरूंविषयी जी कृतज्ञ वृत्ती प्रकट केली तिलाही तोड नाही. गुरूभक्ती आजच्या काळात लुप्त झाली. गुरूनिंदा हाच शिष्टाचार बनला ज्ञानेश्वर तुकारामांचं कवित्व वाचताना मात्र त्यांच्या विनीत वृत्तीचं आणि उच्च संस्कृतीचं दर्शन घडतं. मन प्रसन्न होतं. संतांच्या शब्दांतून त्यांच्या मनी-मानसीचं अमृत झिरपत राहातं. आजच्या प्रदूषित वातावरणात अशा अमृतवचनांची आवश्यकता आहे.

हा अभंग ज्याप्रमाणं ज्ञानेश्वरांची महती स्पष्ट करतो त्याप्रमाणंच तुकारामांच्या अंतःकरणाची विशालता आणि ऋजुता यावर प्रकाश पाडतो. आपल्यापूर्वी होऊन गेलेल्या श्रेष्ठ व्यक्तींच्या विषयी कृतज्ञ बुद्धी ठेवणं हा खरोखरच थोर संस्कृतीचा वारसा आहे. तो प्रत्येकानंच आनंदानं जपला पाहिजे. माणसातल्या देवत्वाचं हे एक सुंदर उदाहरण आहे यात शंका नाही. संत तुकोबांच्या डोळ्यांतल्या कृतज्ञ प्रेमाश्रूंनी चिंब भिजलेला हा अभंग वाचताना तुकोबांचा थोरपणा लक्षात येतो. त्यांनी ज्ञानेश्वरांच्या पायी आपला माथा ठेवला आहे. मस्तक कुठं टेकवावं याचं ज्ञान माणसाला असलं म्हणजे त्याच्या आयुष्याला एक सुंदर अर्थ येतो. आम्हीही म्हणतो, 'आमची मस्तकं संतांच्या चरणी अशीच आनंदभरानं विनम्र व्हावीत.'

❑❑❑

**निंबाचिया झाडा साकरेचे आळे । आपलीं ती फळे न संडी च ।।**
**तैसे अधमाचे अमंगल चित्त । वमन ते हित करूनि सांडी ।।**
**परिसाचे अंगी लाविले खापर । पालट अंतर नेघे त्याचे ।।**
**तुका म्हणे वेळू चंदना संगती । काय ते नसती जवळिकें ।।**

'गाढवाला कितीही शृंगारले तरी त्याचा घोडा होणं शक्य आहे का?' असा प्रश्न तुकोबांनी एका अभंगातून विचारला आहे. मुळातली प्रवृत्ती बदलणं फार कठीण असते, नव्हे ते अशक्य असते असाच त्यांनी निष्कर्ष काढला आहे. दासीची पट्टराणी झाली तरी 'तिचे हिंडणे राहीना । मूळ स्वभाव जाईना ।' हे तुकारामांचं निरीक्षण होतं. मूळ प्रकृतीत परिवर्तन घडवून आणणं दुरापास्त आहे. संत स्वभावतःच सत्प्रवृत्त असतात. त्यांच्यासमोर धनराशी उभी केली तरी आपल्या मूलभूत प्रवृत्तींपासून ते विचलित होत नाहीत. जे निसर्गतःच मनुष्याला लाभलेलं असतं ते दूर होऊ शकत नाही. कोळशाचा रंग तो कितीही धुतला तरी काळाच राहातो. कोळसा कधी हिऱ्यासारखा चमकणं शक्य नाही. प्रकाश आणि उष्णता देणं ही सूर्याची प्रकृती आहे. ती कशी नाहीशी होईल ? तापहीन मार्तंड आणि अलांछित चंद्र ज्ञानेश्वरांच्या कल्पनासृष्टीतच उगवतात. वास्तव सृष्टीत हे शक्य नाही. तुकोबांनी हाच सिद्धांत काही दृष्टांत देऊन या अभंगातून स्पष्ट केला आहे. कडुनिंबाच्या झाडाला साखरेचं आळं केलं तरीही त्याची फळं कडूच असणार. साखरेचा परिणाम त्या फळांवर लेशमात्रही होणार नाही. ' मूळ स्वभाव जाईना' हेच खरं ! तुकोबा पुढं म्हणतात, दुष्टाच्या अंतःकरणात बदल होऊ शकत नाही. त्याला केलेला उपदेश तो ओकून टाकतो. परिसाच्या ठिकाणी लोखंडाचं सोनं करण्याची शक्ती आहे. पण तो परीस खापराचं काही सुवर्णात रुपांतर करु शकत नाही. वेळूचं बन चंदनवृक्षांच्या जवळ असलं तरी वेळू काही चंदनाप्रमाणं सुगंधित होऊ शकत नाही. तुकोबांनी काढलेले हे निष्कर्ष सृष्टिनियमांना अनुसरूनच आहेत. अधमाचं चित्त पालटू शकत नाही ही खेदकारक जाणीव त्यांना तीव्रतेनं झाली. आपल्या आयुष्यात त्यांनी दुर्जनांचं हृदयपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. पण मूळप्रकृतीत स्थित्यंतर होत नाही या निष्कर्षापर्यंत ते आले. दुर्योधन आणि दुःशासन यांच्या मनात सत्प्रवृत्ती रुजवण्याचा प्रयत्न धर्मराजानं केला होता.

श्रीकृष्णानंही त्यांचं चित्त सन्मार्गाकडं वळावं म्हणून उपदेश केला होता. पण कृष्णासारख्या तत्त्ववेत्त्या महापुरुषालाही दुर्योधनापुढं हात टेकावे लागले. या प्रकारची असंख्य उदाहरणं देता येतील. दंश करणं हा सर्पाचा, नांगी मारणं हा विंचवाचा आणि सज्जनांचा छळ करणं हा दुर्जनांचा स्वभावच आहे. रोगावर औषध असतं. पण स्वभाव बलण्याचं औषध मात्र जगाच्या बाजारात उपलब्ध नाही. *'स्वभावो दुरतिक्रमः'* हेच खरं. स्वभाव बदलता आला असता तर हिटलरसारख्या क्रूरकर्म्याला बदलणं शक्य झालं असतं. संतही बदलत नाहीत ही चांगली गोष्ट आहे. पण दुष्ट-दुर्जनांच्या मनोवृत्तीत फरक पडत नाही ही मात्र दुःखद घटना आहे.

दुष्टांच्या मानसिकतेत कधीही आणि केव्हाही बदलच होणार नसेल तर मग तो संतांचा पराभव ठरेल. विकारांचा अंधार दूर होऊन विवेकाची पहाट फुटावी आणि सारं जग मंगल प्रकाशधारांनी न्हाऊन निघावं हे संतांचं विलक्षण उत्कट स्वप्न आहे. तुकारामांच्या हृदयातही हेच स्वप्न नांदत आहे. मूळ स्वभाव जात नाही हे म्हणणाऱ्या तुकारामांनी समाजात वैचारिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी जन्मभर प्रयत्न केले. आयुष्याचा नाश करू नका जीवन निकोपपणानं जगा असा उपदेश त्यांनी आयुष्याच्या अंतापर्यंत केला. त्यांच्या उपदेशानं काही दुष्टांच्या अंतःकरणात निश्चितच बदल घडून आला. याचा अर्थ संतकार्य हळूहळू लोकमानसात दृढ होत जातं. पेरल्याबरोबर उगवत नाही. उगवण्यासाठी दीर्घकाळ वाट पहावी लागते. पेरलेली बीजं बऱ्याच प्रमाणात जळून जाण्याचीही शक्यता असते. पण म्हणून उत्तम विचार आणि संस्कार माणसाच्या मनोभूमीत पेरण्याचा आपला धर्म-आपला स्वभावधर्म संत कधीही सोडत नाहीत. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळं समाजाच्या मनोधारणेत काही प्रमाणात निश्चित बदल होऊ शकतो.वाल्याचा वाल्मीकी होऊ शकतो. याचा अर्थ उत्तम संस्कार मनावर सातत्यानं होत राहिले तर मानसिकता बदलू शकते. हे एकाएकी घडत नाही. कालचा दुष्ट आज साधू झाला असा झटपट चमत्कार होत नाही. मनाची ठेवण, विचारपद्धती, आचारातली शुद्धता या गोष्टी हळूहळू घडून येतात. स्वतः तुकाराम देखील आकाशाएवढे झाले ते एका दिवसात नव्हे. मन, बुद्धी आणि व्यक्तित्व संस्कारित होण्यासाठी तपस्येची आवश्यकता असते. तुकोबांनी आपलं जीवन आणि आपलं मन स्वतःच्या परिश्रमातून घडवलं.

❑❑❑

**अज्ञानाची भक्ति इच्छिती संपत्ती । तयाचिये चित्ती बोध कैचा ।।**
**अज्ञानाची पूजा कामिक भावना । तयाचिया ध्याना देव कैचा ।।**
**अज्ञानाचे कर्म फळीं ठेवी मन । निष्काम साधन तया कैचे ।।**
**अज्ञानाचे ध्यान विषयावरी ध्यान । ब्रह्म सनातन तया कैचे ।।**
**तुका म्हणे जळो ऐशियांचे तोंड । अज्ञानाचे बंड वाढविती ।।**

ज्ञानाला अमृत अशी संज्ञा आहे. अज्ञान हे मात्र जीवन दुःखमय आणि रोगट करणारं विष आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की मनुष्य अमृताकडं पाठ फिरवतो आणि विष मात्र आनंदानं स्वीकारतो. अज्ञानी मनुष्य दुःखसंकटात पिचत पडला तर त्यात आश्चर्य नाही. आजपर्यंत अनेक धर्मपुरुषांनी, तत्त्ववेत्यांनी आणि साधुसंतांनी ज्ञानाचा मार्ग पुन्हा पुन्हा दाखवूनही बहुसंख्य माणसं अज्ञानाच्या वाटेनं चालत राहिली. महर्षी व्यास तर अत्यंत निराश होऊन म्हणाले, 'मी या लोकांना बाहू उभारून धर्म सांगत आहे. पण माझ्या आवाहनाकडं कुणाचंही लक्ष नाही. अर्थ आणि काम धर्ममूलक असावेत. धर्म हेच जीवनाचं सार आहे. म्हणून लोकहो धर्ममार्गी व्हा, असं मी त्यांना सांगत आहे पण माझ्याकडं कुणाचंही लक्ष नाही.' अज्ञानी मनुष्य हट्टी, दुराग्रही असतो. कोणत्याही परिस्थितीत तो आपल्या अज्ञानाला चिकटून राहातो. ज्ञानाचे शब्द त्याला कडवट वाटतात. तुकारामांनी सुद्धा 'मी तुमच्या हितासाठी बोलतो. तुमचा अज्ञानरूपी रोग नाहीसा व्हावा म्हणून मी तुम्हाला कडुनिंब दिला'; म्हटले पण तुकोबांच्या शब्दाकडेही अज्ञानी लोकांनी दुर्लक्ष केलं. अज्ञानाच्या प्रभावामुळं धर्म आणि अधर्म, कर्तव्य आणि अकर्तव्य, सुख आणि दुःख यातला भेद कळत नाही. तो समजावून सांगणाऱ्या संतांनाही लोक किंमत देत नाहीत. संत कोण आणि संतत्वाचा केवळ अभिनय करणारा भोंदू कोण हे कळण्यासाठी सुद्धा ज्ञानाची आवश्यकता असते. तुकोबांनी अज्ञानावर कठोर प्रहार केले आहेत. तुकोबांच्या काळात वेदशास्त्र जाणणारे अनेक शास्त्रीपंडित होते, आचार्य होते. पण तुकोबा हे या पढीक पंडितांपेक्षा ज्ञानाच्या, चारित्र्याच्या आणि अनुभवाच्या उच्च पातळीवर अधिष्ठित झालेले महान संत होते. त्यांची वाणी ज्ञानमय होती.

अज्ञानी लोकांची लक्षणं सांगताना ते म्हणतात, 'हे अज्ञानी लोक भक्ती करू लागले तर ते धनधान्याची, संपत्तीची इच्छा करतात. परमेश्वराच्या स्वरूपा विषयी त्यांना

काहीही गम्य नसते. अज्ञानी माणसाची देवपूजा स्वार्थी भावनेवर आधारलेली असते. आपल्या भक्तीचं आपल्याला फळ मिळालं पाहिजे. भौतिक लाभ झाला पाहिजे नाहीतर ही भक्ती वाया गेली असं ते समजतात.'

'अज्ञानाचे ज्ञान, विषयावरी ध्यान.' त्याच फक्त विषयावर ध्यान असतं. परमेश्वर म्हणजे ब्रह्म. ते कसं अनादि-अनंत आहे हे त्यांना कळत नाही. किंबहुना ते समजून घेण्याची त्यांची इच्छाही असत नाही.

' तुका म्हणे जळो ऐशियांचे तोंड । अज्ञानांचे बंड वाढविती.' संत तुकारामांच्या दृष्टिकोनातून परमेश्वराची भक्ती निष्काम, निरभिलाष असावी. तो परमेश्वर साऱ्या विश्वजीवनाचा सूत्रधार असतो. मांगल्याचं आणि आनंदाचं तो माहेरघर असतो. त्याचं मनःपूर्वक चिंतन हाच सुखाचा ठेवा असतो. त्याची पूजाअर्चा कोणत्या तरी क्षुद्र इच्छेनं करणं, त्याच्याकडं धनधान्य दे, नोकरी दे, सत्तेची जागा दे अशी याचना करून त्याला फुलं वाहाणं, नवस करणं, दंडवत घालणं हा शुद्ध अविचार आहे. देवपूजा म्हणजे देवाला लाच देणं नव्हे. त्याला काहीही नको असतं. फक्त पूजकाची प्रामाणिक भक्तिभावना त्याला हवी असते. भक्तिभावनेनं प्रेरित होऊन जो आपलं अंतःकरण त्याला अर्पण करतो त्याचं संपूर्ण जीवन आनंदमय होतं. असं आनंदपूर्ण जीवन तुकोबा आपल्या विशुद्ध भक्तीच्या बळावर जगले. त्यांचं आयुष्य हा आनंदाचा डोह झाला. आणि या आनंदाची अनुभूती सर्वांना देण्यासाठी ते प्रयत्नशील राहिले. तुकारामांचं संतपण समजून घेणं हे देखील ज्ञानाचंच लक्षण आहे असं मी म्हणेन.

भक्तीला देखील ज्ञानाचं आणि निःस्वार्थ वृत्तीचं अधिष्ठान असलं म्हणजे ती ईश्वरभक्ती जीवनाला सुंदर व समर्थ करते यात संदेह नाही.

❑❑❑

**अधिकार तैसा करू उपदेश । साहे ओझे त्यास तेचि द्यावे ॥**
**मुंगीवरी भार गजाचें पालाण । घालिता ते कोण कार्यसिद्धी ॥**
**तुका म्हणे फासे वाघुरा कुऱ्हाडी । प्रसंगी तो काढी पारधी तो ॥**

समाज प्रबोधन करणाऱ्या विचारवंताला काही पथ्यं पाळावी लागतात. ज्यांना एखादा विशिष्ट विचार सांगायचा त्यांना तो व्यवस्थितपणे पेलता येईल की नाही हे प्रथम पहावं लागतं. प्राथमिक शाळेतल्या विद्यार्थ्यांना एखादा शिक्षक जागतिक आर्थिक परिस्थितीबद्दल काही सांगू लागला तर ते हास्यास्पद ठरेल. देणाऱ्यापाशी तारतम्य पाहिजे आणि घेणाऱ्यापाशी पात्रता असली पाहिजे. लहान मुलांना एखादी गोष्ट सांगताना त्यांच्या पातळीवर जाऊन ती सांगितली तरच मुलांचं मनोरंजन होईल. त्यांच्यासमोर तत्त्वज्ञानातल्या एखाद्या प्रमेयाचं निरुपण करणारा पंडित कितीही मोठा असला तरी तो व्यवहारशून्य आणि मूर्ख ठरेल. तुकारामांनी लोकमनाचा सूक्ष्मपणानं वेध घेतलेला होता. जे सांगायचं ते अनुरूप दृष्टांतांच्या आधारानं साध्या सुलभ पण प्रसादपूर्ण भाषेत स्पष्ट केलं पाहिजे याची जाण त्यांना होती. त्यांचा प्रत्येक अभंग प्रसादगुणानं नटलेला आहे. अर्थवाहक आहे. जनसमुदायासमोर कीर्तन करताना समाजातल्या भिन्न भिन्न थरांतले लोक आलेले असतात याची त्यांना कल्पना होती. शेतकऱ्यांचा आणि कष्टकऱ्यांचा वर्ग मोठ्या प्रमाणात तुकोबांच्या कीर्तनाला उपस्थित असायचा. त्यांच्या जीवनानुभवातली उदाहरणं देऊन, दृष्टांत देऊन ते आपला विचार लख्खपणानं मांडत असत. क्लिष्ट आणि बोजड अशा पंडिती चर्चेला त्यांच्या अभंगात अवसर नसायचा. त्यामुळंच तुकाराम हे लोककवी झाले. लोकभाषेतून लोकप्रबोधन करणारा लोकांचा प्रतिनिधी असलेला हा संत आणि कवी लोकोद्धारक बनला. कारण लोकांना काय आणि कसं द्यावं हे त्यांना कळलेलं होतं. म्हणूनच ते म्हणतात,

'ज्याचा जसा अधिकार त्याप्रमाणं त्याला आम्ही उपदेश करतो. कोणाच्या माथ्यावर किती ओझं द्यावं हे पाहिलं पाहिजे. हत्तीच्या अंगावर घालायचे वस्त्रालंकार मुंगीच्या अंगावर घालता येतील का ? तो प्रयत्न शहाणपणाचा ठरेल का ? शिकार करणाऱ्या पारध्याजवळ फासे, जाळं, कुऱ्हाड वगैरे शस्त्रं असतात. ज्यावेळी जे शस्त्र आवश्यक असेल तेच तो वापरतो. म्हणूनच ज्याला पेलता येईल त्याला ते द्यावं लागतं.'

तुकोबांचं समाजमनाचं अध्ययन कसं खोलं होतं याचं दर्शन या उद्‌गारातून घडतं. या प्रकारचं सामाजिक भान मोठमोठ्या पंडितांनाही असत नाही. कारण पंडित हे केवळ 'ग्रंथोपजीवी' असतात. लोकमनाशी ते कधीच संवाद करीत नाहीत. तुकोबा म्हणजे लोकसागरावर आलेली एक प्रातिनिधिकं लाट आहे. लोकभाषेतून बोलणं ही सहज गोष्ट देखील पूर्वीच्या काळात धर्मपंडित आणि आचार्य करीत नव्हते. न समजणाऱ्या संस्कृतातून, जडजंबाल भाषेतून विद्वत्तेचं प्रदर्शन करीत ते लोकांसमोर बोलत असत. लोकांना पांडित्याचा दबदबा वाटायचा पण प्रत्यक्षात त्यांना यांची प्रवचनं कळत नव्हती. बुद्ध-महावीरांनी, पुढं बसवेश्वरांनी, महानुभाव पंथाच्या साधुसंतांनी आणि भागवत संप्रदायी ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम यांनी लोकांच्या भाषेतून, साध्या सोप्या शब्दांतून धर्मविचार सांगायला सुरुवात केली. ही क्रांती होती. तिचा परिणाम म्हणजे सामान्यातल्या सामान्य माणसाचाही धर्माशी संबंध जोडला गेला. देव आणि धर्म ही विशिष्ट लोकांची मिरास न राहाता त्यावर स्त्री-शूद्रांनाही हक्क सांगता येऊ लागला.

'अधिकार तैसा करू उपदेश' हे तत्त्व त्या दृष्टीनं महत्वाचं ठरलं. लोकशिक्षणाच्या दृष्टीनं या तत्त्वाची महती कोणीच नाकारू शकणार नाही. ज्ञान मार्गापेक्षा भक्तिमार्ग, नाममार्ग हे देखील मुक्तीला साहाय्यक होतात हे सांगून सामान्य लोकांना तुकोबांनी नामभक्ती शिकवली. आणि उदात्त, विचारांचा समाजात प्रसार केला. 'तुका झालासे कळस' या उक्तीतलं हे मर्म आहे.

समाजप्रबोधन करताना पांडित्यापेक्षाही प्रेमाचा, सहानुभूतीचा उपयोग अधिक होतो. विद्वत्तेचे शब्द, जडजंबाल भाषा सामान्य माणसाच्या डोक्यावरून जाते. अशा भाषेतली प्रवचने केवळ ऐकायची असतात आणि सोडून द्यायची असतात. तुकाराम हे तर लोकविकासी कमल होते. या कमलाचा सुगंध साऱ्या समाजासाठी होता. तुकोबांच्या भाषेत जड पांडित्य नाही. प्रेमळ, वत्सल वृत्तीचे परिणामकारक साधे सुलभ शब्द आहेत. कोमलता आहे तशीच कठोरताही आहे. ज्या लोकांसाठी त्यांची कीर्तन प्रवचनं आहेत त्याच लोकांची भाषा तुकोबा बोलतात. त्यामुळं हजारो अंतःकरणांना ते रोमांचित करतात.

❑❑❑

**शांतीपरते नाही सुख । येर अवघेचि दुःख ।।**
**म्हणउनी शांति धरा । उतराल पैल तीरा ।।**
**खवळलिया कामक्रोधी । अंगी भरती आधिव्याधी ।।**
**तुका म्हणे त्रिविध ताप । जाती मग आपोआप ।।**

'सुखाचा शोध जगात सर्वत्र केला. रानावनात हिंडलो. नाटकगृहात, मद्यालयात, पंचतारांकित हॉटेलात, विमानात सर्वठिकाणी सुख शोधून पाहिलं पण सुख आणि शांती यांचा लाभ तर सोडूनच द्या, त्यांचा ओझरताही स्पर्श मला झाला नाही.' संपत्तीच्या राशीवर रात्रंदिवस लोळणारा एक धनवंत बोलत होता. तो म्हणाला, 'शरीराचं सुख फार लवकर उडून जातं. आणि मनात पुन्हा वखवख निर्माण होते. वासनांचा दंश असह्य होतो. त्यांची तृप्ती करता करता मी मात्र अतृप्तच राहिलो. मनाची शांती आणि आत्म्याचं सुख मला कुठंही भेटलं नाही. मी कोट्यावधी रुपये खर्चायला तयार आहे. मला सुख शांती कुठं विकत मिळेल का ?'

त्या धनवंताच्या प्रश्नाला तुम्ही आम्ही सामान्य माणसं उत्तर देऊ शकत नाही. कारण हा प्रश्न केवळ त्या लक्ष्मीपुत्रालाच पडलेला असतो असं नव्हे तर आपणही याच प्रश्नानं अस्वस्थ झालेले असतो. सुख आणि शांती ही बाजारात मिळण्याची वस्तू नव्हे. त्यामुळं सुखशांतीचा शोध कुणातरी अधिकारी मार्गदर्शकाच्या सल्ल्याप्रमाणं केला पाहिजे. याबाबतीत संत हेच खरे मार्गदर्शक असतात. त्यांनी आपलं मन आणि जीवन हे शांतिसुखाचं माहेरघर बनवलेलं असतं. ते सदैव आनंदात निमग्न झालेले असतात. तुकोबा म्हणतात, '*तुझे आहे तुजपाशी । परि तू जागा चुकलासी ॥*' जे तू बाहेर शोधत आहेस ते तर तुझ्याजवळच आहे. ते बाहेर तुला कसं मिळणार ? आपल्या आत्म्यातच सुखशांतीचं निधान आहे. आत्मचिंतन कर. आत्म्याचा शोध घे. शांती आणि सुख यांची प्रकाशकिरणं तुझ्याच आत्म्यात निवास करून आहेत. तू जागा होऊन त्यांच्याकडं पहा. आत्मजागृतीशिवाय सुख मिळणार नाही. तुकोबांच्या मतानं शांतीसारखं दुसरं सुखं नाही. 'येर अवघेचि दुःख' म्हणून शांती धारण करा. पैलतीरावर सुखेनैव जायचं असेल तर मनाच्या अंतर्मनात शांती आणि समाधान ठेवा. पैलतीराकडं जाताना मन अशांत असेल तर नाव डगमगू लागेल.

आणि मध्येच जलसमाधी मिळेल. काम आणि क्रोध प्रक्षुब्ध झाल्यावर नानाप्रकारचे मानसिक आणि शारीरिक रोग उद्भवतात. पण शांती धारण केली की त्रिविध ताप आपोआप नाहीसे होतात.

मनुष्य तीन प्रकारच्या तापांनी पीडलेला असतो. आधिभौतिक, आधिदैविक आणि आध्यात्मिक. यापैकी पहिले दोन ताप सर्वसामान्य माणसांच्या वाट्याला भरपूर प्रमाणात येतात. आध्यात्मिक दुःख मात्र साधकाच्या वाट्याला येत असतं. पण मन प्रशांत ठेवल्यावर हे तिन्ही ताप ओसरून जातात. आणि एका विलक्षण सुखाची अनुभूती येऊ शकते. आधुनिक मानसशास्त्रानं हे सिद्ध केलं आहे की मनाचा समतोल बिघडला, मन प्रक्षुब्ध झालं, राग आणि लोभ यांच्या आहारी गेलं की मग शरीरात देखील अनेक प्रकारचे रोग उद्भवतात. म्हणूनच चंचल मनाला विवेकानं आवर घातला पाहिजे. मानसिक शांती हीच सुखाची गुरुकिल्ली आहे.

एकदा भ. बुद्धाला कुणीतरी प्रश्न विचारला, 'भगवान्, तुम्ही पालापाचोळ्यावर शयन करता, थंडी-वाऱ्यात उघडेच झोपता, तुम्हाला चांगली झोप येते काय ?'

बुद्ध हसून म्हणाले, 'आपलं मन शुद्ध आणि स्वच्छ असेल, निर्विकार असेल, निरोगी असेल तर पालापाचोळ्यावरही गाढ झोप लागते. पण मनात क्रोध, मत्सर असतील, विकारांचं मोहोळ उठलेलं असेल तर उत्तम, मृदुल शय्येवर देखील झोप येणार नाही. निकोप मन म्हणजेच सुख आणि शांती यांचं निवासस्थान असतं.'

तुकारामांनीही हाच आशय या अभंगातून सांगितला आहे. जीवनातलं सुख केवळ मनाच्या सात्विक प्रकृतीवर अवलंबून असतं. संतांच्या दृष्टीनं सर्वोच्च सुख हे संतसमागमातच मिळतं. आपण सामान्य माणसं इंद्रियसुखांना अवास्तव, अतिरेकी महत्व देऊन इंद्रियांचं जन्मभर कोडकौतुक करीत बसतो. अनेक जन्म घालवले तरी इंद्रियसुखांनी तृप्ती होणं शक्य नाही हे मनुष्य विसरून जातो आणि पुन्हा पुन्हा त्या क्षुद्र वैषयिक सुखांच्या पाठीमागं जीव जाईतो धावत राहातो. आनंदाची उत्पत्ती शरीरात नव्हे तर मनात आणि आत्म्यात होत असते. म्हणूनच शरीराच्या क्षणजीवी सुखापेक्षा मनाचं आणि आत्म्याचं चिरंजीवी सुख माणसाला घेता यावं यासाठी तुकोबांनी 'शांतीपरते नाही सुख' हा संदेश दिला आहे. आज शास्त्रीय ज्ञान वाढल्यामुळं नाना प्रकारच्या सुखसाधनांची अमूप निर्मिती होत आहे. पण ही सारी साधनं मनुष्याला अधिकाधिक विवंचनेच्या आणि दुःखाच्या

खाईत लोटत आहेत.

जगज्जेत्या सिंकदरानं एकदा गर्विष्ठपणानं गुरूला विचारलं, तुम्हाला काय पाहिजे ते सांगा, मी तुमची इच्छा पूर्ण करीन.' गुरू तुच्छतेनं सिकंदराला म्हणाला, 'मला काहीच नको, तू समोर उभा राहिल्यामुळं माझ्या अंगावर ऊन येत नाही. तू बाजूला हो म्हणजे माझी इच्छा पूर्ण होईल.'

याच भूमिकेतून तुकोबांनी संपत्ती नाकारली होती. ज्याच्या मनी मानसी शांती, सुख, आणि उत्कट ईश्वरभक्ती आहे त्याला सत्ता, संपत्ती आणि अन्य सुखसाधनं तुच्छ वाटणारच !

मानसिक शांती कोणत्या उपयांनी मिळू शकेल असा प्रश्न अनेक वेळा विचारला जातो. म्हटलं तर या प्रश्नाचं उत्तर सोपं आहे. आणि म्हटलं तर अत्यंत अवघडही आहे. वासनांचा आणि विकारांचा बुजबुजाट झालेल्या मनात समाधान व शांती राहूच शकत नाही. शरीराला झालेली एखादी खोल जखम ज्याप्रमाणं ठणकत राहाते आणि त्या वेदनेमुळं झोप येत नाही त्याप्रमाणं विकारांच्या अधीन झालेल्या चित्तवृत्तीला शांती अल्पांशानंही मिळत नाही. तुम्ही आम्ही सामान्य माणसं वासनांचं जन्मभर कोडकौतुक करीत बसतो आपल्या जीवनाचं सुकाणू इंद्रियांच्या हाती दिल्यावर मनःशांती लाभू शकत नाही हेच तुकोबांचं म्हणणं आहे.

□□□

**बैसोनि निवांत शुद्ध करी चित्त । तया सुखा अंतपार नाही ॥**
**येऊनि अंतरी राहील गोपाळ । सायासाचे फळ बैसलिया ॥**
**राम कृष्ण हरि मुकुंद मुरारि । मंत्र हा उच्चारी वेळोवेळां ॥**
**तुका म्हणे ऐसे देईन मी दिव्य । जरी होईल भाव एकविध ॥**

सुख मिळवण्याच्या सांकेतिक कल्पना आणि ठरीव ठशाचे गुळगुळीत झालेले मार्ग बाजूला सारून जी वाट संत महंतांनी चोखाळली तिचं स्पष्टीकरण या अभंगातून तुकारामांनी केलं आहे. जीवनातलं सगळं सुख सत्तेत आणि संपत्तीत सामावलेलं आहे असं मानणाऱ्या लोकांनी तुकारामांची ही वाट पाहून ठेवावी. या वाटेनं ते निष्ठेनं चालू लागले तर त्यांनाही उदात्त सुखाचा अनुभव येऊ शकेल. कोणी दुसऱ्याला पीडा देण्यात सुख मानतो. दुसऱ्याला दुःख झालं म्हणजे यांना आनंदाच्या उकळ्या फुटतात. ही मानसिक विकृती आहे. यातून होणारा आनद हा अधम स्वरुपाचा आहे. इंद्रियांना मिळणारं सुख हा सुखाचा मध्यम प्रकार मानावा लागेल. हे सुख हळूहळू ओसरून जातं. शरीर दुबळं झालं की मग पंचेंद्रियांची आनंद देण्याची आणि आनंद घेण्याची शक्ती संपून जाते. चरकात पिळला जाणारा ऊस चिपाड झाल्यानंतर रस देऊ शकत नाही. तशीच अवस्था इंद्रियांची होते. अधम आणि मध्यम सुखाचे हे प्रकार माणसाला फार काळ समाधान देऊ शकत नाहीत. यातून मनुष्याच्या वाट्याला अटळपणे केवळ दुःखच येतं. ज्याच्या पाठीमागं आपण जन्मभर धापा टाकीत धावत होतो ते सुख नसून केवळ मृगजळ होतं हे सत्य त्याला समजतं आणि मग तो दुःख निराशेत बुडून जातो. *'सुख पहाता जवापाडे, दुःख पर्वताएवढे'* हे तुकोबांचं मत त्याला मान्य होतं. पण हे ज्ञान उशीरानं होतं.

सुखाचा आणि आनंदाचा अखंड झुळझुळणारा झरा आपल्या मनातच असतो, त्याचा शोध घेतला पाहिजे हे सांगताना तुकोबांनी म्हटलं आहे, 'अरे, तू प्रथम आपलं चित्त शुध्द कर. म्हणजे तुला अनंत, अपार सुख लाभू शकेल' त्यांचं हे वचन सार्थ आहे. दुःखाचं मूळ आपल्या अंतःकरणातल्या अशुद्धतेतच असतं. विवेकबुद्धीच्या 'क्ष' किरणानं मनाचं छायाचित्र काढल्यावर आपलं मन कितीतरी अमंगळ गोष्टींनी बुजबुजलेलं आहे याची कल्पना येते. मनाच्या कुहरात विकार-वासनेच्या असंख्य विषारी

जंतूंनी वास्तव्य केलेलं असतं. मन शुद्ध करण्याऐवजी केवळ बाह्यतः परमेश्वराचं नाव घेऊन काय होणार ? भक्तीचे आणि विरक्तीचे सुविचाराचे आणि सद्‌भावनेचे फवारे सोडून मन स्वच्छ केलं पाहिजे. ते इतकं स्वच्छ आणि प्रसन्न केलं पाहिजे की त्या मनात तो गोपाळकृष्ण येऊन राहिला पाहिजे. यासाठी सतत प्रयत्न मात्र केले पाहिजेत. राम, कृष्ण, हरी, मुकुंद, मुरारी हा नाममंत्र वेळोवेळी उच्चारला पाहिजे. मानसिक शुद्धतेसाठी नामस्मरण आणि विकारांचं उच्चाटन आवश्यक आहे. भावशुद्धी हीच शाश्वत सुखाला कारणीभूत होते. आपलं मन या पृथ्वीवर नरक निर्माण करू शकतं आणि हेच मन त्या नरकाचं नंदनवनात रुपांतर करू शकतं. मन हेच बंधनाला आणि मुक्तीला कारण असतं. ज्याच्या मनाच्या अंगणात ईश्वरी प्रेमाच्या पणत्या पेटलेल्या आहेत त्याचं जीवन परमात्म्याच्या प्रकाशकिरणांनी भरून जातं. या पणत्या केवळ त्याच्याच नव्हे तर समाजजीवनाच्या विशाल प्रदेशातला अंधार उजळू शकतात. तुकोबांनी आपल्या हृदयीची पणती सुविचारानं आणि ईश्वरप्रेमानं पेटवली. म्हणूनच ते एक आनंदी जीवन जगू शकले. त्यांची अभंगवाणी गेली साडेतीनशे वर्ष आपल्याला आनंद देत आहे. दुःख-दैन्याचं निवारण करणं आणि परमआनंदाचं वितरण करणं हेच संतांचं उद्दिष्ट असतं. *'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती'* हेच खरं.

चित्तशुद्धीचा विचार आजच्या स्वार्थी, व्यवहारी वातावरणात कुणी करीतच नाही. क्रोध आणि क्षोभ, मत्सर व सूडाचा पेटता विचार, लोभ, मोह आणि वैर यांचे उष्ण विषारी वारे वाहात असतात. यामुळं मन तर विकृत होतंच पण शरीरही रोगट बनतं. मनाला शुद्ध निरामय करण्याची शक्ती प्रेम आणि करुणा यांच्यात असते. मनाचा निर्मलपणा हे जीवनाला उज्ज्वल बनवणारं सुंदर रसायन आहे. आजच्या जगाचं चित्त मळकट आणि कळकट बनलं आहे. पुण्यशील विचारांचे फवारे मारून हे चित्त धुवून काढलं पाहिजे. संतांच्या विचारातच मनःशुद्धीची संजीवनी आहे. मन शुद्ध असेल तर सारं जीवन निकोप होईल.

❑❑❑

**पापाची वासना नको दावू डोळां । त्याहुनि अंधळा बराच मी ॥**
**निंदेचे श्रवण नको माझे कानीं । बधिर करोनि ठेवी देवा ॥**
**अपवित्र वाणी नको माझ्या मुखा । त्याहुनि मुका बराच मी ॥**
**नको मज कधी परस्त्रीसंगती । जनांतून माती उठता भली ॥**
**तुका म्हणे मज अवघ्याचा कंटाळा । तू एक गोपाळा आवडसी ॥**

माणूस हे एक विलक्षण कोडं आहे. त्याच्यासंबंधी कितीही विचार केला तरी त्याच्या प्रवृत्तीबद्दल निश्चितपणानं काही सांगता येत नाही. माणसाचं मन अत्यंत चंचल असतं. देवपूजा करीत बसलेल्या मनुष्याच्या मनात त्यावेळी एखादी वासना, एखादा घाणेरडा विचार उचंबळत नसेल असं म्हणवत नाही. मनाची गती मानसशास्त्रज्ञांना अद्यापी पूर्णांशानं कळली नाही. बाह्यत: मन स्वच्छ आणि शांत वाटलं तरी त्याच्या खोल कुहरात प्रचंड खळबळ माजलेली असणं अशक्य नाही. म्हणूनच मनाचा भरवसा कोणी देऊ शकत नाही. सदैव धावणाऱ्या किंवा कुठंही थबकणाऱ्या मनाच्या नाठाळ घोड्याला हुकमी लगाम अद्यापी सापडला नाही. फार थोड्या लोकांनी आजपर्यंत आपल्या मनावर विजय मिळवला असेल. मोहाचा सामान्य क्षणसुद्धा मनात वादळ निर्माण करू शकतो. विश्वामित्राची  दीर्घ तपश्चार्या त्याच्या विकारवश मनानं धुळीला मिळवली. नानाप्रकारचे मोह आणि लोभ तुमच्या आमच्या मनात दबा धरून बसलेले असतात. ते केव्हा हल्ला करतील हे सांगता येत नाही. जो आपल्या मनाला जिंकतो, वासनाविकारांना ताब्यात ठेवतो तोच परमेश्वराचा खरा उपासक होऊ शकतो. पण असे श्रेष्ठ उपासक हाताच्या बोटावर मोजण्याइतके असतात. संत तुकारामांनी देवाची प्रार्थना करताना म्हटलं आहे,

'पापवासनेचं दर्शन हे देवा, माझ्या डोळ्यांना होऊ देऊ नको. त्यापेक्षा मी आंधळा झालो तर मला चालेल. निंदानालस्तीचे शब्द ऐकण्याची आवड माझ्यात असू नये. त्यापेक्षा मी बहिरा झालो तर अधिक बरं होईल. माझ्या तोंडून कधीही अपवित्र शब्द निघू नयेत. अमंगळ शब्दांचं उच्चारण करण्यापेक्षा तू मला मुका करशील तर बरं होईल. कधीही परस्त्रीसंगतीची मला ओढ लागू नये. त्यापेक्षा मरण आलं तर ते मी पत्करीन. या साऱ्या दुर्गुणांचा, दुष्प्रवृत्तींचा मला तिटकारा आहे. मला फक्त तू पाहिजे आहेस. केवळ तुझीच भक्ती मला प्रिय आहे.'

अत्यंत उदात्त विचारांनी भरलेला हा अभंग मनाला आनंद देतो यात शंका नाही.

बहुसंख्य माणसं वासनेच्या प्रवाहाबरोबर वाहात असतात. घाणेरडे आचार आणि विचार, अभद्रवाणी आणि दूषित मनोवृत्ती हेच त्यांच्या जीवनाचं सार असतं. हे लोक स्वतःचं उभं आयुष्य दुःखमय करतात. इतरांच्याही आयुष्याला यांच्या कुसंगतीमुळं कीड लागते. मानवी दुःखाचं मूळ कारण त्याचं रोगट अधाशी मन हेच आहे. वाईट पाहू नये, वाईट ऐकू नये आणि वाईट बोलू नये ही पथ्यं ज्याला पाळतां येतात त्याला सुखी जीवनाचं रहस्य सापडलं असं म्हणता येईल. भर्तृहरीनं 'नीतिशतकात' याच संदर्भात मांडलेला एक विचार आठवतो. तो म्हणतो,

'बाहूभूषणं, चंद्रासारखे तेजस्वी हार, सुगंधी द्रव्य अंगाला लावून केलेलं स्नान, फुलं आणि केशकलाप हे माणसाचे खरे अलंकार नव्हेत. संस्कारसंपन्न वाणी हाच त्याचा खरा अलंकार असतो.' इतर अलंकार झिजून जातात. पण संस्कारित वाणीचा अलंकार कधीच झिजत नाही. सुसंस्कृत वाणीसाठी मनही संस्कारयुक्त असावं लागतं. सारी जीवनदृष्टीच उदात्त असेल तर मग त्या माणसाचं व्यक्तित्व वंदनीय ठरतं. तुकारामांनी ईश्वराकडं जे दान मागितलं ते त्यांच्या विचारशीलतेचं द्योतक आहे. संपत्ती मागणारा सुखी होत नाही. सत्तेचा पाठलाग करणारा कोणीही शांत आणि सुखमय जीवन जगू शकला नाही. निरोगी जीवनासाठी निकोप मनाची आणि दृष्टिकोनाची आवश्यकता असते. तुकारामांनी परमेश्वरच आपल्याला आवडतो असं म्हणून देवत्वाची आराधना या अभंगातून केली आहे.

आदर्श जीवनपद्धतीचा वस्तुपाठ या अभंगातून दिला आहे. यातले विचार नित्यनूतन आहेत. अभद्र बोलणाऱ्या जिभेनं शत्रू निर्माण होतात. पापाच्या दर्शनात आनंद मानल्यामुळं चारित्र्याचा अधःपात होतो. आणि परस्त्रीचा संग मनुष्याला अनेक प्रकारच्या नरकयातना भोगायला लावतो. हे विचार पारंपरिक आहेत पण ते कोणत्याही काळात आवश्यक आहेत. आजच्या आंधळ्या भोगवादी युगात तर या विचारांचं महत्व कुणीच नाकारू शकणार नाही. एड्स सारखा भयानक रोग ही आजच्या भोगलंपट माणसाला मिळालेली दुःखमय देणगी आहे. पुढील जन्मीचा नरक आपण पाहिलेला नाही. पण या जन्मीच या रोगाच्या संसर्गानं नरकयातनेत बुडालेले शेकडो रोगी पाहायला मिळतात. अशावेळी संतश्रेष्ठ तुकोबांचे शब्द पुन्हा पुन्हा आठवतात. 'पापाची वासना नको दावू डोळां ' ही पापभीरू इच्छा सर्वांच्या अंतःकरणात फुलून आली तर नरकाचं रुपांतर नंदनवनात होईल यात कसला संशय ?

❑❑❑

**नव्हे जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई ॥**
**बळिया माझा पंढरिराव । जो या देवांचाही देव ॥**
**रंडी चंडी शक्ति । मद्यमांसाते भक्षिती ॥**
**बहिरव खंडेराव । रोटी सुटी साठी देव ॥**
**गणोबा विक्राळ । लाडू मोदकांचा काळ ॥**
**मुंज्या म्हैसासुरे । हे तो कोण लेखी पोरे ॥**
**वेताळे फेताळे । जळो त्यांचे तोंड काळे ॥**
**तुका म्हणे चित्ती । धरा रखुमाईचा पती ॥**

वारकरी पंथानं पंढरीचा विठ्ठल हे दैवत मानून त्याची निष्ठेनं आराधना केली. खरं तर देव एकच आहे. पण अज्ञानी लोकांनी अनेक दैवतं मानून त्यांची पूजा-अर्चा करायला सुरुवात केली. देवकल्पना अज्ञानातून उत्पन्न झाली असेल तर ती वस्तुतः व्यर्थ आहे. एखाद्या देवाला किंवा देवीला मद्यमांसाचा नैवेद्य दिला जातो. जे दैवत बळी मागत, एखाद्या पशूचा प्राण घेऊन त्याच्या मांसाच्या नैवेद्याची अपेक्षा करतं त्याला दैवत कसं म्हणता येईल ? कारण देव हा तर पालनकर्ता, रक्षणकर्ता असतो. तो एखाद्या पशूचा बळी आपल्यासाठी द्यायला सांगणं शक्य आहे का ? देव हे प्रेमाचं, करुणेचं, शक्तीचं आणि ज्ञानाचं सर्वश्रेष्ठ प्रतीक आहे असं आपण मानतो. सकल सृष्टीची निर्मिती परमेश्वरानं केली आणि तो परमात्मा या सृष्टीचा रक्षणकर्ता आहे. दयेचा आणि क्षमेचा तो मूर्तिमंत अवतार आहे. संतांनी तर ईश्वर हे वात्सल्यमूर्ती आईचं रूप आहे असं म्हटलं आहे. देवत्वाचं हेच यथोचित स्वरूप आहे. पण माणूस अज्ञानी असतो. तो अनेक प्रकारच्या क्षुद्र देवदेवतांची पूजाअर्चा करीत राहातो. कदाचित या मागे त्याच्या मनात असलेली अज्ञानमूलक भीती कारणीभूत असेल. संत तुकारामांनी पांडुरंग हाच एक देव मानलेला आहे. *'तुका म्हणे चित्ती । धरा रखुमाईचा पती ॥'* केवळ विठ्ठल हाच हृदयी धारण करावा. तोच आपल्या भक्तीचा अनन्य विषय व्हावा. विठ्ठलाशिवाय अन्य कुठलंही दैवत प्रमाण मानण्याचं कारण नाही ही एकेश्वरी भूमिका तुकाराम घेतात. बहुदेवोपासनेला त्यांनी ठामपणे विरोध केला आहे. एकेश्वरवाद हे भारतीय तत्त्वज्ञानाचं वैशिष्ट्य आहे. अलंकारिक अर्थानं तेहतीस कोटी देवांची कल्पना मांडली असली तरी

तो विश्वचालक परमात्मा एकच आहे हा विचार वारकरी पंथानं रुजवला. अज्ञानी लोकांना नवस-सायास, तीर्थयात्रा, आणि प्रत्येक दिवशी भिन्न भिन्न दैवताची उपासना यांपासून दूर रहा असा स्पष्ट संदेश दिला आहे. ईश्वर एकच आहे आणि तो न्यायी व दयावत्सल आहे. तो कोणाचा बळी मागत नाही. सर्व विश्वाचा निर्माता आणि रक्षक नैवेद्यासाठी प्राण्यांचा बळी मागेल तरी कसा ?

हा महत्वपूर्ण विचार समाज प्रबोधनाच्या दृष्टीनं आवश्यक आहे. शेंदूर फासलेल्या कोणत्याही दगडाला नमस्कार करणं हे तीव्र अज्ञानाचं लक्षण आहे. आणि त्यातून देवाला मद्य-मांस देऊन संतुष्ट करता येतं हा समज तर विचारहीनतेचा द्योतक आहे. तुकोबा या अभंगात परखडपणानं क्षुद्र देव-देवतांसंबंधी आपले विचार सांगत आहेत. ते म्हणतात, 'जाखाई, जोखाई मायराणी, मेसाबाई ही कसली दैवतं आहेत ? माझा पंढरिराव या देवांचाही देव आहे. रंडी, चंडी, शक्ती यांना मांस आणि मदिरा लागते. खंडोबा, बहिरोबा हे तर खादाड देव आहेत. विक्राळ गणपती हा लाडू मोदकांचा काळ आहे. मुंजाबा आणि म्हैसासुर हे तर पोरकट आहेत, नगण्य आहेत. वेताळ - फेताळ या काळ तोंड्यांचे तोंड जळो, विठ्ठल हेच परमदैवत. एकमेव दैवत.'

अज्ञानी लोकांच्या विकृत देवकल्पनेवर तुकारामांनी केलेली ही टीका अत्यंत अर्थपूर्ण आहे. पण क्षुद्र दैवतांची उपासना आजही चालूच आहे. ही उपासना केली नाही तर आपलं काहीतरी अकल्याण होईल या भयगंडातून सामान्य माणूस जाखाई-जोखाई आणि रंडी, चंडी यांच्यासमोर बकऱ्यांचा बळी देतात. कोंबडी आणि बकरी मागणारी देवता - देवता या संज्ञेला तरी पात्र होईल का ? तुकोबांचा हा अभंग विचार करायला लावणारा आहे. देवाचा अभिषेक कोण्या 'भक्तानं' मदिरेनं केल्याची वार्ता नुकतीच वृत्तपत्रात येऊन गेली. तुकोबांच्या शब्दांत त्या तथाकथित भक्ताला 'मोजूनि माराव्या पैजारा' असंच म्हणणं न्यायसंगत ठरेल. देवविषयक अज्ञानाची ही परिसीमा झाली. मूर्खांच्या देवसंदर्भातल्या कल्पना अशाच केविलवाण्या आणि हास्यास्पद असतात. तुकारामांनी एकेश्वरवादी भूमिका घेऊन लोकांच्या अज्ञानावर कठोर प्रहार केले हे प्रबोधनाच्या दृष्टीने आवश्यकच होते.

❑❑❑

तारुण्याच्या मदें न मनी कोणासी । सदामुसमुसी घुळी जैसा ।।
अटोनी वेठोनी बांधला मुंडासा । फिरतसे म्हैसा जनामधी ।।
हाती दीडपान वरती च मान । नाही तो सन्मान भलियांसी ।।
श्वानाचिये परी हिंडे दारोदारीं । पाहे परनारी पापदृष्टी ।।
तुका म्हणे ऐसा थोर हा गयाळी । करिता टवाळी जन्म गेला ।।

जीवन ही निसर्गानं किंवा परमेश्वरानं दिलेली अमूल्य देणगी आहे. पण नव्याण्णव टक्के लोकांना जीवनाची किंमत कळत नाही. आपलं आयुष्य ते वाऱ्यावर उधळून देतात. ते संपत आल्यावर कदाचित काही जणांना पश्चात्ताप होत असेल. असाध्य रोगानं आजारी पडलेला आणि मरणाच्या घटका मोजत राहिलेला एक माणूस रडत रडत म्हणाला,

'माझ्या वयाला साठ वर्षं उलटून गेली. मी आयुष्यात काय केलं ? काय मिळवलं? जन्मभर जुगारात पैसे उडवले. दारूच्या बाटलीत सारी बुद्धी बुडवून टाकली. कधी विद्वान माणसाचा आदर केला नाही.. आई-बापांची अडगळ नको म्हणून त्यांना घराबाहेर काढलं. देव आणि धर्म यांच्याकडं तर मी जन्मभर पाठ फिरवली. आता मरण जवळ आल्यावर मी किती पापी आहे याचं भान आलेलं आहे. पण आता काय उपयोग ? निघून गेलेले आयुष्यातले दिवस परत मिळणार नाहीत. माझ्या हातांनी माझ्या जीवनाची मीच राखरांगोळी केली.'

तो हुंदके देऊन रडू लागला पण वेळ निघून गेली होती. मृत्यूच्या क्षणी सत् आणि असत् यांचा विवेक करणारी बुद्धी जागी झाली खरी पण ती आता काहीच करू शकत नव्हती. घर जळून गेल्यानंतर बादलीभर पाणी टाकण्यात कोणता शहाणपणा आहे ? या माणसाला निदान मरतेवेळी तरी आपण आयुष्याचं काय केलं याचं ज्ञान झालं. पण बहुसंख्य लोक अज्ञानातच जगतात आणि अज्ञानातच मरून जातात. त्यांच्या जगण्यालाही अर्थ नसतो. जगणं तर अनर्थकारक असतं आणि मरणानंतर सारंच संपून जातं. '*मरावे परी कीर्तीरूपी उरावे*' असं रामदास स्वामींनी म्हटलं. पण व्यसनी, दुराचरणी, घमेंडखोर माणसं जगाच्या आठवणीत राहात नाहीत. कधी आठवण आलीच तर जग त्यांच्या नावावर एक पिंक मारून मोकळं होतं. आपल्या जगण्याला प्रेमाचं आणि धर्माचं, भक्तीचं

आणि नीतीचं अधिष्ठान असावं हे तुकारामांनी अनेक अभंगातून तळमळीनं सांगितलं. या अभंगांत एका मस्तवाल अज्ञानी माणसाचं चित्र उभं करून त्याचा अवघा जन्म कसा व्यर्थ झाला हे त्यांनी सांगितलं आहे.

तुकोबा म्हणतात, 'तो तारुण्यानं उन्मत्त झालेला आहे. माजलेल्या घुळी प्रमाणे सदैव मुसमुसत असतो. कोणालाही मानायला तयार नाही. मदोन्मत्त रेड्याप्रमाणं लोकांत फिरत असतो. हातात नेहमी पानपट्टी आणि घमेंडीनं वर मान करून हिंडत असतो. वडीलधारी माणसं भेटली, एखादी श्रेष्ठ व्यक्ती दिसली तरी त्यांना नमस्कार करीत नाहीत. कुत्र्याप्रमाणं दारोदार फिरतो. आणि परस्त्रिया न्याहाळण्यात आनंद मानतो. याच गोष्टीत सगळा जन्म घालवून त्यानं आयुष्याचं वाटोळं केलं.'

तुकोबांच्या शब्दांत दुराचारी, लंपट माणसाबद्दलची तीव्र चीड व्यक्त झाली आहे. समाजजीवनाच्या झाडावर उगवलेल्या अशा बांडगुळाविषयी कोणत्याही संताच्या मनात उद्वेग उत्पन्न व्हावा हे स्वाभाविकच आहे. अशी माणसं समाजात नको तितकी असतात. यांच्यामुळं सामाजिक वातावरण दूषित होतं. सारी नैतिक मूल्यं पायी तुडवायची आणि माजोरीपणात आयुष्य उधळून टाकायचं हा भयानक गुन्हा आहे. जे आयुष्य परमेश्वरी शक्तीनं आपल्याला मिळतं ते बेजबाबदारपणानं उधळून टाकण्याचा कुणालाच अधिकार नाही. ईश्वरी देणं असलेलं हे जीवन ईश्वरार्पण बुद्धीनं जगता आलं पाहिजे. इतरांना सुख दिल्याशिवाय आपण सुखी होऊ शकत नाही. एवढा सुविचार दुर्जनाच्या मनात कधीच उगवत नाही. स्वैर आयुष्य अविचारानं जगणारी माणसं विनाशाकडं जातात. हा वेडावाकडा रस्ता सोडून सज्जनांच्या, शहाण्यांच्या पाऊलावर पावलं टाकीत गेलं पाहिजे. कारण त्यातच उच्च कोटीचं समाधान लाभणार आहे हा विचार लोकमनात रुजवण्यासाठी संतांचा अवतार असतो.

तुकोबांनीच म्हटलं आहे, *'झाडू संतांचे मारग । आडरानी भरले जग ॥'* 'रस्ते स्वच्छ करणं हे संतकार्य आहे. आडरानात रस्ता चुकलेल्या लोकांची करुणा येऊन संत त्यांना मार्गदर्शन करतात. पण दुर्दैव असं की, साधुसंतांचे शब्द कानावर पडत असूनही ते अज्ञानी लोकांच्या मनापर्यंत पोहोचत नाहीत. मनात परिवर्तन घडतच नाही. म्हणून तुकोबासारख्या संतश्रेष्ठाच्या मनाचा क्षोभ होतो. अनेक वेळा, अनेक प्रकारांनी उपदेश

करूनही ही मूर्ख नतद्रष्ट माणसं सुधारत नाहीत हे पाहून काहीशा वैतागानं ते म्हणतात,

- किती सांगो तरी नाईकती बटकीचे । पुढे सिंदळीचे रडतील ॥
नका नका करु रांडेची संगती । नेवोनी अधोगती घाली राम ॥
तुका म्हणे जरी देवीं नाही चाड । हाणोनी थोबाड फोडी काळ ॥

आपल्या शब्दांच्या गोफणीतून तुकोबांनी फेकलेले हे दगडधोंडे दुर्जनांचा स्वभाव बदलू शकतील का ? स्वतः तुकोबा या बाबतीत निराश आहेत. म्हणून ते म्हणतात काळच यांचं थोबाड फोडील. काळ हा सर्वांची परीक्षा घेतो. त्याच्या सारखा न्यायानिष्ठुर परीक्षक दुसरा कुणीच नाही. यौवन, धनसंपत्ती आणि अधिकार यांची प्राप्ती झाली की आता आपण सर्वश्रेष्ठ झालो आता जगात आपल्याला आव्हान देणारी शक्ती उरलेली नाही असल्या उन्मत्त विचारांच्या वलयात अनेक माणसं गुरफटून जातात. काळपुरूष त्यावेळी हसत असतो. हळूहळू म्हातारपण स्वार होतं. बाहेरचा अधिकार तर संपलेलाच असतो पण घरातही हा म्हातारा उपहासाचा आणि उपेक्षेचा विषय होऊन बसतो अनेक रोग हल्ला चढवतात. त्यावेळी मात्र पश्चात्तापची लाट त्याच्या मनात उचंबळते. एकेकाळचा हा मदोन्मत्त प्राणी गलितगात्र होऊन देवळाचे उंबरठे झिजवतो. हे चित्र बदलायचं असेलं तर जीवनात भक्ती, शांती आणि माणुसकी असावी हाच संतांचा जीवनविचार आहे.

❑❑❑

**जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचे । अंत हे काळीचे नाही कोणी ।।**
**जाल्या हीन शक्ति नाक डोळे गळती । सांडोनि पळती रांडापोरे ।।**
**बाइल म्हणे खर मरता तरी बरे । नासिले हे घर थुंकोनिया ।।**
**तुका म्हणे माझी नव्हतील कोणी । तुज चक्रपाणी वाचूनिया ।।**

या अभंगात मनाला विषण्णता देणारं एक दाहक सत्य तुकोबांनी सांगितलं आहे. आपल्याला वाटतं की, आपले आप्तनातलग आहेत, इष्टमित्र आहेत. बायका मुलं आहेत. आपण एकटे नाही, त्यांचा प्रेमळ सहवास आपल्याला जगवतो. पण खरोखरच हे स्वजन आहेत काय? त्यांच्या मनात आपल्याविषयी कितपत आपुलकी असते ? आप्तनातलगांना आणि जवळच्या मित्रांना आपली खरोखरच सर्वार्थानं जरूर असते काय ? या प्रश्नाचं उत्तर तुकोबांनी दिलं आहे. ते म्हणतात, 'जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचे' सुखात ते आपल्याबरोबर असतात. सुखाची देवाण-घेवाण ते करतात. पण अंतकाळी मात्र आपलं कुणीही असत नाही. त्यांचं प्रेम आणि आपुलकी स्वार्थमूलक असते. स्वतःसाठी म्हणून ते आपल्या जवळ आलेले असतात. अंतकाळी सारे दूर निघून जातात. अखेरचा प्रवास आपल्याला एकट्यानंच करणं भाग पडतं. हा तुकोबांचा अभिप्राय कडवट असला तरी तो संपूर्णपणानं खरा आहे. सुखसंपत्तीचे सारे भागीदार असतात. दुःख आलं की सर्वजण ती भागीदारी तोडून टाकतात. ही जगाची ठरलेली नीती आहे.

उपनिषदात याज्ञवल्क्य-मैत्रेयी संवादात याज्ञवल्क्यानं हेच विदारक सत्य सांगितलं आहे. तो म्हणतो,

'न वा अरे पत्युः कामाय पति : प्रियो भवति,
आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति,
न वा अरे जायायाः कामाय जाया प्रिया भवति,
आत्मनस्तु कामाय जाया प्रिया भवति'

पतीसाठी म्हणून पती प्रिय होत नाही तर तो स्वतःसाठी म्हणून प्रिय होतो. पत्नीसाठी म्हणून पत्नी प्रिय होत नाही स्वतःसाठी म्हणूनच ती प्रिय होते-असा या वचनाचा अर्थ. जीवनाचा विचारच स्वार्थमूलक आहे. स्वार्थासाठी जे आवश्यक ते प्रिय होतं. स्वार्थाला साहाय्यक नसेल ते अप्रिय होतं. सुखाची सावली असेल तोपर्यंत आप्तस्वकीय आपल्याबरोबर उभे राहतात. दुःख संकटाचं उन पडल्यावर सगळे सोडून निघून जातात. हा सार्वत्रिक

अनुभव आहे. जीवनाचं निरीक्षण करणाऱ्या तुकोबांच्या सूक्ष्म दृष्टीला हे पाहायला मिळावं यात आश्चर्य नाही. ते पुढं म्हणतात, म्हातारपण येऊन शक्ती क्षीण झाली की आपल्याबरोबर कोणी नीट वागत नाही. आपण सगळ्यांच्या तिरस्काराचा विषय होतो. साध्या सहानुभूतीला सुद्धा महाग होतो.
'सांडोनि पळती रांडापोरे' फार काय बायको सुद्धा आपल्याला विटून जाते. आपल्या मरणाचीच जणू जवळचे लोक वाट पाहतात. अशा परिस्थितीत हे परमेश्वरा तुझ्याशिवाय माझं कोण आहे ? तो परमेश्वर मात्र सदैव आपल्या बरोबर असतो. इथं परमेश्वर याचा अर्थ धर्म असाच केला पाहिजे. ज्यानं धर्मावर प्रेम केलं, ज्यानं रंजल्यागांजल्यांना पोटाशी धरलं, ज्यानं हृदयात सदैव पांडुरंगाला स्थान दिलं, जो नीतीनं जगला त्याचा अंतकाळी एकमेव समर्थ आधार म्हणजे परमेश्वर असतो. तोच त्याला आपल्याठायी आश्रय देतो. म्हणून माणसानं आपल्या जीवनाचं अधिष्ठान केवळ परमेश्वर आहे हेच समजावं. साऱ्या विश्वाचा निर्माता आणि रक्षणकर्ता असलेला हा चक्रपाणी हाच खऱ्या अर्थानं स्वकीय असतो. बाकीचे सगळे परकीय असतात. झाडाची फळं गळून पडल्यावर पाखरंसुद्धा त्या झाडाकडं पाहात नाहीत. त्याप्रमाणं लोक असतात. दयाघन परमेश्वर मात्र इहलोकात आणि परलोकात आपला पाठीराखा असतो. म्हणूनचं तुकोबा म्हणतात, *'जेथे जातो तेथे देवा तू माझा सांगाती'*

सुखदुःखांचं रहाटगाडगं सारखं फिरत असतं. सुखाचे दिवस कमी. दुःख मात्र नको तितकं माणसाच्या पदरात पडतं. अनुकूल दिवस असले की त्याच्या भोवती सर्वजण प्रदक्षिणा घालतात. परिस्थितीचं वारं बदललं की जवळची माणसं सुद्धा दूर दूर निघून जातात. हा अनुभव सर्वांनाच केव्हा ना केव्हा अवश्य येतो. त्यातून माणसाच्या आयुष्यातले अखेरचे दिवस त्याला अधिकच तापदायक वाटू लागतात. अशा वेळी कुणीतरी जवळ असावं असं वाटतं. त्यावेळी कोणी वाऱ्यालाही फिरकत नाही. हे ज्वलंत सत्य जीवनाचं स्वरूप स्पष्ट करतं. पोटचाही विचारीत नाही आणि पाठचाही समजून घेत नाही. अशावेळी जगणं हा देखील एक भयानक शाप वाटतो. आपणच आपल्या प्रेताला खांदा द्यायचा असतो यात अतिशयोक्ती काही नाही. कोणी कोणाचे असत नाही. अंतकाळीचे तर कुणीही कुणाचे राहात नाही. तुकोबांचा हा विचार अस्वस्थ करणारा आहे. असे अनेक अंतर्मुख करणारे चिंतनाचे झरे त्यांच्या अभंगवाणीत सापडतात. तुकोबांची कविता म्हणजे जीवनाच्या प्रकृतीवर केलेलं भाष्य आहे.

□□□

**तीळ जाळिले तांदूळ । काम क्रोध तैसेचि खळ ।।**
**का रे सिणलासी वाउगा । न भजता पांडुरंगा ।।**
**मानदंभासाठी ।केली अक्षरांची आटी ।।**
**तप करूनि तीर्थाटन । वाढविला अभिमान ।।**
**वाटिले ते धन । केली अहंता जतन ।।**
**तुका म्हणे चुकले वर्म । केला अवघाचि अधर्म ।।**

तुकारामांनी कर्मकांडावर अनेक ठिकाणी प्रखर टीका केली आहे. भक्ती बाजूला राहून कर्मकांडाचं स्तोम कर्मठ लोकांनी वाढवून ठेवलं. होमहवन, जपजाप्य, सोवळं-ओवळं, तीर्थयात्रा अशा अनेक आचारात बुडून गेलेल्या लोकांना त्यांनी आंतरिक तळमळीनं उपदेश केला आहे. कर्मकाण्डात भक्तीपेक्षा अहंकार विशेषत्वानं असतो. होमहवनात तीळतांदूळ जाळत बसलेले तथाकथित धार्मिक लोक तुकोबांच्या उपहासाचा विषय झाले आहेत. ज्याची भक्ती विशुद्ध आहे त्याला आचारांचं, कर्मकाण्डाचं अवडंबर माजवण्याचं काहीच कारण नाही. स्वतः तुकोबांचं समग्र जीवन शुद्ध निरामय होतं. होमहवन आणि तीर्थयात्रा करण्यानं परमेश्वर प्राप्त होतो असं मानणाऱ्या अज्ञानी लोकांवर टीका करताना त्यांनी म्हटलं आहे, *'तीर्थी धोंडा आणि पाणी ! देव रोकडा सज्जनी !'* हा विचार आजही अनेक भाबड्या भाविकांना धक्का देणारा वाटतो. तीर्थक्षेत्री काय असतं? धोंडा आणि पाणी ! देवत्वाचा निवास सज्जनांच्या ठायी असतो. ईश्वर जीवमात्राच्या ठिकाणी राहिलेला आहे. *'देव आहे अंतर्यामी । व्यर्थ हिंडे तीर्थग्रामी'*।। सृष्टीत भरून उरलेला देव ज्याला ओळखता येत नाही त्यानं होमात तीळ-तांदूळ जाळले म्हणून तो परमात्मा त्याला कसा भेटेल ? आपल्या अंतरातच वास्तव्य करून राहिलेला परमात्मा भक्तीनं आणि ज्ञानानं ओळखता यावा. यज्ञ केल्यामुळं तो कसा दिसणार ?

संत तुकाराम हे बुद्धिवादी होते. तीळतांदळाचं हवन करून समाधान मानणाऱ्या कर्मठांचा त्यांनी उपहासपूर्वक निषेध करावा यात आश्चर्य नाही. तीळ तांदूळ जळून जातात. पण होम करणाऱ्याच्या मनातले कामक्रोधासारखे विकार अभंग राहातात. 'पांडुरंगाची भक्ती न करता होमहवन करून तू कशासाठी शिणतोस' असा स्पष्ट सवाल

तुकोबांनी विचारला आहे. कारण खरा होम आपल्या अंतःकरणाच्या वेदीवर करायचा असतो. या होमात मनातल्या वासना आणि विकार जाळायचे असतात. ईश्वराची निष्काम भक्ती करायची असते. लोभ, मत्सर, ईर्ष्या, द्वेष, शत्रुत्व या साऱ्या गोष्टी निग्रहपूर्वक जाळाव्या लागतात. हाच खरा यज्ञ. हेच खरं हवन. केवळ धान्य जाळून केलेला होम अहंकार मात्र वाढवतो. तीर्थाटन करणं, यज्ञं करून धन वाटणं-याच्या पाठीमागं आपल्याला प्रतिष्ठा मिळावी, समाजानं मानमान्यता द्यावी हीच अहंकारमूलक इच्छा असते. अहंगंड वाढवणारे हे होम आणि यज्ञ एका अर्थानं परमेश्वरापासून दूर नेतात. जो परमेश्वराचा भक्त आहे त्याला कोणत्याही कर्मकांडात रस वाटणं शक्य नाही. खोट्या भक्तीची भपकेदार जाहिरात करण्यात काय अर्थ आहे ? 'वाढविला अभिमान, केली अहंता जतन'म्हणून तुकोबा म्हणतात, 'तुका म्हणे चुकले वर्म । केला अवघाचि अधर्म।' निरर्थक कर्मकांड हे अखेर अधर्माच्या आणि अहंकाराच्या वाटेनं घेऊन जातं. म्हणून त्यांनी या गोष्टीवर परखडपणानं टीका केली आहे. ईश्वर होम करण्यानं आणि तीळ-तांदूळ जाळण्यानं मिळत असता तर फारच सोपी गोष्ट ठरली असती. ईश्वराला धनधान्य नको. त्याला कोणत्याही प्रकारचं अवडंबर नको. त्याला फक्त निरपेक्ष भक्ती पाहिजे असते.

*'पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छती। तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मन : ॥'* -असं गीतेत श्रीकृष्णानं म्हटलं आहे. 'पान, फूल, फळ फार काय पाणी सुद्धा जो मला भक्तीनं देतो. त्याची भक्ती मला तृप्त करते. मी केवळ भक्ती जाणतो.' अशा परमेश्वराला यज्ञाची आणि होमहवनाची काहीच जरुर नाही. विदुराघरच्या कण्या तो आवडीनं खातो. द्रौपदीनं दिलेलं भाजीचं पान खाऊन तो संतुष्ट होतो. शबरीची बोरं तो आनंदानं चाखतो. त्याच्यासाठी होमात तीळ तांदूळ जाळत बसण्याचं काहीच कारण नाही. तुकोबांनी भक्तिभावनेचं माहात्म्य या अभंगात गायिलं आहे. भक्ताचं मन निर्विकार निरहंकारी बनत जावं हीच तुकोबांची अपेक्षा आहे. म्हणून यज्ञ किंवा होम करणाऱ्या अहंकारी कर्मठ लोकांना त्यांनी हा हितोपदेश केला आहे.

❑❑❑

**सेवितो हा रस वाटितो आणिकां । घ्या रे होऊ नका राणभरी ॥**
**विटेवरी ज्याची पाउले समान । तोचि एक दानशूर दाता ॥**
**मनाचे संकल्प पाववील सिद्धी । जरी राहे बुद्धी याचे पायी ॥**
**तुका म्हणे आज धाडिले निरोपा । मारग हा सोपा सुखरूप ॥**

संतांचं जीवन सर्वांच्या कल्याणासाठी असतं. *'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारे ॥'* हे तुकोबांचेच वचन आहे. अवघाचि संसार सुखाचा करून त्रैलोक्य आनंदानं भरून टाकण्याची प्रतिज्ञा ज्ञानेश्वरांनी केली आहे. कीर्तनाच्या रंगात नाचणारे नामदेव 'ज्ञानदीप लावू जगी' या भावनेनं भारलेले असतात. संत स्वतः जगतात आणि जगाला उत्तम जीवनाचा मंत्र देतात. त्यांची वृत्ती समाजनिष्ठ असते. जो केवळ आत्मनिष्ठ असतो, स्वतःच्या पलीकडे ज्याची दृष्टी पोहोचत नाही तो कितीही ज्ञानी असला तरी संत मात्र होऊच शकत नाही. स्वार्थ गळून गेला आणि परमार्थाचा भाव जागा झाला म्हणजेच संतत्व उदयाला येतं. तुकारामांचे अभंग समाजमनाशी संवाद करणारे आहेत. आडरानी भरलेलं जग पाहून त्यांनी लोकहितासाठी रस्ता स्वच्छ करून त्याला योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न केला. सर्वच संतांचं हे उद्दिष्ट असतं.

तुकारामांनी ईश्वरभक्तीतला आनंदरस मनःपूर्वक चाखला आणि हा मधुर अनुभव आणखी अनेकांनी घ्यावा यासाठी आपल्या अभंगांतून त्याचा आविष्कार केला. प्रत्येक अभंग रसपूर्ण आहे. हृदयाला तो केवळ स्पर्श करीत नाही तर हृदयाचं सामर्थ्य वाढवतो. नवी दृष्टी देतो. आपल्या अभंगात ही शक्ती आहे याची जाणीव तुकोबांनाही आहे. म्हणूनचं त्यांनी म्हटलं आहे, 'अरे, हा प्रेमरस मी अनुभवतो. तुम्हालाही तो आनंदानं देत आहे. तो स्वीकारा. हा ब्रह्मरस तुमचं जीवन बदलून टाकील. निष्कारण रानभरी होऊ नका. स्वैर भटकू नका. विटेवर स्थिर उभा असलेला तो दाता आपल्याला दान देत आहे. त्याच्यावर श्रद्धा ठेवाल तर तुमच्या मनाचे संकल्प सहज सिद्धीला जातील परमेश्वरानंच तुम्हाला सांगण्यासाठी मला हा निरोप दिला आहे. हा सुलभ आणि सुखकारक मार्ग तुम्ही प्रमाण मानला पाहिजे.'

तुकोबांच्या ह्या शब्दांत नम्रता आणि आत्मविश्वास आहे. जनतेला हिताची वाट दाखवण्याची उत्कट ऊर्मी आहे. आपल्या अनुभवातून हा संत बोलत आहे. लौकिक

दृष्टीनं पाहिलं तर तुकोबाच्या आयुष्यात काय होतं ? ना सत्ता, ना संपत्ती, ना सामाजिक प्रतिष्ठा. विठ्ठलाचा नामगजर करणारा आणि रसाळवाणीनं कीर्तन करणारा एक कीर्तनकार. पण भजन-कीर्तनाच्या माध्यमातून तुकोबांनी दिव्यानंदाची जी अनुभूती घेतली तिच्यात साऱ्या समाजाला वाटेकरी केलं पाहिजे असं त्यांना तीव्रतेनं वाटलं. भक्तिप्रेमाचा आनंद न मिळाल्यामुळं माणसं जन्मभर सुखासाठी रानावनातून भटकत असतात. तुच्छ गोष्टीत सुख सामावलेआहे या कल्पनेमुळं क्षुद्र गोष्टींना अकारण महत्त्व देऊन स्वतःला दुःखी करून घेतात. नामसंकीर्तनात, विठ्ठलाच्या दर्शनात, त्याच्या भजनात विलक्षण सुख असतं याची जाणीवच या लोकांना नसते. वखवखलेल्या वृत्तीनं भटकणाऱ्या मानवतेला पांडुरंगाच्या पायी आपली बुद्धी स्थिर करा हा उपदेश तुकोबांनी आपल्या अनुभवातून दिला आहे. संतांचा उपदेश म्हणजे आत्मानुभूतीचा आविष्कार असतो. जे आपण सांगतो ते ग्रंथातून सांगण्यापेक्षा अनुभवातून सांगितलं पाहिजे ही त्यांची भूमिका असते. म्हणूनच तुकोबा म्हणतात, भक्तिरसाचं सेवन स्वतः केल्यानंतर तो रस मी सर्वांना देत आहे. मनीचे संकल्प पूर्ण करण्याची संधी विठ्ठलचरणी बुद्धी स्थिर ठेवल्यामुळं मिळू शकेल. सुखाचा हा सोपा उपाय या अभंगातून त्यांनी सांगितला आहे. आपल्या आराध्य दैवताच्या एकाग्र उपासनेत मनातली सारी दुःखदैन्यं नाहीशी करण्याची शक्ती असते. श्रद्धापूर्वक ही आराधना मात्र केली पाहिजे. परमेश्वराचा हा निरोप सांगण्यासाठी मला त्यानं पाठवलं आहे हे तुकोबांचं म्हणणं त्यांच्या दृढ भक्तिभावाचं निदर्शक आहे. आपल्या स्वरूपीचा आनंद जगाला देण्याचं महाकार्य या संतानं केलं म्हणूनच तुकाराम लोकहृदयात चिरंतन स्थान मिळवून बसले.

सर्व रसांत श्रेष्ठ रस कोणता ? भक्ती आणि प्रीती. सर्वांविषयी प्रेम आणि ईश्वरासंबंधी भक्ती असलेला भक्त रसमय जीवन जगू शकतो. संतांच्या जीवनातलं खरं वैभव या दोन रसांत सामावलं आहे. प्रेम आणि भक्ती हीच श्रेष्ठ संपत्ती. ही नसेल तर भौतिक ऐश्वर्याला काही अर्थ उरत नाही. म्हणूनच या स्वार्थी जगाला तुकाराम आपल्या हृदयीचा प्रेमरस देत आहेत.

❑❑❑

**गंधर्वनगरी क्षण एक न राहावे । तैंचि करावे मूळ क्षेत्र ।।**
**खपुष्पाची पूजा बांधोनि निर्गुणा । लक्ष्मीनारायणा तोषवावे ।।**
**वंध्यापुत्राच्या लग्नाचा सोहळा । आपुलियां डोळां पाहो वेगी ।।**
**मृगजळा पाहे घालूनि सज्ञाना । तापलिया जना निववावे ।।**
**तुका म्हणे मिथ्या देहेंद्रिय कर्म । ब्रह्मार्पण ब्रह्म होय बापा ।।**

तुकारामांचा हा अभंग चमत्कृतिपूर्ण अर्थानं भरलेला आहे. अर्थाची चमत्कृती साधणं कविप्रतिभेला आवडतं. कवीची प्रतिभा कधीकधी शब्दांचा आणि कल्पनांचा गमतीदार खेळ करीत अर्थसौंदर्य निर्माण करते. तुकाराम हे एक प्रतिभावंत कवीश्वर आहेत. त्यांचे बहुतेक अभंग सरळ अर्थाचे असतात. औचित्यपूर्ण दृष्टांत देऊन आपल्याला काय सांगायचं ते सुबोध भाषेत व्यक्त करतात. ते लोकांचे कवी आहेत. पंडितांचे नव्हे. पण या लोककवींनं आपल्या काव्यात जीवनविषयक जे ज्ञान ओतलं तसं कार्य पंडित म्हणवणाऱ्या कवीलाही करता आलेलं नाही. कवित्व जणू तुकारामांच्या रक्तातूनच वाहात होतं. या अभंगातली दृष्टान्तमाला लक्षणीय आहे. ते म्हणतात, आकाशातली ढगांची सुंदर सृष्टी म्हणजे गंधर्वनगर आहे. त्या गंधर्वनगरीत आपण निवासस्थान करावं. पण ही गंधर्वनगरी स्थिर कुठं आहे? ती फार लवकर नाहीशी होते. आकाशपुष्पांची माळ करून लक्ष्मीनारायणाची पूजा करता येईल का? कारण आकाशाला फुलं लागत नाहीत. वांझेच्या मुलाचा लग्नसोहळा आपण आपल्या डोळ्यांनी पहावा. पण हे शक्य होईल का? कारण वंध्येला पुत्र कसा होणार ? मृगजळाची पाणपोई घालून तहानलेल्या लोकांना तृप्त करता येईल का? अरे ! हे सर्व खोटं आहे. म्हणून देहासंबंधीची इंद्रियाची सर्व कर्मे खोटीच आहेत. ती ब्रह्मार्पण करून तू ब्रह्मरूप हो.

ढगांची गंधर्वनगरी, आकाशपुष्पांनी केलेली पूजा, वंध्यापुत्राचा विवाहसोहळा आणि मृगजळाची पाणपाई या केवळ कल्पना आहेत. त्यांना वास्तवाचा लेशमात्रही आधार नाही. जे मुळातच निराधार, काल्पनिक आहे ते सत्य कसं ठरेल? अशक्य गोष्टी एकत्र आणून त्या शक्य होतील का? असा प्रश्न करण्यातच उत्तर अभिप्रेत आहे. अशा प्रकारचे दृष्टान्त देऊन प्रश्न उभे केले म्हणजे ऐकणाऱ्याच्या मनावर त्याचा अधिक परिणाम होतो. अमुक व्यक्ती शहाणी होईल का? या प्रश्नाचं उत्तर एक कवी देतो 'होय, जरूर

होईल. जेव्हा सशाचं शिंग सापडेल, समुद्राचं पाणी गोड होईल, चंद्रकिरणांतून आगीचा वर्षाव होईल आणि विंचवाच्या नांगीनं गुद्गुल्या होतील तेव्हा ही व्यक्ती शहाणी होईल.' हे सांगण्यात चमत्कृती तर आहेच पण या पद्धतीमुळं कथनात परिणामकारकता येते. इंद्रियांची कर्मे तुकोबांच्या मते मिथ्या आहेत. त्या कर्मांचा अहंकार बाळगू नये. ती ब्रह्मार्पण म्हणजे ईश्वरार्पण करावीत. त्या कर्मांविषयी आसक्ती ठेवू नये. स्वकर्मकुसुमांनी परमेश्वराची पूजा करावी. याचा अर्थ देहविषयक आणि कर्मविषयक अभिलाषा बाळगू नये. निःशंक आणि निरहंकारी झाल्याशिवाय ईश्वराची प्राप्ती होऊ शकत नाही हा विचार दृढपणे सांगण्यासाठी वरील चमत्कृतिपूर्ण दृष्टांत तुकोबांनी घेतले. ते स्वतः उत्तम कीर्तनकार होते. त्यामुळं आपला विचार जनसमूहाला कसा पटवून द्यावा हे कौशल्य त्यांच्या ठायी बाणलेलं होतं. ज्ञानेश्वर, नामदेव आणि एकनाथ यांचे ग्रंथ त्यांनी अभ्यासिले होते. कवित्वाचंही वरदान त्यांना लाभलेलं होतं. त्यामुळे बुद्धीचं रंजन करता करता परमार्थाचा विचार श्रोत्यांच्या गळी कसा उतरवावा याची त्यांना कल्पना होती.

गीतेत श्रीकृष्णानं अर्जुनाला असाच उपदेश केला आहे. आपली सर्व कर्मे ब्रह्मार्पण बुद्धीने केल्यास ती कर्त्याला बाधक होत नाहीत. हे ईश्वराचे आहे असा अलिप्ततेचा भाव ठेवून ते कर्म त्यालाच अर्पण करण्याची ही भूमिका मनुष्याला अध्यात्माच्या उंच पायरीवर नेते. आपली कर्मे देवाला अर्पण करायची म्हटल्यावर ती पवित्र आणि शुद्ध असावीत हे बंधन अपरिहार्यपणे येते. जीवन सफल करण्याची हीच एकमेव पद्धती आहे. कर्मसंन्यास घेऊ नये. कर्म हे अपरिहार्य, अटळ आहे. पण ते निरभिलाष वृत्तीनं आणि ईश्वरसमर्पित बुद्धीनं केलं तर ते बंधक होत नाही. वंध्येला जसा पुत्र होत नाही त्याप्रमाणं निष्काम कर्म कर्त्याला बांधून टाकीत नाही.

❑❑❑

**गुळ सांडुनि गोडी घ्यावी । मीठ सांडुनि चवि चाखावी ।।**
**ऐसा प्रपंच सांडुनि द्यावा । मग परमार्थ जोडावा ।।**
**साकरेचा नव्हे ऊस । आम्हां कैचा गर्भवास ।।**
**बीज भाजुनि केली लाही । जन्ममरण आम्हां नाही ।।**
**आकारासी कैचा ठाव । देह प्रत्यक्ष जाला वाव ।।**
**तुका म्हणे अवघे जग । सर्वां घरी पांडुरंग ।।**

मनुष्य संसारात गुरफटला की त्याची सुटका होणं अत्यंत कठीण असतं. संसाररूपी नदीत अनेक भोवरे असतात. पोहणारा मनुष्य भोवऱ्यात सापडला की त्यातून त्याला बाहेर पडणं सर्वस्वी अशक्य असतं. प्रपंच हा एक चक्रव्यूह आहे. त्यात प्रवेश करणं सोपं असलं तरी त्यातून बाहेर पडणारे फार थोडे लोक असतात. बहुतेकांची अवस्था चक्रव्यूहात सापडलेल्या अभिमन्यू सारखी होते. संसार ही एक दुस्तर अशी नदी आहे. पैलतीराकडं जाण्याची धडपड करणारा माणूस प्रवाहाच्या वेगवान धारेत सापडतो आणि कोणत्या तरी विनाशाच्या किनाऱ्याला लागतो. साधुसंतांनी या दुर्धर प्रपंचाचं निरीक्षण केलं, परीक्षण केलं. काही संत पूर्वावस्थेत भोवऱ्यातही सापडले होते पण आपल्या उत्कट मनोबलामुळं ते त्यातून बाहेर पडले. सुरक्षित किनाऱ्यावर आले आणि मग प्रपंचाच्या मोहात फसलेल्या समाजाला त्यांनी वात्सल्यानं संदेश दिला 'भिऊ नका, धीर धरा. हा प्रपंचाचा पाश हळूहळू युक्ति-प्रयुक्तीनं सोडवता येईल. निराश होऊ नका. त्याच्या मोहाच्या जाळ्यात अडकू नका.' हा संदेश जेव्हा तुकोबासारखा एखादा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला निःस्पृह संत आपल्या स्पष्ट वाणीनं सांगतो तेव्हा त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहात नाही. कारण त्यांनी संसारातले चढउतार पाहिले होते. प्रापंचिक अनुभवांनी ते होरपळून गेले होते. अनुभवाच्या बळावर आता ते उपदेश करू शकत होते.

ते म्हणतात, 'गूळ सोडून गोडी घेता आली पाहिजे आणि मीठ टाळून चव चाखता आली पाहिजे. प्रपंच सोडून परमार्थ जोडता आला पाहिजे.' आता प्रश्न असा उद्‌भवतो की गोडी तर चाखायची तर गूळ कसा सोडून द्यायचा ? मीठ सोडून चव कशी घ्यायची? ही काही तरी विसंगती दिसते. पण यात एक आंतरिक संगती आहे. गुळाच्या गोडीत अडकून पडायचं नाही. अलिप्तपणानं त्या रूचीकडं पाहायचं. गोड आहे म्हणून त्याच्या

आहारी जायचं नाही. संसारातल्या सुखदुःखांकडं तटस्थपणानं पाहाण्याची स्थितप्रज्ञता अंगी बाणवता आली पाहिजे. तुकोबांनी आपली प्रापंचिक दुःखं आणि सुखं एकप्रकारच्या निर्लेप वृत्तीनं स्वीकारली. त्या सुखदुःखात ते बुडून गेले नाहीत. संसारी असावे, असोनी नसावे. कमळाच्या पानावर पाण्याचा थेंब असतो पण तरीही पानापासून तो अलिप्त असतो. माणसं सुखदुःखांत लिप्त होतात. त्यातूनच अनर्थाची निर्मिती होते. लोकमान्य टिळकांचा मुलगा प्लेगाच्या साथीत मरण पावला. अंत्यक्रियेनंतर टिळक घरी आले आणि अग्रलेख लिहू लागले. सांत्वनाला आलेल्या एका गृहस्थानं विचारलं, 'या अवस्थेतही तुम्ही लेखन करतां?' टिळक म्हणाले, 'दुःखाचे प्रसंग येतात.  ते शांतपणे स्वीकारावेत. कारण असे प्रसंग येतात आणि जातात. आपण मात्र स्थिर राहावं. सुख आणि दुःख स्वीकारताना त्यांच्या स्वाधीन होऊ नये.' तुकारामांनी म्हटलं आहे, 'बीज भाजुनी केली लाही, जन्म मरण आम्हां नाही.' भाजलेल्या बीजातून अंकुर निर्माण होत नाहीत त्याप्रमाणं ज्या कर्मात लिप्तता नाही, उदासीनता आहे ती कर्मे निर्मूल होतात. आम्ही जन्म आणि मरण या दोहोंच्याही पलीकडे गेलो आंहोत. अवघ्या जगात असलेला पांडुरंग आता आम्ही पाहू शकतो. आंता देहच पांडुरंग बनला. प्रपंच उरला नाही. सारं जीवन परमार्थमय झालं. या प्रकारची अवस्था भक्ताला, निष्काम कर्मयोग्याला अनुभवतां येते. तो सर्वत्र असूनही कुठेच गुंतलेला नसतो. प्रपंचालाच त्यानं परमार्थाचं अधिष्ठान दिलेलं असतं. यशस्वी प्रपंचाचा हा मार्ग तुकोबांनी या अभंगातून सांगितला आहे.

सुखी जीवन जगण्याचा हा मूलमंत्र नव्हे काय? एक प्रकारची उच्च तटस्थ वृत्ती बाणवल्याशिवाय समाधानाची अनुभूती येऊ शकत नाही. लिप्ततेपेक्षा अलिप्तपणा हाच मानसिक संतुलनाला व समाधानाला पोषक ठरतो.

❑❑❑

**हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।**
**गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ।।**
**न लगे मुक्ति आणि संपदा । संत संग देई सदा ।।**
**तुका म्हणे गर्भवासीं । सुखे घालावे आम्हांसी ।।**

परमेश्वराला काय मागावं? बहुसंख्य लोक देवाकडं पैशाअडक्याची सोन्यानाण्याची, घरादाराची आणि अधिकाराच्या जागेची मागणी करतात. देवाची पूजा अर्चा केली म्हणजे तो प्रसन्न होऊन आपल्या सर्व इच्छा पूर्ण करतो अशी त्यांची अज्ञानी समजूत असते. ईश्वराकडं क्षुद्र भौतिक गोष्टींची मागणी सामान्य माणसं करतात. चोर, दरोडेखोर सुद्धा आपल्या कामात यश मिळावं म्हणून देवाला नवस बोलतात.सर्वकाळ स्वार्थाच्या विचारातच गळ्यापर्यंत बुडालेल्या लोकांना सर्वशक्तीमान अशा परमात्म्यापाशी काय मागावं याची अक्कल नसते. कोणी नोकरी मिळावी म्हणून, कोणी पगारवाढ मिळावी म्हणून तर कोणी निवडणुकीत विजय मिळावा म्हणून परमेश्वराची करुणा भाकतो. ज्या भक्तीच्या मागे स्वार्थ लपलेला आहे ती भक्ती खऱ्या अर्थानं भक्तीच असू शकत नाही. श्रेष्ठ भक्त निरपेक्ष असतो. तुकोबांनीच म्हटलं आहे, *'ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती ।।'* शुद्ध भक्ती स्वार्थी विचारापासून अलिप्त असते. कारण उत्कट भक्ताला स्वार्थ उरलेला नसतो. त्याच्या मनात लाभहानीचा विचार नसतो. त्यानं आपलं सर्वस्व परमेश्वरचरणी निष्काम बुद्धीनं समर्पित केलेलं असतं. तुकोबांची भक्ती उच्चकोटीची होती. सुदाम्याची कृष्णप्रीती अशीच निष्काम स्वरूपाची होती. मनात कसलीही स्वार्थी आकांक्षा न ठेवता रानंवनं तुडवीत रात्रंदिवस प्रवास करीत आंतरिक उमाळ्यानं श्रीकृष्णाला भेटण्यासाठी तो द्वारकेला पोहोचला. त्या जगदीश्वराजवळ, भक्तांची कामना पूर्ण करणाऱ्या त्या भक्तवत्सल परमात्म्याला त्यानं काहीही मागितलं नाही. सकाम भक्ती हा भक्तीचा एक प्रकार असला तरी तो अत्यंत कनिष्ठ प्रतीचा आहे. म्हणूनच कोणताही संत स्वार्थी उद्दिष्टासाठी ईश्वरभक्ती करीत नाही. तुकोबा सर्व व्यक्तिगत स्वार्थाच्या पलीकडं गेलेले परमेश्वराचे एकनिष्ठ भक्त होते. ते म्हणतात,

'हे देवाधिदेवा, तुझा कधीही विसर पडू नये हेच मला दान दे. तुझे गुण मी आवडीनं गात राहीन. ते गुणगान हीच माझी आयुष्याची कमाई. मला संपत्ती नको, फार काय मुक्ती सुद्धा नको. मला फक्त संतांचा सहवास दे. तुझं स्मरण करण्यात, गुणसंकीर्तन करण्यात

आणि संतांच्या सान्निध्यात राहाण्यात माझं परमसुख सामावलेलं आहे. या व्यतिरिक्त कसलीही अपेक्षा नाही. मला फक्त एवढं दान दे आणि मग मी गर्भवासाचं दुःखदेखील भोगायला तयार आहे.'

भक्ताच्या अंतःकरणाचं हे दर्शन किती आनंददायक आहे. स्वार्थ नाही, अहंकार नाही, धनाची आणि कीर्तीची लेशमात्रही इच्छा नाही. कारण परमेश्वरी गुणसंकीर्तनात जे सुख मिळतं त्याची बरोबरी दुसऱ्या कुठल्याही सुखाशी करता येणार नाही. कल्पवृक्षाच्या शीतल छायेत पहुडलेल्या ज्ञानी माणसाला बाभळीच्या झुडपाची सावली कधी तरी मोह घालू शकेल का? ज्यानं अमृताची माधुरी चाखली तो एखाद्या क्षुद्र पेयाकडं ढुंकून तरी पाहील का? ईश्वराचं नामस्मरण आणि संत-सज्जनांचा सहवास हीच या जगातली परमोच्च सुखं आहेत. तुकोबांनी याच सुखांची मागणी देवाकडं केली आहे. विठ्ठल तर त्यांच्या श्वासोच्छ्वासात भरून उरला होता. त्याचा आपल्याला कधीही विसर पडू नये हेच वरदान त्यांनी मागितलं आहे. काय पाहिजे आहे? हे ज्याला सर्वार्थानं कळतं ते त्याला मिळू शकतं. जे ठिसूळ आहे, नाशवंत आहे, क्षुद्र स्वरूपाचं आहे ते मिळवण्याची इच्छा करणारे अज्ञानी लोक आणि तुकोबासारखा एक ज्ञानी भक्त या दोघांत केवढंतर अंतर आहे. तुकारामाला म्हणूनच जीवन कळलं होतं, देव समजला होता. मोक्षात काही अर्थ नाही याची जाण त्याला आली होती. हा महान संत-हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा ॥ असं आर्ततेनं मागत आहे. कारण काय मागावं हे त्याला कळलेलं आहे. 'गुण गाईन आवडी' हा विचार देखील महत्वाचा आहे. गुणांचं संकीर्तन करणं, त्या गुणांची महती जाणून घेणं हे मानसिक उदारतेचं द्योतक आहे. तुकोबासारखा उदारचरित संत उत्कट प्रेमानं परमेश्वरी गुणांचं चिंतन आणि स्तवन करू शकतो. माणसाच्या ठायी देखील असलेल्या गुणवत्तेची ओळख माणसानं करून घेतली पाहिजे. पण बहुसंख्य लोक गुणपूजा करण्याऐवजी निंदा करण्यातच अधिक रस घेतात. कारण त्यांची वृत्ती क्षुद्र असते. खरं तर गुणोत्कर्ष पाहिल्यानंतर आनंद वाटला पाहिजे. आजच्या संदर्भात या अभंगाचा विचार करताना मी म्हणतो की मुक्तकंठानं गुणांचं उद्गान करण्याची मनोवृत्ती आपल्यात यावी; हे दान ईश्वरानं आम्हाला द्यावं. हीच खरी जीवनातली संपदा आहे. गुणग्रहण करणं म्हणजे आपणच गुणवत्तेच्या उंच पायरीवर चढणं. तुकोबांचे अभंग सूक्ष्म दृष्टीनं वाचले तर त्यातून अनेक चिंतनसूत्रं सूचित झालेली दिसतात म्हणून मी म्हणतो, 'हेचि दान देगा देवा। तुकोबाचा विसर न व्हावा।'

❑❑❑

**जन्म मरणांची विसरलो चिंता । तू माझा अनंता मायबाप ।।**
**होतील ते डोळां पाहेन प्रकार । भय आणि भार निरसली ।।**
**लिगाडाचे मूळ होती पंच भूतें । त्यांचे या पुरते विभागिले ।।**
**तुका म्हणे जाला प्रपंच पारिखा । जिवासी तू सखा पांडुरंगा ।।**

मनुष्य प्रपंचात गुंतून पडतो. सुखदुःखांच्या वेटोळ्यात अडकून पडतो. खऱ्या अर्थानं तो कधीच स्वतंत्र असत नाही. प्रापंचिक वातावरणातून क्षणभर तरी दूर होऊन आत्मस्वरूपीचा आनंद त्याला उपभोगता येत नाही. साधुसंतांचं चित्त सुद्धा कित्येक वेळां प्रपंचातच गुरफटलेलं असतं. प्रपंच त्यांना सोडीत नाही. आणि ते प्रपंचाला सोडीत नाहीत. संन्याशाच्या मनात सुद्धा संसाराचा लोभ आणि मोह असतो तिथं सामान्य मनुष्याची काय कथा ? आत्मिक स्वातंत्र्याकडं वाटचाल करणारी तुकोबासारखी संसारविन्मुख वृत्ती फार थोड्या व्यक्तींची असते. संत ज्ञानेश्वरात ती होती. समाधी घेताना क्षुद्र प्रपंच त्यांनी पूर्णपणे बाजूला सारला. कोणत्याही विकारांचा लेशही त्यांच्या मनाला चिकटलेला नव्हता. त्यामुळं ते परम आनंदाचा अनुभव घेत होते. त्यांची समाधी संजीवन समाधी म्हणून प्रसिद्ध आहे. संत तुकाराम हे देखील आत्मसाक्षात्कारी सिद्धपुरुष होते. आपलं सारं जीवन आणि मन त्यांनी तपस्येनं शुद्ध केलं होत. आत्मानुभूतीच्या उंच पायरीवर ते उभे राहिले. प्रपंचातून ते झडझडून बाहेर पडले. मनाची निरामयता साधू शकले. या अवस्थेलाच मुक्ती म्हणायचे. कोणताही पाश नाही. चित्तवृत्ती अनंत अशा परमेश्वरी शक्तीत विलीन झाली आहे. जन्म आणि मरण यांच्या पलीकडं जो सौंदर्यपूर्ण प्रदेश आहे तो दिसत आहे. भय आणि प्रपंच यांचा भार गळून पडला आहे. पंचमहाभूतात्मक असा देह असतो. त्या महाभूतांची आपापल्या ठिकाणी वाटणी करून टाकली. आता परमेश्वर हाच एकमेव जिवलग उरला. ही विलक्षण अनुभूती तुकोबांना आली. तिचं वर्णन या अभंगातून केलं आहे.

ही दिव्य अनुभूती एकाएकी येत नाही. अनेक कठीण परीक्षांतून साधकाला जावं लागतं. तुकोबांचं संपूर्ण आयुष्य ही एक खडतर साधना होती. म्हणूनच तिचं वर्णन करताना त्यांनी *'रात्री दिवस आम्हा युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ।'* असं म्हटलं आहे. हा संघर्ष साधा असत नाही. तो तीव्र आणि अनेक पातळ्यावरचा असतो. अनेक आघाड्यावर चाललेल्या या युद्धात तुकाराम विजयी झाले आणि मग म्हणाले,

'जन्ममरणांची विसरलो चिंता । तू माझा अनंता मायबाप ॥'

तुकोबांच्या उच्च अशा मानसिक आणि आत्मिक पातळीवर आपल्याला जाणं मुळीच शक्य नाही असं मानू नये. तुकोबा आपल्यासारखेच सुखदुःखांच्या चक्रव्यूहात सापडले होते. कधीकधी त्यांचाही धीर गळून जायचा. पण निग्रहानं, नेटानं या सुखदुःखांच्या भोवऱ्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत राहिले. अपयशाच्या ठेचा लागत होत्या. केव्हातरी निराशेचा दाट अंधार भोवती पसरत होता. अशावेळी अंतःकरणातल्या ईश्वरी अस्तित्वाला मनापासून साद घातली पाहिजे ही जाणीव त्यांच्या अंतर्मनात होती. इतकी प्रयत्नशीलता तुम्हा आम्हा सामान्य माणसांत बहुधा असत नाही. पण भक्तीच्या वाटेनं प्रामाणिक पाऊलं टाकली आणि साऱ्या विकारांशी निकराचा संघर्ष केला तर आपल्याही व्यक्तित्वात तुकोबाची पारमार्थिक शक्ती जागी झाल्याशिवाय राहाणार नाही. जन्ममरणाची चिंता रात्रंदिवस करणाऱ्याला परमात्मा कसा भेटेल ? तुकोबा आपल्या हृदयाच्या गाभ्यापासून म्हणतात, 'हे अनंता, हे परमेश्वरा, तूच मायबाप. तूच सर्वस्व. तुझ्याच ठायी मला विलीन व्हायचं आहे. पंचमहाभूतांपासून हे सगळं लिगाड उत्पन्न झालं. ते सारं त्या महाभूतांना वाटून टाकलं. आता जन्माची आणि मरणाची भीतीच उरली नाही. प्रपंचाची वाट सरली. पांडुरंगाची भेट झाल्यावर आता मिळवण्यासारखं काहीच उरलं नाही.

या अभंगातली अनुभूती सूक्ष्म आहे. तुकोबांचा आदर्श आपल्याला पेलणार नाही असं म्हणणाऱ्या लोकांनी शक्य तितकं तुकोबांचं अनुकरण केलं पाहिजे. शरीराची सुखं आणि दुःख यांचं स्तोम माजवीत बसण्यापेक्षा पांडुरंगाच्या नामस्मरणात आणि चिंतनात काही वेळ तरी खोल बुडी मारली पाहिजे. हे करण्याची बहुतेकांची प्रवृत्तीच नसते. लौकिक आयुष्यातले मोह आणि कामक्रोध हेच सत्य आहे असं मानून त्यातच रस घेणाऱ्यांना तुकोबांना सापडलेला 'आनंदाचा डोह' कधीच दिसणार नाही. कारण शरीराच्या कुंपणाबाहेर एक विशाल, आनंदकारक विश्व पसरलेलं आहे हे त्यांना कळणं शक्य नाही. तुकोबांना हे कळलं. त्यांनी ते अनुभवलं. पांडुरंग म्हणता म्हणता तेच पांडुरंगरूप झाले. प्रपंचात राहून प्रपंचाला पारखे झाले. आणि जन्ममरण विसरून गेले. ही त्यांच्या विजयाची कहाणी आहे. ही त्यांच्या पुरुषार्थाची कथा आहे 'तुका आकाशाएवढा' हे सत्य आहे.

□□□

**याजसाठी केला होता अट्टाहास । शेवटचा दिस गोड व्हावा ॥**
**आता निश्चिंतीने पावलो विसावा । खुंटलिया धावा तृष्णेचिया ॥**
**कवतुक वाटे जालिया वेचाचे । नाव मंगळाचे तेणे गुणे ॥**
**तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आता दिवस चारी खेळीमेळी ॥**

आपला शेवटचा दिवस सर्वार्थांनी गोड व्हावा असं कुणाला वाटणार नाही ? जो विचारशील आहे त्याला असं वाटेल. पण बहुसंख्य माणसं शेवटच्या दिवसाचा-अंतिम क्षणांचा कधी विचारच करीत नाहीत. जगण्याच्या प्रक्रियेत हे लोक इतके गढून गेलेले असतात की आपल्या आयुष्याला शेवट आहे. त्याला पूर्ण विराम मिळणार आहे हा विचार त्यांच्या मनाला कधीच स्पर्श करीत नाही. खरं तर कसं जगायचं या विचाराइतकाच, किंबहुना त्याहून अधिक कसं मरायचं हा विचार महत्वाचा आहे. मृत्यूची एक जबरदस्त लाट आपल्याला जीवनापासून क्षणार्धात खेचून नेऊ शकते. आपलं अस्तित्व पुसून टाकू शकते. जीवनाची इमारत निमिषमात्रात उध्वस्त करू शकते. म्हणूनं आपण शेवटच्या दिवसाचाही विचार करून ठेवला पाहिजे असं त्यांच्या मनातही येत नाही. बळी द्यायला निघालेला बोकड जसा अज्ञानामुळं बेदरकार असतो. खाण्याशिवाय त्याचं कशावरही लक्ष नसतं. थोड्याच वेळात आपल्या गळ्यावरून सुरी फिरणार आहे ही कल्पनाही त्याच्या निर्बुद्ध डोक्यात नसते. तशीच अज्ञानी माणसांची अवस्था नाही काय ? पैशाच्या पाठीमागं धावायचं. इंद्रियांची सुखं वाटेल त्या मार्गानं मिळवायची, उच्च मूल्यं पायदळी तुडवीत नाना प्रकारच्या भोगात गुरफटून जायचं आणि एक दिवस मरणाचा घाला पडला की मातीला मिसळून जायचं हे सामान्य माणसाचं जगणं आणि मरणं असतं. आपल्या शेवटच्या दिवसाचंही नियोजन केलं पाहिजे. तो अखेरचा दिवस गोड झाला पाहिजे ही कल्पनाही सामान्य माणसाला सुचत नाही.

तुकारामांनी मात्र जीवनाचा आणि मरणाचा सुसंगत, तर्कशुद्ध विचार करून ठेवला आहे. हा देह एक दिवस सोडावा लागेल आणि मृत्यूचं बोट धरून त्याच्याबरोबर वेगळा प्रवास करावा लागेल याची स्पष्ट जाणीव त्यांच्या चित्तात होती. त्यामुळं आपला अंतिम दिवस देखील रसमय झाला पाहिजे याची त्यांनी तरतूद करून ठेवली होती. शेवटचा

दिवस देखील गोड व्हावा याची मानसिक तयारी संत जन्मभर करीत असतात. जसं आपलं जीवन आपल्या हाती आहे तसंच आपलं मरणही आपल्याच हातात आहे हा आत्मविश्वास त्यांना असतो. *'स्मरण असावे मरणाचे'* असं संतवचन आहे. मृत्यूचं स्मरण हे सुद्धा मनुष्याला जीवन सुंदर आणि पवित्र बनवायला मदत करू शकतं. एका अत्यंत अहंकारी, दुष्ट प्रवृत्तीच्या माणसाला संत एकनाथांनी सांगितलं की त्याचं आयुष्य केवळ सात दिवसांचं उरलं आहे. हे ऐकल्याबरोबर त्या घमेंडखोराचा गर्व गळून गेला. तो अंतर्मुख झाला, त्याच्यातली दुष्प्रवृत्ती ओसरून गेली. ज्यांच्याशी तो वाईट वागला होता त्या सर्वांची त्यानं मनःपूर्वक क्षमा मागितली. त्याचा दृष्टिकोनच बदलून गेला. या कथेतला तात्त्विक आशय लक्षात घेतला पाहिजे. मरणाची जाणीव माणसाच्या मनोवृत्तीत बदल घडवून आणू शकते. शेवटचा दिस गोड करण्यासाठी सारं आयुष्यच गोड केलं पाहिजे कारण कोणता दिवस अखेरचा आहे हे कसं कळणार ?

संत तुकारामांनी या अभंगात मांडलेला तात्त्विक विचार अत्यंत अर्थपूर्ण आहे. त्यांनी म्हटलं आहे. 'माझा शेवटचा दिवस चांगला व्हावा यासाठीच मी अट्टाहास केला. परमेश्वराच्या चिंतनात आणि नामस्मरणात आयुष्य घालवलं. साऱ्या वासना आणि तृष्णा आता ओसरून गेल्या आहेत. कोणतीही विवंचना उरली नाही. हरीच्या मंगल ध्यानात जीवन व्यतीत करू शकलो याचा मला आनंद वाटत आहे. मुक्तीरूपी नवरीशी आता माझं लग्न झाल्यामुळं उरलेले दिवस सुखासमाधानात जातील' तुकोबांच्या या कृतार्थ उद्गारातून त्यांच्या मनातला आनंद ओसंडून वहात आहे. सारा जन्म ईश्वरध्यानात, आत्मचिंतनात गेल्यामुळं स्वार्थ संपला, अहंकाराचा लेशही उरला नाही. तृप्ती आणि शांती यांचे सूर साऱ्या जीवनाला वेढून बसले. सारेच क्षण मधुर बनल्यानंतर शेवटचा दिवस देखील असाच मधुर वातावरणात विलीन होणार यात कसली शंका ? दुसऱ्या एका अभंगात तुकोबा म्हणतात,

*'आपुले मरण पाहिले म्यां डोळां । तो जाला सोहळा अनुपम्य ।'* मृत्यू हा देखील एक सोहळा असतो आणि तो आपल्याला गोड करून घेता आला पाहिजे हे त्यांचं तत्त्वज्ञान आनंदवादी आहे. तुकोबा मांगल्याचे आणि आनंदाचे उपासक होते. शेवटचा दिस गोड करण्याचा विचार म्हणजे आनंदवाद आणि आशावाद यांचा आविष्कार आहे. एक सुंदर निकोप जीवन जगण्याची आणि तृप्त व शांतमनानं मृत्यू स्वीकारण्याची युक्ती

तुकारामांनी सांगितली आहे. शेवटचा दिवस जो गोड करू शकतो त्याचं आयुष्य यशस्वी झालं. अंतिम क्षणापर्यंत जीवनातली माधुरी आणि प्रसन्नता टिकवून धरण्याची शक्ती आपल्या जीवनातच सामावलेली असते. *'मन करा रे प्रसन्न । सकळ सिद्धीचे कारण ।'* तुकोबांच्या या वचनाचा इत्यर्थ इतकाच की आपलं मन कोणत्याही भौतिक सुखदुःखांच्या आधीन होऊ न देता उच्च आदर्शांच्या विचारात रमवलं पाहिजे. मन शुद्ध आणि सदैव प्रसन्न ठेवणं हीच शेवटचा दिवस गोड करण्याची युक्ती आहे.

❑❑❑

**आम्ही जातो आपुल्या गावा । आमुचा रामराम घ्यावा ।।**
**तुमची आमची हेचि भेटी ।येथुनियां जन्मतुटी ।।**
**आता असो द्यावी दया । तुमच्या लागतसे पायां ।।**
**येतो निजधामी कोणी । विठ्ठल विठ्ठल बोला वाणी ।।**
**रामकृष्ण मुखीं बोला । तुका जातो वैकुंठाला ।।**

संत तुकारामांचा उत्कट भावनेनं ओथंबलेला हा अभंग वाचकांच्या अंतःकरणात हुरहुर निर्माण करतो. या थोर संतानं जगाचा अखेरचा निरोप घेण्याचं ठरवलं आहे. खरं तर तुकोबा शरीरानं मर्त्य लोकात वावरत होते. पण त्यांचं मन मात्र सदैव वैकुंठातच विहरत होतं. स्फटिकासारखं स्वच्छ, गंगाजळासारखं निर्मळ जीवन जगलेला हा परमभक्त पांडुरंगाच्या रूपात विलीन होण्यासाठी उत्सुक झालेला होता. ते सावळं परब्रह्म रात्रंदिन त्याच्या दृष्टीसमोर उभं होतं. तुकोबा विठ्ठलरूप बनलेले होते. ते तृप्त होते. शांत होते. कोणतीही पार्थिव आकांक्षा त्यांच्या चित्तांत उरली नव्हती. स्वतःसाठी किंवा कुटुंबासाठी काही मिळवावं या इच्छेचा लेशही त्यांच्या मनात राहिलेला नव्हता. *'तुका म्हणे आता उरलो उपकारापुरता ।'* असं त्यांनीच म्हटलेलं आहे . समाजाचं कल्याण इच्छिणारा आणि त्यासाठी सारं जीवन समर्पित करणारा हा महापुरुष अखेरचा निरोप या अभंगातून घेत आहे.

तुकोबांनी साऱ्या जीवमात्रांवर आपल्या प्रेमाचं पांघरूण घातलं. विश्वजीवनाशी त्यांचं अतूट नातं जुळलं होतं. ते एखाद्या विशिष्ट संप्रदायाचे नव्हते. देहूत राहिलेला हा संत साऱ्या मानवतेशी सहकंप पावत होता. त्यामुळं तुकोबांच्या व्यक्तित्वाला, मनाला आणि त्यांच्या कवित्वाला कोणत्याही सीमा पडलेल्या नाहीत. तुकोबा हा मानवतेचा कवी आणि संत आहे. विशालहृदयी माणूस जेव्हा जगाचा निरोप घेतो तेव्हा त्याचे शब्द मनुष्यप्रेमानं थबथबलेले असले तर त्यात आश्चर्य नाही. त्यांच्या शब्दांत नम्रतेचा सुगंध आहे. प्रेमाचा चैतन्यस्पर्श आहे. हा अभंग वाचताना तुकोबा जणू आपला हात हातात घेऊन आपल्याशी आत्मीयतेनं संवाद करीत आहेत असं वाटतं. त्यांची सारी अभंगवाणी ही मनुष्यमात्राशी केलेल्या प्रेमसंवादासारखी आहे. माणूस उत्तमरीतीनं घडावा, त्याच्यातली पशूता निरसून जावी, माणुसकी उत्तरोत्तर उन्नत व्हावी हीच प्रबल इच्छा ठेवून तुकोबांनी

आपल्या साहित्याची निर्मिती केली. सर्व प्रकारचा छळ सोसून ते लिहीत राहिले. गात राहिले. कीर्तनांतून प्रबोधन करीत राहिले. शिवाजी महाराजांनी भेट म्हणून पाठवलेल्या उंची वस्त्रालंकारांकडे त्यांनी दृष्टिक्षेपही केला नाही. त्यांच्या घरात दारिद्रय होतं पण मनात अपार समृद्धी होती. अशी माणसं जगाला प्रकाश देतात, प्रेरणा देतात.

या अभंगात ते म्हणतात, 'आता येथून जन्मतुटी. आता पुन्हा भेट नाही. आता अम्हा द्यावी दया. तुमच्या लागतसे पाया' विनम्रतेचा, सात्त्विकतेचा, शुद्ध विचारांचा आणि निरपेक्ष प्रेमाचा हृदयस्पर्शी आविष्कार या अभंगातून झाला आहे. 'पसायदाना'तलं ज्ञानेश्वरांचं मन आणि या अभंगात व्यक्त झालेलं तुकोबांचं मन दोन्ही एकच आहेत. आत्मवेलीचा विकास झाला म्हणजे तिच्यावर कशी भावसुगंधानं दरवळणारी फुलं उमलतात याची उदाहरणं संतांच्या साहित्यात कितीतरी सापडतात. तुकोबाची गाथा हे मराठी सारस्वतातलं कधीही न सुकणारं भावपुष्प आहे यात शंका नाही.

अखेरचा निरोप घेताना तुकोबा एक संदेश जगाला देतात. ते म्हणतात, 'तुमच्या घरी कोणी आला तर विठ्ठलाचं नाव तुमच्या वाणीतून निघू द्या. रामकृष्णांचं स्मरण करा. तुमच्या मुखी दैवतांची पवित्र नावं राहू द्या. हेच माझं तुम्हाला अखेरचं सांगणं आहे. मला निरोप द्या. मी आता वैकुंठाला जातो.'

हे शेवटचे शब्द आपण विसरू शकू का ? तुकोबांनी उच्चारलेले अंतिम शब्द केवळ साहित्यालाच नव्हे तर तुमच्या आमच्या मनाला संपन्न बनवणारे आहेत. जे शब्द मनाला श्रीमंती देतात त्यांनाच साहित्याची प्रतिष्ठा प्राप्त होते. विकार वाढवणारे, वासना चाळवणारे, मन मळवणारे शब्द लिहिणारे लेखक , कवी साहित्याच्या बाजारात आपापली दुकानं थाटून बसलेले आहेत. पण आपल्या हृदयीचा सुगंध जगावर उधळणारे आणि आपल्या अभंगवाणीच्या धारेनं समाजमन स्वच्छ करणारे तुकोबांसारखे संतकवी जागतिक साहित्यात फार थोडे आहेत. तुकोबांच्या शब्दांना म्हणूनच मोल आहे. अशा कवीचे बोल मानवजातीला आपला तोल सावरायला मदत करतात.

अखेरचा निरोप घेणारा हा अभंग वाचकांच्या हृदयात कालवाकालव निर्माण करतो. एक नंदादीप आपले शेवटचे किरण देऊन विझून जाणार आहे ही कल्पना असह्य वाटते, अंधाराला कवटाळून बसणारे रातकिडे जगात कमी नाहीत. खरं तर या

रातकिड्यांनीच जग भरलं आहे. अंधाराशी संघर्ष करणारे स्वयंप्रकाशी नंदादीप मात्र तेवत राहिले पाहिजेत. ते जरी आपल्या गावाला निघून गेले असले तरी अभंगवाणीच्या रूपानं आमच्या अंतःकरणात आहेत. आमच्या श्वासनिःश्वासात आहेत. ते महाराष्ट्राच्या व्यक्तित्वात आणि मानवी संस्कृतीच्या सामर्थ्यात आहेत. तुकोबा अमर आहेत.

संतांच्या व्यक्तिमत्त्वात अपार्थिव सौंदर्य असतं पार्थिव शरीर नाहीसं झालं तरी या सौंदर्याला अक्षयतेचं वरदान असतं. संतांच साहित्य हे मानवी संस्कृतीचं वैभव असतं. त्यामुळं तुकाराम त्यांच्या अपार्थिव रूपात दीर्घकालपर्यंत आपल्याला सोबत करीत राहातील. महाराष्ट्राच्या मनोभूमीत खोलवर रूजलेला तुकाराम नावाचा कल्पवृक्ष आपल्याला त्याच्या विचारभावनांची रसमय फळं देत शतकानुशतकं उभा राहील, 'आम्ही जातो आपुल्या गावा' असं जरी या संतानं म्हटलं असलं तरी तो महाराष्ट्राच्या कणाकणांत, मराठी भाषेच्या प्रकृतीत आता पूर्णतः मिसळून गेलं आहे. त्यानं दिलेली अभंगवाणी जोपर्यंत आमच्या अंतःकरणात तेवत आहे तोपर्यंत 'ओस जाल्या दिशा मज भिंगुळवाणे' असं आपल्याला कधीही वाटणार नाही. 'उलट फोडू कळिकाळाचे शिर' हा आत्मप्रत्यय रसरसून फुलेल 'तुकोबांचे अभंग आम्हाला अभंग ठेवतील. एकच मागणं आहे.'

हेचि दान देगा देवा । तुकोबाचा विसर न व्हावा ।'
न लगे मुक्ति आणि संपदा । संतसंग देई सदा ॥
यापेक्षा अधिक मागण्यासारखं काही नाही.

❑❑❑

## डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे प्रकाशित साहित्य

१ लोकहितवादी : काल आणि कर्तृत्व
२ साहित्यवेध
३ संतकवी तुकाराम : एक चिंतन
४ काही रंग काही रेषा
५ हिरव्या वाटा
६ आनंदाची डहाळी
७ संत चोखामेळा आणि समकालीन संतांच्या रचना
८ जगायचं कशासाठी?
९ रंग एकेकाचे
१० संत सहवास
११ संतांचिया भेटी
१२ अमृतकण कोवळे
१३ संतवीणेचा झंकार
१४ समाजपरिवर्तनाची चळवळ : काल आणि आज
१५ सुखाचा परिमळ
१६ प्रिय आणि अप्रिय
१७ चिंतनाच्या वाटा

### संपादित

१ ज्ञानेश्वरी : अध्याय पहिला
२ चिपळूणकरांचे तीन निबंध
३ प्रबोधनातील पाऊलखुणा
४ निवडक लोकहितवादी
५ रत्नकरंड श्रावकाचार
६ यात्रिक
७ कल्लोळ अमृताचे

डॉ. निर्मलकुमार फडकुले हे संत साहित्याचे एक व्यासंगी भाष्यकार, ललित लेखक व समीक्षक आणि प्रभावी वक्ते या नात्याने महाराष्ट्राला परिचित आहेत. संतकवी तुकारामांच्या काही महत्त्वपूर्ण अभंगांवर त्यांनी अधिकारवाणीने केलेले हे रसमय अर्थपूर्ण भाष्य.

तुकारामांची अभंगवाणी ही त्यांची जीवनकहाणी आहे. जीवनाचा या संताने आणि तत्त्वज्ञाने केलेला विचार कसा सर्वांगीण आहे याचे साधार विवरण करताना डॉ. फडकुले यांच्याही चिंतनाची साक्ष पटते. आपल्या सहजसुंदर, काव्यात्म शैलीतून त्यांनी तुकारामांच्या कवित्वाचा आणि जीवनदृष्टीचा घेतलेला वेध वाचकांना प्रसन्न आणि अंतर्मुख करील. तुकोबांच्या अभंगवाणीतील सामर्थ्यसौंदर्याच्या अमृतधारा आपल्या शब्दांतून चित्रित करण्याचा हा एक लक्षणीय प्रयत्न.

'अणुरणिया थोकडा' असलेला एक माणूस आपल्या आत्मबळावर 'आकाशाएवढा' कसा झाला याचे विश्लेषण यात आहे.